# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग २ : मराठी

सत्र-३ **Major Mandatory**

## समकालीन मराठी कविता

सत्र-४ **Major Mandatory**

## वाङ्मय प्रकाराचा अभ्यास : कादंबरी

## साहित्यकृती : नांगरमुठी - पांडुरंग पाटील

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN - 978-93-49570-14-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती ज्योती जाधव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ अभ्यासमंडळ : मराठी ■

**अध्यक्ष – प्रा. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. नंदकुमार मोरे**
  मराठी विभाग
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शीतल गोरडे–पाटील**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **प्रा. अरुण शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **प्रा. गोमटेश्वर पाटील**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. संदीप दळवी**
  श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. सागर पाटील**
  कन्या महाविद्यालय, मिरज, जि. सांगली
- **डॉ. एकनाथ पाटील**
  श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स
  ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले
- **प्रा. प्रकाश दुकळे**
  देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲण्ड
  सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली
- **डॉ. सर्जेराव जाधव**
  यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
  जि. कोल्हापूर
- **प्राचार्य, गोविंद काजरेकर**
  गोगटे–वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी,
  जि. सिंधुदुर्ग
- **प्रा. रमेश साळुंखे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अशोक तवर**
  लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स
  ॲण्ड कॉमर्स सातारा.
- **प्रा. तातोबा बदामे**
  पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
  तासगांव, जि. सांगली

# संपादकीय

विद्यार्थी मित्रहो,

बी. ए. भाग दोन (मराठी) सत्र तीनसाठी 'समकालीन मराठी कविता' व एका वाङ्मय प्रकाराचा अभ्यास : कादंबरी या विषयावरील पाठ्यपुस्तक आपणांपुढे ठेवताना आनंद होत आहे. समकालीन साहित्याचे स्वरूप समजावे असा या प्रकारच्या अभ्यासपत्रिकेमागे हेतू आहे. भाषासाहित्याच्या विद्यार्थ्यांची समकालीन साहित्यविषयी विषयाची जाण अद्यायवत असावी अशी यामागे धारणा आहे. या अभ्यासात तुम्हाला कविता व कादंबरी या प्रकाराचे स्वरूप समजेल तसेच समकालीन नऊ कवींच्या 'निवडक कवितांचा व नांगरमुठी' या कादंबरीचा अभ्यास करता येणार आहे.

बऱ्याचदा विद्यार्थ्यांना कविता या प्रकाराची ढोबळ माहिती असते. परंतु वाङ्मय प्रकाराच्या स्वरूपाचा सखोल परिचय असणे गरजेचे असते. या दृष्टीने कविता म्हणजे काय? कवितेचे स्वरूप व गुणविशेषांची माहिती तुम्हाला होणार आहे. तसेच कविता या प्रकाराचे आकलन व विश्लेषण कसे करावे व मूल्यमापनासंबंधी तुम्हाला माहिती होईल. जेणे करून विद्यार्थ्यांची कविताविषयक जाण अधिक विस्तारेल. समकालीन मराठी कविता ही विविधस्वरूपी आहे. तीमध्ये अनेकविध संवेदनांचे व जाणिवांची रूपे आहेत. कविता ही नेहमीच आपल्या काळाला अधिक जवळची असते. त्यामुळे या कवितेतून सामाजिक, भौतिक या अवकाशाचे संदर्भ असणे स्वाभाविक आहे. समकालीन मराठी कवितेची लिपी ज्यांनी घडविली अशा प्रातिनिधीक स्वरूपातील नऊ कवींच्या कवितांचा यात समावेश आहे. प्रवाहकेंद्री भाषेत बोलायचे झाले तर भावकविता, ग्रामीण कविता, दलित स्त्रीवादी कविता, आदिवासी, महानगरीय, लोकप्रिय कवितांचा यात समावेश आहे. तो समकालीन मराठी काव्याचे काहीएक प्रातिनिधिक दर्शन घडविणारे आहे. विचार, भावना, कल्पना, संवेदनांचा यात आविष्कार आहे. सामाजिक पडझडीच्या नोंदी आहेत. स्त्रियांच्या बदलत्या जगाचा कानोसा आहे. स्त्रीकेंद्री समाजचिकित्सा आहे. ग्रामीण, शेतकरी जीवनाचा कैफियतसूर आहे. जागतिकीकरणातील पडझडीबरोबर निसर्ग संवेदनांची रूपे आहेत. तसेच 'बाईपणा'च्या विविध संवेदना आहेत.

कवितेतील या विविध प्रकारच्या जाणीव विश्वाबरोबरच समकालीन कवितेचे रूपविशेष त्यातून लक्षात येतील. समकालीन कवी भाषेची व वाङ्मयरूपाची कोणती जाण. प्रकट करीत आहेत याचे दर्शन घडेल. या कवितेतील लयी, अल्पाक्षरत्व व कवितेचे सौंदर्यतत्त्वांची माहिती होईल.

विद्यार्थी मित्रहो, 'कादंबरी' हा एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराचा अवकाश विस्तृत आहे. त्यामुळे मानवी जीवनातील समग्रतेचा वेध घेण्याची क्षमता या वाङ्मय प्रकारामध्ये आहे. या वाङ्मय प्रकाराची संरचना कथानक, पात्रचित्रण, निवेदन आणि भाषा या घटकांवर उभी असते. कादंबरी प्रकाराचा तुम्हाला या अभ्यासानिमित्ताने परिचय होणार आहे. कादंबरीचे स्थूलमानाने काही प्रकार केले जातात. तेही तुमच्या लक्षात येतील. तसेच मराठी कादंबरीची दीर्घ परंपरा, स्थित्यंतरे, महत्त्वाचे वळण टप्पे यामधून मराठी कादंबरीचा विकासक्रम तुमच्या लक्षात येईल. या सर्व संकल्पनात्मक आणि माहितीपट गोष्टींचा उपयोग तुम्हाला अभ्यासक्रमातील 'नांगरमुठी' या कादंबरीचा अभ्यास करताना होईल. ही कादंबरी पांडुरंग पाटील यांनी लिहिली असून कृषिजनसंस्कृतीचा आलेख मांडणारी समकाळातील ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. शेती, वारकरी परंपरा, गाव परिसरातील माणसांच्या वृत्ती-प्रवृत्ती, श्रद्धा, राजकारण, नातेसंबंध, आंदोलने अशा विविध विषयसूत्रांचे पारदर्शी चित्रण पांडुरंग पाटील यांनी या कादंबरीत केले आहे. तसेच या कादंबरीतून प्रकटलेली जीवनदृष्टीही समृद्ध करणारी आहे. या कादंबरीतील कथानक, पात्रचित्रण, वातावरणनिर्मिती, आशयसूत्रे आणि वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास तुम्हाला निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

विद्यार्थी मित्रहो, कवितास्वरूपाच्या ज्ञानाबरोबरच समकालीन मराठी कवितेचे स्वरूपाची माहिती होण्यासाठी, तसेच कादंबरी हा वाङ्मय प्रकार समजून घेण्यासाठी हे स्वयंअध्ययन साहित्य तुम्हाला उपयुक्त ठरणार आहे.

■ संपादक ■

**डॉ. सदीप दळवी**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

**प्रा. रणधीर शिंदे**
प्रमुख, मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | |
|---|---|
| दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **सत्र–३ : समकालीन मराठी कविता**<br>**सत्र–४ : वाङ्मय प्रकारचा अभ्यास : कांदबरी**<br>**साहित्यकृती : नांगरमुठी** |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकांचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ३ | सत्र ४ |
| **डॉ. सुप्रिया आवारे**<br>सिद्धार्थ नगर, पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १, २ | |
| **डॉ. कविता मुरुमकर**<br>घर नं. १६, चिराग रेसिडन्सी, २५५ रविवार पेठ,<br>दयानंद कॉलेज जवळ, सोलापूर, जि. सोलापूर | ३, ४ | – |
| **श्री. रवी लोंढे**<br>मराठी अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. सुखदेव एकल**<br>मराठी अधिविभाग,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | २, ४ |
| **डॉ. प्रदीप पाटील,**<br>विवेकानंद महाविद्यालय,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. संदिप दळवी**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

**प्रा. रणधीर शिंदे**
प्रमुख, मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

बी. ए. २ – मराठी

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–३ : समकालीन मराठी कविता** | |
| १. | कविता म्हणजे नेमके काय? | १ |
| २. | निवडक कविता : भाग– १ | १७ |
| ३. | निवडक कविता : भाग–२.१ | ३० |
| ४. | निवडक कविता : भाग–३.१ | ६३ |
| | **सत्र–४ : वाङ्मय प्रकाराचा अभ्यास : कादंबरी** | |
| | **साहित्यकृती : नांगरमुठी – पांडुरंग पाटील** | |
| १. | कादंबरी : एक वाङ्मयप्रकार | १०० |
| २. | नांगरमुठी आशयसूत्रे | ११७ |
| ३. | नांगरमुठी : पात्रचित्रण, वातावरण | १४० |
| ४. | नांगरमुठी : कादंबरीचा रूपबंध | १६२ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना :**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक ०१

# कविता म्हणजे नेमके काय?

## १.१ उद्दिष्टे-

१) कविता या प्रकाराचा संक्षिप्तपणे परिचय होईल.

२) कवितेच्या स्वरूप वैशिष्ट्य अभ्यासणे.

३) कवितेच्या विविध घटकांची माहिती होईल.

४) समकालीन मराठी कवितेचा परिचय होईल.

४) समकालीन कवितेचे स्वरूप समजून घेणे.

## १.२ प्रस्तावना-

कला ही आदिमानवाची निर्मिती आहे. ती त्याची प्रथमतः मानसिक व भावनिक गरज आहे. नंतर याच गरजेचे रूपांतर त्याच्या सांस्कृतिक व सामाजिक अविष्कारामध्ये झाले. कला ही मनुष्याच्या शरीर, मन, आत्मा या सर्वास व्यापून आहे. कलेच्या माध्यमातून आदिमानवाने आपल्या सृष्टी विषयीच्या परस्परांविषयीच्या अनुभूती व्यक्त करण्यासाठी अनेक माध्यमांचा आधार घेतला. जसे की, वाद्य, तालबद्ध शारीरिक हालचाली यासोबतच माती, दगड, रंग, लाकूड या सर्वांच्या माध्यमातून व्यक्त होता येते ही त्याची स्वाभाविक कृती होती. आदिमानवास लागलेला शब्दांचा शोध हा त्यापैकीच एक होय. या शब्दाच्या जोरावर आणखी नव्या पद्धतीने व्यक्त होता येते या स्वतःतील सर्जनशक्तीचाही त्याला शोध लागला. त्यामुळे कला ही आदिमानवाच्या अंतःस्फूर्त भावनांना मिळालेली वाट आहे, असे म्हणता येते.

कविता ही कला आहे. तशीच जीवन हे देखील कला आहे. तेव्हा मानवी जीवनाशी कला तादात्म्य होताना एका सुंदर क्षणी घडलेली अविस्मरणीय घटना म्हणजे कविता आहे. अशी कविता जी कलेचा आविष्कार असते. हा आविष्कार सर्जनशील मनाची कृती असते. सौंदर्यपूर्ण अनुभूतीची अभिव्यक्ती असते. म्हणूनच कला आणि सौंदर्य यांना वेगवेगळे करता येत नाही. कलेतून अभिव्यक्त होणाऱ्या सौंदर्याची रूपे भिन्न आहेत. परंतु सौंदर्य हा कलेचा स्थायीभाव आहे. प्रत्येक कलावंत आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून सौंदर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो. याच कारणाने प्रत्येक सौंदर्यासक्त मन कलेकडे धाव घेत असते. सौंदर्याचा शोध हे कलावंताचे ध्येय असते.

## १.३ कविता एक साहित्यप्रकार -

साहित्याच्या अभिव्यक्तीचे माध्यम त्यातील शब्द व भाषा हे असते. साहित्य हे अनेक शब्दांच्या अर्थपूर्ण मांडणीतून व विभिन्न भाषांच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असते. त्यातून मानवाच्या विविध वैशिष्ट्यपूर्ण भावना

व्यक्त होत असतात. शब्दांशिवाय साहित्याचे अस्तित्व असू शकत नाही. या साहित्याच्या संकल्पनेमध्ये गद्य व पद्य हे मुख्य भाग समाविष्ट आहेत. कथा, कविता, कादंबरी, नाटक असे साहित्याचे मुख्य प्रकार आहेत. हे साहित्य गद्य अथवा पद्य स्वरूपाचे असते. ही विभागणी करताना भाषेचे कथन आणि अंतःस्फूर्त भाव हे गुण नजरेसमोर ठेवलेले असतात. मनुष्याला नेहमीच काही सांगायचे असते. हे सांगणे म्हणजेच कथन तर एखाद्या अनुभूतीच्या क्षणी अंतःस्फुर्त भावना उचंबळून येऊन त्यांची अभिव्यक्ती ही शब्दांच्या माध्यमातून होत असते. मनुष्याला काही अविष्काराची इच्छा असते; त्यास नाट्यात्म भाव असे म्हटले जाते. कथा, कादंबरी, कविता व नाटक अशी वाङ्मयाची विभागणी मनुष्याच्या या वृत्तींच्या आधारे केली गेलेली आहे. मानवी भावभावनांच्या आविष्काराचे हे आकृतिबंध आहेत.

कादंबरीत दीर्घ प्रदीर्घ स्वरूपाची असते. कविता अल्पाक्षरी असते. कवितेची शब्द कला नादमय असते. शब्द लयबद्ध असतात. कवीच्या मनातील अंतरिक संवेदनेच्या प्रत्यय असतो. कवितेचा स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण प्रवास आहे. कविता निर्माण होण्यापूर्वी, कविता निर्माण होताना आणि कविता निर्माण झाल्यानंतर अशा अनेक टप्प्यावर कविता नेहमी टवटवीतपणे वाटचाल करत असते. नादमय शब्दांमधून निर्मिलेली कविता हि विविध प्रकारची असते.सरस कविता ही नेहमी त्या भाषिक परंपरेतील महत्त्वाची कविता असते.

मानवी मनातील भावना, संवेदनांचे प्रकटीकरण दृश्य काम कवितेत असते. भावना नेहमी अनुभूतीच्या पातळीवर असतात. त्या तरल भावानुभवांना वस्तुरूप देणे हे कवितेचे लक्ष्य असते. ज्याला मुळातच आकार आहे त्याची चित्रे काढणे सोपे पण जे निरवयव आहे त्याचे चित्र शब्दासारख्या माध्यमात रेखाटणे सोपे नाही. कित्येकदा चांगली कविता शब्दावाचून अडते हे अनेक कवी नमूद करतात. एकतर भाव हे मूलद्रव्य आणि शब्द हे माध्यम! ह्या दोन्ही न दिसणाऱ्या हवेतल्या गोष्टी. पण कवितेची सर्व भिस्त ह्याच तरल गोष्टींवर अवलंबून असते. म्हणूनच कविता ही सर्वश्रेष्ठ कला मानली जाते. कारण ती संपूर्ण स्वरूपातील कवीने साधलेली नवनिर्मिती असते. कविता ही कला पर्यायाने स्वान्तशोधा जसा असतो तसाच जीवनाचा शोधही. भावनेसंदर्भातील मूलसत्य शोधण्याचा, ते सावयव करण्याचा तो एक प्रयत्न असतो.

कविता हा प्रकार प्राचीन असला तरी तिचा प्रवास दीर्घकालीन आहे. तिच्यात विविध परंपरा आहेत. स्वान्तःशोधाय म्हणता म्हणता स्वान्तःसुखाय झालेली, नंतर भक्तिरसात बुडून गेलेली प्रारंभीची मराठी कविता आधुनिक काळात इंग्रजी राजवटीत केशवसुतांच्या प्रतिभेने कवितेच्या रूपात अविष्कृत झाली. मर्ढेकर-मुक्तिबोधांच्या रूपाने तिच्यात पुन्हा आमूलाग्र बदल घडून आले. केवळ आत्मपर भावापुरते मर्यादित न राहता, आत्मनिष्ठेच्या ठिकाणी सामाजिक जाणिवेचा फलक प्राप्त झाला. जुनी कविता आणि नवी कविता, संतकविता आणि पंतकविता, शाहिरी कविता, तसेच आधुनिक कविता आणि नवकविता, छंदबद्ध कविता आणि मुक्तछंदातली कविता अशी तिची अस्तित्वरेषा आढळते.

### १.४ कविता साहित्यप्रकाराचे घटक-

प्राचीन साहित्यशास्त्रात एकंदर साहित्याला काव्य म्हटले जाई. अर्थात पद्य हेच वाङ्मय निष्काराचा प्रमुख भाग होता. यावरून कविता या प्रकाराचे प्राचीनत्व लक्षात येते. सुरुवातीला सौंदर्याची निर्मिती ज्यातून होते त्या

सर्वच ललित घटकांना काव्य संबोधण्याची प्रथा होती. नंतर या ललित साहित्याच्या हेतूनुसार त्यात भेद करून कथा व नाटक हे दोन प्रकार बाजूला झाले आणि कविता हा ललित वाङ्मयाचा प्रधान मूलभूत प्रकार म्हणून कायम राहिला. सर्व साहित्यप्रकार या कला वस्तू असून काव्य हा त्याचा आत्मा आहे, असे प्राचीन साहित्यशास्त्र मानते. त्याच्या मुळाशी सौंदर्य निर्मितीचे गृहीतक आहे. त्यामुळेच ललित साहित्याचे सर्व गुणधर्म सर्व साहित्य प्रकारांना लागू आहेत आणि सर्वच साहित्य प्रकारांमध्ये काव्य आहे, असे म्हटले जाते.

आदिमानवाच्या सहज स्वाभाविक अंतःस्फूर्त कृतीतील लालित्य हे काव्यात्म मानले जाते. काव्याचे लालित्य व भावात्मकता हे गुणधर्म पाहता कविता ही आदिमानवापासून अस्तित्वात असल्याचे लक्षात येते. म्हणूनच काव्य ही संकल्पना अधिक मूलभूत, समावेशक व संमिश्र आहे. कविता ही कधी जन्मास आली? असा प्रश्न केला तर त्याचे निश्चित उत्तर देता येत नाही. कारण लोकभाषा व लोकसाहित्यातच तिचा जन्म असल्याचे लक्षात येते. सोबतच कविता म्हणजे काय? याचा शोध घेताना तिच्या स्वभावगुणांचा शोध घ्यावा लागतो. तिच्यातील अंतःस्फूर्तता व लयबद्धता विचारात घ्यावी लागते. लयबद्धता आणि अर्थपूर्ण प्रतिमा यांच्यातून निर्माण झालेला गोळीबंद आशय हा कविता असतो. मानवाचा प्रथम अनुभव हा प्रतीकात्मकच आहे. या प्रतिमांमध्ये आदिमानवाचा सृष्टी विषयक आकलानाचा अनुभव समाविष्ट आहे. तो आदिमानवाचा सृष्टी विषयक अंत:स्फूर्त अनुभव आहे. कवितेतील अंत:स्फूर्तता प्रतिमांना आवाहन करत असते. त्यामुळेच कवितेमध्ये प्रतिमांचे महत्त्व हे वरच्या दर्जाचे असते. कवितेतील अंत:स्फूर्तता प्रतिमांना घेऊन येते तेव्हा साहजिकच तिचा अल्पाक्षरत्व हा स्वभाव बनतो. अंत:स्फूर्ततेतील भावनांचे उचंबळलेले पण हे खरे तर शब्दांना कवितेचे रूप प्राप्त करून देत असते. वड्र्सवर्थ देखील उत्कट भावनेचा उत्स्फूर्त आविष्कार अशीच कवितेची व्याख्या करतो. कविता ही एक अनुभूती असते. रस रंग गंध इत्यादीचा ती आविष्कार असते, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यातून येणाऱ्या प्रतिमा, लय आणि सौंदर्य हे कवितेचे अस्तित्व रूप असते. हे अस्तित्व रूप सांस्कृतिक व सामाजिक अवकाशातील असते. परिस्थितीचे नेणिवेतील आकलन अंत:स्फूर्ती मध्ये समाविष्ट असते. त्याचा प्रतीकात्मक आकृतिबंध म्हणजे कविता असते, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यामध्ये परंपरा, संस्कृती, जीवनशैली समाविष्ट असते. त्यामध्ये माणसाच्या परंपरांचा कवितेशी अतूट संबंध आहे. कवितेची भाषा ही प्रतिमांची व लयीतील सौंदर्याची असते. कवितेचा आशय हा अशाप्रकारे आदिमकाळापासून समकालापर्यंत सर्व आकलनाला कवेत घेणारा असतो.

इतर सर्व साहित्य प्रकारांच्या निर्मितीकालीन भावावस्थेपेक्षा काव्यनिर्मितीकालीन कवीची भावावस्था अधिक तल्लीन व उत्कट असते. ही एकरूपता कवीला कल्पनेच्या भराऱ्या घेण्यास वाव देते. ही एकरूपता ही संवेदनशील मनाचा अविष्कार असतो. त्यामुळेच संवेदनशीलता हा कवीचा स्वभावधर्म असतो. कल्पना ही भावनांनी प्राप्त परिस्थितीला सौंदर्यपूर्ण व अर्थपूर्ण प्रतिक्रिया देताना काढलेली वाट असते. अशावेळी भावात्मक अभिव्यक्ती सौंदर्याचा प्रकार बनते. या एकात्मतेमध्ये कलावंत आपल्या ठायीच्या प्रतिभा शक्तीच्या आधारे नवनिर्मितीचा आनंद घेतो. कलावंताला हा आनंद मिळणे गरजेचे असते. यामध्ये तार्किकता नसते. कार्यकारण संबंध नसतो. केवळ अनुभवांमध्ये न सापडलेले त्याचे असतेपण असते. एक प्रकारे ते आत्मभान असते. व्यक्तीच्या आंतरिक भावना संवदेनाचा आविष्कार शब्दासारख्या माध्यमातून रेखाटणे सोपे नाही. पण ही अवघड कृती कवितेसारखा साहित्य प्रकार साध्य करू पाहतो. त्यासाठी काही वेळा त्यास व्यावहारिक नियमांची, पूर्वसिद्ध प्रकार

व घाटाची तोडफोड करावी लागते. हीच नवनिर्मिती असते ज्यातून कवितेची नवी भाषा जन्म घेते.

कवी व वाचक यांच्यातील संवाद हा देखील सौंदर्यपूर्ण असतो. साहित्य प्रकारानुसार या संवादाचे स्वरूप वेगवेगळे असते. गद्य आणि पद्य यातील संवादातील फरक स्पष्ट आहे. गद्याला संवादासाठी अनेक शब्दांचा आधार घेता येतो. परंतु कवितेला ती मुभा नसते. संपृक्तता हे तिचे वैशिष्ट्य आहे. हा संवाद कलाकृतीच्या अस्तित्व रूपाचा महत्त्वाचा घटक असतो. कविता निर्मितीपूर्व जसा संवाद सुरू असतो तसाच वाचक अथवा आस्वादकाचा कलाकृतीशी तिच्या निर्मितीनंतर संवाद सुरू राहतो. या संवादातील तगमग अभिव्यक्तीला कारण ठरते. तर वाचकांसाठी हा संवाद अनुभूतीचा भाग असतो. रंग, रूप, रस, गंध ही तत्त्वे काव्यानुभूतीची वाहक असतात. रूप म्हणजे आकृती. रंग हा त्याला व्यक्तिमत्व देणारा घटक. यातून होणारा संवाद सौंदर्याची अनुभूती देत असतो.

### १.५ कवितेच्या विविध व्याख्या-

प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांनी काव्याचे शरीर आणि काव्याचा आत्मा या घटकांच्या आधारे कवितेचे स्वरूप उलगडून दाखवले. त्यानुसार कवितेच्या विविध व्याख्या केल्या गेल्या. 'शब्दार्थौ सहितौ काव्यं' या भामहच्या व्याख्येत शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य असे सांगितले आहे. 'ननु शब्दार्थो काव्य' असे रुद्रट म्हणतो. (खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य.) दोषरहित, अलंकृत आणि रसयुक्त शब्दार्थ म्हणजे काव्य असे तो सुचवितो. अंतःकरणातील अभिप्रायाचा आविष्कार म्हणजेच रसपरिपोष, रसपरिपोष हाच कवीचा हेतू असतो. दंडी इष्टार्थयुक्त पदावली म्हणजेच काव्याचे शरीर असे सांगतो. 'रीति: आत्मा काव्यस्य' या वामनाच्या व्याख्येत रीति म्हणजे विशिष्ट गुणांनी युक्त अशी पदावली हाच काव्याचा आत्मा असे म्हटले आहे. तर 'जगन्नाथ रमणीयार्थप्रतिपादको शब्दो काव्यं' असे सांगतो, त्याच्या मते रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य, मात्र या सर्व चर्चेत विश्वनाथाने रस हेच काव्याचे प्राणभूत तत्त्व असे स्पष्ट केले. 'वाक्यं रसात्मक काव्यं' ही त्याची व्याख्या अनेक शतके चालू असलेल्या काव्याविवेचनाचा समारोप करते. याप्रकारे आपल्याकडे प्राचीन काव्याच्या व्याख्या आहेत.

रस या कसोटीचा विचार करत असताना क्षेमेंद्राने औचित्यविचाराला महत्त्वाचे स्थान दिले. रसाचा उत्कर्ष साधणारी शब्दालंकारांची उचित योजना म्हणजे औचित्य. आनंदवर्धनाचा ध्वनिसिद्धांत आपल्याकडे क्रांती घडवतो. मम्मटाच्या दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फुट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य या म्हणण्याचा आजच्या कवितेशी जवळचा संबंध पोहचतो असे दिसते. आलंकारिक शब्दार्थांनाच महत्त्व देणाऱ्या दृष्टीला स्फुट अलंकाररहित शब्दार्थ हे खटकले. काव्यामध्ये रसालंकार प्रकट किंवा अप्रकट स्वरूपात असू शकतात या म्हणण्यात कवितेचा नाद, तिच्यातील काव्यलय अधोरेखित होते. कवितेला तिच्या स्वतःच्या भाषेचे जे अवगुंठन असते त्यात तिचा अंतरीचा नाद गुंजत असतो. त्यालाच आशयाची लय प्राप्त होते.

कविता म्हणजे काय याचा विचार करत असताना आपण जसे प्राचीन भारतीय साहित्यशास्त्र काय म्हणतात ते पाहतो त्याचप्रमाणे पाश्चिमात्य साहित्यशास्त्रांचाही आपण विचार करतो.

'लयबद्ध विचार म्हणजे काव्य' असे कार्लाईल मानतो तर 'सौंदर्याची लयबद्ध निर्मिती म्हणजे काव्य' असे एडगर एलन पो चे म्हणणे आहे. 'काव्य ही कल्पना आणि भावना यांची भाषा होय', असे हॅझलीट म्हणतो. कवितेला

टी. ई. ह्यूम अंत:स्फूर्त उद्गाराचे मर्म असे म्हणतो आणि उत्कट भावनेचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे काव्य ही वर्डस्वर्थची कवितेची व्याख्याही तेच सांगते.

कवितेकडे एक हळुवार साहित्यप्रकार म्हणून पाहण्याचा प्रघात मोठा होता. poem should not mean But he(आर्चीबॉल्ड मॅक्लीश) poem is as a flower is. It does not mean असे म्हटले जाऊ लागले होते. त्या अनुषंगाने मराठी आधुनिक कवितेच्या वाटचालीत कवितेचा आभास देणाऱ्या अनेक उडत्या, हलक्याफुलक्या रचनांचा प्रादुर्भाव झाला. पण भालचंद्र नेमाडे यांनी 'टीकास्वयंवर' या ग्रंथात कवितेविषयी जी भूमिका प्रस्तुत केली. ती विचारात घेता कविता म्हणजे काय? त्याचा उलगडा होईल. ते म्हणतात की, नुसत्या हळुवार किंवा मोहक ओळींना कविता म्हणता येत नाही. लयबद्ध शब्द म्हणजे कविता नव्हे. कवितेचे लयतत्त्व आपल्याला नीट समजले पाहिजे, इंग्रजीमध्ये उपलब्ध झालेल्या लयतत्त्वाचा संपूर्ण व सखोल अभ्यास करून बा. सी. मर्ढेकर लयतत्त्व उलगडून देतात, भालचंद्र नेमाडे यांनीही कवितेतील लयतत्व अगदी सरलपणे स्पष्ट केले आहे. ते म्हणतात की, शब्दांच्या अर्थाचा मनोमन प्रतीत होणारा ताल म्हणजे लय व असे ताल ज्या ओळींनी साधतात त्या ओळी लयबद्ध होत. अशा लयबद्ध ओळींच्याद्वारे जर एक संपूर्ण आकार उमटविला तर ती कविता होय.

प्रा. रा. श्री. जोग यांनीही शब्द इकडचे तिकडे आणि तिकडचे इकडे फेकून देण्याची कला म्हणजे कविता नव्हे असे म्हटले. तर काव्य ही एक अशी कला की तिचे शिल्प, चित्र, नर्तन, इत्यादी कलांबरोबर साधर्म्य असते. त्या सर्व कलांचे अस्तित्व त्यामधील सौंदर्यदर्शनावर अवलंबून असते. तर आता आपल्याला या सौंदर्य नावाच्या घटकाचा नीटपणे विचार करावा लागेल. ह. ना. आपटे यांनी कवितेचा विचार करताना त्यामधील नाद, अर्थ व ध्वनी हे घटक अधोरेखित केले. शब्द यथोचित असावेत. बाह्यांग आणि अंतरंग सुंदर अर्थयुक्त असणे कवितेत आवश्यक असे म्हटले. सुधीर रसाळ कवितेची व्याख्या करताना 'प्रतिमांची सेंद्रिय संघटना म्हणजे कविता' असे म्हणतात. वसंत आबाजी डहाके कवितेच्या रूपबंधाचा सविस्तर विचार करताना नादवती, अर्थवती, ध्वनीवती शब्दरचना म्हणजे कविता असे म्हणतात. गंगाधर पाटीलही कवितेच्या वेगळ्या भाषिक अंगाकडे लक्ष्य वेधतात, वसंत पाटणकर यांनी तिच्या ठायी आलेल्या आत्मभानाकडे (केशवसुत), परस्परसंबंधांकडे लक्ष्य वळविले. कविता एक साहित्यप्रकार म्हणून तिला भिडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रा. ग. जाधव कवितेकडे आस्वादात्मक भूमिकेतून पाहतात. म. सु. पाटील कवितेकडे मिशेल रिफोटेरी यांच्या चिन्हमीमांसेच्या परिदृष्टीतून पाहतात.

या सर्व विवेचनातून कवितेचे घटक व स्वरूप - वैशिष्ट्ये लक्षात येतात.

### १.६ कवितेचे प्रकार–

कवितेचे रचनेनुसार आणि आशयानुसार प्रकार पडत असतात. ढोबळ मानाने विधान करायचे झाले तर प्राचीन काव्यप्रकारातील पद या प्रकारात मोडणारे आरती, स्तोत्र, भूपाळी, गौळण व आख्यानकाव्याचे अन्य प्रकार हे प्रामुख्याने रचनाकेंद्री काव्यप्रकार होत, तर आधुनिक कविता ही प्रामुख्याने आशयकेंद्री आहे. केवळ सादरीकरण या उद्दिष्टाने येणारे सर्वच काव्यप्रकार हे अर्थातच रचनाकेंद्री प्रकार असतात. काळाच्या प्रवाहाबरोबर चालतानाकवितेने भोवतालच्या वास्तवाच्या दाबाखाली अधिकाधिक आपल्या अस्तित्वाची, अस्मितेची प्रतिक्रिया देताना आपला आकार प्राप्त केला त्यामधूनच आपण तिचे प्रकार अधोरेखित करतो.

प्राचीन मराठी वाङ्मयात रूढ असलेले पद्य प्रकार हे लोकपरंपरा (मौखिक) आणि शिष्ट (संस्कृत लिखित) परंपरा या दोन्ही प्रवाहांतून चालत आलेले दिसतात. शिष्ट परंपरेच्या सहवासातून संस्कृत काव्यातील अक्षरगणवृत्ते आणि मात्रावृत्ते मराठी काव्यातही प्रविष्ट झाली. त्याचप्रमाणे प्राकृत व लोकसाहित्याच्या संपर्कातूनही काही पदबंध मराठीत आले. महानुभाव आणि वारकरी या दोन संप्रदायांनी सुरुवातीच्या मराठी पद्यरचना प्रस्तुत केल्या आहेत. वारकरी संतांनी लोकसाहित्याची संगत ओवी, अभंग, इत्यादी रूपांत लिखित पातळीवर आणली.

प्राचीन काळात मराठीत कोणकोणते पदबंध अस्तित्वात होते हे आपल्याला मराठी आद्य गद्यग्रंथ 'लीळाचरित्र' व महानुभावांचे इतर चरित्र-वाङ्मय यामधून समजू शकते. त्यामधून नमन (मंगलाचरण, जती), धवळे, चौपदी, पदे, ओवी (अभंग), भारूड यांचे उल्लेख आढळतात. गुजराती आणि जैन कवींच्या संगतीने मराठीत फागडा हा पद्य प्रकारही रचला जात होता. चक्रधरांनी फागडा गाइला असा 'लीळाचरित्रात' उल्लेख आढळतो. तुकारामांनीही फागडा रचल्याची नोंद आहे.

जती: देवाचा वा मानवी राजाचा जयजयकार करणाऱ्या नमनाला जती असे म्हणत. महाराष्ट्र बिरुद गायनासाठी विख्यात होता. महानुभाव पंथ याला जती म्हणे, वारकरी यालाच नमने म्हणत. संगीतरत्नाकर ग्रंथात याचा मंगलाचार असा उल्लेख येतो, तर राजदरबार याला बिरुद-गायन असे संबोधतो,

धवळे : धवळे हा दाक्षिणात्य लोक संस्कृतीतील मंगलचरण गायनाचा प्रकार. मराठीतही महदंबेच्या (११६४-१२३४) रूपात आपल्या समोर आहे. मराठी, कन्नड, तेलगु स्त्रिया हा छंद विवाहगीतांमधून जोपासत. लोकसंस्कृतीचे कृषी-परंपरेचे मूळ या छंदात जोपासलेले आहे. वैलाशी असणारा लोक श्रीचा संवाद त्यावाटे अक्षरबद्ध आहे. महदंबेच्या धवळ्यांची रचना चार पादांची असून प्रत्येक चार पादांच्या शेवटी जय जय श्री प्रभू गोविंदा असे पालुपद येते.

स्तोत्रे: हा संस्कृत मधील रचना प्रकार मराठीत आलेला आहे. मराठी स्तोत्र-महात्म्यपर रचना भक्तीभावमय आहेत. नरेंद्रापासून ते मोरोपंतापर्यंत स्तोत्रलेखन मोठ्या प्रमाणात झाले. कोणतेही स्तोत्र एखाद्या देवतेची स्तुति करणारे असते. देवाचे सामर्थ्य, त्याचा महिमा अनेकदा उदाहरणांसह सांगितलेला असतो, मराठीतील बहुतांश स्तोत्रे ओवीबद्ध असली तरी मारुतीचे रामदासकृत भीमरूपी स्तोत्र अनुष्टुभ वृत्तात आहे.

चौपदी: वास्तविक चौपदी हा छंद सिद्ध व नाथ वाङ्मयात रूढ़ होता. चक्रधरांनीही एक चौपदी गायली होती. आद्य चौपदी रचनाकार दामोदर पंडिताने ६० चौपद्या रचल्याचा उल्लेख आढळतो. त्यापैकी ३५ मराठी तर बाकी हिंदीत आहेत. (गोरखबानी व नामदेवाच्या हिंदीशी साम्य)

ओवी : ओवी हा प्राचीन काळापासून चालत आलेला लोकपरंपरेतील स्त्री-हृदयाने जोपासलेला गेय प्रकार. प्राचीन काव्यात मोठ्या प्रमाणात हा छंद होता. लोककाव्यात ओवी रूढ आहे. तिच्या गेयतेच्या वैशिष्ट्यामुळेच प्राचीन कवींनी तो वापरला.

साधारणपणे ओवी चार चरणाची असते. पहिल्या तीन चरणाच्या शेवटी यमक जुळविलेले असते. चौथा चरण लहान असेल तर त्याला साडेतीन चरणाची ओवी असे म्हणतात, पसायदान हे याचे स्पष्ट उदाहरण होय.

अभंग : ओवीचे जुळे भावंड वाटावा असा हा काव्यछंद, ओवी आणि अभंग यांच्या सीमारेषा अगदी धूसर आहेत. संगीत हा घटक लक्षात घेतला तर ओवी व अभंग यामधील फरक लक्षात येतो. अभंग तालगेयता धारण करतो तर ओवी स्वरगेयरूप आपलेसे करते. ओवी तालापासून मुक्त झाली. अभंग तालबद्ध राहतो. एकाच प्राकृत तालगेय छंदातून (षट्पदी व अर्धचतुष्पदी) ओवी आणि अभंग विकसित झाले. ओवीप्रमाणेच अभंगाची रचनाही लवचीक असते. अभंग हे ओवीचेच तालगेय रूप असते

भारूड : भारूड म्हटल्याबरोबर एकनाथ पुढे येतात. प्रबोधनाचे कार्य मराठी संत सामाजिक समस्येच्या किती मुळाशी जाऊन साधू पाहतात त्याची कल्पना कीर्तन, भारूड-जोहार यांसारखे प्रकार पाहता स्पष्ट होते. भारूड हा लोकनाट्याचा एक प्रकार आहे. भारुडातून एकपात्री प्रयोग सादर होत असतो. मध्यवर्ती पात्र सोंग वठवत असते, गीत आणि अभिनय या माध्यमातून आध्यात्मिक संदेश पोहोचवला जात असतो. भारूडाचाच दुसरा प्रकार जोहार, जोहारामध्ये जातिभेद व कर्मठपणाचा उपहास असतो. गोंधळ्यांचे आख्यान देवीमाहात्म्य सांगते पण भराडीच्या भारूडाला-आख्यानाला विषयाचे बंधन नसते. भारूड हे रूपक या कक्षेत बसते. वारकरी संप्रदायात हा प्रकार उपदेशपर रूपके या सदरात मोडतो. हा रचनाप्रकार दृश्य-काव्यात्मक प्रकार असतो.

पोवाडा व लावणी : मराठ्यांच्या इतिहासाची काव्यमय पर्वणी म्हणजे पोवाडा. शाहीर अज्ञानदास (अगीनदास) ज्याने सर्वांत जुना पोवाडा अफजलखानाचा वध गायिला त्याने आपण 'कडाका' गाईला असे म्हटले. छंद, कटाव, कटिबंध अशी विविध नावे त्यासाठी आढळतात.

शाहिरी कवितेत पोवाडा, लावणी यांबरोबर कटाव अथवा कटिबंध, फटका, भेदिक सवाल-जवाब, इत्यादी काव्यप्रकार आहेत. या अंतर्गत दीर्घ कविता प्रस्तुत झाल्या.

भेदिक सवाल : जबाब किंवा झगडा हा काव्यप्रकार तमासगीरांच्या फडात रंगतो, यांत संघर्ष असतो. नाट्य असते. रचना मुक्त असते. भाषा काहीशी सांकेतिक असते, काही ठोकताळे असतात. भेदिक फड आणि तमाशा यांचे जवळचे नाते असते. यालाच कलगी-तुरा असे म्हणतात. सवालाची लावणी ऐकणाऱ्याला सतर्क बनविते. गण, गौळण, भेदिक रचना, लावण्या, वग या सर्व प्रकारांमध्ये आख्यानात्मक कथात्मकता, कथनात्मकता, नाट्यात्मता हे विशेष संगीत, अभिनय, नृत्य या कलाप्रकारांसह प्रभावी झालेले असतात.

महाकाव्य मध्ययुगीन आणि आधुनिक मराठीत महाकाव्यरचना आहेत. महाकाव्य हा काव्याचा प्रकार असला तरी मुख्यतः हा कथनात्मक प्रकार आहे. आशयाची व्यापकता आणि विशालता हे महाकाव्याचे वैशिष्ट्य आहे. रामायण-महाभारत ही आर्ष महाकाव्ये आहेत तर कालिदास, भास, भारवी यांची महाकाव्ये विदग्ध आहेत. मध्ययुगीन मराठीत भास्करभट्ट, नरेंद्र या महानुभाव कवींनी शिशुपालवध व रुक्मिणीस्वयंवर ही महाकाव्ये लिहिलेली आहेत, आधुनिक मराठीत म. मो. कुंटे यांच्या 'राजा शिवाजी' या महाकाव्याप्रमाणे गणेशशास्त्री लेले, वा. वा. खरे, वि. वा. भिडे यांनी महाकाव्यरचना केलेल्या आहेत.

खंडकाव्य : विश्वनाथाने खंडकाव्य म्हणजे महाकाव्याचे अनुकरण करणारा पण आवाका कमी असणारा प्रकार असतो असे म्हटलेले आहे. संपूर्ण जीवनाचे किंवा किंवा एका युगाचे चित्रण करण्याऐवजी त्याच्या एका खंडाचे चित्रण खंडकाव्यात येते. खंडकाव्यात नाट्यतत्व अधिक असते. आख्यान कवितेहून खंडकाव्य वेगळे असते.

मराठीत रविकिरण मंडळाच्या काळात यशवंत, गिरीश यांनी खंडकाव्ये लिहिलेली आहेत.

दशपदी : आधुनिक काळात दशपदी हा रचनाप्रकार कवी अनिल यांच्या प्रतिभेने मराठी कवितेला प्रस्तुत केला. गझलेपेक्षा दशपदी कशी वेगळी आहे हेही त्यांनी स्पष्ट केले. दोन दोन ओळींचे एक पद अशा दहा पदांची एक कविता म्हणून दशपदी असे नाव दिलेले दिसते. एका ओळीत साधारणपणे आठ-दहा शब्द असतात, दोन ओळींच्या शेवटी यमक बहुधा असते.

मुक्तछंद : आधुनिक काळात जुन्या कवितेने कलाटणी घेतली. त्यातून मुक्तछंद हा काव्याचा नवा प्रकार अस्तित्वात आला आहे. स्वात्मनीच्या काळात कवितेसंदर्भात काय बदल झाले ? एक म्हणजे शैलीगत आविष्कार आता म्हणजेच मुक्त-छंद आला. आपले विचार व्यक्त करण्यासाठी सर्व प्रथम काव्याच्या पारंपरिक चौकटीतून मुक्त झाल्याशिवाय ते शक्य नव्हते. या विचार व्यक्त करण्याच्या गरजेतून कवितेचा छंद मुक्तछंद झाला. मुक्तछंद हा सामान्यत गद्यसदृश्यच असतो.

**१.७ आशयानुसार कवितेचे प्रकार -**

प्राचीन कवितेला श्रुतिगम्यता महत्त्वाची वाटत होती. पण नव्या कवितेत कथनाच्या ठिकाणी भाववणे, जाणवणे ही कृती अग्रेसर झाली. त्या दृष्टीतून कवितेने आपले तंत्र विकसित केले.

भावगीत : सगळी आधुनिक कविताच भावगीतात्मक असली तरी भावगीत हा एक स्वतंत्र प्रकार म्हणून मराठीत रूढ झालेला आहे. एकेकाळी मराठीत हा प्रकार तर फारच लोकप्रिय होता. भावना व्यक्त करणारी कविता चालीवर गाविली तर ती भावगीत होते. गायनानुकूलता हे ज्या कवितेचे वैशिष्ट्य ते भावगीत.

नाट्यगीत: नाट्यगीत हे संवादात्मक असते. संवाद दोन किंवा अधिक व्यक्तींमधला असू शकतो. व्यक्तींच्या संवादामुळे कविता नाट्यात्म बनते. 'तुझ्या गळा माझ्या गळा मोत्याच्या माळा' ही भा. रा. तांबे यांची कविता नाट्यगीत आहे.

सुनीत: इंग्रजीतील शेक्सपियर मिल्टन आणि वर्डस्वर्थ यांच्या रचनाप्रकारावरून मराठीत सुनीत हा कवितेचा प्रकार रूढ झाला. अर्थात, याचे श्रेय मराठी आधुनिक कवितेचे जनक कवी केशवसुत यांना जाते. बारा अथवा चौदा ओळींची एक संपूर्ण कविता पाहणे हे मराठी काव्यरसिकांना सवयीचे नव्हते. प्रारंभी सुनीताचा स्वीकार करणे अवघड गेले असले तरीही केशवसुतांच्या योगदानामुळे हा प्रकार मोठ्या प्रमाणात अनुकरणीय ठरला. सुनीत हा कविताप्रकार आशयानुसारी असला तरी तो ध्वनीप्रधान प्रकार आहे. सुनीतात योग्य प्रकारे गंभीर जीवनानुभव विशिष्ट वृत्तबंधातून प्रामुख्याने शार्दूलविक्रिडित वृत्तातून मांडले जाते. यमकाचे उपयोजन हुये प्राधान्याने होत असते.

गझल: गझल अरबी फारसीतून आणि उर्दूतून मराठीत आलेला पद्यरचनेचा प्रकार आहे. माधव ज्यूलियन यांनी मराठी भाषा-संस्कृतीला तिचा अधिक परिचय करून दिलेला असला तरी त्यापूर्वीही रसने न राघवाच्या थोडी यशात गोडी किंवा आनंदकंद ऐसा हा हिंददेश माझा या गझलसदृश रचना मराठीत दिसतात. गझल हा प्रामुख्याने प्रेमकवितेचा प्रकार आहे.

हायकू: हायकू हा आपल्याकडे आलेला जपानी मुक्त काव्य-प्रकार आहे. हा आशयप्रधान तसाच रचनाप्रधानही

प्रकार आहे. सर्वात लघुत्तम काव्यप्रकार म्हणून हायकूने जागतिक काव्यात आपले स्थान मिळवले. सतरा वर्णाच्या तीन ओळी असतात. पहिली ओळ पाच वर्णाची, दुसरी सात वर्णाची आणि तिसरी ओळ पुन्हा पाच वर्षांची असते. हा छंद असा अत्यंत संक्षिप्त दिसतो पण त्यामध्ये कथा सामावलेली असते) एखादे फार सुंदर चित्र त्यामध्ये रेखाटलेले असते. अर्थ-प्रक्रिया वाचकावर सोपविलेली असते.

विडंबन कविता : मराठीमध्ये प्र. के. अत्रे यांची 'झेंडूची फुले' मधील कविता हा एक स्वतंत्र असा प्रकार म्हणावा लागेल. इतक्या समर्थ विडंबन कविता मराठीत अन्य कोणी लिहू शकले नाही पण अत्रेंनी चांगली विडंबन कविता लिहिली. रविकिरण मंडळाच्या कवितेत येऊ लागलेल्या तांत्रिकता व कृत्रिमता यांचा उपहास करण्याच्या हेतूने अत्रे यांची विडंबन कविता असली तरी त्यांच्या विडंबन कविता तत्कालीन, केवळ स्वकेंद्रित्व जागवू पाहणा-या प्रवृत्तींचा उपहासात्मक प्रत्यय सामर्थ्याने आहे.

याशिवाय आधुनिक मराठीत उद्देशिका (oder), विलापिका, चिंतनिका, जानपद कविता असे (Pastoral Poetry) काही काव्यप्रकार हाताळले गेले पण आज हे प्रकार कालबाह्य झाले आहेत.

**१.८ कवितेचे आकलन-**

कवितेच्या स्वरूपाचा अभ्यास करताना कवितेचे घटक आपण अभ्यासले. त्या सर्व घटकांचा विचार कवितेच्या आकलनामध्ये केला जातो. कवितेच्या आकलन ही एक दीर्घ प्रक्रिया आहे. ती जितकी शास्त्रीय आहे तितकीच ती भावनिक देखील आहे. कारण कवितेमध्ये तिच्या तंत्राइतकेच कवितेतून व्यक्त होणाऱ्या भावनांना महत्त्व असते. कवितेचे वाचन करताना विशिष्ट भाव वृत्ती जागा झाल्या की आपोआप कवितेच्या आकलन शक्य होते. यासाठी काही वेळा कवितेच्या शब्दांवर लक्ष केंद्रित होते तर काही वेळा नाद प्रतिमा लय या गोष्टी कवितेच्या आकलनात भर टाकतात. म. सु. पाटील म्हणतात त्याप्रमाणे, आकलन ही केवळ बौद्धिक प्रक्रिया नाही तिचेही स्वरूप काही असेल तर अपूर्व असते ते यामुळेच. ते म्हणतात त्याप्रमाणे, आस्वाद आणि समीक्षा यांच्या मधल्या पातळीवरून चालणारी ती प्रक्रिया आहे असे वाटते

मराठी कवितेचे आकलन म्हणजे तिच्यातील विविध घटकांचा आणि अर्थांचा विचार करणे. यामध्ये कवितेतील भाषा, शैली, विषय, आणि भावना, लय, प्रतिमा व प्रतीके यांसारख्या घटकांचा समावेश होतो.

कवितेचा आशय व विषय कवितेतील अंतःस्फूर्त भावनांची अभिव्यक्ती ठरवत असते. ही अभिव्यक्ती कधीचा चिंतन व मननातून होत असते. या चिंतन मननामध्ये त्याच्या विचार व भावनांच्या वृत्ती व प्रवृत्ती, संस्कार, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती या सर्वांचा समावेश असतो. या सर्वांचा समावेश निर्मिती प्रेरणेमध्ये असतो. ही निर्मिती प्रेरणा जाणीव व नेणीव यांचा सर्वसमावेशक समतोल साधत असते. तीच या सर्वांच्या अभिव्यक्तीस कारण ठरते. ही प्रेरणा एक ऊर्जा असते; जी सर्जनशील असते. या निर्मिती प्रेरणेच्या आधारावरच कवी परंपरेचे मोडतोड करत असतो. भाषा अधिक सर्जक बनवतो. कवितेच्या विषय व तंत्रामध्ये बदल घडवून आणत असतो. निर्मिती प्रेरणेचे हे स्वरूप कवितेच्या आकलनामध्ये समाविष्ट करून घेणे गरजेचे असते. या सर्वातून कविता एक आकार व अर्थ धारण करते, त्याचे आकलन हेच कवितेचे आकलन असते. कवितेची अभिव्यक्ती जन्मताच एक शैली धारण करते. ही शैली अनेक गोष्टींच्या आधारे विशिष्ट अर्थाची निर्मिती करत असते. कवितेतील अर्थाचे आकलन म्हणजेच

कवीच्या अनुभवविश्व, विचारव्यूह, संवेदनशीलता, भावना, प्रतिमा प्रतिकांचे संयोजन व त्यातील नाद, लयीचे आकलन असते. येथे पु.शि.रेगे यांच्या एका कवितेचे उदाहरण घेता येईल.

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळांतली पुष्कळ तू
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी.

या कवितेमध्ये 'पुष्कळ' या शब्दाची दुरुक्ती लयीमध्ये अर्थपूर्ण सहभाग नोंदवते. या ओळींचे वाचन कवितेला एक नादाचा रूपबंध प्राप्त करून देते. या ओळींच्या वाचनात श्रुतीगम्य लय आहे. त्यातून 'पुष्कळ' या शब्दाचा छंद लक्षात येतो. 'पुष्कळ' या शब्दातील आंतरिक लय या कवितेचा आकृतिबंध आहे. 'पुष्कळ' शब्दाच्या पुन्हा पुन्हा येण्याने पुष्कळ ही एक प्रतिमा बनते. जी कवितेला अर्थ प्राप्त करून देते. पुष्कळ या शब्दातील अर्थाधिक्य कवितेतील प्रतिमेला उदात्तेपर्यंत नेते.

येशिल तेव्हा जपून ये तूं,
ठिसूळ माझ्या पहा बरगड्या;
आलिंगन तूं देतां मजला कडकडुनी,
ह्या पिचतिल निधड्या.

परंपरेमध्ये प्रेम या संकल्पनेला ऊर्जात्मक व भरीव अर्थ आहे. मर्ढेकरांनी या ओळींमधून पारंपारिक अर्थाची मोडतोड केली आहे. यातून निर्माण होणारा अर्थ हा वर्तमानातील बोथट झाल्या संवेदनशीलतेला अधिक अर्थपूर्ण करणारा आहे. आशय अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा प्रकारची मोडतोड गरजेची असते. यामागे मर्ढेकरांचा एक विचारव्यूह आहे. हा विचारव्यूह व तिची भूमिका समजून घेतल्याशिवाय या ओळींचे आकलन होणे अशक्य आहे. कवी व आस्वादक यांच्यातील विचार, भावना, अनुभव यांच्यातील अंतर आकलनात अडचण निर्माण करू शकते. अनेकदा मर्ढेकरांची कविता दुर्बोध वाटते ती यामुळेच.

देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत........... विं.दा. करंदीकर

या ओळींमध्ये अर्थाचे दोन पदर आहेत. या ओळींचे आकलन करून घेताना महातफ या शब्दाचा व्यंजनेने येणारा व्यंगार्थ लक्षात घ्यावा लागतो. हात म्हणजे हाताचा गुणधर्म म्हणजेच दान करण्याची वृत्ती, उदारता हा अर्थ येथे अपेक्षित आहे. या अर्थाच्या आकलना अभावी कवितेच्या आकलनामध्ये दोष निर्माण होऊ शकतो. म्हणूनच भाषेचे ज्ञान हे देखील आपल्याला मध्ये महत्त्वाची भूमिका निभावते. विशेषतः १९६० नंतरच्या कविता समजून घेण्यासाठी भाषेचे अनेक अंगानी ज्ञान असणे, तिचे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ माहीत असणे गरजेचे बनते.

कवितेच्या आकलनामध्ये हे समजून घ्यावे लागते. या प्रतिमांच्या अर्थांमधील आंतरिक लय आशयाला आकर्षक व प्रभावी बनविते.

युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना

किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करू प्रीतिची याचना ! (कुसुमाग्रज)

या ओळींमध्ये कविता स्वतःचा रूपबंध घेऊन आलेली आहे. तो रूपकात्मक व छंदात्मक आहे. यातील कल्पनाविश्व कवितेला एका वैश्विक अर्थांपर्यंत नेऊन पोहोचवते. या रूपबंधाने कवितेला लय प्रदान केलेली आहे. ही लय कवितेतील पृथ्वी व सूर्य यांच्यातील प्रेमाच्या आशयाला देखील अर्थपूर्ण बनवते.

'त्यांची सनातन दया फॉकलंड रोडच्या भडव्याहून उंच नाही
खरंच त्यांनी आपल्यासाठी आभाळात मांडव घातला नाही
बोलून चालून ते सामंतशाहा, त्यांनी तिजोरीत लॉक केलेला प्रकाश
लादलेल्या पडीबाज आयुष्यात फुटपाथ देखील आपली नाही

नामदेव ढसाळ यांचे अनुभवविश्व हे शोषित, दलित सर्वहारा वर्गाचे वास्तव चित्रत करणारे आहे. हे अनुभव विश्व त्यांच्या कवितांचा अर्थ लावताना लक्षात घ्यावे लागते. कवीचे अनुभवविश्व हे समकालाला सामावून घेणारे असते. तर आस्वादकाचे अनुभवविश्व  जर पारंपारिक मनोवृत्तीत अडकलेले असेल तर आकलनात मर्यादा येणे स्वाभाविक असते. येथे परंपरा आणि वास्तव, भांडवलशहा आणि कामगार वर्ग यांच्यातील वास्तवाचे चित्र तिजोरीत लॉक केलेला प्रकाश या प्रतिमेतून व्यक्त होते. वर्षानुवर्ष उच्चवर्णीयांकडून दलित वर्गावर अन्याय होत आलेला आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये देखील शोषितांची संख्या जास्त आहे. नामदेव ढसाळांनी समर्पक प्रतिमा वापरून त्यांचा जीवन संघर्ष व्यक्त केलेला आहे. कवीच्या विचार प्रक्रियेमध्ये प्रतिमांचे संयोजन कसे होते हे येथे लक्षात येते. या ओळी गद्यात्मक असल्या तरी यातील अर्थ ओळींना आंतरिक लय पुरवतो. ती लय आस्वादकाला आनंद देण्यासाठी त्या अनुभवविश्वाशी तादात्म व्हावे लागते.

ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन
निळासावळा झरा वाहतो बेटाबेटातून.
चार घरांचे गाव चिमुकले पैलटेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे.

बालकवी हे अतिशय संवेदनशील अशा वृत्तीची कविता लिहिणारे कवी आहेत. बालकवींचे भावविश्व निसर्ग प्रतिमा, त्यातील मृदुता व उदात्तता या अंगाने साकारते. या ओळींमध्ये एका झऱ्याचे व गावाचे लयबद्ध चित्रात्मक वर्णन आलेले आहे. या ओळींमधील परस्पर संवादातून या कवितेचे नादमय वाचन शक्य होते. त्यामध्ये यमक, अनुप्रास, अर्थाची व शब्दांची आंदोलने यांचा सहभाग आहे. यातील शब्दांची अल्पाक्षरी मांडणी प्रतिमांचे वर्णनात्मक जग उभे करते. अशा प्रकारची चित्रात्मक मांडणी कवितेला एका विशिष्ट क्रमाने अर्थापर्यंत पोहोचविते. या ओळींचे वाचन देखील अर्थामध्ये भर घालते. कवितेचा नादरूप रूपबंध कवितेच्या भावविश्वामध्ये समाविष्ट होऊन व्यक्त होत असतो. वाचकाला याचे आकलन होण्यासाठी कवीच्या संवेदनाविश्वाशी एकरूप होऊन जावे लागते.

कवितेच्या आकलनामध्ये या सर्व गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. कविता ही अल्पाक्षरी असल्याने तिच्यात सामावणारा अर्थ हा व्यापक असतो. त्यामुळेच तिच्या आकलनात अनेक अर्थ समाविष्ट होतात. कवितेचा एक

अर्थ शब्दात्मक असतो तर दुसरा अर्थ हा अर्थात्मक असतो. कवितेच्या अर्थात्मक अंगामध्ये तिचा अर्थ, आशय, आशय सूत्र, अनुभव, अनुभव विश्व, भावना, भावविश्व, विचार, दृष्टिकोन, तत्त्वज्ञान यांचा समावेश होतो. हा अर्थ कवितेच्या दृश्य शब्दातील अर्थापेक्षा वेगळा असतो. कवितेतील शब्दांची व ओळींची मांडणी देखील कवितेच्या अर्थामध्ये भर घालत असते. अर्थाधिक्य हे तिचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच वेगवेगळ्या अंगांनी कवितेच्या अर्थाचे आकलन शक्य असते. या शक्यता कवितेच्या आशयाला अधिक अर्थपूर्ण बनवतात. तुकारामांचे अभंग, ज्ञानेश्वरीतील ओव्या यासारख्या रचना यासाठीचे उत्तम उदाहरण आहे. एकनाथांची भारुडं आजच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर उपहासात्मक भाष्य करण्यास उपयोगी ठरतात. काही वेळा तंत्राच्या अंगाने कविता वेगळा अर्थ देते तर काही वेळा कल्पना व भावना यांच्या पातळीवरचा कवितेचा अर्थ वेगळा असतो. म्हणूनच आकलन करताना फार सावध राहावे लागते. केवळ बुद्धीचा वापर करून आकलन करता येत नाही तर त्यासाठी रसिक दृष्टी व कल्पकता यांचा सावधपणे उपयोग करून घ्यावा लागतो. रसिकतेसाठी आस्वाद अवश्यक असतो तर आकलनासाठी रसिकतेबरोबरच काव्याविषयीची बहुश्रुतता आवश्यक असते. ती सरावाने साध्य करावी लागते. या बहुश्रुत रसिकतेने कवितेचे एक एक पदर उलगडून पाहताना कविता आकळत जाते. यासाठी चिकाटीची देखील तितकीच गरज असते. कविता कठीण आहे म्हणून तिला नकार देणे चुकीचे ठरते.

### १.९ कवितेचे मूल्यमापन -

कवितेचे मूल्यमापन म्हणजे तिच्यातील कलात्मकता, भावना, विचार, आणि भाषा यांवर आधारित तिची गुणवत्ता ठरवणे. कवितेचे मूल्यमापन करताना अनेक घटक विचारात घेतले जातात, जसे की लय, यमक, भाषाशैली, आणि कवितेतून व्यक्त होणारे भाव.

कवितेतून व्यक्त होणारा अर्थ कवितेच्या मूल्यमापनामध्ये महत्त्वाची भूमिका निभावतो. तात्पुरता व तात्कालीक अर्थ कवितेला तिच्या प्रतिष्ठेपासून व उदात्तेपासून दूर नेतो. श्रेष्ठ दर्जाच्या कवितेतील अर्थ हा वैश्विक जाणिवांना स्पर्श करणारा असतो. साहित्यातून मानवी मूल्यांची जपणूक व मानवाची प्रतिष्ठा यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. कवितेने देखील अशा स्वरूपाच्या आशयाची मांडणी करणे अपेक्षित असते. वैश्विक मूल्यांचे भान देणारी कविता ही श्रेष्ठ दर्जाची मानली जाते. या वैश्विकतेमध्ये सृष्टी, मानव व त्याचा भवताल, त्यांचे परस्परांतील संबंध समाविष्ट आहे. अशी कविता चिरकाल मानवी जगण्याला सहाय्यभूत असते. व्यवहार व भावना यांचा समतोल साधणारी असते अशा कवितेकडे मानवाच्या संघर्षात्मक परिस्थितीत उपचारात्मक ताकद म्हणून पाहिले जाते. अशी कविता पक्षपाती नसते. जात, धर्म, वर्ग, लिंग अशा भेदभावाला ते दूर ठेवणारी असते. तिच्यातील सर्वसमावेशक सहिष्णुता तिला उदात्त बनवते. अशा कवितेतील कल्पनाशक्ती देखील वास्तवाच्या पायावर आधारलेली असते. त्यातून कवितेला एक अर्थ सांगायचा असतो. कविता ही विचार व भावना यांचा कलात्मक वापर करून एक सर्जक कृती बनलेली असते. अशी कृती ही उच्च दर्जाची असते. मानवी जीवन व्यापून असणारे वास्तव कवितेचा विषय बनते तेव्हा अशी कविता हे श्रेष्ठ दर्जाचे असते. मानव, सृष्टी, भवताल, सृष्टी, त्यांच्यातील परस्पर सहसंबंध व वास्तवातील घडामोडी या सर्वांतील मानवी जीवन या सर्वच गोष्टी कवितेचा विषय बनतात. या सर्व घटकांची कलात्मक मांडणी कवितेला आशय पुरवते. या मांडणीचे स्वरूप देखील कवितेच्या मूल्यमापनामध्ये महत्त्वाची भूमिका निभावते. कलात्मकतेमध्ये कवितेची शैली, लय, प्रतिमा, प्रतीके, रूपके या सर्वाचा विशिष्ट सहसंबंध

कवितेला घट्ट आकार देतो. ओळींची यमकबद्ध रचना ही कवितेला नादमधुर अथवा आकर्षक बनवू शकते. परंतु ती कवितेच्या अर्थामध्ये भर टाकेलच असे नसते. अशावेळी कवितेच्या मूल्यमापनामध्ये या घटकांचा आणि आशयातील अर्थाचा सहसंबंध लक्षात घ्यावा लागतो. कवितेची शैली ही तिची व कवीची ओळख असते.

### १.१० समकालीन कविता-

समकालीन हा शब्द सहज वापरला जात असला तरी समकालीनता ही एक संकल्पना आहे. सर्व प्रकारच्या समकालीनतेकडे या दृष्टीनेच पाहायला हवे. समकालीनता ही प्रामुख्याने काळाशी संबंधित आहे. त्यामध्ये प्रत्यक्ष काळात जगतानाचा विचार मूल्य, संवेदना, निष्ठा, भौतिकता, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती या सर्वांचा समावेश होतो. या सर्वांच्या वेगवेगळ्या संदर्भातून समकालीनता घडत जाते. समकालीनतेला एक दिशा मिळते. ही दिशा मानवी जगण्याची असते. त्यातून काळाचे संदर्भ घडत जातात. समकालीनतेचे हे सर्व संदर्भ साहित्यामध्ये त्या त्या काळात दृश्य होत असतात. समकालाचे आकलन करून घेण्यासाठी सभोवारची परिस्थिती सजग राहून अनुभवावी लागते. समकालीनता ही दैनंदिन जगण्याशी प्रामाणिक असते. ही पारदर्शकता साहित्यात कितपत उतरली आहे यावरच साहित्याचे मूल्यमापन होत असते. पूर्वपरंपरा त्यासाठी आधारभूत मानावी लागते. मराठी कवितेच्या पूर्वपरंपरेमध्ये काळाच्या प्रत्येक टप्प्यावर ही समकालीनता कवितांमधून दृश्य होताना दिसते.

मराठी कवितेला आठशे वर्षांची परंपरा आहे. या परंपरेची प्रेरणा धार्मिक, आध्यात्मिक आहे. या प्रेरणेतून मराठीमध्ये विपुल काव्यलेखन झाले. त्यामध्ये संतकाव्य, पंडिती काव्य, शाहिरी काव्य अशा काव्याच्या धारा निर्माण झाल्या. मराठी कवितेला अनेक संत, पंडित व शाहिरांनी आपले भरीव योगदान दिले. त्यामध्ये अभंग, आरत्या, स्पुष्ट काव्य, आयान काव्य, श्लोक इ. अशी विपुल रचना झाली. पारमार्थिक बोध, रंजनपरता, समाजप्रबोधन या उद्देशाने काव्यरचना केली गेली. आध्यात्मिक काव्याची प्रेरणा इहवादाकडे झुकू लागली. हा बदल लक्ष वेधून घेणारा होता. नंतर इंग्रजी राजवटीने मराठी समाजामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला. इंग्रजांनी मराठी समाजाला पाश्चात्य संस्कृतीची ओळख करून दिली. इंग्रजांचे शासन भारतीयांवर असल्याने या संस्कृतीला रुजायला व मराठी मनावर राज्य करायला फार सायास पडले नाहीत. भारतीय समाजात घडणारे बदल हे पाश्चात्य समाजात घडणाऱ्या बदलांचे पडसाद होते असेही म्हणावयास हरकत नाही. औद्योगिक काळातील समग्र बदलांनी ढवळून निघणारा समाज व मनाच्या प्रवृत्ती याने साहित्य व कलेवर परिणाम घडवून आणला. मराठी साहित्यात या सर्व बदलास आधुनिकता व आधुनिकतावाद अशा संकल्पना दिल्या गेल्या आहेत. परंतु त्यानंतरही जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या काळात मानवी वृत्तीबदल घडून आला त्यास उत्तरआधुनिकता म्हणून संबोधले गेले. ही संकल्पना प्रामुख्याने पाश्चात्य देशात उदयास आली. परंतु जागतिकीकरणात जग जवळ आले. बहुसांस्कृतिकता व अनेकता जगभर निर्माण झाली. त्याचा परिणाम भारतातही झाला. तेव्हा पाश्चात्य संकल्पनेचे पडसाद भारतीय समाजात दिसणे स्वाभाविक होते या संकल्पनेचे विशेष भारतीय संस्कृती व भारतीय मनाला दिसू लागले. त्याचे मराठी कवितेतील स्वरूप उत्तर आधुनिक कवितेची संकल्पना समजून घेताना अभ्यासावे लागते.

## १.११समकालीन कवितेचे स्वरूप–

आधुनिक कवितेने अभिजाततेमध्ये रमणाऱ्या कवितेचा तोंडावळा बदलला. हा तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक राजकीय आर्थिक परिस्थितीतील बदलाचा परिणाम होता. औद्योगिक बदलाने मानवी जग व मन बदलून टाकले त्याचा हा परिणाम होता. मानवाच्या आस्थेची ठिकाणं बदलून मानवा मानवातील सहसंबंधांचे स्वरूप बदलले. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत पर्यावरणाची हानी झाली. निसर्गाशी व मानवाशी जोडलेल्या नात्याची नाळ तुटून मानवी संवेदनशीलता अधिकाधिक बोथट होत जाण्याचा हा काळ होता. औद्योगिक काळाने मानवाला नवनव्या वस्तूंची ओळख करून दिली, वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या. वाढत्या उपलब्धतेने मानवाच्या अपेक्षा व स्वप्नांना बळ दिले. वैज्ञानिक प्रगतीने मानवी आयुष्य अधिक सुखी व सुलभ झाले. परंतु परिणामतः माणूस व निसर्गातील जीवंततेची जागा वस्तूंनी घेतली. वस्तूंनी मानवावर अधिराज्य गाजवायला सुरुवात केले आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न प्रखरपणे समोर उभा राहिला. १९६० नंतरची कविता प्रामुख्याने हे प्रश्न घेऊन येते. ही कविता मानवी अस्तित्वावरील नव्या जगाचे अधिराज्य सहन करू शकत नाही. त्याविषयी ती उपरोध व उपहास व्यक्त करते. विभिन्न संस्कृती संपर्काने गोंधळलेला व धास्तावलेला मानव मानवी संस्कृतीच्या मुळांशी आपली नाळ जोडू पाहतो. त्यामुळेच या कवितेला वैश्विक भान आहे. मानवी अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या काळातून सुटका करून घेण्याची वाट तिला सापडत नाही. बदलाच्या प्रत्येक टप्प्यावर साहित्य एक ताण अनुभवते. असा ताण या कवितेवरही होता. समता, बंधुभाव व व्यक्तिस्वातंत्र्य या नव्या मूल्यांनी जुने आचार विचारांचे ढाचे बदलले. केशवसुतांनी देखील या मूल्यांचा स्वीकार केल्याने त्यांना विरोध झाला. प्रत्येक टप्प्यावरील आधुनिकतेला मूल्यव्यवस्थेतील बदलाचा ताण सहन करावा लागतो. या काळात भौतिक पातळीवरील बदल व मूल्यात्मक पातळीवरील बदल हे द्वंद्व होते १९४५ नंतरच्या काळात मानवमुक्तीतील हे बदल स्वीकारणाऱ्या कवीच्या कविता आरोपाच्या केंद्रस्थानी होत्या. परंतु हे बदल अपरिहार्य असल्याचे नंतरच्या काळाने सिद्ध केले. यामध्ये मर्ढेकर, करंदीकर, पु. शि. रेगे, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर या कवींचा समावेश होतो. आधुनिकतेचं नवं रूप यांच्या कवितांमधून दिसतं.

## १.१२ उत्तर आधुनिकतेचा काळ व वैशिष्ट्ये–

जागतिकीकरणाने आधुनिक काळातील अनेक ताण सैल केले. माहिती तंत्रज्ञानाच्या विस्फोटाने अनेक संधी उपलब्ध केल्या. या संधी आर्थिक आहेत तशाच मुक्त मानसिकतेच्या देखील आहेत. त्यामुळे असंतोष या काळात दिसत नाही. उपभोक्ता असण्याला अधिक महत्त्व देणारा हा काळ जुन्या मूल्यांना सहज तिलांजली देतो. त्यागाला महत्त्व उरत नाही. सत्य सापेक्ष बनते. मानवी मूल्यांबरोबरच संस्कृतीमध्येही खळखळ निर्माण झाली. मानवी जगण्यावरच नव्हे तर सबंध जगावर मिडियाची सत्ता आहे. तितकेच आकर्षणाचे, मोहाचे जंजाळ आहे. या काळाची मानसिकता गोंधळलेली, संभ्रमित, तुटलेली आहे. या सर्वाचं केंद्रस्थान महानगर असल्याने या कवितेमध्ये महानगराची वैशिष्ट्ये सामावलेली आहेत. अशी कविता १९९० नंतरच लिहिली गेली.

जागतिकीकरणाने सारे विश्व ढवळून काढले. मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. सामाजिक व आर्थिक स्तरावर झालेल्या या बदलाने साहित्यावरही परिणाम घडून आला साहित्यातील हा बदल साधारणतः

१९९० नंतर जाणवतो या काळात काव्यलेखन करणाऱ्या कवीमध्ये प्रामुख्याने श्रीधर तिळवे, सचीन केतकर, हेमंत दिवटे, संजीव खांडेकर, मंगेश नारायणराव काळे, सलील वाघ, दिनकर मनवर, मन्या जोशी या कवींची कविता उत्तर आधुनिकतेचे वैशिष्ट्ये सामावलेली आहे. हे कवी मुख्यतः महानगरीय म्हणून ओळखले जातात. यासोबतच वर्जेश सोलंकी, संतोष पवार, अभय दाणी, ऐश्वर्य पाटेकर, गोविंद काजरेकर, श्रीकांत देशमुख, अजित अभंग, महेंद्र भवरे, दा. गो. काळे, रवींद्र दामोदर लाखे, मनोज पाठक, राहुल पुंगलिया, राजू देसले, आशुतोष पोतदार, तेजस मोडक यासारखे इतर अनेक कवी काव्यलेखन करत आहेत. ही कविता जागतिकीकरणाच्या जवळ आहे. यांच्या कवितेमध्ये उत्तर आधुनिक संवेदनशीलता वेगवेगळ्या पद्धतीने दृश्य होते. त्यामुळे ही कविता उत्तर आधुनिकतेची काही वैशिष्ट्ये सामावून आहे.

## १.१३ समारोप –

कविता हा साहित्यप्रकार अन्य सर्व साहित्यप्रकारांना जोडून आहे. कवितेचे गुणविशेष अन्य साहित्य प्रकारांमध्ये थोड्या बहुत प्रमाणात अस्तित्वात असतात. यामागे कवितेचे ललित असणे हे प्रमुख कारण आहे. लालित्य व भावात्मकता या गुणांनी कविता अन्य साहित्य प्रकारांहून वेगळी ठरते. कवितेमध्ये अंतःस्फूर्तता ही गोष्ट महत्त्वाची आहे. त्यामुळेच कविता हा उत्स्फूर्त काव्य प्रकार ठरतो. कविता हा अल्पाक्षरी साहित्यप्रकार आहे. याच गुणांनी गद्य व पद्य यामध्ये भेद निर्माण होतो. कविता ही त्या त्या काळात स्वतःमध्ये बदल करत आलेली आहे. कवीचे अनुभवविश्व व भावविश्व बदलेल तसे कवितेच्या स्वरूपात देखील बदल होत जातो. त्या त्या काळाची वैशिष्ट्ये कवितेमध्ये सामावलेली दिसतात. यातून काव्यपरंपरेमध्ये अनेक काव्य प्रवाह निर्माण झाले. सर्जनशील असणे हे तिचे वैशिष्ट्य आहे त्यामुळेच नवनव्या शब्दांची रचना, जुन्या शब्दांची मोडतोड, नवीन साहित्य प्रकारांचा उदय या सर्वच गोष्टी मराठी काव्यपरंपरेमध्ये पाहायला मिळतात.

## १.१४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

### १.१४.१ योग्य पर्याय निवडा

१) सर्व साहित्यप्रकार या कला वस्तू असून काव्य हा त्याचा........ आहे, असे प्राचीन साहित्यशास्त्र मानते.

अ. आत्मा ब. यश क. अर्थ ड. व्यवहारज्ञान

२) काव्य ही संकल्पना अधिक मूलभूत, समावेशक व ........ आहे.

अ. संमिश्र ब. स्वतंत्र क. आर्थिक ड. यापैकी नाही

३) मराठी काव्याच्या परंपरेमध्ये संत काव्य पंडिती काव्य व ........ या प्रमुख धारा निर्माण झाल्या.

अ. शाहिरी ब. इंग्रजी क. आदिवासी ड. ग्रामीण

४) उत्कट भावनेचा ........ आविष्कार म्हणजे काव्य.

अ. सामूहिक ब. उत्स्फूर्त क. धार्मिक ड. सामाजिक

५) कवितेचा एक अर्थ शब्दात्मक असतो तर दुसरा अर्थ हा ........ असतो.

अ. भावनात्मक ब. अर्थात्मक क. संवादात्मक ड. यापैकी नाही

**उत्तरे**

**१) अ– आत्मा** **२) अ– संमिश्र** **३) अ–शाहिरी काव्य**

**४) ब– उत्स्फूर्त** **५) ब – अर्थात्मक**

### १.१४.२ लघुत्तरी प्रश्न

१) आशयानुसार कवितेचे प्रकार सांगा

२) कवितेचे मूल्यमापन कसे केले जाते. सोदाहरण सांगा

### १.१४.३ दीर्घोत्तरी प्रश्न

१) कविता या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

२) कवितेच्या विविध घटकांचे स्वरूप स्पष्ट करा.

३) कविता या साहित्य प्रकाराचे इतर साहित्य प्रकारांपेक्षा असलेले वेगळेपण स्पष्ट करा.

### १.१४.४ संदर्भासाठी पुस्तके

१) पाटणकर, वसंत *कविता संकल्पना निर्मिती आणि समीक्षा,* मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व अनुभव प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९५.

२) जाधव, रा.ग. *साठोत्तरी मराठी कविता व कवी*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९९.

३) पवार, गो.मा. व हातकणंगलेकर, म. द. (संपा.) *मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप* १९५०-७५, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती १९८६.

◆◆◆

# घटक ०२

# निवडक कविता भाग-१

## २.१ उद्दिष्टे

१) नलेश पाटील यांच्या कवितेचे स्वरूप समजेल.

२) नलेश पाटील यांच्या कवितेच्या आशय व रूपवैशिष्ट्ये लक्षात येतील.

३) कवितेचे आवाहक करणाचे स्वरूप लक्षात येईल.

४) कवितेतील वेगवेगळे प्रवाह लक्षात घेणे.

## २.२ प्रस्तावना-

प्राचीन काळापासून मराठी कवितेमध्ये अनेक परंपरा उदयास आल्या. या परंपरेमध्ये विविध प्रकारची कविता लिहिली गेली. मराठी कवितेच्या परंपरेत संत, पंत, तंत, आधुनिक, उत्तर आधुनिक असे काही प्रमुख टप्पे आहेत. या प्रत्येक टप्प्यावरील कविता वेगवेगळे अनुभवविश्व, प्रतिमा प्रतीके घेऊन येते. तिचे आकलन समकालीन वास्तवाच्या आधारे करावे लागते. येथे साधारणतः १९९० नंतरच्या कवितेचे स्वरूप आपण समजून घेणार आहोत. यासाठी नलेश पाटील, संदीप खरे, वीरधवल परब या वेगवेगळे अनुभवविश्व व भावविश्व व्यक्त करणाऱ्या कवितेचे आकलन समकालाच्या संदर्भात करणार आहोत.

## २.३ नलेश पाटील यांची कविता -

नलेश पाटील यांची **आभाळाला खडा मारता पाण्यालाही तडाच गेला** ही कविता म्हणजे पावसाचे रूपक आणि अनेक प्रतिमा होय. ही कविता नाद, रंग, गंध स्पर्श यांच्या अनेक प्रतिमांनी परिपूर्ण आहे. पाऊस पडल्यानंतरचे निसर्गातील दृश्याचे या कवितेमध्ये अनेक प्रतिमा मधून वर्णन केले आहे. पाऊस येणे ही निसर्गातील एक चैतन्यमय अशी घटना असते. हे चैतन्य सृष्टीतील विविध घटकांमध्ये संचारते आणि सौंदर्याचे एक विलक्षण चित्र उभे राहते. कवीने देखील या सौंदर्याला कविकल्पनांनी अधिकच आकर्षक व मोहक बनविलेले आहे. आभाळाला खडा मारावा आणि त्यातील पाण्याला तडा जाऊन पावसाचे आगमन व्हावे असे हे रूपक आहे. कवीने या रूपका भोवती जमीन झाडे पूर्ण पक्षी आकाश या प्रतिमांचे एक सौंदर्यपूर्ण जग उभा केले आहे. कल्पना आणि सौंदर्य यांचे एक गाणे निर्माण व्हावे आणि या गाण्यात अनेक शब्द गुंफलेले असावे तसे निसर्गातील पावसाच्या या गाण्यात अनेक निसर्गघटक गुंफले जातात. पावसाच्या आगमनाने पारदर्शी झालेल्या भवतालाची अनेक प्रतिबिंब कवीला फुलांच्या पाकळ्याप्रमाणे फुलून आलेली भासतात. ही प्रतिबिंब म्हणजे आकाशाचे मातीवरचे साम्राज्य आहे, असे तो म्हणतो. आकाश मोकळे झाल्याने भुईवर पसरलेली सूर्याची किरणे हिरव्या कुरणांवर पसरतात. तेव्हा हिरव्या भुईने आपला रंग सूर्याला देऊन सूर्य देखील हिरवा केला आहे आणि निसर्गाचा अवघा रंग एक झाल्यासारखा कवीला भासतो. पाणी पाणी झाल्या जमिनीच्या पाण्याच्या पाठीवर मोकळ्या आकाशातील ऊन देखील ओले होऊन कोवळे ठिपके घालत आहे असे दृश्य तो पाहतो. नितळ व स्वच्छ झाल्या ओल्या कुरणांत जणू उन्हाच्या हरणांनी नाचत प्रवेश

केला आहे असेच त्याला वाटते. हिरवा रंग, नितळ, स्वच्छ वातावरण, पारदर्शी ऊन या सर्वांचे दूर दूरवर पसरलेले चित्र चित्राला कवी मृगजळाची उपमा देतो. कितीही डोळ्यांना मनाला हे दृश्य थंडावा देत असले तरी हे नितळ, रम्य हिरवेपण व उन्हाचे कोवळेपण इतके अधीर असते की ते आपण कितीही अनावर मोह झाला तरी हातात पकडू शकत नाही म्हणूनच कवी त्यास मृगजळाची उपमा दिली आहे.

पानापानांवर सांडलेल्या उन्हास कवी उन्हाच्या दिव्यांची उपमा देतो. हे दिवे रानभर उजळल्याचे तो पाहतो. पानांचे हिरवे हात आणि त्यावरचे हे दिवे म्हणजे दिवसा आभाळातील तारे आभाळातून उतरून आल्यासारखे आहेत असेच त्याला वाटते. हिरवे हात आणि उन्हाचे दिवे यातून साकारणारी स्त्री प्रतिमा ही शालीन वत्सल व संपन्न असे स्त्री रूप नजरेसमोर उभा करते. वैभवशाली अशीच स्त्री प्रतिमा उभा करण्यात या प्रतिमा महत्त्वाची भूमिका निभवतात निसर्गाशी तदाम्य झालेले कवी मन येथे पाहायला मिळते. त्यातूनच येथे पिकांनी व झाडाझुडपांनी गजबजलेली कुरणे, राने व त्यांच्या गजबजाटाच्या सावल्यात उधळलेली ही ऊनफुले अशा प्रतिमा निर्माण होतात. ही सर्व दृश्यं व प्रतिमा म्हणजे आकाश आपले अस्तित्व नोंदवतो आहे असे कवीला वाटते. या दृश्यात ओल्या हिरव्या चमकदार झाल्या फांद्यांवर बसलेले पक्षी म्हणजे जणू फांद्यांनी आपल्या हातावर गोंदण काढलं आहे. या पक्षांचा चिवचिवाट म्हणजे शब्दांच्या अनेक कळा आहेत आणि या चिवचिवाटाने रानातल्या वृक्षांना बोलके केले आहे. हिरव्या फांद्या, ओले पक्षी आणि त्यांच्या चिवचिवाटाने बहरलेलं रान या प्रतिमांमधून कवी मोहक असे एक दृश्य नजरेसमोर उभा करतो. या दृश्यातले पक्षी निळ्या आकाशात झेप घेतात तेव्हा त्या पक्षांची ललाटरेषा आभाळाला मिळते. यांतील निसर्ग प्रतिमांमधून एक सकारात्मक व ऊर्जा देणारे कवी उभा करतो पाऊस निसर्गातील घटकांमध्ये जीव भरतो. त्यातून जिवंत झालेल्या दृश्यांची एक साखळी पावसाच्या रूपकात गुंफली जाते व सृष्टीचे एक आल्हाददायक, मोहक व संपन्न असे रूप समोर येते. यातून कवीचे संवेदनशील भावविश्व निसर्गाशी एकरूप झालेले पहावयास मिळते.

निसर्गातील अनेक घटक हे मानवाला जीवनमूल्य शिकवत असतात. सदा सर्वकाळ तिन्ही ऋतूंशी झुंजणारी, उन्हाळ्यात माथ्यावर ऊन घेऊन पायाखाली सावली पेरणारी झाडं देखील आपणास त्यागाचे मूल्य शिकवत असतात. याच मूल्याची प्रतिमा झाडाच्या रूपाने '**माझ्या झाडांची हिरवी किती सांगू मी थोरवी**' या कवितेतून साकारली आहे. या कवितेमध्ये कवीने झाडांच्या समर्पण गुणाचा गौरव केलेला आहे. त्यागाचे मूल्य शिकविणारी झाडं आपल्याला सावली देऊन स्वतःच्या माथ्यावर ऊन मुकुटासारखे मिरवत असतात. दिवसभर निमुटपणे उन्हाचा दाह सोसतात. परंतु तक्रार किंवा त्रागा न करता हीच झाडं पुन्हा सांजेला मायेने पाखरांना आपल्या कुशीत सामावून घेतात. झाडं आपले पाय मातीत घट्ट होऊन उभी असतात. आभाळ व धरा यांच्यातील अंतर कोसो मैलांचे आहे. परंतु मातीत पाय घट्ट रोवून असणारी ही झाडं आभाळाला गवसणी घालत असतात. म्हणूनच आभाळातून कोसळणाऱ्या पावसाच्या धारा किंवा धरेवरून आभाळात झेप घेणारी पाखरं ही आकाश व धरा यांच्यातील अंतर मोडून काढतात. ही झाडं आभाळाला गवसणी घालतात म्हणूनच पावसाचे पाणी आपणास मिळते, अशीही एक वैज्ञानिक गोष्ट कवी सांगून जातो. कवीचे संवेदनशील मन झाडांच्याकडे अतिशय स्नेहाने पाहते तेव्हा त्याच्या लक्षात येते की झाडांना ऊन पाऊस वादळ यांना सततचे सामोरे जावे लागते. त्यांच्या भोवती यांनी कितीही फेर धरला तरी झाडांना स्वतःचे घर नसते पण तरीही ते मात्र इतरांना घर पुरवतात याविषयीचा अत्यंत आदर कवीच्या मनात आहे म्हणून च तो झाडांशी एकरूप होऊन झाडांचे हे दुःख समजू शकतो. इतरांसाठी सतत काही ना काही

देत राहणारी ही झाडं मात्र स्वतःला जगण्यासाठी साधे पाणीदेखील कोणाकडे मागत नाहीत. तरीही यांच्या शरीरातून पाण्याची जिवंततेची सळसळणारी वाणी सतत ऐकू येते, जी मानव प्राणी विसरतो आहे. पाणी म्हणजे जीवन जीवनाचे हे गमक व त्यांची सळसळ झाडं स्वतःमध्ये सामावून आहेत, हेच कवी रूपकाच्या माध्यमातून येथे सांगतो आहे.

झाडे मानवाच्या सुखदुःखाच्या कल्पनांपासून कोसो दूर असतात हे देखील कवी येथे सांगू पाहतो. तेव्हा तो शिशिराची प्रतिमा वापरतो. झाडं वर्षातून एकदाच पानं गाळतात. त्यांचे हे दुःख त्यांच्या सोबतीस सतत असणारे रान समजू शकते. म्हणूनच पिकल्या पानांचे हे दुःख उमजून त्यांचे सहप्रवासी असणारी राने सुद्धा वनवा होऊन जळतात, असे कवी एक प्रतिमांचे भावमयी, स्नेहपूर्ण सौहार्दाचे दृश्य उभे करतो. परंतु सृष्टीतील या सहनशील घटकांचे सौहार्द आपण जपू शकलेलो नाही याची खंत कवीला वाटते. कवी पाहतो की पाऊस, वाऱ्याचे, वनव्याचे, शिशिराचे दुःख गिळून झाड फुलत राहतात फळ देत राहतात परंतु मानव मात्र त्यांच्यावरच कुऱ्हाडीचे घाव घालतो. त्यांच्यातील सौहार्द व त्याग, समर्पण यांची मूल्य घेण्याऐवजी स्वार्थाने, मोह व लोभाने बरबटून जातो. झाडांच्या कत्तली करून घर शहर उभं करतात हिरव्या, संपन्न, सुंदर अशा भुईला बकाल बनवून टाकतात, ही कृतघ्नता कवीला त्रासदायक वाटते. ही कृतघ्नता माणसाला संपवणारी आहे रम्य भूमीचे वाळवंट करणे हे माणसाला परवडणारे नाही. हे सांगताना कवी झाडांचे त्यागमूल्य मानवाच्या लक्षात आणून देऊ पाहतो. तो म्हणतो,

काय पाप त्यांनी केले तुम्हा सावली देऊनी

अर्धी लाकडे त्यांचीही गेली सरण होऊनी

जिवंततेची सळसळ स्वतःत वागवणाऱ्या झाडांचे जिथे सरण होते तिथे मानवाची काय दशा. म्हणूनच कवी पुढे म्हणतो,

पुढे लागणार नाही एक थेंबसुद्धा ओठी

खेळ सरतेशेवटी मांडा वाळवंटी काठी

झाडांशिवायचे माणसाचे जीवन हे वाळवंटात घर थाटण्यासारखे आहे. झाड हीच माणसाचे जीवन आहेत, जीवनाचे मूल्य शिकविणारी आहेत, असे कवी येथे झाडांच्या रूपकातून सांगतो.

झाडं, राने, कुरणे, पाऊस, पाणी, वारा, आकाश, धरा यांचे अस्तित्व ही कवीला हिरवी वस्ती वाटते. ह्या हिरव्या वस्तीमध्ये प्राणवायूंची घरे आहेत. माणसाचा निवारा हा या वस्तीतच आहे, याची येथे कवी जाणीव करून देतो आहे. हा निवारा केवळ डोक्यावर छत देणारा नाही तर संघर्ष, संकटं, दुःखं, आव्हानं यापासून मानवी जीवनाला तरुन जाण्याचे धडे देणारे आयुष्य सुखी, संपन्न व यशस्वी करण्याची बोली शिकवणारे गुरू आहेत. या वस्तीतच कवीला निवारा मिळतो व जगण्याचा चैतन्यमयी, सकारात्मक असा हिरवा सूर सापडतो. झाडं माणसाला अन्न, निवारा देतात. पाणी हे तर पृथ्वीचे जीवन आहे. हे सर्वच घटक माणसाच्या शरीर, मन, भावना यांना जिवंत ठेवणारे आहेत. मानवाचे केवळ शरीर जगून उपयोग नाही तर मन व भावना यांचे जिवंत राहणे देखील माणूसपणासाठी तितकेच गरजेचे असते. ही सर्वच ऊर्जा माणसाला या हिरव्या वस्तीतून मिळत असते, याची पुरेपूर जाणीव कवीला आहे. येथे कवीच्या भाव वृत्ती निसर्गाशी इतक्या तादात्म झालेल्या पाहायला मिळतात की कवी आश्चर्याने म्हणतो की,

माझ्या हातांच्या रेषा पानात उमटल्या कशा?

कवीच्या हातावरच्या या रेषा हिरव्या वाटा शोधत पानांमध्ये उतरलेल्या आहेत. मानवी जगण्याची प्रक्रिया देखील अशीच असते. जगण्याचा हेतू व आनंद शोधत सतत माणूस धावत असतो. मानवाची ही धाव कवीला हिरव्या वाटांसारखी वाटते. या हिरव्या वाटा हातांवरून पाण्यावर सळसळतात आणि पाण्यावरून कुणाला पाठीवर घेऊन दूर आभाळात निघून जातात आणि पुन्हा या धरेला भेटायला या हिरव्या वस्तीमध्ये प्रवेश करतात, असे एक निसर्गाचे चक्र देखील कवी या हिरव्या वस्तीच्या रूपाने उलगडून दाखवतो. मानवाला प्राणवायू पुरवणारी ही हिरवी वस्ती मानवाने जपायला हवी असेच कवी यातून सांगू पाहतो. प्राणवायू असेल तर माणूस जगेल. तसेच झाडं, पाणी, वारा असेल तरच माणूस या पृथ्वीवर टिकू शकतो, जगू शकतो, हे वास्तव सत्य आहे. दिवसेंदिवस माणूस याकडे डोळे झाक करत चालला आहे. निसर्गाशी एकरूप होणारे कवी मन मानवाचे या वास्तवाकडे लक्ष वेधू पाहतो.

निसर्गाशी एकरूप होणारे नलेश पाटील यांचे संवेदनशील कवी मन निसर्गात अनेक चैतन्यमयी दृश्यं पाहते. **सावलीच्या शाईत बुडाली झाडांची लेखणी** हे त्यापैकीच एक रूपक आहे. झाडांच्या पायाशी पडलेल्या सावल्या या कवीला निळ्या शाईच्या दौतीसारख्या भासतात. कवी येथे या शाईत झाडं आपली लेखणी बुडवून पानापानांवर हिरवे शब्द लिहितात अशी कल्पना करतो. अक्षरं व विरामचिन्हं यांचे रूपक या लेखणी भोवती साकारते. विरामचिन्हातील पूर्णविराम हा येथे टपोरा ओला डोळा बनतो. या डोळ्याच्या तळाशी पहाटलेला सूर्य गोळा झालेला आहे, असे कवी दृश्य निर्माण करतो. येथे निसर्गातील पहाटलेला सूर्य हा पूर्णविराम सारखाच बनतो. बाराखडीतील अक्षरांच्या रेषा म्हणजे जणू तलम, हिरव्या गवतांच्या भाषाच आहेत असा कवीला भास होतो. ही भाषा पोहोचविण्याचे काम येथे वारा करतो आहे. वारा ज्या दिशेने वाहतो त्या दिशा त्याच्या वाहण्याच्या आवाजाने बोलक्या होतात म्हणजे जणू तो ही अक्षरंच दिशा दिशांना पसरवत आहे, अशीच कवी कल्पना येथे करतो. आकाशातला मेघ डोंगर आणि रानांना पाहण्यासाठीची विनवणी करतो आणि डोंगरमाथ्यांवर उतरतो. तेव्हा तो झाडांच्या वर्गातच येऊन बसतो. या वर्गात कोण गुरुजी शाळा घेत आहेत हे त्याच्या लक्षात येत नाही. तेव्हा कवी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील लळा पाऊस आणि झाडं यांच्या प्रतिमेत पाहतो आणि म्हणतो,

झाड गुरु अन् झाड शिष्य झाडच अवघी शाळा

म्हणून झाडांनाच लाविती मेघ सरींचा लळा

झाडांना मेघांचा लळा लागला की आपोआप हिरवी शाळा भरत राहील अशी एक सुंदर कल्पना कवी येथे करतो. ही हिरवी शाळा म्हणजे पावसाच्या आगमनाने फुललेली आणि हिरव्या रंगाने भरून आलेली सृष्टी होय. झाडे जिथे असतील तिथे पाणी असणारच हे वैज्ञानिक सत्य कवी येथे कवी कल्पनेच्या माध्यमातून उलगडून दाखवतो. तेव्हा एक प्रतिमांचे सुंदर जग उभे राहते. सृष्टीचे हे सत्य सांगणारे सत्य सांगणारी ही झाडं म्हणजे ज्ञानी गुरुच आहेत, जे एका जागी शांत व निर्मळ उभे राहून सृष्टीला व मानवाला आपले ज्ञान सतत सांगत असतात. मानवाने या त्यांच्या शिकवणीकडे कायम लक्ष दिले पाहिजे, हेच कवी येथे लक्षात आणून देऊ पाहतो.

निसर्गाशी तादात्म्य झालेले संवेदनशील कवी मन या कवितांमधून पहावयास मिळते. या एकरूप होण्यातूनच फुले, प्राणवायूंचे घर, हिरवी वस्ती यासारख्या प्रतिमा निर्माण होतात. निसर्गाकडे कवी ज्या सौंदर्यपूर्ण दृष्टीने पाहतो

त्यातून निसर्गाची सुंदर रूपकं तयार होतात. झाडांच्यामधील ऊर्जा व जिवंतता सकारात्मक वृत्तीच्या या कवीला प्रिय आहे. ही ऊर्जा त्याला जगण्यासाठी अस्वस्थ करते. भयावह होत जाणाऱ्या वास्तवात ही दृश्यं आशादायक आहेत.

### २.३.२ संदीप खरे यांची कविता -

संदीप खरे हे १९८०-९० च्या दशकातील कवी आहेत. ते आपल्या कवितांमधून कल्पनेतले स्वप्नातले एक जग उभे करतात. सर्वसामान्यांच्या भावना समजून त्यांच्या सुखदुःखाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. फार संपत्ती, वैभव जरी या सामान्य माणसाकडे नसले तरी मनातली उमेद आणि आत्मविश्वास घेऊन जगणाऱ्या सर्वसामान्यांचा एक चेहरा संदीप खरे यांच्या कवितेतून समोर येतो. हा सामान्य माणूस प्रामुख्याने मध्यमवर्गीय आहे. **नामंजूर** या कवितेमध्ये देखील या मध्यमवर्गीयांचा एक चेहरा दिसतो. यातील माणूस आत्मविश्वासाने भरलेला आहे. याच्याकडे तरुणाईचा एक आत्मविश्वास आणि उमेद आहे. त्याच्या जोरावर तो आपल्या जगण्याचे नियम आपणच ठरवतो आहे. त्याला इतरांच्या सांगण्याप्रमाणे जगणे नामंजूर आहे. या कवितेमध्ये त्याने त्याला नामंजूर असणाऱ्या आणि तो करू इच्छिणाऱ्या अशा गोष्टी रेखाटलेल्या आहेत. त्याच्या सामान्य जगण्यात तो असामान्य होऊन जगू पाहतो. म्हणूनच सामान्यप्रमाणे किनारा जपणे आणि वादळ वाऱ्याला घेऊन शिड सोडणे त्याला नामंजूर आहे. त्याची जीवन नका पुरी सरकण्यासाठी वाऱ्याची वाट पाहत राहणे हे सुद्धा त्याला नामंजूर आहे. तर त्याला स्वतःच वाहत्या पाण्याची दिशा ठरवायची आहे म्हणूनच त्याला येईल त्या लाटेवर डुलणे त्याला नामंजूर आहे. आयुष्याची चांगल्या गोष्टींनी नवी सुरुवात करण्यासाठी त्याला शुभशकनांची किंवा मुहूर्ताची गरज वाटत नाही. त्यासाठी त्याला तुमचे देखील साथ नको आहे.

नव्या सुरुवातीसाठी इतरांनी दिलेला कौल तो नामंजूर करतो आणि त्याची इच्छा हाच तो आपला मुहूर्त मानतो. त्याला वेळ पाहून खेळ मांडणे हा शहाजोगपणा नामंजूर आहे. या सर्वातून व्यावहारिक दृष्टीने तोलून मोजून मापून आयुष्य जगण्यास तो नामंजुरी देताना दिसतो. स्वतःमधील आत्मविश्वास आणि उमेद हाच त्याच्या जगण्याचा पाया आहे. व्यवहाराच्या कसोटीवर न जगल्यामुळे येणारा पराभव जरी विनाशा सारखा असला तरी त्यासाठी तो देह ठेवायला तयार आहे. अब्रूचे बहाणे सांगून सौंदर्याला नकार देणे त्याला नामंजूर आहे. इभ्रतीचा विचार करून माणसं पावसात भिजायला नकार देतात किंवा एखाद्याच्या सौंदर्यावर प्रेम करायला देखील नकार देतात हा नकार कवीला नामंजूर आहे. खुल्या दिलाने साऱ्याचा उपभोग घेण्याची त्याची इच्छा यातून लक्षात येते. संसार आणि जगणं म्हटलं की रुसवे -फुगवे, भांडण -तंटे यासारख्या अनेक गोष्टी आहेतच. या सर्वांत माणसाचा अहंकार आणि प्रतिष्ठा लपलेली आहे. परंतु माणसाला मृत्यू समयी स्वतः बरोबर यातलं काहीच घेऊन जाता येत नाही. तेव्हा मानवाला आपल्या साऱ्या भावनांची परतफेड ही संसारलोकीच करायची आहे. याची आठवण करून देत तो संसाराचे गाह्राणे पुन्हा आकाशात जाऊन मांडण्याचे नामंजूर करतो. नीती तत्वे ही सारी त्याला फसवी गणिते वाटतात. त्यापासून तो दूरच राहू पाहतो. जगण्यातील सहजता आणि पारदर्शकता त्याला महत्त्वाचे वाटते. जीवनाच्या हाकेला ओ देत जगत राहणे ही ओढ महत्त्वाची वाटते. अस्मितेसाठी किंवा धर्म, वंश यासाठी रक्त वाहणे त्याला नामंजूर आहे. मानवाचे रक्षण करण्यासाठी वाहिलेले रक्त हेच माणसाला प्रतिष्ठा मिळवून देऊ शकते. असा एक भाव शेवटी ही कविता व्यक्त करते.

मध्यमवर्गीयांच्या सर्वसामान्य जगण्यामध्ये आस्तिक आणि नास्तिक यांची दुफळी कायम सक्रिय असताना

दिसते. **नास्तिक** या कवितेमध्ये कवीने नास्तिकाच्या भूमिकेचे समर्थन केलेले आहे. नास्तिक हा जरी देवाचे अस्तित्व मान्य करत नसला तरी तो देवाचा एक सच्चा साथीदार असतो हे कवी येथे सांगू पाहतो. देवासमोर झुकणे अमान्य करून जेव्हा नास्तिक देवळाबाहेर थांबतो तेव्हा तो त्याच्या स्वतःच्या भूमिकेशी ठाम असतो. त्याला परमेश्वराविषयीचे उमगलेले सत्य आणि त्या सत्याशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न हीच त्याची पुण्याई असते. असे एक आकलन कवी येथे मांडतो. देव हा सर्वांसाठी आहे. त्याला सर्वजण सारखेच प्रिय आहेत. तो सर्वांना दर्शन देतो. सर्वांना एक न्यायाने वागवतो. हे जर देवाविषयीचे सत्य असेल तर एक नासिक जेव्हा देवळाबाहेर उभा राहतो तेव्हा त्याला भेटण्यासाठी देव सुद्धा देवळाबाहेर येण्याची शक्यता निर्माण होते, असे कवी म्हणतो.

सर्वांनी देवळात जाऊन देवाला भेटण्याची देवाला सुद्धा सवय लावलेली आहे. त्यामुळे देव आळशी बनलेला आहे. तेव्हा आपला हा आळस झटकून निदान आपली प्रतिमा जपण्यासाठी तरी तो देवळाबाहेर येऊन भक्ताला दर्शन देईल अशी ही एक अपेक्षा आहे. नास्तिक हा देवदर्शनासाठी लागलेल्या रांगा, आसपासची गर्दी, भाविकांच्या जत्रा या सर्वांविषयी उदासीन असतो. त्याला त्यामध्ये रस नसतो. या भाविकांच्या गर्दीच्या मनात देव आपले रक्षण करतो आहे, असा एक भक्तिभाव असतो. जो त्या सर्वांना उभा राहण्याची ताकद तर देतो परंतु परावलंबी देखील बनवतो. म्हणूनच देवळाबाहेर उभा राहिलेला नास्तिक हा स्वतःचे ओझे स्वतःच आपल्या पायावर सांभाळीत उभा आहे याचे समाधान देवाला देखील लाभेल असा एक भाव कवी येथे व्यक्त करतो. देवाला देखील भक्तांच्या संख्येऐवजी मिळणारे समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असते. असेच जर असेल तर एक नास्तिक जेव्हा देवळा बाहेर थांबतो तेव्हा त्याला एक सहकारी मिळाल्याचं आकंठ समाधान नक्कीच मिळेल असा कवीला विश्वास वाटतो. कारण नास्तिकाला देखील गर्दी करून देवाला गराडा घालणाऱ्या भाविकांच्या संख्येत सामील होण्याऐवजी श्रद्धा भाव असणे अधिक महत्त्वाचे वाटत असते. हा श्रद्धा भाव भाविकांच्या गर्दीत विसरला जातो याची कवीला खंत वाटते. तीच खंत कवी येथे उपहासात्मक पद्धतीने व्यक्त करतो. श्रद्धा भाव हरवून केवळ गर्दी करणाऱ्या भाविकांनी देव सुद्धा कंटाळतो आणि देऊळ बंद झाल्यावर मस्त आळस देऊन बाहेर ताटकळलेल्या नास्तिकाशी गप्पा मारू लागतो असे एक चित्र कवी रेखाटतो.

या चित्रातील देव नास्तिकाला अधून मधून दर्शन देण्याची विनंती करतो. पण खऱ्याखुऱ्या नास्तिकाला देवाने अशी विनंती करणे किंवा देवळाबाहेर येणे योग्य वाटत नाही. तेव्हा आस्तिकांसाठी तो देवाला मिन्नतवाऱ्या करून पुन्हा देवळात पाठवतो. नास्तिकाचे हे कृत्य जणू आस्तिकांच्यावर उपकारच आहेत. त्यामुळेच त्याच्या या कृत्यामुळेच श्रद्धा भाव हरवलेली भाविकांची गर्दी देवाचे दर्शन घेऊ शकते. कवी येथे अशा भक्तिभावाला आस्तिकत्त्वाची भरजरी शाल अशी उपमा देतो आणि या शालीत देव गुदमरल्याचेही नमूद करतो. नास्तिक हा खरंतर भक्ती भावाचा भुकेला असणाऱ्या देवाचा खरा साथीदार असतो, हेच कवी येथे काव्यात्मक भाषेमध्ये सांगतो. नास्तिकाविषयीचे कवीचे आकलन काव्यरूप घेते तेव्हा अशी खऱ्या भक्ती भावाचे चित्रण करणारी रचना निर्माण होते. अशा रचना आस्तिक आणि नास्तिक यांच्यातील भेद समजून घेण्यास उपयोगी ठरतात.

सामान्य मध्यमवर्गीयाच्या मनात सतत एक द्वंद्व सुरू असते. तो नेहमी सीमारेषेवरती उभा असतो. ज्या सीमारेषेच्या एका बाजूला पूर्णता असते तर दुसऱ्या बाजूला अपूर्णता असते. एका बाजूला पूर्णतेचे स्वप्न असते तर दुसऱ्या बाजूला अपूर्णात गुरफटलेले वास्तव असते. हा मध्यमवर्गीय सामान्य माणूस स्वप्न, अपेक्षा आणि किरकिरे वास्तव यांच्या दरम्यान दुःख भोगणारा असतो. सामान्य माणसाच्या जगण्यातील या द्वंद्वाचे चित्रण **दोन**

**मी** या कवितेत आलेले आहे. सीमारेषेच्या दोन बाजूकडचे हे दोन मी आहेत. याच्यातील एक 'मी' वास्तवातला आहे तर दुसरा 'तो' हा मानसिक वास्तवाच्या पातळीवरचा आहे. ही कविता या दोन मी चे दोन पात्र रेखाटते. मी हा रोजमर्रा जिंदगीतील हजार चिंतांनी सतत डोके खाजवत असतो. तर अशावेळी तो मात्र कट्ट्यावर शीळ वाजवत निवांत बसून असतो. चिंतांनी ग्रासलेल्या मी ची खरे तर हीच इच्छा असते. जी पूर्ण होऊ शकत नसते. वास्तवातील मी ला स्वच्छंदपणे जगावे वाटते परंतु वास्तवात हे शक्य नसते. तेव्हा तो कल्पनेच्या पातळीवर पाहतो की आपण स्वच्छंदपणे उघड्या दारातून बाहेर पडत चौकट पार करतो आहे. अशावेळी वास्तवातला मात्र बंदी आहे. जुनाट दार करकरावं तसं तो कोणतीही चौकट उल्लंघताना सतत कारणे देत असतो. सामान्य माणसाची भूमिका कवी येथे स्पष्ट करतो आहे. उन्हाचा ताप आणि जगण्याचा दाह सारख्याच पद्धतीने साहत सामान्य माणूस जगत असतो. हेच काव्यात्मक पद्धतीने प्रतिमांमध्ये घडवून कवी व्यक्त होतो. ज्या उन्हाचे राप आणि शाप चेहऱ्यावर वागवत मी सूर्यापेक्षाही अधिक संताप घेऊन जगत असतो तेव्हा हा तो मात्र त्याच उन्हाचे झगझगीत लखलख लखलखीत दागिने घडवून सूर्यफुलांवर झुलत असतो. येथे मानसिक पातळीवरच्या 'तो' ला आव्हान आणि संघर्षाचे काहीच वाटत नसते कारण तो कुढण्यापेक्षा आम्हाला सामोरे जाणे महत्त्वाचे मानतो. कदाचित या अशा गुणांमुळेच मी ला त्याचे आकर्षण वाटते. जेव्हा मी पायात काचा रुतल्याने काचांवर राग काढतो तेव्हा तो मात्र त्याच काचांची नक्षी मांडतो. हाच तो वास्तवातल्या मी ला आकर्षित करणारा गुण आहे. चिडणे, कुढणे, रागावणे यापेक्षा मुक्त व मोकळ्या मनाने हार स्वीकारणे देखील महत्त्वाचे असते, ही शिकवण मिळालेला तो आहे. मी हा आस्तिक आहे. जो सतत आपल्या श्रद्धा भावाची पुण्याई मोजत राहतो. देवाला देखील नवसांची लाच देतो आणि बोली लावतो. परंतु तो हा खरे तर नास्तिक असला तरी तो आपल्या सर्व इच्छा अर्पूण देवाचेच आभार मानतो. देवाचा खरा भक्त तोच असतो ज्याच्या मनी समाधान असते आणि समर्पण भाव असतो. म्हणूनच नास्तिक असूनही तो देवाची मर्जी जिंकून घेतो. अध्यात्माच्या शृंगाराने माणसाला आपला भेसूर चेहरा लपवता येत नाही, हे वास्तव कवी येथे मी च्या रूपाने मांडतो. प्रतिमांची सौंदर्यपूर्ण रचना येथे सुंदर काव्यमय अनुभव देते.

'मेघ नसता वीज नसता' ही कविता प्रेम कवितेचा अनुभव देते. एकीकडे ही कविता प्रियकर व प्रेयसी यांच्या प्रेमाची वाटते तर त्याचवेळी ती बाप आणि छोटी मुलगी यांच्यातील प्रेमाचा ही अनुभव देते. आभाळ भरून आले की मोर नाचू लागतात. हीच उपमा कवी तिच्या भेटण्याला देतो. इथे मात्र जेव्हा ती भेटते तेव्हा मेघ किंवा वीज नसते परंतु मोर मात्र नाचू लागलेले असतात. हा मोर त्याच्या मनाचा असतो. ही जशी त्याच्या मनाची अवस्था आहे तशीच तो तिच्याही मनाची अवस्था रेखाटतो. त्याने तिला पाहिल्याने त्याच्या मनात मोर नाचू लागतात. तसेच त्याने आपणाला पाहिले आणि आपण त्याच्याकडे पाहताना त्यानेही आपल्याला पाहिले ज्यामुळे आपल्या मनातला प्रेमभाव व्यक्त झाला आहे हे त्याच्या लक्षात आले आहे हे उमगल्याने तिचे गोरे गाल लाल होतात. तिच्या उमलत्या, नाजूक वयाचे त्याला अप्रूप वाटते. या अप्रूपाने तो तिला फुला असे संबोधतो. तिच्या नाजूकपणाचे कौतुक करताना तो प्रतिमा वापरतो की पाकळ्यांना आपल्या रंगांचाही भार वाटावा इतके कोमल हे नाजूकपण आहे. उमलत्या वयाच्या नव्या कोऱ्या भावना तिला सजग राहून सांभाळता येत नाहीत हेच कवीला येथे सुचवायचे आहे. वयात येणाऱ्या या मुलीच्या मनात लाख नक्षत्रे लखलखत आहेत. नवी स्वप्ने आणि आकांक्षा यांचा उत्साह घेऊन ती वावरते आहे. हा उत्साह इतका भरून सांडणारा आहे की त्याने आभाळ देखील आपल्याकडे हा उत्साह नसल्याने हळहळत असावे अशी कवी कल्पना करतो. या उत्साहाचा, आनंदाचा हेवा आभाळाला देखील वाटतो आणि तो जणू म्हणतो आहे की,

हे तुझे नक्षत्र वैभव का धरेवर राहिले?

असा प्रश्न पडणाऱ्या आभाळाला तिच्या नवलाईचे किती अप्रूप वाटत असावे याची कल्पना कवी या ओळीतून करून देतो. तिच्या कोमलतेचे व नवखेपणाचे अप्रूप कवीला देखील आहे. ज्यासाठी तो अशा प्रतिमा वापरतो. तिच्या प्रेमाशी व सौंदर्याशी एकरूप झालेला कवी तिच्यासाठी अनेकानेक सुंदर प्रतिमा या कवितेत वापरतो. तिच्या सौंदर्याचे वर्णन करताना तो या सौंदर्याची तुलना मोगऱ्याशी करतो. ही तुलना करताना तिच्या सौंदर्याला पाहून मोगरा सुद्धा पांढरा पडतो, त्याचा रंग उडून जातो असे म्हणून कवी तिच्या सौंदर्याचे गौरव करतो. तिच्या सौंदर्याने मोगऱ्याच्या मनात जागी झालेली असूया त्यांच्या सुगंधाच्या रूपाने दरवळते आहे असे तो म्हणतो. आपल्यालाही हे सौंदर्य लाभायला हवे होते हे शल्य त्याच्या मनी उरते. तिच्या या सौंदर्याला कोणाची दृष्ट लागू नये असे कवीला वाटते. म्हणून जणू पहाटेला फुलांचा पडलेला सडा हा जणू त्याने तिची दृष्ट काढून टाकलेला आहे अशी प्रतिमा कवी वापरतो. ही काव्यमय कल्पना तिच्या सौंदर्याचे तेज वर्णन करते. तिचे सौंदर्य इतके मोहक आहे की अनेकांना आकर्षित करते. तिच्या प्रेमात पडून अनेक जण तिला स्वप्नात पाहतात. त्यांचीच दृष्ट लागण्याची कवीला येथे भय वाटते. यातून कविता तिच्यावर हक्क सांगण्याचा अधिकार लक्षात येतो. ती फक्त आपली आहे ही स्वामीत्वभावाची भावना येथे कवी यातून व्यक्त करतो. हा स्वामित्वभावच तिच्या सौंदर्याशी व प्रेमाशी त्याला एकरूप बनवतो.

### २.३.३ वीरधवल परब यांची कविता–

वीरधवल परब यांची कविता ही १९९० नंतरची आहे ही कविता बदलत्या परिस्थितीतील वास्तवाला अधोरेखित करते त्यांची कविता ही प्रामुख्याने गद्यात्मक आहे. जागतिकीकरणाने गाव व गावसंस्कृती यांच्यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला. वीरधवल परब हे कोकणातील आहेत. तेव्हा तेथील प्रादेशिक परंपरा, रीती रिवाज, संस्कृती, आचार विचार, गावचे वातावरण, पर्यावरण या सर्वांवर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम त्यांच्या कवितांमध्ये विषय बनून येतो. त्यांची गिरोबा ही कविता देखील कथात्मक कविता आहे. एखाद्या प्रसंगाची कविता कशी बनते हे या कवितेतून समजून घेता येते. येथे कवी आपण शिम धड्याचा आहोत असा उल्लेख करतात. गिरोबा हे या त्याच्या गावातील दैवत आहे. हे त्यांचे कुलदैवत देखील असावे. या देवाविषयीची आस्था जुन्या पिढीतील त्यांच्या आई–वडिलांना आहे. परंतु आता आचार विचार बदललेला कवी नास्तिक आहे. परंतु आई–वडिलांच्या भक्ती भावा विषयी त्याला आस्था देखील आहे. म्हणूनच तो आई जेव्हा त्याला शहरात जाताना गिरोबाला नारळ ठेव, देवाला भेटून ये असे बजावते तेव्हा तो मुकाट्याने वाकडी वाट करत गिरोबाला जातो. आईच्या भक्ती भावाचा आदर करावा असे त्याला वाटल्याने तो आपल्या विचारांची खळखळ करत नाही. गिरोबाच्या वाटेवरच्या लाल मातीने आपले पाय भरवून घेतो. हा एक प्रकारे कवीने ग्रामदैवताला केलेला भक्ती भावाचा नमस्कार आहे. कवी ही वाट फक्त आईच्या म्हणण्याखातर तुडवतो. त्यामुळे तो आपल्या तारतम्य व तथ्याधारित विचारांवर नियंत्रण ठेवतो. देवाला किंवा लोकांच्या भक्ती भावाला तपासात बसत नाही. देवाला काही सांगायचं मागायचं त्याला नसतं. परंतु एकदा देवाच्या दारी गेले की भक्तीभावाचा कर्मकांड होतो, हे त्याच्या लक्षात येते. देवळातील मानकरी कवीसाठी गाऱ्हाणं घालतो.

आलेल्या भक्ताला निराश न करण्याची जबाबदारी ही त्याच्या मानकऱ्यावरच असते असे जणू मानकरी समजत असतो. तो देवाचा स्तुती पाठक देखील असतो. देवा विषयीचे प्रेम, आस्था व अभिमान यांच्या तो आख्यायिका

बनवून सांगतो. कवी त्याने सांगितलेल्या आख्यायिकांमध्ये शंका काढत नाही. त्यामुळे मानकऱ्याला उत्साह येऊन तो अधिकच देवाविषयी सांगू लागतो. त्या सोबत तो स्वतःचा व आपल्या पूर्वजांचा अभिमान ही सांगतो. आपल्या पूर्वजांना दृष्टांत होऊन इथे देवाचे वस्तीस्थान उदयास आले आणि गावाचे कल्याण झाले, आपल्या घराचे देऊळ झालं, अशी कथा तो सांगतो. देव व देवळावर स्वतःचा अधिकार सांगणारा मानकरी आता मात्र बदलत्या परिस्थितीत मानकरी खूप झाल्याचे सांगतो. पण तरीही आपले सत्ता स्थान टिकविण्यासाठी तो आपले अधिकार चालवतो, असेही तो कवीला सांगतो. जणू आता देवाच्या सत्तेऐवजी मानकऱ्यांची सत्ता महत्त्वाची बनली आहे, असा उपरोध भाव कवी यातून सांगतो आहे. आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी मानकरी कवीला आपला इतिहास खणून काढून दाखवतो. साहजिकच कवीला त्यात रस वाटत नाही. तेव्हा रिवाजाप्रमाणे दहाची नोट त्याच्यापुढे ठेवून कवी निघून येतो. परंतु भक्ती भाव किती आंधळा असतो, तारतम्याच्या विचारांना देखील काही वेळेस आपल्या आधिन करतो याचा प्रत्यय कवीला येतो. कारण कवी घरी येताच त्याचे वडील त्याला तिथपर्यंत पायपीट केल्याबद्दल मुर्खात काढतात. ते त्याला सांगतात की तिथे देवच नाही. देव पळवून तिसऱ्याच गावात नेला आहे. दर्शनासाठी तुला तिथे जायला हवं होतं. आईप्रमाणेच वडिलांनाही देवदर्शन महत्त्वाचे वाटते. परंतु आई ज्याप्रमाणे आंधळा विश्वास ठेवते त्याप्रमाणे वडील विश्वास ठेवत नाहीत इतकाच फरक त्याला दिसतो. परंतु या दोघांच्या भक्तीभावा खातर त्याला भ्रष्ट फिरस्ता होऊन धांडोळा घेत फिरावे लागते. असा फिरस्ता असणारा कवी स्वतःला कंगाल समजतो. कारण त्याच्याकडे निश्चित असं विश्वासपात्र काहीच उरलेलं नाही. तो इतरांना बदलू देखील शकत नाही हे त्याचे अपयश कवी स्वीकारतो. त्याचा त्याला त्रास देखील होताना दिसतो. अशाप्रकारे कवीने या कवितेतील प्रसंगाच्या माध्यमातून शहर व गाव संस्कृती यांच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या सद्सद् विवेक बुद्धीच्या व्यक्तीची घालमेल व्यक्त केली आहे. जागतिकीकरणांनी बदलणारी गाव संस्कृती ही गोंधळात सापडलेली आहे हे देखील कवी येथे यानिमित्ताने नमूद करतो.

वीरधवल परब हे वास्तवाचा धांडोळा घेणारे कवी आहेत. सर्वसामान्य माणसांच्या अनेक प्रश्नांना ते आपल्या कवितेतून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात. सर्वसामान्य माणसाचे प्रश्न हा त्यांच्या कवितेचा केंद्र आहे. **अवतीभवती किती प्रश्न असतात** ही त्यांची कविता देखील अशाच स्वरूपाची आहे. एकीकडे मन शांत आणि एकाग्र ठेवण्यासाठी माणसं झटत असतात त्याच वेळेला त्यांच्या आजूबाजूला प्रश्नांनी, रोजच्या जगण्यातील आव्हानांनी आणि अडचणींनी घेरलेले असते. अशावेळी प्रश्न पडतो की निराकाराचा वेध घेण्यासाठी केलेले ध्यान काय कामाचे जेव्हा आपल्या अवतीभवती इतके प्रश्न असतात. अशा परिस्थितीत एका विशिष्ट वर्गाचे मन एकाग्र तरी कसे होणार? या कवितेत दारू पिणारा मुलगा आणि त्याच्या त्रासाने हवालदिल झालेला बाप, निरक्षर शेतकरी आणि तहसीलदार, एक रोजंदार आणि पक्ष कार्यकर्ते, कामगार आणि त्याची गरिबीला त्रासलेली बायको गवळी आणि बाजार संघर्ष उभा केलेला आहे. हा संघर्ष स्वातंत्र्यानंतरही कायम आहे याचे कवीला दुःख वाटते. दारू पिऊन झिंगणाऱ्या मुलापासून आणि संसारापासून बापाला सुटका मिळत नाहीये. संसारासाठी त्याला अनेक ताप सहन करावेच लागतात. एका निरक्षर शेतकऱ्याला आपल्या दारिद्र्याची पोच पावती मिळविण्यासाठी तहसीलदार कार्यालयात फेऱ्या घालाव्या लागतात. भारताचा शेतकरी दरिद्री आहे, हे जाहीर असतानाही त्याला या दारिद्र्याची पोचपावती मिळविण्यासाठी पुन्हा झगडावे लागते हे दुर्दैव आहे. सरकारी कार्यालयातील सुटा बुटातील लोक कोण अशा दारिद्र्याकडे लक्ष देणार? हा आजच्या गरीब व श्रीमंत यांच्यातील वाढत्या दरीमध्ये अगदी सहज येणारा प्रश्न आहे. हे अंतर कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे, हे एकविसाव्या शतकातील भारताचे दुर्दैव आहे.

शेतकरी हा देशाचा कणा राहिलेला नाही, हे वास्तव आज या निमित्ताने समोर येते आहे. एका वडापावचा गाडा चालवणाऱ्या माणसाला राजकीय नेत्यांची मर्जी सांभाळून राहावे लागते हे देखील आजचे उघड उघड वास्तव आहे. तो एक मतदार आहे. परंतु तो राजा केवळ निवडणुकीच्या वेळी असतो इतर वेळी मात्र त्याला आपला धंदा आणि पोट सांभाळण्यासाठी वेगवेगळ्या पक्षांची मर्जी सांभाळून राहावे लागते. ज्याच्या घामावर हा देश चालवला जात आहे तोच आज गुलाम आहे हे सत्य एका विकसित देशाचे असणे ही देशासाठी लाजिरवाणी बाब आहे. परंतु आपण दिवसेंदिवस याकडे डोळे झाक करत चाललो आहोत. हे या निमित्ताने कवी येथे सांगू इच्छितो.

या देशातल्या विकासात सामान्यातल्या सामान्य माणसाची परिस्थिती अत्यंत बिकट आहे, हे कवी गवळ्याचे उदाहरण देऊन समोर आणतो. विकासात राखीव कुरणे नष्ट झाली, महामार्गात शेती गेली. जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था करणे कठीण बनले. त्यासाठी गावोगाव गवळी फिरत राहतात. चाऱ्याचा व जनावरांच्या कोंड्याचा प्रश्न बिकट झाल्याने त्यांच्या दुधाची किंमत देखील वाढते. परंतु लोकांना याचे काही नसते. ते बाजारभावाने दूध घ्यायला नाकारून पिशवीतल्या दुधाला अग्रक्रम देतात. तेव्हा आपला धंदा सावरण्यासाठी, संसार वाचवण्यासाठी गवळ्याच्या डोक्यात मात्र आधुनिकतेची चक्र फिरू लागतात. परंतु आर्थिक परिस्थिती अभावी त्याला ते अशक्य असते. याचा राग तो म्हैशीवर काढतो. तेव्हा त्याची प्रतिक्रिया 'ब्रिटिशांचं सरकार चांगलं होतं यापेक्षा' अशी असणं स्वाभाविक आहे. देशाच्या विकासात सर्वसामान्य मात्र भरडला जात आहे, हे वास्तव कवी येथे समोर आणतो. आणि खरंच देश विकसित होत आहे का? असा एक प्रश्न अप्रत्यक्षपणे उभा करतो.

या कवितेत कवीने वर्तमान परिस्थितीत दुर्लक्षित राहिलेल्या अतिशय सामान्य माणसाला व त्याच्या प्रश्नांना आवाज दिलेला आहे. एकीकडे विकासाच्या गप्पा आणि दुसरीकडे त्याची झळ बसणारा सामान्य माणूस असा विरोधाभास या कवितेतून समोर येतो.

गाव आणि शहर, सामान्य आणि श्रीमंत यांच्यातील अंतर वर्तमानात संवेदनशील कवी मनाला अस्वस्थ करणे स्वाभाविक आहे. याच अस्वस्थतेतून वीरधवलपर यांच्या कविता जन्मास येतात. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे याकडे कवी **आठवडी बाजाराच्या दिवशी हल्ली** या कवितेतून लक्ष वेधतो. शहरी जीवनशैलीचे आणि श्रीमंतीचे आकर्षण गाव आणि गावातल्या सामान्य लोकांना टाळणे अशक्य आहे हे या कवितेचा केंद्र आहे. त्यामुळेच या कवितेतील आशय हा या आकर्षणात माणूस स्वतःला अधिकच त्रास करून घेत आहे यातून बनतो. गावात आठवड्याला एक बाजार असतो. ज्या बाजारात सर्व वस्तू मिळतात ठिकठिकाणी लोक आपापल्या वस्तू विक्रीसाठी घेऊन येतात. या बाजारात हरतऱ्हेच्या वस्तू मिळतात. परंतु तरीही गावातल्या लोकांना शहराचे आणि तिथल्या जीवनशैली व वस्तूंचे इतके आकर्षण असते की वडापच्या गाडीत स्वतःला कोंबून लोक या शहरात धावतात. आठवडी बाजारातील वस्तूंच्या किंमती आणि शहरातील शोरूम मधल्या वस्तूंच्या किंमती यांच्यातील अंतर कापणे त्यांच्या आर्थिक परिस्थितीला अशक्य असते. परंतु शोरूमच्या पारदर्शी काचा आणि त्यांचा चकचकाट त्यांना भुरळ घालतो. हमरस्त्याच्या दुतर्फा लावलेले जाहिरातींचे फलक, स्टॅचूवर चढवलेले कपडे, नेत्यांचे मोठमोठे फोटो हे सर्व ते माना वळवून पाहतात. शहर आणि गाव या कोंडीत अडकलेल्या माणसाची हताशा त्याच्या स्वतःच्याच लक्षात येत नाही. शहरातून चालताना तिथल्या ग्रॅनाईटच्या गुळगुळीत फरशींवरून पाय घसरून पडू याच्या भीतीने चप्पल हातातच घेऊन चालतात, अशी परिस्थिती आहे.

घरातल्या मातीच्या दिनवाण्या जमिनीपेक्षा

त्यांना हवाहवासा वाटतो फरशीचा गार स्पर्श

बसावं वाटतं मऊशार कोचावर

गोल गोल फिरणाऱ्या खुर्चीवर

हे आकर्षण त्यांना जमीन सोडून चप्पल हातात घेऊन चालवण्यासाठी भाग पाडते. चप्पल हातात घेऊन चालावे लागले तरी शहरात गावाकडची माणसं येत राहतात.

कितीही आकर्षण वाटलं तरी गावाकडचे लोक शोरूम मधील वस्तू खरेदी करू शकत नाहीत. तेव्हा त्यांना केवळ अप्रत्यक्षपणे त्या वस्तू आपल्या सोबत घेऊन जाता येतात. परंतु तो हे देखील पाहतो की, आपल्याच वस्तू कवडीमोल दराने शहरातल्या मॉलमधून विकल्या जात आहेत. शेतातल्या मालाला ब्रँड नसतो परंतु मॉलमध्ये गेल्यावर त्याला ब्रँड मिळतो. ज्या धान्यासाठी पेढीवरच्या मालकांनं आपल्याला भिकारी समजून हाकलेलं असतं तोच माल शहरात दसपटीच्या दराने विकला जातो आहे. हे पाहून तो हबकतो. तरीही स्वतःला वडापच्या गाडीत कोंबून गावामधून शेकडो गरीब माणसं तालुक्याला जात येत राहतात. आठवडी बाजाराच्या दिवशी घडणारे हे चित्र पाहून कवीला दुःख होते. अशा आठवडी बाजाराचे वर्णन त्याने येथे केले आहे. येथे आठवडी बाजार हा शहर आणि गाव यांच्यातील आकर्षण उपरोधिक पद्धतीने व्यक्त करणारी प्रतिमा बनवून येतो.

हे ग्रामपंचायतीच्या रोजगार हमीचे कामगार ही कविता एका वेगळ्या दुर्लक्षित विषयाला स्पर्श करणारी आहे. सर्वसामान्यांचा कळवळा असणाऱ्या संवेदनशील कवीला या विषयाची दाहकता सहज लक्षात येते, त्यामुळेच कवी असा विषय हाताळू शकतो. दुर्गम, दुष्काळी भागातून मोठा वर्ग शहरात कामगार म्हणून स्थलांतरित होत असतो. शहराच्या विकासात हा वर्ग निव्वळ वापरला जातो. म्हणूनच अनेक विकासाची, श्रमाची कामे या वर्गाकडून कमी मोबदल्यात करून घेतली जातात मात्र विकासाच्या आराखड्यात ही माणसं दुर्लक्षित राहतात. यास कारण ते आपला प्रदेश सोडून ज्या दुष्काळी भागातून आले तितकेच त्यांचा अज्ञान, अशिक्षितपणा साधे भोळेपणा व गरिबी कारण ठरते. ही माणसं शहरात लोकांच्या दयेवर व सहानुभूतीवर जगतात. ते शहरातल्या सुशिक्षित व सुंदर माणसांच्याकडे आशेने पाहतात. यातील कोणीतरी आपली बाजू मांडेल, आपले प्रश्न सोडवेल ही त्यांची आशा असते. परंतु सुशिक्षित माणसांकडून ही अपेक्षा वर्तमानातच नव्हे तर भविष्यात देखील करणे चुकीचे आहे हे कवी कवितेच्या शेवटी नोंदवतो. गावघर सोडलेली स्थलांतरित या माणसांच्या डोळ्यात सतत भयाचे काहूर आणि असुरक्षिततेची भीती दाटून असते. ती हर एकाकडे दयेने पाहतात. परंतु त्यांचे प्रश्न सोडवणे अशक्य आहे हे लक्षात येणारा कवी दुःखी होतो. वर्तमानात देखील मध्ययुगीन सरंजामशाही या लोकांच्या निमित्ताने सुरूच असलेली त्याच्या लक्षात येते. कारण तो पाहतो की या लोकांचे संसार निर्दयपणे भिरकावून लावले जातात. त्यामध्ये ॲल्युमिनियमची ताटी, पत्राची गंजकी पेटी, काठ तुटलेली प्लास्टिकची कळशी आणि मोठ्या मुश्किलीने जमवलेली ज्वारी बाजरीची पायली दोन पायलीची शिदोरी इतका तुटपुंजा आणि मोडका तोडका संसार असतो. जो घेऊन ती या ठिकाणाहून त्या ठिकाणी पोटासाठी ऊन्हा पावसात राबत असतात. परंतु समाजातील तथाकथितांना त्यांच्या या दुर्दशेबद्दल दुःखं वाटत नाही. कवी पाहतो की,

मी पाहिली काडी ओढून भुर्र पेटवून दिली जाताना
त्यांची गोणपाटं शिवून बनवलेली वावभर झोपडी
लंगोटीही गेली जळून त्यात त्यांच्या चिमुरड्यांची
आणि त्यांच्या अंगठ्याचे ठसे
ज्या कागदांवर उमटवले होते ते वेतनाचे कागदही

त्यांच्या गावाकडे त्यांची चिक्कार शेत जमीन असताना आता मात्र ते कोणाच्यातरी खळ्याशी उभे राहून घोटभर पाणी याचकासारखे मागताना कवीला समाजातील निर्दयतेचे दर्शन घडते. त्याहूनही कवीला दुःख वाटते ते याचकाला पाणी देण्याऐवजी त्याच्याच शाळेतला त्याचा विद्यार्थी या कामगारांच्या अंगावर धावून जातो आहे.

या कवितेत कवीने ठिकठिकाणाहून स्थलांतरित झालेल्या रोजगार हमीवरच्या कामगारांची दुर्दशा मांडलेली आहे. या कवितेतील कवी हा शिक्षक आहे. हा शिक्षक पिढी घडवतो. परंतु त्याला दुःख आहे की आपण समाजातील अन्याय व अज्ञान दूर करणारी पिढी घडवू शकत नाही.

## २.४ समारोप–

१९९० नंतरचा काळ हा जागतिकीकरणाने प्रभावित आहे. हा प्रभाव गावापासून शहरापर्यंत आहे. जागतिकीकरणाने केवळ मानवी जगण्यावरच नव्हे तर सृष्टीवरही आक्रमण केले आहे. अशावेळी समकालीन कविता वेगवेगळ्या स्वरूपात समोर येते आहे. तिच्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झालेले दिसतात. ही कविता वास्तवाला अधिक जवळची आहे. हे वास्तव शहरी जीवनातील आहे. समकालात आधुनिकतेने मानवी जगण्यावर व व सृष्टीवर केलेले आक्रमण वास्तवात अनुभवास येते. तेव्हा अशी कविता मानवाला सजग करण्याचा प्रयत्न करते. अशी कविता वास्तवाच्या अधिक जवळची असते हे या कवितांमधून लक्षात येते. मानवी मनाचे परिशिलन करणे हा कवितेचा एक गुणधर्म आहे. तो अशा कवितांमधून साध्य होताना दिसतो. आधुनिक युगाचे आकर्षण यामध्ये आहे. यातील लोकप्रिय कविता ही अधिक नादमधुर व श्रुतीगम्य आहे. ती वास्तवात पूर्ण न होणाऱ्या इच्छांचे एक जग निर्माण करते. तिला स्वतःची एक भाव लय आहे. ही कविता उपमा व अलंकार यांच्यावर अधिक भर देते. अशी कविता वास्तवाच्या फार जवळची नसली तरी ती मानवी मनाला आकर्षित करते.

## २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नोत्तरे

### २.५.१ योग्य पर्याय निवडा.

१) नलेश पाटील यांच्या कवितेतून ......... प्रतिमा आलेल्या दिसतात.

अ. निसर्ग प्रतिमा    ब. सामाजिक प्रतिमा

क. महानगरीय प्रतिमा    ड. यापैकी नाही

२) संदीप खरे हे .........कवी आहेत.

अ. लोकप्रिय    ब. संत कवी    क. दलित कवी    ड. भूमीगत

३) वीरधवल परब यांची कविता ........च्या अधिक जवळची आहे.

अ. वास्तवाच्या		ब. पंडिती साहित्याच्या

क. सत्यशोधकीय		ड. समाजभान

४) हिरव्या वस्तीमध्ये .........ची घरे आहेत.

अ. निसर्ग		ब. प्राणवायूंची

क. महानगरीय		ड. आदिवासी

५) वीरधवल परब यांची कविता .......... प्रदेशातील आहे.

अ. कोकण		ब. खानदेश

क. माणदेश		ड. महानगरीय

उत्तरे १) अ- निसर्ग प्रतिमा   २) अ- लोकप्रिय   ३) अ- वास्तवाच्या

४) ब - प्राणवायू   ५)अ- कोकण

### २.५.२ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) संदिप खरे यांच्या कवितेतील 'नास्तिकतेचे' स्वरूप सांगा.

२) वीरधवल परब यांच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण करा.

### २.५.३ दीर्घोत्तरी प्रश्न.

१) नलेश पाटील यांच्या कवितेतील निसर्ग प्रतिमांचे सौंदर्य उलगडून दाखवा.

२) संदीप खरे यांच्या कवितेतील दोन 'मी' चे स्वरूप वास्तवाच्या आधारे स्पष्ट करा.

३) संदीप खरे यांच्या कवितेतील नास्तिकाचे वेगळेपण स्पष्ट करा.

४) वीरधवलपरब यांच्या कवितेच्या आधारे गाव व शहर यांच्यातील अंतर तुमच्या शब्दात मांडा.

### २.५.४ संदर्भासाठी पुस्तके


१) डहाके, वसंत आबाजी *कवितेविषयी* स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९९.

२) जाधव, रा.ग. *साठोत्तरी मराठी कविता व कवी*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद १९९९.

३) गुप्ते, विश्राम *नवं जग नवं साहित्य*, देशमुख आणि कंपनी पब्लिशिंग प्रा.लि., पुणे.


◆◆◆

घटक ३

# निवडक कविता : भाग –२.१

**प्रफुल्ल शिलेदार**

## १.० उदिष्ट्ये

प्रफुल्ल शिलेदार यांच्या 'तुटत जाण्याचा काळ असला तरीही', 'मुंगी', 'एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस', 'खूप माणूस होऊन' या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

- कवी बहुमितीय आकलनातून वास्तवाकडे कसा पहात असतो हे लक्षात येईल.
- कवीच्या मूल्यात्म दृष्टीचा प्रत्यय येईल.
- कवीच्या काव्य जाणिवांचे प्रतिबिंब अभ्यासता येईल.
- कवीचे प्रतिकूल, दाहक वास्तवात आशावादी असणे लक्षात येईल.
- कवीच्या संवेदनशीलतेला जाणवलेल्या समकालीन जीवनाच्या नोंदी अभ्यासता येतील.
- कवितेतील लय, प्रतीक, प्रतिमा, या घटकाआधारे कवितेचे भाषिक सौंदर्य अभ्यासता येईल.

## १.१ प्रस्तावना

प्रफुल्ल शिलेदार यांच्या कवितेतून नव्वोदत्तर काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संवेदनाची नोंद दिसून येते. प्रफुल्ल शिलेदार आपल्या कवितेतून समकालावर निर्भीड भाष्य करतात. माणुसकीवर विश्वास असणारा हा कवी माणसाविषयी अपार करुणा बाळगतो. सहभावाने माणुसकीची कास धरून आत्मविश्वासाने उद्याचे स्वप्न पाहतो. आजच्या अस्वस्थ वर्तमानात कवी माणुसकीचा आणि आशावादाचा दिवा कवितेच्या हातच्या आडोशाने जपतो. मानवी जीवनमूल्ये पादळी तुडवणाऱ्या भवतालाच्या या अवकाशात प्रफुल्ल शिलेदार यांची कविता अत्यंतिक जिव्हाळ्याने माणूसकी जपते. माणसातला, आपुलकीचा ओलावा जाणते आणि माणुसकीचे आस्थाबंध जपून रहावेत म्हणून धडपडते.

विनाशाच्या आणि हिंसेच्या सावटातही माणसाने जगण्याचा, फुलून येण्याचा धर्म जपला पाहिजे असे कवीला वाटते. मानवतावादाच्या निर्णायक शक्तीला विलीन करणं सोप नसते याची जाणीव कवीला आहे. मानवी मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या अधिपत्याला नकार देणारी, अस्वस्थ असली तरी आश्वस्त असलेली ही कविता आहे. जागतिकीकरणाने प्रभावित केलेल्या समाजसंस्कृतीचे मूल्यात्म भान ही कविता प्रकट करते. आकर्षणाच्या आणि झगमगाटाच्या डोलाऱ्याखाली उपेक्षित वंचित गाडले जात आहेत. भोवंडणाऱ्या या अस्वस्थ अवकाशात बदललेल्या वर्तमानाने एक नवी शोषण व्यवस्था उभी केली आहे. जात वास्तव, भांडवली व्यवस्था त्यातून निर्माण झालेली गुंतागुंत यामुळे सर्वसामान्य माणसाच्या जगण्याची विस्कटलेली घडी त्यातून अनुभवाला येणारे ताणतणाव,

भेडसावणारी पडझड यांचे  प्रत्ययकारी दर्शन प्रफुल्ल शिलेदारांची कविता घडवते. पारंपरिक मूल्यव्यवस्था आणि आधुनिक जगण्याची न नैतिक भूमिका यातून निर्माण झालेल्या संघर्षाला भिडणाऱ्या सर्वसामान्य माणसाचा अगतिक स्वर या कवितेत अधिक ठळक होत जातो आणि वाचकांना अस्वस्थ करतो हे या कवितेचे यश आहे.

**१.२ कवी परिचय – प्रफुल्ल शिलेदार**

प्रफुल्ल शिलेदार यांचे 'स्वगत' (१९९३),'जगण्याच्या पसाऱ्यात' (२००६), 'पायी चालणार' (२०१७, २०२१, २०२४), 'हरवलेल्या वस्तूचं मिथक' (२०२३) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. प्रफुल्ल शिलेदार यांनी 'पैदल चलूँगा' (हिंदी – २०१७), 'समुद्र पर दस्तक' (हिंदी २०२३), 'आत्मकथे बरेयुवा मुन्ना' (कन्नड २०२३), Scratching the Silence (English - 2025), इंग्रजी, हिंदी, मल्याळम, मणिपुरी, ओडिया, नेपाळी, कन्नड, गुजराती, पंजाबी, दखनी, तेलुगु, स्लोवाक, जर्मन, टर्किश इत्यादी भाषांमध्ये कवितांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. प्रफुल्ल शिलेदार  यांची 'आदिवासी साहित्य आणि अस्मितावेध' (भुजंग मेश्राम यांच्या वैचारिक लेखनाचे संपादन– २०१४, २०२३), अरुण कोलटकर (समीक्षा संपादन–२०२४), अरुण कोलटकर 'सत्य, सत्ता आणि साहित्य' (जयंत पवार यांच्या वैचारिक आणि अन्य लेखनाचे सहसंपादन २०२४), सांध्य सूक्ते (२००४), शुभवर्तमान (२०१७) (ना. वा. गोखले यांच्या निवडक कवितांचे संपादन), 'युगवाणी' या विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादन (एप्रिल २०१८ पासून आजपर्यंत या काळात अनेक विशेषांकांचे संपादन) ही संपादने प्रकाशित आहेत. प्रफुल्ल शिलेदार यांचे 'येरझारा'(२०२५) हे गद्य लेखनाचे पुस्तक प्रकाशित आहे. प्रफुल्ल शिलेदार हे अनुवादक आहेत.   त्यांचे   'पूल नसलेली नदी' (मानसी यांच्या मल्याळी कथांचे अनुवाद २००९, २०२४), 'जास्तीचे नाही' (विनोद कुमार शुक्ल यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद २०१३), 'संशयात्मा' (ज्ञानेंद्रपती यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद २०१३),'दगड भिरकावू लागलोय' (चंद्रकांत देवताले यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद २०१९), 'केवळ काही वाक्यं' (उदयन वाजपेयी यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद– २०२३), 'दुसरा ना कोणी' (कुंवर नारायण यांच्या हिंदी कवितासंग्रहाचा अनुवाद २०२५) तसेच अनेक देशी विदेशी कवींच्या कवितांचे अनुवाद विविध नियतकालिकांमधून प्रकाशित केले आहेत.

प्रफुल्ल शिलेदार यांना विशाखा पुरस्कार (१९९३), शरच्चंद्र मुक्तिबोध काव्य पुरस्कार (२००६), केशवसुत पुरस्कार (२००६), गांधी स्मारक निधी अनुवाद पुरस्कार (२००९), बाळशास्त्री जांभेकर अनुवाद पुरस्कार (२०१४), मारवाड़ी फाउंडेशन साहित्य गौरव पुरस्कार, (–२०१७), बाराशिव कविता पुरस्कार (२०१८), लोकमंगल साहित्य पुरस्कार (२०१८), साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार (२०१८), कवीवर्य कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार (२०२१), पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील विशेष साहित्य पुरस्कार, २०२४) इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. प्रफुल्ल शिलेदार यांना आर्स पोएतिका इंटरनॅशनल पोएट्री फेस्टिवल, ब्रातीस्लावा, स्लोवाकिया येथे कविता वाचनाकरता आमंत्रित (२०१३) केले होते, आकाशवाणी प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय कविसंमेलनात (२०१३) सहभाग व बावीस भारतीय भाषांमध्ये त्यांच्या कवितेच्या अनुवादाचे प्रसारण झाले. मालवण जि. सिंधुदुर्ग (२०२४) येथे संपन्न झालेल्या चौथे समाज साहित्य विचार संमेलनाचे त्यांनी संमेलनाध्यक्षपद भुषविले. तसेच ते आर्ट ओमाय, इंटरनॅशनल रायटर्स रेसिडेन्सी, न्यूयॉर्क येथे फेलो रायटर( २०२५) म्हणून वास्तव्यास होते.

### १.३ विषय विवेचन

जागतिकीकरणाचे संवेदन नव्वदोत्तर कवितेत जाणवते. कारण जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या नव्या जीवनशैलीमुळे माणसाचाच, माणसाकडे पाहण्याच्या दृष्टीत अमूलाग्र बदल झाला. त्यामुळे माणूस पूर्णतः व्यवहारी बनला, त्यातूनच मानवी मूल्यांची घरसण होऊ लागली. परिणामतः सामाजिक प्रगतीत बाधा निर्माण झाली. त्यातूनच नव्या सामाजिक विषमतेने जन्म घेतला. या नव्या सामाजिक विषमतेमुळे 'नवे ग्लोबलचे' गावकुस निर्माण झाले. पुन्हा या नव्या गावकुसात नवभांडवलशाही व्यवस्थेद्वारे शोषणाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली. या संपूर्ण घडामोडीचा परिणाम नव्वदोत्तर नंतरच्या मराठी कवितेवर झालेला दिसून येतो. जागतिकीकरण व त्या अनुषंगाने आलेल्या मुक्त बाजारपेठीय संस्कृतीने मानवी जगण्यात गुंतागुंत निर्माण करत अनेक प्रश्न उपस्थित केले. मानवी संवेदनेचे हे समकालीन वास्तव  प्रफुल्ल शिलेदार यांच्या कवितेतून  प्रतिबिंबित झाल्याचे जाणवते. मानवी जगण्याचे वास्तवावादी चित्र त्यांनी आपल्या कवितांतून मांडले. जगण्याच्या झगमगाटीत माणूस स्वतःचे अस्तित्त्व हरवून मुखवटा घेऊन जगतो आहे, ही भावना या कवीने व्यक्त केली आहे. जीवनाचे वास्तव कवितेतून मांडले.  मानवी जगण्यातील निरर्थकता, विरूपता, कटूता माणसाच्या अस्तित्वाचा भाग सहजपणे कसा बनतात या गोष्टींची नोंद कवीने कवितेत केली आहे. मानवी मूल्यांची घसरण याचे वेधक चित्रण प्रफुल्ल शिलेदार यांच्या कवितेत दिसून येते. जागतिकीकरणाची समकालीन कविता आशय, विषय व रचनाशैलीच्या दृष्टीने निराळेपण सिद्ध करणारी आहे. कवीने बदलत्या वर्तमानाचा आलेख रेखांकित केला आहे.

#### १.३.१ तुटत जाण्याचा काळ असला तरीही

प्रफुल्ल शिलेदार यांच्या कवितेत नव्वोदत्तर जीवनजाणिवांचे,  समकालीन संदर्भातील प्रकटीकरण दिसून येते. समकालामध्ये झालेली सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे, पारंपारिक मूल्य व्यवस्थेची वाताहात मानवाच्या पारंपारिक व नैसर्गिक जीवनशैलीची झालेली पडझड दिसून येते. मानवी जगण्याचे नैसर्गिक रूप हरवून  औद्योगिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे मानवी जीवन कुरुप झाले आहे.

'तुकडा तोडण्याकरता सुरू असलेल्या झटापटीत
भाकरी थापणारे हात कुठे आहेत
दिवसाढवळ्या सुसाट सुटलेल्या मरणघाईत
गाढ रात्रीने दिलेला जिवंतपणा कुठे आहे
सडका वास नाकातून येतोय बाहेर
आत भरून घेतलेला गंध कुठे आहे
घट्ट काळा धूर चिकटतोय अंगाला
कानाशी झुळझुळणारी हवा कुठे आहे'

रोजच्या जगण्याकरता सुरू असलेल्या धडपडीत जीवनातली प्रेम, माया, सर्जनशीलता आपण हरवून बसलो आहोत. जगण्याच्या धावपळीत आणि भवतालाच्या कोलाहलात आपण जगणे हरवून बसलो आहोत. दाहक आणि

सडक्या वास्तवाला सामोरे जाताना माणसाने आंतर्यामीची सुंदरता हरवून टाकली आहे. औद्योगिकीकरणामुळे पर्यावारणाचा ऱ्हास होत आहे. हवेतल्या प्रदुषणामुळे घट्ट काळा धूर अंगाला चिकटतोय. पूर्वीची कानाशी झुळझुळणारी हवा कुठे आहे हा अस्वस्थ प्रश्न कवी करतो आहे. औद्यागिक क्रांतीने पर्यावरणावर गंभीर परिणाम केले. औद्योगिकीकरणामुळे हरितगृह वायूचे उत्सर्जन वाढले. हरितगृह वायू वातावरणात अधिक उष्णता अडकवून ठेवतात त्यामुळे जागतिक तापमान वाढून जगभरातील परिसंस्था अस्थिर होतात. पर्यावरणाच्या ऱ्हासाची जाणीव कवीला अस्वस्थ करते.

स्वतःच्या काट्यावर दुसऱ्याला तोलताना
पायाशी काळाची जमीन कुठे आहे
ओंजळीतून सोडलेलं पाणी गेलंय वाहून
मुळापर्यंत पोहचणारी ओल कुठे आहे
तुटत जाण्याचा काळ असला तरीही
जोडले जाण्याची शक्यता कुठे आहे
दोन हातात मावेल एवढीच आहे पृथ्वी
हिरवेपण तोलणारे तळवे कुठे आहेत

मानवी जगण्याची नैसर्गिक रम्यता, विलोभनियता आपण हरवून बसलो आहोत. जणू आपण 'पायाशी असलेली काळाची जमीन' हरवून बसलो आहोत. असे कवीला वाटते. झगमगाटीच्या, वरवरच्या नटव्या आणि दिखाऊ जगण्यात माणूस स्वत:ला रमवू शकणार नाही. त्यामुळे  त्याच्या वाट्याला दुभंगलेपण आणि परात्मतेच्या दु:खाला सामोरे जावे लागणार आहे. कारण त्याच्या जगण्याची 'मुळापर्यंत पोहोचणारी ओल' तो हरवून बसला आहे. सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे मानवी मूल्यांची पडझड होऊन माणसाच्या समरसतेचे, एकतेचे विघटन अशा पद्धतीने होत आहे की, तूटत जाण्याच्या काळात जोडले जाण्याची शक्यता आपण हरवून बसत आहोत.  जागतिकीकरणामुळे आणि तंत्रज्ञानामुळे 'जग एक खेडे आहे' असे वाटत आहे. जागतिकीकरणामुळे व्यापार संस्कृतीचे आदान प्रदान होत आहे. जग एकमेकांशी जोडले जात आहे. जागतिक पातळीवर लोक एकमेकांशी संवाद साधत आहेत. त्यामुळे पृथ्वी माणसाच्या 'दोन हातात मावेल एवढी झाली आहे'. मात्र पृथ्वीचे 'हिरवेपण तोलणारे तळवे हरवले आहेत'.  निसर्गाचे 'हिरवेपण' नष्ट करून माणसाने भौतिक प्रगती केली आहे.

प्रस्तुत कवितेत नैसर्गिक जीवनाच्या गाभ्याशी असलेले हिरवेपण, समृद्धता, सुंदरता, रम्यता, विलोभनियता आपण हरवून बसलो आहोत. ही अस्वस्थ जाणीव व दुखरेपण या कवितेच्या आशयसूत्रातून ध्वनीत होते.वर्तमान जगण्याच्या रेट्यातून  निसर्गातील आदिम मूल्य व्यवस्थेशी सुरू असलेला माणसाचा झगडा आणि त्यातून आलेले दुखरेपण आपणास अस्वस्थ करते. तरीही तूटत जाण्याच्या काळात हे सारं सांभाळू शकू हा 'आशावाद' बाळगत भाकरी थापणारे हात जपायला हवे, रात्रीचा गाढ जिवंतपणा सांभाळायला हवा, नाकात भरून ठेवलेला गंध शोधायला हवा, कानाशी झुळझुळणारी हवा सांभाळायला हवी, पायाशी असलेली काळाची जमीन जपायला हवी, मुळापर्यंत पोहचणारी ओल सांभाळायला हवी, जोडले जाण्याची शक्यता शोधायला हवी, पृथ्वीचे हिरवेपण

तळव्यावर तोलता यायला हवे...या कृतीशीलतेने जगण्याचा पण केला पाहिजे. तरच तुटत जाणारे जगणे सांधता येईल.

'भाकरी थापणारे हात', 'काळाची जमीन', 'दोन हातात मावेल एवढी पृथ्वी' या प्रतिमा अर्थपूर्ण आहेत. कवितेच्या आशयाला बहुस्तरीयता प्राप्त करून देतात. सहज सोप्या काव्यभाषेत कवीने व्यापक आशय व्यक्त केल्याचे दिसून येते.

### १.३.२ मुंगी

'मुंगी' ही अंतर्मुख करणारी चिंतनशील कविता आहे. जागतिकीकरणाच्या दृष्य-अदृष्य परिणामाची जाणीव प्रस्तुत कवितेच्या आशयकेंद्री आहे. माणसाचे विस्थापित होणे, निसर्गापासून विभक्त होणे हे जागतिकीकरणाचे परिणाम आहेत. जागतिकीकरणाने मानवी जीवनात अमुलाग्र बदल केले.

एक मुंगी
थेट माझ्यासमोर उभी राहून
घसा फोडून ओरडून सांगतेय
माझ्या मागे उभं असलेलं धरण
उंच होत होत वाढतंय
आणि ते फुटणारंय बेडकाच्या पोटासारखं
मुंगीच्या आवाजाकडे
मी नेहमीच दुर्लक्ष करतो
आणि फक्त गालातल्या गालात हसतो
मला तिचं सगळं जीव तोडून सांगणं
तिच्याएवढंच हलकं वाटत राहतं
धुळीच्या दरवळासारखं

एक मुंगी धरण उंच उंच वाढत जातय आणि ते फुटणार आहे हे ओरडून सांगत आहे. तिचे सांगणे हे निर्भिडपणाचे आहे आणि त्या ती घसा फोडून सांगत आहे. मात्र मुंगीच्या आवाजाकडे दुर्लक्ष केले जाते. तिचे जीव तोडून सांगणे कवीला धुळीच्या दरवळीसारखं हलकं वाटतं. तिचं सारखं कवीला उद्देशून सांगणं गैरसोईचं होतं. मुंगीचं हसणं कवीला सहन होत नाही. ती कवीला इतकी सूक्ष्म वाटते की, कवी तिला पायाच्या अंगठ्याने चिरडूही शकत नाही. मुंगी कवीच्या लक्षात यासाठी राहते की तिने घसा फोडून सांगितलेलं खरं ठरत जातं.

तिचं सारखं मलाच उद्देशून बोलणं
मला गैरसोयीचं वाटतं
तिचं हसणं सहन होत नाही मला

पण ती इतकी सूक्ष्म आहे की
तिला चिरडूही शकत नाही
माझ्या पायाच्या निबर अंगठ्यानं
ती दिसत राहते भिंगातून पाहिल्यासारखी
बहुतेक राहत असावी
डोळ्याच्याच बाहुलीवर
ती लक्षात एवढ्याकरता राहते
कारण तिने घसा फोडून सांगितलेलं
महत्त्वाचं आणि खरं ठरत जातं

'मुंगी' ही प्रतिमा सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करते. मुंगीत श्रम विभाजन, व्यक्तीमधील संवादी असणे आणि गुंतागुंतीची समस्या सोडवण्याची क्षमता असते.

१२ जुलै १९६१ रोजी पुण्यात पानशेत धरण फुटले होते. त्यानंतर खडकवासला धरण फुटले होते. या घटनेत अनेक लोक मृत्यूमुखी पडले. अनेकांची वाताहत झाली होती, अनेकांची आयुष्य उद्ध्वस्त झाली होती. ज्या दिवशी धरण फुटले त्या दिवशी पुण्याजवळच्या पानशेत धरणाला धोका असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. बातमीत धरणाचा फोटोही छापला होता. याचा अर्थ धरणामुळे धोका निर्माण होणार आहे या संकटाची जाणीव सर्व सामान्य माणसाला झाली होती तरीही विकासाचं स्वप्न पाहणारी सरकारी दमनयंत्रणा सर्व सामान्यांचा आवाज ऐकत नाही.

मध्यप्रदेशातील सरदार सरोवर धरणाचे दरवाजे न उघडल्यामुळे १९३ गावातील कुटुंबांना बुडण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यासाठी धरणाचे दरवाजे उघडण्याच्या मागणीसाठी आणि संबंधित आदिवासी, शेतकरी आणि भूमिहीन कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी 'राजघाट' येथे सत्याग्रह करण्यात आला होता. प्रशासनाने दिलेले आश्वासन विश्वासार्ह नसते. हजारो रहिवाशांचे जीव धोक्यात असतात. पर्यावरणीय मुद्याबाबत प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचा प्रत्यय येतो. पर्यावरण, पुनर्वसन आणि विस्थापन या मुद्यांमुळे असंवेदनशीलतेने दुर्लक्ष केले जाते. धरण जितके आवश्यक असते त्याहून अधिक विस्थापनाचा मुद्दा महत्त्वाचा असतो. परंतु सरारची मनमानी आणि भ्रष्ट शासन यंत्रणा बधिर झाल्याचे दिसून येते.

प्रस्तुत कविता बहुस्तरीय आशयाची आहे. मुंगी ही प्रतिमा जैविक कीटक, सामान्य माणूस हा अर्थ ध्वनित करते. या कवितेतील मुंगी या प्रतिमेत मेघा पाटकर यांच्या शोषित, वंचित, आदिवासी, विस्थापित लोकांसाठी केलेल्या लढ्याचे स्मरण होते.

### १.३.३ एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस

प्रस्तुत कवितेत माणसाच्या मनात असणारा द्वेष, कटूता, कडवटपणा यावर भाष्य केले आहे. मानवतेचे धर्म, जात, प्रदेश, समूह या पध्दतीने विघटन होऊन माणूसकी दुभंगल्याचे चित्र हे समाजाचे वास्तव आहे. टोकाचा द्वेष् करणे माणसाला श्वास घेण्याइतके सोपे वाटत आहे.

‘डोक्यात उकळत असलेलं
कडूजहर डांबर
तुझ्या डोळ्यांतून आरपार दिसतंय
अंगातून उठत आहेत
दुर्गंधीच्या लाटा
एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस
या कडवटपणानं
तुझ्या भाषेला मारला आहे लकवा
ती एक पाय ओढत ओढत
निघून जाते आहे तुझ्या अंगणातून
कुठून निर्माण झाला हा कडवटपणा
ही आग इतकी कशी भडकली
आणि करपला आत्मा

माणसाच्या डोक्यात कडूजहर, डांबर उकळत आहे. त्याच्या अंगातून दुर्गंधीच्या लाटा येत आहेत, कवीला वाटते एवढ्या कडवट पणाचं माणूस काय करणार आहे? या कडवटपणामुळे भाषेला लकवा मारला आहे याचा अर्थ भाषा अधु झाली आहे. ती माणसामाणसात संवादाचे पूल बांधू शकत नाही. भाषा हे संप्रेषनाचे माध्यम असते. भाषेमुळे माणसे एकत्र येतात, एकमेकांशी संवाद साधतात, एकमेकांच्या सांस्कृतीची, वैचारिकतेची देवाण घेवाण करतात. या संप्रेषणातून माणसे एकमेकांना जोडली जातात. त्यांच्यात जिव्हाळा निर्माण होतो. परंतु माणसातल्या कडवटपणामुळे भाषेला लकवा मारला आहे. संप्रेषणातून जिव्हाळा निर्माण करण्यात या कडवटपणामुळे भाषा निष्क्रिय झाली आहे. द्वेषाची, कडवटपणाची आग अशा पद्धतीने भडकली आहे की जणू माणसाचा आत्मा करपला आहे.

माणूसपणाची सीमा ओलांडून
भक्ष्य शोधत हिंडणाऱ्या
लांडग्यांच्या कळपातला
तू एक तरस झालास
तुझ्या अंगावर लटकणाऱ्या
उघड्या मांसाच्या तुकड्यांना पाहून
कुत्री झेपावत आहेत तुझ्याकडे
आणि माणसं पाठ फिरवत आहेत
हेदेखील लक्षात येत नाही

माणूसपणाच्या सीमा रेषा ओलांडून माणसू हिंस्त्र झाला आहे. या माणसाच्या हिंस्त्रतेला कवी लांडग्याच्या कळपातल्या तरसाची उपमा देतात. तरस हा मांसभक्षक प्राणी आहे. समाज व्यवस्थेतील हीनता, क्रूरता, माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटना आजूबाजूला घडताना दिसत आहेत. या बाबतची कवीची अगतिकता उपरोक्त काव्यओळीत दिसून येते. लांडगा, तरस, कुत्री या हिंस्त्र प्राण्यांच्या प्रतिमेतून मानवी मनातील, वागण्यातील हिंस्त्रता अधोरेखित होते.

ज्या कडवटपणात

वितळून जात आहेत

जगण्यातले गुलाबी आकाशी पोपटी रंग

ज्यामधे राख होत आहे

सगळा कोमलपणा विश्वास ओढ आणि आदर

त्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस

कवीला वाटते या कडटपणामुळे माणसाच्या जगण्यातले गुलाबी, आकाशी पोपटी रंग वितळून जात आहेत. माणसाच्या मनातील सगळा कोमलपणा, विश्वास, ओढ आणि आदर या भावनांची राख होत आहे. कवीला या प्रश्न पडतो माणूस एवढ्या कडवटपणाचं काय करणार आहे? जगण्यातले गुलाबी, आकाशी, पोपटी रंग हे माणसाच्या विविध भावनांचे प्रतीक आहेत. गुलाबी रंग हा प्रेम, कोमलता, दयाळूपणा, समत्व, संवेदनशीलता याचे प्रतीक आहे. आकाशी रंग हा शांतता, विश्वास, स्थिरता , विशालता, आनंद, आशावाद, निष्ठा, सद् भावना, सकारात्मकतेचे प्रतीक आहे. पोपटी रंग हा समृध्दी, नवता, निसर्ग, प्रगती, पुनरुज्जीवन, चैतन्याचे प्रतीक आहे. माणूस हे सारे जीवनाला सौंदर्य आणि अर्थपूर्णता बहाल करणारे इंद्रधनुषी रंग कडवटपणात वितळवून टाकत आहेत.

प्रस्तुत कवितेत भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या उपमा, प्रतीक, प्रतिमा यांचे उपयोजन करून कवितेच्या आशयाला अर्थपूर्णता बहाल केली आहे.

**१.३.४ खूप माणूस होऊन**

'खूप माणूस होऊन' या कवितेत माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे आणि माणूस म्हणून जगावे हा संदेश कवीने दिला आहे. वर्तमानकाळातील सामाजिक घडी विस्कटलेली आहे. मानवतेचे विघटन झाले आहे. दुभंगलेपण घेऊन माणूस जगत आहे. अशा परिस्थितीत समाजाला प्रेम, करुणा, बंधुता, एकात्मता जपण्याची गरज आहे. एकात्मता आणि विविधता हे आपल्या देशाचे वेगळेपण आहे आणि हाच आपल्या देशाचा गौरव आहे. हे वेगळेपण जपता आले पाहिजे. धार्मिक द्वेष, हिंसेला नकार देऊन सद्‌भावना व विवेकाची कास धरायला हवी. माणूसकीचा धर्म जपायला हवा. म्हणून कवीला वाटते,

आतून सारखा झिनझिनाट

खूप माणूस होऊन जगावं

खूप माणूस होऊन जगावं

कुणी पडताना दिसताच

धावून सावरावं

झडताना दिसताच

पाणी होऊन मुळापर्यंत पोहचावं

कवीला वाटते, कुणी पडताना दिसताच धावून सावरावं, झडताना दिसताच पाणी होवून मुळापर्यंत पोहोचावं या प्रतिमेतून जीवदान देणे सूचित होते. कुणाला जीवनदान देता आलं तर ते निश्चितच द्यावं. अनोळखी माणसांविषयी आपुलकीची भावना यावी की बिनचेहऱ्याच्या गर्दीन ओळखीचं असावं. शब्द इतके सरळ यावेत की समोरच्याच्या हृद्यात शिरावे. चोराला मिठी मारता त्याच्या मनामध्ये इतके परिवर्तन व्हावे की त्याने केलेल्या कृत्याविषयी अपराधबोध जन्मावा. माणसाला माणसासारखे वागवून पिसाटाच्या डोळ्यातले कौर्य थांबवता यावे. माणसाने बाईला बाईपण, मुलाला मुलपण आणि माणसाला माणूसपण देता यावे. हिजड्यांच्याही खांद्यावर हात ठेवता यावा. मंदावलेले वाट उजळवता यावी. सत्व गमावल्याची जाणीव नाहीशी व्हावी. डोळ्यादेखत सुटून चाललेली भाषा परत हाती यावी. जीवनातल्या बकालपणाला, उध्वस्ततेला, उदासिनतेला, कोरडेपणाला माणूसपणाने कवटाळता यावे. तडकलेल्या मातीला सांधणारे माणूसपणाचे काळेभोर ढग दाटून यावेत. हरवलेला पुटपुटत, हळहळत खिसे चाचपडताना बंदा रुपया गवसल्यावर जो निरागस आनंद होतो तो गवसण्याचा आनंद व्हावा खूप माणूस म्हणून जगताना.

बिनचेहऱ्याच्या गर्दीनं

ओळखीचं हसावं

अनोळखी माणसातही

पाहताक्षणी घुसावं

शब्द इतके सरळ याचे

समोरच्याच्या ह्दयात शिरावे

माणूस होऊन जागावे या साध्या व सोप्या अर्थातून व्यापक अर्थ ध्वनीत होतो. माणूस म्हणून जगणे म्हणजे आपले कर्तव्य पूर्ण करणे, इतरांना मदत करणे, समाज घडविण्यासाठी आपले जीवन समर्पित करणे, भावनांवर नियंत्रण ठेऊन संतुलित जीवन जगणे, सकारात्मक दृष्टीकोन जोपासणे होय. माणूस म्हणून जगणे हे एक कौशल्यच आहे. 'माणूस' होऊन जगण्याची मार्गदर्शिका आहे.

प्रस्तुत कवितेत बिन चेहऱ्यांची गर्दी, ओळखीचं हसू, पिसाटाचे डोळे, रक्ताच्या उसळ्या, मंदावलेली वात या प्रतिमा अर्थपूर्ण आहेत.

**१.४ सारांश**

प्रफुल्ल शिलेदार यांनी 'तुटत जाण्याचा काळ असला तरीही', 'मुंगी', 'एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस', 'खूप माणूस होऊन' या कवितातून समकालीन वास्तवाविषयी भाष्य केले आहे. 'तुटत जाण्याचा

काळ असला तरीही' कवितेत नैसर्गिक जीवनाच्या गाभ्याशी असलेले हिरवेपण, समृद्धता, सुंदरता, रम्यता, विलोभनियता हरवून बसल्याची अस्वस्थ जाणीव व दुखरेपण या कवितेतू दिसून येते. वर्तमान जगण्याच्या रेट्यातून निसर्गातील आदिम मूल्य व्यवस्थेशी सुरू असलेला माणसाचा झगडा आणि त्यातून आलेले दुखरेपण या कवितेच्या आशयकेंद्री आहे. 'मुंगी' ही अंतर्मुख करणारी चिंतनशील कविता आहे. जागतिकीकरणाच्या दृष्य-अदृष्य परिणामाची जाणीव या कवितेच्या आशयकेंद्री आहे. माणसाचे विस्थापित होणे, निसर्गापासून विभक्त होणे हे जागतिकीकरणाचे परिणाम आहेत. जागतिकीकरणाने मानवी जीवनात केलेल्या अमुलाग्र बदलाचे प्रतिबिंब या कवितेत दिसून येते. 'एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस', कवितेत माणसाच्या मनात असणारा द्वेष, कटूता, कडवटपणा यावर भाष्य केले आहे. मानवतेचे धर्म, जात, प्रदेश, समूह या पध्दतीने विघटन होऊन माणूसकी दुभंगल्याचे चित्र हे समाजाचे वास्तवचित्र या कवितेत दिसून येते. 'खूप माणूस होऊन' ही कविता म्हणजे 'माणूस' होऊन जगण्याची मार्गदर्शिका आहे. 'खूप माणूस होऊन' या कवितेत माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे आणि माणूस म्हणून जगावे हा संदेश कवीने दिला आहे.

### १.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. तोलणे - वजन करणे, जोखणे

२. लकवा - अर्धांगवायू, अधू होणे, शरीराचा एक भाग निकामी होणे

३. तरस - मांसभक्षक प्राणी

४. घटत जाणे - कमी होणे, क्षीण होणे, घटणे

५. बकालपणाला - उद्धस्त, उदासीनता

६. सांधणे - जोडणे, जुळविणे, एकत्र करणे

७. गवसणे - मिळणे, सापडणे, हाती लागणे

### १.६ स्वयं अध्ययन प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. कशापर्यंत पोहचणारी ओलं कवी शोधत आहे?.

अ. मुळापर्यंत ब. खोडापर्यंत

क. झाडापर्यंत ड. फुलापर्यंत

२. दोन हातात मावेल एवढे काय आहे?

अ. चंद्र ब. सूर्य

क. पृथ्वी ड. आकाश

३. धरण फुटणार आहे असं ओरडून कोण सांगत आहे ?

अ. आदिवासी ब. बेडूक

क. कवी ड. मुंगी

४. मुंगी लक्षात का रहाते?

अ. तिने सांगितलेलं महत्त्वाचं आणि खरं असतं.

ब. तिने सांगितलेलं खोटं असतं.

क. तिने सांगितलेलं मिथक असतं.

ड. तिने सांगितलेलं फसवं असतं.

५. भाषेला काय मारला आहे?.

अ. परफ्युम ब. सुगंध

क. लकवा ड. मसाला

६. खूप ---------- होऊन जगावं.

अ. माणूस ब. देव

क. देवदूत ड. यक्ष

७. कुणी पडताना दिसताच काय करावे?.

अ. पडूद्यावे ब. धावून सावरावे

क. दुर्लक्ष करावे ड. हसावे

**१.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१. मुळापर्यंत

२. पृथ्वी

३. मुंगी

४. तिने सांगितलेलं महत्त्वाचं आणि खरं असतं.

५. लकवा

६. माणूस

७. धावून सावरावे

## १.८ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'तुटत जाण्याचा काळ असला तरीही' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

२. 'मुंगी' या कवितेचे आशयसूत्र स्पष्ट करा.

३. कवितेच्या घटका आधारे प्रफुल्ल शिलेदार यांच्या कवितेचे सौंदर्य स्पष्ट करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'एवढ्या कडवटपणाचं तू काय करणार आहेस' या कवितेच्या आशयकेंद्री कवी कोणता विचार मांडतो?

२. मुंगी घसा फोडून काय सांगते आणि ती का लक्षात राहते?

३. 'खूप माणूस होऊन' या कवितेतला मानवतावादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. कवितेविषयी, वसंत आबाजी डहाके, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

२. कविता संकल्पना आणि निर्मिती, वसंत पाटणकर

३. कविता आणि प्रतिमा, सुधीर रसाळ, मौज प्रकाशन, मुंबई

◆◆◆

घटक ३

# निवडक कविता : भाग –२.२

## एकनाथ पाटील

**अनुक्रमणिका**

**२.० उद्दिष्ट्ये**

एकनाथ पाटील यांच्या 'माझा बाप शेतकरी', 'तिला खोलवर गलबलून येते आतून', 'मातीत मुळं घट्ट रोवून', 'संतान जॅकोबा डिसूझा' या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

कवीची ग्रामीण संवेदना, शेकतऱ्याविषयी असलेले आस्था, भावबंध समजून येतील.

ग्रामीण जीवनानुभवातील विदारक वास्तव लक्षात येईल.

औद्योगिक संस्कृतीच्या भयावह आक्रमणाने झालेली शेतकऱ्याची अवस्था लक्षात येईल.

कवीच्या संवेदनशीलतेला जाणवलेल्या बदलत्या ग्रामीण जीवनाच्या नोंदी अभ्यासता येतील.

कवितेतील लय, प्रतीक, प्रतिमा, या घटका आधारे कवितेचे भाषिक सौंदर्य अभ्यासता येईल.

**२.१ प्रस्तावना**

प्रारंभीच्या कालखंडात ग्रामीण कवितेचे संवेदन प्रगल्भ आणि सखोल नव्हते. परंतु सद्यस्थितीत बदलत्या कालखंडाला सामोरे जात ग्रामीण कविता वास्तवाची नोंद घेत असल्याचे जाणवते. १९९० च्या पूर्वीची ग्रामीण कविता निसर्ग वर्णने, वातावरणातील रम्यता, निसर्गात फुलणारा प्रेमी युगुलांचा प्रेमभाव याचा आविष्कार करणारी होती. १९९० नंतरच्या ग्रामीण कवितेचे रूप साहित्य चळवळीमुळे बदलले. ग्रामीण पार्श्वभूमीवर कार्यरत असणाऱ्या विविध चळवळीतून अनेक लेखक-कवी उदयास आले. आत्मभान असलेली ही पिढी बदलत्या ग्रामीण समस्यांना प्रत्यक्षपणे सामोरे जात होती. त्यांना कृषी जीवनाविषयीचे भान होते. औद्यागिक संस्कृतीच्या आक्रमणामुळे विकासाचे स्वप्न दाखवलेली खेडी उजाड झाली. कृषीसंस्कृतीवर हल्ले झाले. शेतजमिनीवर टोलेजंग इमारती बांधल्या गेल्या. प्रकल्प, धरणे, राष्ट्रीय महामार्ग, मॉल्स निर्मितीसाठी शेतकऱ्यांच्या काळ्याभोर पिकावू जमीनी वापरल्या गेल्या. खेड्यातले लोक उदरनिर्वाहासाठी शहरात पांगले. जागतिकीकरणाच्या उदयामुळे खेड्यातील परंपरा, मुल्ये, संस्कृती बदलली. विकासाचे स्वप्न दाखवून खेड्यांना उद्ध्वस्त केले गेले. हे चित्र बघून नव्या पिढीतील लेखक कवींचा भ्रमनिरास झाला. ही भ्रमनिरासता, अस्वस्थता, आराजकता या लेखक कवींच्या कलाकृतीचे आशयसूत्र बनले. एकनाथ पाटील यांनी ग्रामीण जीवनाचा, कृषी जीवनाचा पेज केंद्रस्थानी ठेवून बदलत्या ग्रामीण जीवनाचे, शेतकरी जीवनाचे वेगवेगळे बदल आपल्या कवितेतून उलगडून दाखवले आहेत.

शेती हा बेभरोशाचा धंदा आहे. सततच्या दुष्काळामुळे, पिकावर होणाऱ्या रोगराईमुळे, सरकारी मदतीच्या अभावामुळे शेती करणे बिकट होत आहे. बदलत्या शेतीची व्यथा सांगणारी कविता आणि शेतकऱ्याभोवती

घोंगावणाऱ्या अराजकतेच्या वादळाचे भयसूचन एकनाथ पाटील यांनी आपल्या कवितेतून केले आहे. आपल्या भोवतालाचे सामाजिक पर्यावरण व त्याला वेढून असलेल्या दाहक वर्तमानाची नोंद एकनाथ पाटील यांनी आपल्या कवितेतून केली आहे. आजच्या काळातील औद्योगिक आक्रमणामुळे, जागतिकीकरणामुळे, बदलत्या खेड्याचे भकासपण आणि शेतकऱ्याच्या विमनस्क अवस्थेचे शल्य कवीला वाटते.

**२.२ कवी परिचय – एकनाथ पाटील (जन्म २ डिसेंबर, १९७२ )**

एकनाथ पाटील हे नव्वद नंतरच्या कालखंडातील कवी आहेत. कृषी संस्कृतीशी घट्ट पाळे असलेली कविता एकनाथ पगार यांनी लिहिली. कृषीजीवन हा त्यांचा आस्थेचा परिघ आहे. शेतकऱ्याच्या, गावसंस्कृतीतल्या माणसाच्या हर्ष-खेदाच्या भावना त्यांनी आपल्या कवितेतून शब्दांकित केल्या. बदलत्या ग्रामीण जीवनाची व्यथा सांगणाऱ्या कविता एकनाथ पाटील यांनी लिहिल्या आहेत. सध्या ते कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली येथे 'मराठी' भाषा आणि वाङ्मयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. एकनाथ पाटील यांचे 'सत्वशोधाच्या कविता' (२००४), 'खुंट्यांवर टांगलेली दुःखं'(२००९), 'आरपार झुंजार', (२०२२) 'अरिष्टकाळाचे भयसूचन'(२०२३) हे चार कविता संग्रह प्रकाशित आहेत. एकनाथ पाटील यांनी '१९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा'(२००८), 'जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने (२०१८), 'कादंबरीच्या निर्मितीचा सूत्रशोध'(२०२०), 'युगानुयुगे तूच : संदर्भ आणि अन्वयार्थ'(२०२३), 'एन. डी. पाटील यांची प्रदीर्घ मुलाखत'(२०२५) हे ग्रंथ संपादित केले आहेत. तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक प्रयोग झालेल्या 'सॉक्रेटिस ते दाभोळकर पानसरे व्हाया तुकाराम' या रिंगणनाटकाच्या एका भागाचे लेखन एकनाथ पाटील यांनी केले आहे.'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका' (त्रैमासिक) या मराठीतील वायीन नियतकालिकाचे संपादन एकनाथ पाटील यांनी केले आहे. (कालखंड : एप्रिल २०१६ ते जून २०२२ अखेर)

एकनाथ पाटील यांना कवी केशवसुत पुरस्कार, शेतकरी साहित्य पुरस्कार, विशाखा काव्य पुरस्कार, भि.ग रोहमारे ग्रामीण साहित्य निर्मिती पुरस्कार, वसंत सावंत काव्य सन्मान, मुक्ताई साहित्य पुरस्कार, दे. भ. बळवंतराव मगर साहित्य पुरस्कार भूमी काव्य पुरस्कार, नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, कविवर्य रेंदाळकर वाङ्मय पुरस्कार, सुधांशु काव्य पुरस्कार, शब्दगंध काव्य पुरस्कार, चैतन्य माने काव्य पुरस्कार, मैत्र काव्य पुरस्कार, श्रीशब्द काव्य पुरस्कार, उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार, न.ना. देशपांडे उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार, कृष्णाई साहित्य गौरव पुरस्कार, बलभीम मुळे स्मृती पुरस्कार, कोळंबा वाचनालयाचा साहित्य पुरस्कार, वामनदादा कर्डक काव्य पुरस्कार, शिविम उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार, काशिबाई घुले राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार, चिकोत्रा भूषण पुरस्कार, शाहीर अण्णा भाऊ साठे साहित्य पुरस्कार, शहीद शिवाजी मगदूम समाजरत्न पुरस्कार, विशेष गुण गौरव साहित्य पुरस्कार, साधना पुरस्कार, या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**२.३ विषय विवेचन :**

ग्रामीण कविता ही कृषीसंस्कृतीची कविता आहे. समकालीन ग्रामीण कवितेने कृषीसंस्कृतीचे विविधांगी जीवनदर्शन घडविलेले दिसून येते. जागतिकीकरणाच्या परिणामाची नोंद या कवितेने ठळकपणे केलेली दिसून येते.

समकालातील एकनाथ पाटील हे कृषी संवेदन अधोरेखित करणारे महत्त्वाचे कवी आहेत. एकनाथ पाटील यांनी नव्वोदत्तर कालखंडात ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या समस्येवर भाष्य केले आहे.

एकनाथ पाटील यांच्या आस्थे चे केंद्र गाव आहे. औद्योगिक संस्कृतीमुळे गाव आणि शहर हे पेच निर्माण झाले. खाजगिकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणांमुळे ग्रामीण जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. विकासाच्या नावाखाली ग्रामीण जीवनाचे शोषण झाले. या शोषणाची नोंद एकनाथ पाटील यांनी आपल्या कवितेतून घेतली आहे. गावातील राजकारण, जातीयता, धर्मांधता, सावकारशाही, व्यसनाधिनता, गावपातळीवरील कुटील कारस्थाने, निसर्गाचा लहरीपणा याच परिणाम कृषीनिष्ठ ग्रामजीवनावर झाला. या परिणामाचे पडसाद एकनाथ पाटील यांच्या कवितेत दिसून येतात. शेती- माती- माती या आशयसूत्रातून त्यांनी कवितालेखन केले. त्यांची कविता अंतर्मुख आणि चिंतनशील आहे.

### २.३.१ माझा बाप शेतकरी

शेतकरी हा भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा आहे. 'मढे झाकुनिया। करावी पेरणी।'या संत वचनाप्रमाणे तो काळ्या आईवर श्रद्धा ठेवतो, तिला सर्वस्व अर्पण करत मातीत राबणारा शेतकरी सर्वांना पोसतो. म्हणूनच तो 'जगाचा पोशिंदा' असतो. जगाचा पोशिंदा असलेल्या या शेतकऱ्याच्या जीवनाची व्यथा दयनीय असते. दैन्य-दारिद्रयाने गांजलेला, दुष्काळ, पाणी टंचाई, रोगराई, कर्जबाजारी या कचाट्यात सापडलेल्या दुर्दैवी शेतकऱ्याची शोकात्म वेदना हे या कवितेचे आशयसूत्र आहे.

'माझा बाप शेतकरी
उभा खपला मातीत
दारिद्र्याची कळ त्याच्या
सदा उठते छातीत'

'माझा बाप शेतकरी' ही कविता शेता राबणाऱ्या उन्हातानात अपार कष्ट करणाऱ्या बाप नावाच्या बळीराजाचे शोकात्मक कथन आहे. उभं आयुष्य शेतात राबणाऱ्या बापाच्या वाट्याला दारिद्र्य येते. आस्मानी सुलतानी संकटांना तोंड देताना ह्या शेतकरी बापाची विठोबावर श्रद्धा आहे.

'त्याच्या छातीतली कळ
कशी व्हईल हलकी?
बोले विठोबाला नवस
तुला वाहीन पालखी'

दारिद्र्यात हताश झालेला बाप विठोबाला 'पालखी वाहण्याचा' नवस करतो विठ्ठलाला आई बाप समजणारा बाप त्याच्या बरकतीला व्यवहारीक फुटपट्टीने मोजत नाही. विठ्ठलावर नितांत श्रद्धा असलेल्या शेतकरी बापाच्या हाकेला मात्र विठू धावून जात नाही. कवीला भाबड्या बापाला विठूचं फसवणं अस्वस्थ करते.

दैववादी असलेल्या शेतकऱ्याला जेव्हा निसर्गही साथ देत नाही, शेती पिकत नाही म्हणून हताश होणं खचून आणि खंगून जाणाऱ्या शेतकऱ्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या शेतकरी बापाची व्यथा प्रस्तुत कवितेतहृदयस्पर्शी

शब्दात मांडली आहे. शेतकऱ्याच्या दु:खाची एक हाताश जाणीव या कवितेतून व्यक्त होते. ज्याच्यावर विश्वास आहे तो देवही शेतकऱ्याच्या आर्त प्रार्थनेला प्रतिसाद देत नाही.

'काळजीचा फाळा
त्याच्या पोटात घुसला
गरिबीचा साप
त्याच्या पाठीला डसला
हत्तीसारा माझा बाप
हळूहळू खचला
दारिद्र्याचा गाळ
त्याच्या पायात साचला.'

निसर्गाची अवकृपा शेतकऱ्याला दारिद्र्याच्या खाईत लोटते. या सार्वत्रिक दु:खाचे प्रातिनिधिक रूप या कवितेत दिसून येते.

दारिद्र्याची कळ, व्यवहाराच माप, काळजीचा फाळ, हत्तीसारा बाप, दारिद्र्याचा गाळ या शब्दप्रतिमा अर्थपूर्ण आहेत.कवितेत यमकबद्ध रचनेमुळे लय निर्माण झाली आहे. मातीत-छातीत, हालकी-पालखी, बाप-माप, केला-गेला, मान-दान, घुसला-डसला, खचला-साचला, राहिला-ध्यायीला अशा शब्दसंयोगामुळे कवितेला लय प्राप्त झाली आहे.

### २.३.२ तिला खोलवर गलबलून येते आतून

'तिला खोलवर गलबलून येते आतून' या कवितेत तरूमावशीच्या व्यक्तिगत पातळीवर सुरू असलेला भावनिक कोलाहल अपत्य असूनही एकाकी जीवन जगणाऱ्या वृद्ध अवस्थेतील आईबापाचे प्रतिनिधित्व करतो. नोकरीसाठी खेड्यातून शहरात स्थलांतर करणारी मुले आई वडिलांना सोबत नेत नाहीत आणि गावाकडे येवून त्यांची देखभालही करत नाहीत. नव्या पिढीला आपल्या अस्तित्त्वासाठी संघर्ष करणे अटळ असले तरी जगण्याच्या लढाईत आलेली कर्तव्यभावना निभावली जात नाही. मूल्यहीनता, संवेदनशीलता, जगण्याला आलेले बाजारू रूप, फायदे-तोटे या गणितावर बेतलेल्या नातेसंबंधातून जगण्याला आलेले बाजारूरूप या कवितेत दिसून येते.

'गाडी गेल्यावर मला तिच्या दारावरून जावे लागते
तेव्हा डोक्याला हात लावून तरुमावशी दारातच बसलेली असते.
अधू झालेल्या किलकिल्या डोळ्यांनी आधी माझा अंदाज घेते
खात्री पटल्यावर जोराची हाक देते,
'ए माज्या हाट्याच्या तसाच जातू व्हय रं मला टाळून'
मला जाताच येत नाही मग पुढे तिचे घर गाळून
रस्त्यावरच उभारलो तिच्याशी बोलत
तर वाकत वाकत जवळ येते
आणि हाताला धरून ओढून नेते.'

गावी गेल्यावर तरूमावशीच्या गावावरून जाताना अधू असलेल्या आपल्या किलकिल्या डोळ्यांनी तरूमावशी कवीचा अंदाज घेते. दारावरून चाललेल्या कवीला तरूमावशी हाक मारून बोलावते. कवीत स्वत:च्या मुलला बघणारी तरूमावशी चहाचं आदन ठेवत तिच्या एकटेपणविषयी, तिला वाटणाऱ्या पोरकेपणाविषयी भरभरून बोलते.

'तिकडे चुलीवर चहा असतो शिजत
तिच्या दु:खाला स्पर्श करायला माझे मन नाही धजत.
म्हणते, 'लेकरा माजं धा गेलं पाच उरलं
मालक मरून गेला मला एकटीला मागं सोडून
त्यो गेला नी बध मी बी कशी पडले मोडून
बचारामाला शिकीवला हाडाची काडं करून
पर त्यो बी इसरला.
आता म्हातारपणात एकटीच ऱ्हाते भुईला धरून
एक येळा शिजवायचं आन दोन येळंला खायचं
खालं तर खायाचं नायतर कवा कवा तसंच ऱ्हायाचं.'

तरुमावशीचा शिकलेला लेक शहरात नोकरी निमित्त जातो. आपल्या बायको-पोरात तिथेच रमतो आणि गावाकडच्या वृद्ध आईकडे दुर्लक्ष करतो.तरूमावशीला गावाकडे एकटे सोडून राहणारा तिचा लेक सुगी झाल्यावर वाण्याच्या दुकानात फोन करतो. 'धान्य माझ्याशिवाय विकू नको' म्हणतो. तरूमावशीचा मुलगा घाईघाईत मुंबईहून येतो. धान्याचे पैसे घेऊन लगेच परत जातो. तरूणपणी आईने खस्ता खावून, कष्ट करून, दागिने गहाण ठेऊन त्याला शिकवले परंतु मुलाने आईच्या कष्टाची जाणीव ठेवली नाही. तरूमावशी म्हातारपणी स्वत:च्या लेकराजवळ रहावसं वाटतं, नातवंडांना मांडीवर घ्यावसं वाटतं. परंतु सुनेला गावाकडची म्हातारी सासू नको असते. तरूमावशीचं दु:ख गावाकडील बहुतांशी वृद्धावस्थेतील माणसांचे दु:ख आहे.

### २.३.३ मातीत मुळं घट्ट रोवून

२००० च्या शेवटच्या दशकात आपल्या देशाने खुली अर्थव्यवस्था स्वीकारली. खुल्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांना विविध संधी देणे अपेक्षित होते. खुल्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांना या संधीचा लाभ घेता यावा म्हणून शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी योग्य धोरणे आणि योजना राबवणे गरजेचे असते. यामुळे खुल्या अर्थव्यवस्थेत शेतकरी विविध प्रकारची उत्पादने उदा. धान्य, भाजीपाला. ही उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारात विकू शकतात. शेतकरी इतर देशाकडून नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादने आयात करू शकतात व स्वत:ची उत्पादने निर्यात करू शकतात. शेतकरी आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर उत्पादकांशी स्पर्धा करू शकतो. आपल्या उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ मिळवू शकतो. मात्र या खुल्याअर्थव्यवस्थेचे शेतकऱ्याला फायदे होण्याऐवजी तोटे झाले.

'संकरितच्या नादाला लावून
तुझ्या गाडग्याला अस्सल वाणाचा सकस बिवाळा

कधीच मोडीत काढला त्यांनी
आता बाजारात मिळणारा डुप्लिकेट बिवाळा
तुझ्या रानात उगवून येत नाही
त्याचं काय करायचं?'

खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्वीकारामुळे बहुराष्ट्र कंपन्यांचा शिरकाव झाला. देश जागतिक बँकेच्या दबावाखाली आला आणि सरकारने देशातील सीड बँका बंद केल्या. कृषी विद्यापीठातील बियाणे संशोधनाला प्रोत्साहन दिले नाही, त्याकडे दुर्लक्ष केले. बहुराष्ट्र कंपन्यांनी प्रलोभने दाखविली. शेतीची समृद्धी होऊन शेतकऱ्याच्या जीवनात अमूलाग्र बदल होणार असल्याचे विविध जाहिरातीतून दाखवले. शेतकरी या प्रलोभनाला आणि मृगजळाला भुलला. शेतकऱ्याने पारंपारिक शेती नाकारून रासायनिक शेती अवलंबली. व्यवस्थेने शेतकऱ्याला पारंपारिक शेती पद्धती नाकारून रासायनिक शेतीपद्धती अवलंबण्यास भाग पाडले. संकरीत बियाणे, रासायनिक खते, रासायनिक शेतीपद्धती, किटक नाशकांचा अतिरेकी वापर यामुळे शेतकरी कर्जात बुडाला. उत्पादन खर्चावर आधारीत हमीभाव त्याला मिळाला नाही. रासायनिक खताच्या वापरामुळे शेतातल्या मातीचा कस निकृष्ठ झाला. बेभरोशाच्या पावसामुळे उत्पन्न घटले. बँकांच्या तुटपुंज्या कर्जाच्या खर्चामुळे शेतकरी दुर्दशेच्या चक्रव्यूहात अडकला.

'तुझ्या अर्ध्याअधिक शेतांवर आक्रमणं करून
सेझसाठी टोलंजंग कॉँक्रिटीकरण केलंच आहे त्यांनी
तिथं उभारलेल्या उद्योगांचं रसायनमिश्रित सांडपाणी
तुझ्या उरल्यासुरल्या शेताच्या तुकडयात आणून सोडलं आहे
शेताबरोबरच आता तुझा मेंदूही क्षारपड होत निघालाय
त्याचं काय करायचं?'

सेझ (SEZ)मुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. शेतकऱ्याची सुपीक जमीन बळकावल्यामुळे ते बेरोजगार झाले. सुपीक जमीनीवर टोलेजंग इमारती बांधल्या गेल्या. विविध रासायनिक उद्योगांनी रसायन मिश्रीत पाणी नद्यांना सोडले. त्यामुळे जमीन क्षार मिश्रीत झाली. काळ्या आईमुळे शेतकऱ्याचा उदरनिर्वाह होत होता. सेजमुळे त्याच्या उपजिवीकेचे साधन हिसकावून घेतले गेले. त्यामुळे शेतकऱ्याचे मानसिक खच्चीकरण झाले. आपल्याला फसवल्या गेल्याची भावना आली. उजाड शेत आणि उद्ध्वस्त गाव सोडून शेतकरी शहरात स्थलांतरित झाले. शेतकऱ्याविना गावं उजाड झाली.

'या सगळ्या परिस्थितीवर मात करताना
तू नांगर सोडला नाहीस
धानाला दर मिळत नसतानाही
शेती कसणं सोडलं नाहीस

मात्र आता तुलाच

जगण्यातून हद्दपार करण्याची

कुटील कारस्थानं सुरू आहेत...'

कवीला शेतकऱ्याचे कौतुक यासाठी वाटते की, या सगळ्या परिस्थितीवर मात करताना शेतकऱ्याने नांगर सोडला नाही. धान्याला हमीभाव नसताना शेती करणं सोडलं नाही. शेतकऱ्याच्या आजूबाजूला सगळे प्रश्न आवासून उभे आहेत तरीही शेतकऱ्याने धीर सोडता कामा नये. सर्व ताकदीनीशी ही लढाई शेतकऱ्याला लढावी लागणार आहे.

'मातीत मुळं घट्ट रोवून

सर्व ताकदीनिशी आपल्याला लढावंच लागेल या लढाईत

टिकावंच लागेल सर्वस्व पणाला लावून

आजमितीला बाकी काहीच नाही करता आलं,

तरी जगण्याला धार लावून ठेवणं आपल्या हाती आहे

तेवढी धार लावून ठेवूया...'

शेतकऱ्याविषयी उदासिन असलेल्या राजकीय धोरणांनी शेतकऱ्याचे जीवन अधिकच उद्ध्वस्त केल्याचे दिसून येते. नव्या अर्थकरणात शेतकऱ्याचे शोषण होत आहे. शेतकऱ्याचे भयावह शोषणाचे आणि पिळवणूकीचे करुण चित्र रंगवून ही कविता थांबत नाही तर शेतकऱ्यांना संघर्ष करण्याची चेतावणी देत आहे.

### २.३.४ संतान जॅकोबा डिसूझा

'संतान जॅकोबा डिसूझा' हा निरपेक्ष भावनेने गावाची सेवा करणारा तळमळीचा कार्यकर्ता होता म्हणूनच तो गावाचा सलग वीस वर्ष बिनविरोध सरपंच होता. गावाने त्याला मोठ्या भावाचा दर्जा दिला होता. त्याने कुठल्या शाळेत शिकवले नाही तरी आख्खा गाव त्याला संतान मास्तर म्हणायचे. अल्पसंख्याक असलेल्या संतान जॅकोबा डिसूझाने आपला धर्म गावाच्या सेवेआड कधी येऊ दिला नाही.गावाच्या रितीभाती त्याने निष्ठेने सांभाळल्या.

'त्याच्या गळ्यात पंढरीची माळ

गावाच्या वारकरी पंपरेशी जोडलेली त्याची नाळ

त्याच्या देव्हाऱ्यात येशू आणि विठोबा एकत्र नांदायचे

सगळ्या गावाला एका समान धाग्यात बांधायचे

दसऱ्याला जोतिबाच्या पालखीला त्याने नेहमीच दिला खांदा

त्यावरून गावाने कधीच केला नाही वांदा.'

समकालातील धर्मांध असलेल्या दाहक वास्तवात 'संतान जॅकोबा डिसूझा माणूसकी जपायचा. त्याच्या देव्हाऱ्यात येशू आणि विठोबा असायचे. दसऱ्याला जोतीबाच्या पालखीला तो श्रद्धेने खांदा द्यायचा. गावातल्या

लोकांच्या अडीअडचणींना तो धावून जायचा. गावातले उपकार जाणून तो सदैव गावकऱ्यांविषयी कृतज्ञ असायचा. त्याने कुठलेही पद मिरवले नाही आणि सत्तेचा माज वाटू दिला नाही. गावातील सगळ्या माणसांप्रती त्याला कळवळा होता. सामान्यातला सामान्य होऊन तो वेळोवेळी लोकांच्या अडचणींना धाऊन जात असे. कधी पंचायतीच्या फळ बागेत तो शिपायाबरोबर तण खुरपायचा. तर हातात खराटा घेऊन प्राथमिक शाळेचा परिसर झाडायचा. सत्तेतून त्याने कधी पैसे मिळवले नाहीत आणि पैसे देऊन कधी कुठले पद मिळवले नाही. त्याची बायको वाड्यावस्त्यावर फिरून झिंग्या बांगड्या विकायची. त्यावर त्याच्या कुटुंबाची उपजिविका चालायची. गावात त्याने जात धर्माला द्वेषाचे स्वरूप दिले नाही.

आयोध्येत बाबरी मशिदीचं पतन झालं आणि गावात दुही निर्माण झाली. या प्रसंगाला घेऊन काही दुष्टप्रवृत्तीच्या लोकांनी तापल्या तव्यावर पोळी भाजण्याचा प्रयत्न केला आणि संघर्ष निर्माण केला. संतांचा सर्वधर्म समभाव गावातल्या दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना रूचला नाही. त्याच्या वागण्याचे त्या लोकांनी भांडवल केले. 'हा कोण, कुठला याचा काय संबंध गावाशी?' हा प्रश्न उपस्थित करून संतांविषयी गावात उलटसुलट प्रचार केला. संतांनी मात्र त्यांच्या अपप्रचाराला प्रतिउत्तर दिले नाही आणि निवडणूक जिंकण्याचे राजकारणही केले नाही. या सर्वाचा परिणाम म्हणजे संता निवडणूक हरला. निर्विकारपणे पंचायतीतून घरी परतला. पुन्हा तो पंचायतीची पायरी चढा नाही आणि झाल्या प्रकारावर त्याने कुणावर रागही धरला नाही.

'खूप वर्ष झाली या गोष्टीला
तरीही आता संतान लोकांत फारसा मिसळत नाही
कुणाश्यी फारसा बोलत नाही
मनातली सल कुणासमोर खोलत नाही
आता तो एकटा एकटाच आत्ममग्न असतो
आणि गाव मात्र आताबाहेरून पुरता भग्न दिसतो...'

प्रस्तुत कविता धर्मांधता आणि जाती द्वेषाच्या प्रखर समकालीन समस्येवर प्रकाशझोत टाकते. बहुतांशी गावातील राजकारणाचे हे चित्र आहे. धर्म द्वेषाचे आणि जातीय द्वेषाचे राजकारण गावात शिरल्यावर गावाची एकी दुभंगते आणि प्रगती खुंटते. विशिष्ट जाती जमाती विषयी नकारात्मक भावना व द्वेष पसरवून राजकारण केले जाते त्यामुळे गावात भेदभाव, हिंसा आणि सामाजिक तणाव निर्माण होऊन गावातल्या समरसतेला धोका निर्माण होतो.

**२.४ सारांश**

एकनाथ पाटील यांनी 'माझा बाप शेतकरी', 'तिला खोलवर गलबलून येते आतून', 'मातीत मुळं घट्ट रोवून, संतान जॅकोबा डिसूझा' या कवितातून ग्रामीण जीवनातील दाहक वास्तव पारदर्शीपणे व्यक्त केले आहे. ग्रामीण जीवनानुभवांतील विदारक वास्तव आणि परंपरागत श्रद्धांनी केलेला भ्रमनिरास याचा प्रत्यय 'माझा बाप शेतकरी' यातून येतो. भ्रष्ट सरकारी अर्थव्यवस्था कोणतेही फायदे शेतकऱ्यापर्यंत पोहचू देत नाही. त्यामुळे या शेतकऱ्याची अवस्था दयनीय असते. दैन्य-दारिद्र्याने गांजलेला, दुष्काळ, पाणी टंचाई, रोगराई, कर्जबाजारी या दुष्ट चक्रात

सापडलेल्या दुर्दैवी शेतकऱ्याचे भयावह वास्तव चित्रित केले आहे.

'तिला खोलवर गलबलून येते आतून' या कवितेत आधुनिक काळात नातेसंबंधात निर्माण झालेला कोरडेपणा अधोरेखित होतो. जगण्याच्या कोलाहलात माणसे संवेदनाशून्य होत आहेत. आपत्य असूनही एकाकी जीवन जगणाऱ्या तरुमावशीचे दु:ख अनाथासारखे जगणाऱ्या वृद्ध अवस्थेतील आईबापाचे दु:ख आहे.

'मातीत मुळं घट्ट रोवून' या कवितेत औद्यागिक संस्कृतीच्या भयावह आक्रमणाने अस्वस्थ झालेला शेतकरी, शेतकऱ्याविषयी उदासिन असलेल्या राजकीय धोरणांनी शेतकऱ्याचे जीवन अधिकच उद्ध्वस्त केल्याचे दिसून येते. नव्या अर्थकरणात शेतकऱ्याचे शोषण होत आहे. शेतकऱ्याचे भयावह शोषणाचे आणि पिळवणूकीचे करुण चित्र रंगवून ही कविता थांबत नाही तर शेतकऱ्यांना संघर्ष करण्याची चेतावणी देत आहे.

## २.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. बरकत - वाढ, विपुलता, समृद्धी

२. ध्यायी - ध्यान, चिंतन, मनन, स्मरण

३. अगळपगळ - मोकळेपणाने बोलणे, मोकळे, सैल

४. जोखणे - अंदाज घेणे, एखाद्या गोष्टीचे वजन करणे

५. आधण - उकळी, कढ, पाणी तापल्यानंतरची आवस्था

६. येळ - वेळ, समय

७. बाव - पायऱ्या असलेली विहिर, बावडी

८. बिवाळा - पेरणीसाठी साठवलेले बियाणे, धान्याची साठवण

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्न

### अ. बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न

**योग्य पर्याय निवडा.**

१. शेतकरी बाप विठोबाला ---------------- वाहण्याचा नवस करतो.

अ. पालखी ब. मुकूट

क. चांदीचे डोळे ड. नारळ

२. शेतकरी बापाच्या छातीत ----------------ची कळ उमटते.

अ. हृदयविकाराची ब. भितीची

क. वेदनेची ड. दारिद्र्याची

३. 'तिला खोलवर गलबलून येते आतून' या कवितेतील व्यक्तिरेखेचे नाव काय?

अ. गुणामावशी ब. सरूमावशी

क. मायामावशी ड. तरूमावशी

४. संतान जॅकोबा डिसूझा ला गावातील लोक काय म्हणायचे ?

अ. साहेब ब. संतान मास्तर

क. सर ड. दादा

५. संतान जॅकोबा डिसूझा ----------------वर्षे गावात बिनतिवरोध सरपंच होता.

अ. पाच ब. पंधरा

क. वीस ड. बारा

६. संतानची बायको काय विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायची?

अ. झिंगे-बांगडे ब. काचेच्या बांगड्या

क. भाजीपाला ड. मसाले

## २.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. पालखी

२. दारिद्र्याची

३. तरूमावशी

४. संतान मास्तर

५. वीस

६. झिंगे-बांगडे

## २.८ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. एकनाथ पाटील यांच्या कवितातून बदलत्या खेड्याचे किंवा कृषी जीवनाचे चित्र स्पष्ट करा.

२. एकनाथ पाटील यांच्या कवितेतील ग्रामीण संवेदन स्पष्ट करा.

३. 'मातीत मुळं घट्ट रोवून' या कवितेत औद्यागिक संस्कृतीच्या भयावह आक्रमणाने अस्वस्थ झालेल्या शेतकऱ्याची अवस्था स्पष्ट करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'संतान जॅकोबा डिसूझा' या कवितेच्या आधारे संतान जॅकोबा डिसूझाची व्यक्तिरेखा स्पष्ट करा.

२. गावातील राजकगारणाचा संतान जॅकोबा डिसूझाच्या मनावर काय परिणाम झाला.

३. 'मातीत मुळं घट्ट रोवून' या कवितेत शेतकऱ्याने 'जगण्याला धार लावून ठेवणं' गरजेचे आहे असे कवीला का वाटते?

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. खुंट्यांवर टांगलेली दुःखं, एकनाथ पाटील, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००९.

२. ग्रामीण कवितेचा इतिहास, डॉ. कैलास सारवेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९९

३. 'ग्रामीण साहित्यः प्रेरणा आणि प्रयोजन, डॉ. श्रीराम गुंदेकर, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९९

४. 'मुराळी' अंक, संपा. राजन गवस, एप्रिल २०२५


◆◆◆

## घटक ३

# निवडक कविता : भाग –२.३

## रफीक सूरज

---

अनुक्रमणिका

### ३.० उदिष्ट्ये

- रफीक सूरज यांच्या 'इसेंट्रीक', 'पाटीचा काळा चौकोन', 'दुर्बीण', 'नखं' या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,
- कवीने कवितेत नोंदवलेले समकालीन वास्तव अभ्यासता येईल.
- लिंगभावाच्या राजकारणाला कवीने कवितेतून कसा हस्तक्षेप नोंदविलेला आहे याचा अभ्यास करता येईल.
- कविच्या मनातील भावनिक संघर्ष तसेच कविला वाटणाऱ्या सामाजिक व राजकीय समजून येतील.
- कवितेच्या आशयाच्या माध्यमातून पर्यावरणीय समस्या, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील निर्बंध, समाजातील विदारक वास्तव लक्षात येईल.
- कवीला वाटणारे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मोल आणि गरज लक्षात येईल.
- कवीच्या संवेदनशीलतेला जाणवलेल्या विविध सामाजिक समस्या अभ्यासता येतील.
- कवीने अर्थपूर्ण प्रतिमांचे उपयोजन करून कवितेतील आशयाचा अधिक नेमकेपणाने आविष्कार कसा केला आहे हे अभ्यासता येईल.

### ३.१ प्रस्तावना

समकालीन मराठी कवितेच्या परिप्रेक्ष्यातून विचार करीत असताना काही महत्त्वाच्या कवींमध्ये रफीक सूरज यांच्या नावाची आवर्जून नोंद करावी लागते. गेल्या तीन दशकापासून त्यांनी लिहिलेल्या कविता निश्चितच लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. विदारक, भयग्रस्त भवतालाला व वर्तमानाला दिलेली तीव्र प्रतिक्रिया म्हणजे रफीक सूरज यांची कविता! या कवितांतून समाजस्थितीचे उपरोधिक, विदारक वास्तव संयतपणे शब्दबद्ध झालेल दिसते. व्यक्तीकडून समष्टीकडे जाणारा या कवितांचा प्रवास आहे.स्वत:च स्वत:शी केलेला संघर्ष आणि या संघर्षातून घेतलेला आत्मशोध या कवितेत आहे. समकालीन जगण्याचा अन्वयार्थ लावणरी ही अत्यंत महत्त्वाची कविता आहे. समकालीन वास्तव आणि त्यातून निर्माण झालेले भावनिक, सामाजिक, राजकीय संघर्ष हे या कवितेचे आशयसूत्र आहे. माणसाचे झालेले वस्तुकरण, भावनिक, सामाजिक, राजकीय संघर्षाच्या उद्‌वेगातून निर्माण झालेले एकटेपण, अस्तित्व शोधाची निकड या कवितेच्या केंद्रस्थानी आहे.

मानवी नातेसंबंधातील विदिर्णता आणि तिच्या तळाशी असलेलं माणसाचं एकटेपण, जगण्याला नव्याने भिडण्याची उमेद या कवितेत आहे. तसेच कशाशीही जोडले न जाण्यातून, तुटलेपणातून येणारी हतबलता येथे दिसते. आनंद, दु:ख कोणतीही भावना धडपणे व्यक्त न होण्याची घुसमट रफीक सूरज यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. जगण्यातल्या ताऱ्या बाऱ्यांच्या आड असलेलं लिंगभावाचं आणि जातीयतेचं राजकारण जाणून घेत त्याला हस्तक्षेप नोंदवणारी ही कविता आहे. आयुष्य 'चिडिचूप्प', निमुटपणे जगणाऱ्या असंख्य पिचलेल्या माणसांच्या यातनांचा पट या कवितेत मांडला आहे. सामाजिक पडझडीतून काळाच्या ओघात निर्माण झालेली ऱ्हासशील स्थित्यंतरे ही कविता नोंदवते. स्त्रियांच्या भावविश्वाशी अंतरीच्या कळवळ्याने समरस झालेला हा कवी त्यांच्या घुसमटीची, शोषणाची निष्पापपणाची, संघर्षाची, त्यांच्या वाट्याला आलेल्या पोरकेपणाची, समंजसपणाची, मुक्या दु:खाची कितीतरी भावचित्रे रेखाटतो. स्त्रियांविषयी आत्मीय जिव्हाळा या कवितेत प्रतिबिंबित होतो.

**३.२ कवी परिचय – रफीक सूरज (जन्मः १९ मार्च १९७०)**

रफीक सूरज हे कादंबरीकार, कवी, समीक्षक म्हणून परिचित आहेत. रफीक सूरज यांचे 'सोंग घेऊन हा पोर' (२०११), 'चिडीचूप्प' (२०२२), हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत.'आभाळ'(१९९०), 'बेबस'(२०१३), 'पायाड'(२०२०), 'आरशातल्या आरशात' हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. 'रहबर'(२००६), ही कादंबरी प्रकाशित आहे. तसेच त्यांचे 'आवडनावड'(२००८), 'महानगरीय कविताः नवे वळण, नवे परिमाण'(२०२१), 'भारतीय साहित्याचे निर्माते: रणजित देसाई'(२०२१), 'भारतीय साहित्याचे निर्माते: सखा कलाल'(२०२५), हे समीक्षा लेखन प्रसिद्ध आहे. 'लघुनियतकालिकांची वर्णनात्मक सूची'चे(२०११) लेखन त्यांनी केले आहे. तसेच 'दस्तक'(२०१२), मुस्लीम कवींच्या कवितांचे संपादन, 'गाठीभेटी'(२०१३), अकरा साहित्यिकांच्या मुलाखती, 'जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील शोषितांचे जग'(२०१८), 'हाताची घडी तोंडावर बोट'(२०२२), (सुनीलकुमार लवटे यांच्या निवडक कवितांचे संपादन), 'मुस्लीम लेखकांच्या मराठी ग्रंथांची सूची'(२०२४), 'कविवर्य ए. पां. रेंदाळकरः जीवन चरित्र आणि समग्र साहित्य' त्यांची संपादने प्रसिद्ध आहेत.

रफीक सूरज यांना अण्णा भाऊ साठे पुरस्कार (२००७), बहिणाबाई चौधरी पुरस्कार (२०१२), ना. धों. महानोर पुरस्कार (२०१९), मोरेश्वर पटवर्धन पुरस्कार (२०१२), 'कवितेचा पाडवा : ना. धों. महानोर पुरस्कार' (२०२५) याशिवाय विविध मान्यवर साहित्य संस्थांचे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**३.३ विषय विवेचन**

रफीक सूरज यांची कविता सामाजिक व राजकीय समस्यांवर भाष्य करते. कवीच्या अंतरद्वंद्वाच्या संघर्षाची ही कविता आहे. कृतीशील हस्तक्षेप नोंदविण्याचे कसब या कवितेच्या ठायी आहे. शोषितांचा धिक्कार करत वर्चस्ववादी अधिपत्याला नकार देणारी कविता आहे. संकुचित होत जाणारा मानवीय अवकाश तिला अमान्य आहे. ही कविता अन्याय आणि दमनाच्या विरोधात हस्तक्षेप करणारी आहे. समाजसंस्कृतीचे मूल्यात्म भान ही कविता प्रकट करते. सर्वसामान्य माणसाच्या जगण्याची विस्कटलेली घडी त्यातून अनुभवाला येणारे ताणतणाव, भेडसावणारी पडझड यांचे प्रत्ययकारी दर्शन रफीक सूरज यांची कविता घडवते. रफीक सूरज यांची कविता एककेंद्री नाही. ग्रामीण, महानगरी या प्रादेशिक, मुस्लिम, दलित, आदिवासी अशा संवेदनात्मक तसेच सौंदर्यवादी,

वास्तववादी अशा मर्यादित साच्यामध्ये या कवितेला बसवता येत नाही आणि बांधूनही ठेवता येत नाही. तिचे 'कवितापण' मानवतेच्या व्यापक पटावर व्यामिश्र जीवनजाणिवांच्या संवेदनातून समजून घ्यावे लागते. याचा प्रत्यय या घटकातील कवितांचा अभ्यास करताना येतो.

### ३.३.१ इसेंट्रीक

'इसेंट्रीक' या कवितेत गावाच्या मध्यभागी तळाच्या काठावर असलेल्या वडाच्या झाडाचा संदर्भ आहे. हे झाड दोनशे वर्षांपेक्षा जूणे असावे. कवी रेंदाळकरांना जाऊन ८०-९० वर्षे झाली त्यांना या वडाच्या पारांब्यांना हेलकावे घेत अनक कविता सूचल्या असतील असे कवीला वाटते. पूर्वी गावात एस् टी स्टँड नव्हते. तेव्हापासून हे झाड प्रवाशांना सावली देत उभे आहे. झाडाच्या पार कट्यावर काहीजण झोपलेले दिसतात. मात्र आता झाडाखालून जाणाऱ्या अपूऱ्या रस्त्याला झाडाची अडचण होत आहे असे लोकांना वाटते. त्यामुळे लोकांनी सुरवातीला झाडांच्या फांद्यांचा पसारा छाटून कमी केला. त्यानंतर जमीनकडे झेपावणारी लांबसडक पारंब्याची गुंतावळ छाटून काढली. झाडा भोवती विहिरीसारखा खड्डा खणून रस्त्याच्या दिशेने गेलेल्या झाडाच्या मुळ्या कुऱ्हाडीने तोडण्यात आल्या. झाडाचे अर्धेअधिक खोड कापून रस्ता बऱ्यापैकी रुंद करण्यात आला. पुन्हा नव्याने झाडाने रस्त्यात घुसू नये तसेच झाडाच्या मुळांनी शोषू नये बाजूची गटार त्यामुळे उखडा जाऊ नये गटारीलगतचा रस्ता म्हणून पुरुषभर उंचीची कॉंक्रीटची जाडजूड भिंत काळजीपूर्वक उभी करण्यात आली जेणेकरून झाडाच्या वाढीला पुरेशी माती, हवा, पाणी मिळू नये. झाडाची शोभा आणणारा भवतालचा प्रशस्त कट्टा तोडून एकाबाजूने अर्धाच ठेवला गेला. कट्ट्यावरून चढून जाण्यासाठीच्या पायऱ्या वाहतूकीला अडचण होऊ नये म्हणून उखडून काढण्यात आल्या. जणू झाडाजवळ सहजासहजी कोणी पोहचू नये याची व्यवस्था केली. आता झाड एकदम बदलून गेले अनबॅलन्सड् झाले. झाड आता सेंटर चुकलेले इसेंट्रीक झाले. कवीला येता-जाता हे अनबॅलन्सड् झाड पाहून काळजी दाटून येते की, झाडाला बायका कशा प्रदक्षिणा घालतील!

प्रस्तुत कविता माणसाच्या कृतघ्न वागण्याची नोंद घेते. ज्या झाडाने सावली दिली, आसरा दिला त्याच झाडाच्या फांद्या, पारंब्या, त्या झाडाचे खोड क्रूरपणे तोडले गेले. केवळ रस्ता रुंद करण्यासाठी दोनशे वर्षापूर्वीचे झाड कापण्याचा अपराध लोकांनी सहजपणे केला आहे. झाड ही काही निर्जिव गोष्ट नाही. झाड हे सजीव संवेदशील चैतन्य असते. झाड कापणे किंवा झाडाला इजा करणे म्हणजे एका चैतन्याचा खूण करणे असते. परंतु ही संवेदनशीलता लोकांमध्ये राहिली नाही यांची खंत आहे.

लोकांनी झाडाला इसेंट्रीक, अनबॅलन्सड् केले खरे परंतु सगळीकडे हेच घडत आहे. रस्ता रुंदी करण्यात झाडे कापली जात आहेत. मानवाच्या या कृतघ्न वागण्यामुळे पर्यावरण इसेंट्रीक, अनबॅलन्सड् होणार आहे. सध्याच्या काळात रस्ता रुंदीकरणासाठी, वाहतूक सुरळीत करण्यासाठी झाडे तोडली जातात. मानव आपली भौतिक सोय-सुविधा करत असताना स्वत:चे खूप मोठे नुकसान करत आहे याचे त्याला भान नाही. झाडे तोडल्यामुळे वातावरणातील ऑक्सिजन कमी होऊन कार्बनडायऑक्साईड वाढत आहे. झाडे कट केल्यामुळे झाडावर असलेल्या वन्यजीवांचा आसरा हरवतो. जमीनीची धूप वाढते, पावसाचे प्रमाण घटते अशा प्रकारे पर्यावरणाला हानी पोहोचते.

प्रस्तुत कवितेतून सहज सोप्या भाषेत झाडाच्या कत्तली थांबवून पर्यावरणाचे संरक्षण व्हावे ही सजग जाणीव निर्माण केली आहे.

**३.३.२ पाटीचा काळा चौकोन**

'पाटीचा काळा चौकोन'या कवितेत कवीच्या छोट्या मुलीने आपल्या चिमुकल्या बोटात पेंन्सील पकडून धबधबा, सूर्य, फूल, झाड, उंदीर, बादली, मासा, घागर अशी पाटीवर चित्रे काढली. काळ्या पाटीच्या चौकोनाच्या परिघात दाटीवाटीने चित्रांची गर्दी झाली असली तरी दोन चित्रांचा एकमेकांना धक्का लागू नये म्हणून तिने पुरेशी काळजी घेतलेली दिसते. तिला अजूनही पाटीवर थोडीशी रिकामी जागा दिसत आहे. 'पप्पा आत कशाचे हो काढू चित्र?' असा प्रश्न ती वडिलांना विचारते. वडील तिला तिच्या समोर मांडून ठेवलेल्या वास्तवाला धरून तिच्या कुवतीनुसार चित्रांचे विषय तिला सूचवतात. मुलगी तिच्या कुवतीनुसार दोन चित्रांच्या रिकाम्या फटीत वास्तवाला चिमटीत धरण्याचा प्रयत्न करते. हळूहळू वडिलांना तिच्या हाताची थरथर, तिची अस्वस्थता, तिच्या शरीराचा कंप, कपाळावर जमा झालेले घामाचे बिंदू वडिलांना जाणवू लागतात. वडिलांना चिंता वाटते की,

': ती आता आधीच्या चित्रांना धक्का लागू न देता
कशी चालवणार आहे पेन्सिलीतून सुटणाऱ्या रेषा
: बारीकशा रेषेच्या स्पर्शाने अंगलट येणारी
आधीच्या चित्रांची विटंबना तिला कशी टाळता येणार आहे?
:ती आता कोणता मार्ग काढणार आहे
आखून ठेवलेल्या पाटीच्या मर्यादित काळ्या चौकोनात?
मी तिची अवघडून गेलेली अवस्था ओळखून
तिला म्हटले समजुतीने – बेटा, राहू देत, नकोच वाढवूस
आणखीन चित्रांची गर्दी!
तशी ती उखडली माझी छोटी फणकाऱ्याने
आणि चक्क उगारला तिने मला मारण्यासाठी
हातातल्या पाटीचा काळा चौकोन!'

प्रस्तुत कविता अर्थपूर्ण आहे. कवितेतली चिमुरडी ही 'स्त्री' जातीचे प्रतिनिधित्व करते. धर्म कोणताही असो अथवा समाज कोणताही असो, स्त्रियांच्या अभिव्यक्तीवर परंपरेने नियम लादले आहेत. स्त्रियांच्या वाढीवर(Growth) दबाव निर्माण केला आहे. प्रस्तुत कवितेतील 'पाटीचा काळा चौकोन' ही प्रतिमा मर्यादीत अवकाश सूचित करते. प्रस्तुत कवितेतील वडील 'पुरूष' जातीचे प्रतिनिधित्व करतो. पुरुष असले तरी वडील या नात्यातून निश्चितच मुलीवर प्रेम आहे. मुलीला चित्रातून आविष्कार करण्याची संधी ते देतात मात्र मर्यादित अवकाशात. मात्र मुलीला आविष्काराची इच्छा आहे. ती 'पप्पा आता कशाचे हो काढू चित्र?' असे विचारते

तेव्हा ते 'तिच्या समोर मांडून ठेवलेल्या वास्तवाला धरून कुवतीनुसार' चित्रांचे विषय सूचवतात. याचा अर्थ ती 'मुलगी' आहे हे वास्तव आहे आणि हीच तिची कुवत 'मर्यादित' असणार अशी वडिलांची(पुरुषाची)धारणा आहे. मुलगी जेव्हा पाटीवरल्या दोन चित्रांच्या रिकाम्या फटीत जागा शोधून त्या जागेत चित्र काढण्याचा प्रयत्न करते तेव्हा तिची तगमग, थरथर, अस्वस्थता, तिच्या शरीराचा कंप कपाळावर जमा झालेले घामाचे बिंदू, तिची अवघडलेली अवस्था पाहून वडील तिला समजुतीने म्हणतात, 'बेटा, राहू देत, नकोच वाढवूस आणखीन चित्रांची गर्दी!' यावरून लक्षात येते की, वडिलांना वाटते की, मुलीने दिलेल्या मर्यादित अवकाशातच व्यक्त व्हावे अन्यथा तिने व्यक्त होऊ नये (चित्र काढू नये). वडिलांचा सल्ला समजूतीचा असला तरी सुद्धा चिमुरड्या मुलीला मान्य नाही. अभिव्यक्तीवर मर्यादा येताच त्या मुलीने हातातल्या 'पाटीचा काळा चौकोन' फणकाऱ्याने वडिलांना मारण्यासाठी उगारला! यातून मुलीची चित्र काढण्याची आर्त अंतरिक इच्छा सूचित होते. याचा अर्थ मुली अर्थातच स्त्रियां अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत आणि त्याच्या नैसर्गिक अधिकाराबाबत सजग आहेत.

प्रस्तुत कविता बहुस्तरीय आशयाची आहे. मुलींनी अभिव्यक्तीसाठी सुरक्षित आणि स्वीकार्य वातावरणात असले पाहिजे. मुलीचं मुलगी असणं किंवा तिचं अभिव्यक्त होणं याबाबत वडिलांना काही हरकत नाही मात्र ते पाटीच्या काळ्या चौकोनाच्या मर्यादित अवकाशात असावे असे वाटते. पालक म्हणून मुलींवर प्रेम करणाऱ्या परंपरा जपणाऱ्या आणि स्त्रियांच्या बाबतीत असुरक्षितता असलेल्या वास्तवाचा विचार करणाऱ्या समकालीन वडिलांचे प्रतिनिधित्व कवितेतील वडील करतात.

प्रस्तुत कवितेतून निघणारा तिसरा अर्थ म्हणजे सावित्रीबाई फुलेंनी हातात पाटी पेन्सील घेऊन उंबरठ्याबाहेर पाऊल टाकले आणि स्त्रियांबाबतचा मर्यादित अवकाश झुगारून ज्ञानसाधनेसाठी स्त्रियांना व्यापक आकाश उपलब्ध करून दिले. रुढी परंपरा झुगारून सावित्रीबाई फुलेंनी बंडखोरी केली आणि आपल्या लेकींच्या हातात पाटी पेन्सील दिली. शिक्षण हे वाघीनीचं दूध आहे. ज्यामुळे अन्यायाविरुद्ध , शोषणाविरुद्ध बंडखोरी येते आणि स्वत:च्या हक्कासाठी निर्णय घेण्याची आणि लढण्याची जाणीव होते. नेमकी हीच जाणीव कवितेतल्या चिमुरड्या मुलीत आहे. आणि पर्यायाने आत्मभान जपणाऱ्या स्वत:च्या हक्काविषयी सजग असणाऱ्या सावित्रीच्या साऱ्या लेकींमध्ये आहे!

### ३.३.३ दुर्बीण

अभिव्यक्त होणं ही मानवी मनाची नैसर्गिक गरज आहे. व्यक्तीला स्वत:ची मते व्यक्त करण्याचा, मुक्त वावरण्याचा अधिकार आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाची असते. परंतु समकालाने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या आहेत. कलावंताला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असल्यामुळेच आपले विचार, भावना आणि कल्पनेचा आविष्कार ते आपल्या कलाकृतीतून कलात्मक पद्धतीने करू शकतात. विशेषत: कलावंताच्या संवेदनशील मनाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याची बंधने काचतात.

'तुम्ही मला माझ्या मर्जीने
हिंडूफिरू देणार नसाल
किंवा माझ्या प्रत्येक हालचालीवर
निर्बंध आणणार असाल

तर मला किमान

मोकळेपणानं बोलू तरी द्या

तेही शक्य नसेल तर

लिहू तरी द्या नं कवितेच्या दोन ओळी !'

कलावंत आपल्या विचारांचा भूमिकेचा आविष्कार कलेतून करत असतात. परंतु त्यांच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अनेकदा हिरावून घेतलेले दिसून येते. माणसाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, स्वत:ची मते व्यक्त करण्याचा, मुक्त जीवन जगण्याचा अधिकार, अवकाश असायला हवा. दडपशाही व हुकूमशाही माणसाच्या स्वातंत्र्यावर मर्यादा लादत असते. राजकीय हस्तक्षेपामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आल्याचे दिसून येते.

कवितेच्या दुर्बिणीतून मला

तुमच्या डोळ्यांत बघता येईल

भरभरून साचून राहिलेला माझ्याविषयीचा द्वेष

जो मला दूर करण्यासाठी धडपडता येईल...

मी उद्या असेन नसेन

पण माझी कविता नक्कीच

माझं-तुमचं-प्रत्येकाचं स्वातंत्र्यगीत

गुणगुणत असेल...!'

प्रस्तुत कवितेत कवीला कवितेच्या दुर्बिणीतून पहायचे आहे. दुर्बीण हे असे साधन आहे ज्याचा उपयोग दूरच्या वस्तुंना मोठ्याने पाहण्यास मदत होते ज्यामुळे आपल्याला नवीन गोष्टी शिकायला आणि त्या चांगल्या प्रकारे समजून घ्यायला मदत होते. प्रस्तुत कवितेत कवीला कवितेच्या दुर्बिणीतून त्याच्याविषयी इतरांच्या मनात साठलेला द्वेष पहायचा आहे आणि त्याला तो द्वेष दूर करण्याचा प्रयत्न करायचा आहे. कारण त्याला जाणीव आहे की, आपलं दैहिक अस्तित्व या जगात नसेल तेव्हा असेल त्याची कविता! आणि अभिव्यक्तीचं मोल जाणून असणारी ही कविता निश्चितच प्रत्येकाचं स्वातंत्र्यगीत गुणगुणत असेल.

प्रस्तुत कवितेत कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर भाष्य केले आहे. कला आणि कलात्मक अभिव्यक्ती समाजाला नवीन दृष्टीकोन देत असते. कलावंत जीवनमूल्यांचा आविष्कार आपल्या कलेतून करीत असतो. कलावंताची मानवतावादी भूमिका सामाजिक समरसतेसाठी आणि सामाजिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण भूमिका बजावत असते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कलावंताच्या सर्जनशील प्रतिभेचा आविष्कार करण्यासाठीचे व्यासपीठ असते!

### ३.३.४ नखं

'नखं' या कवितेत मुलींच्या वडिलांच्या मनस्थितीचे दर्शन होते. प्रस्तुत कवितेतील वडील आपल्या तळहातावर हातावर आपले बाळ असलेल्या चिमुकल्या मुलीचे हात घेतात. त्या चिमुरड्या मुलीच्या इवल्याशा

हाताचे निरीक्षण करतात,

'तुझ्या नाजूकशा नखांच्या पृष्ठभागावर
माझ्या हातांची तळवी पसरवत राहतो
तेवढ्यानेही तू दचकून जागी व्हावीस अन्
धरावेस माझे जाडजूड बोट तुझ्या मानाने, इवल्याशा मुठीत
वाटत राहते तुझी झोपमोड होऊच नये
तशीच रमत राहावीस तुझ्या अलग दुनियेत, स्वतःच्या खुशीत
माझ्या शापित आयुष्याची ऊब नसावीच तुझ्यासाठी
तुझ्या हाताच्या मुठीतल्या भविष्याच्या रेषांचा उभारपणा
जाणवतोय माझ्या बोटाला, जाणवतेय तुझ्या भविष्याची थरथर'

त्या इवल्याशा हाताचे निरीक्षण करताना त्याला वाटते की, एवढया हलक्या स्पर्शानेही ती दचकून जागी व्हावी आणि वडिलांचे जाडजूड बोट तिच्या इवल्याशा मुठीत धरावे. पण हे वाटणे क्षणभराचेच असते. पुन्हा कवीला वाटते तिची झोप मोड होऊ नये. ती तशीच रमत रहावी तिच्या अलग दुनियेत. स्वतःच्या आनंदात. वडिलांच्या शापीत आयुष्याची उब त्या चिमुरडीच्या आयुष्याला नसावी. वडिलांच्या बोटाला तिच्या हाताच्या मुठीतल्या भविष्याच्या रेषांचा उभारपणा जाणवतो. वडिलांना जाणवते तिच्या भविष्याची थरथर. त्यांना वाटते,

'नको... तू अशीच पडून रहा तुझ्या मस्तीत
मऊशार स्तनांना तोंडात धरून...
फक्त तुझ्या आईच्या गळ्यातले मंगळसूत्र चाचपत
मला अधिक लज्जित करू नकोस.
नाहीतरी तुझ्या नाजूकशा बोटांची नाजूकशी नखं
अजून माझे नरडे धरण्याइतपत सशक्त तरी होऊ देत !'

वडिलांना वाटते या रूक्ष दुनियेत मुलींनी येऊच नये. तिने आईच्या कुशीत तसेच अलगद विसावावे. बाप म्हणून मुलीला वाढवणे तसे अधिक जबाबदारीचे असते. याची जाणीव होऊन कवीला होऊन वडिलांना वाटते की, मुलीला निकोप वाढवण्याचे कर्तव्य आणि कौशल्य त्याने नाही दर्शवले तर निश्चितच ही मुलगी त्यांच्या 'बाप' असण्याला जबाब विचारेल, बंडखोरी करेल.

प्रस्तुत कवितेत मुलीच्या वडिलांच्या विविध मनस्थितीचे दर्शन होते. प्रत्येक वडील आपल्या मुलीवर खूप प्रेम करीत असतात, त्यांची काळजी घेत असतात. मुलीला सुरक्षित, प्रेमळ व तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून सजग असतात. बाहेरील जगापासून ते सदैव मुलीचे संरक्षण करतात. मुलीला आत्मविश्वास आणि आत्मभानाची भावना देतात. मुलीच्या मानसिक आरोग्यासाठी सकारात्मक भूमिका बजावतात. परंतु कधीकधी

आजूबाजूच्या रूक्ष आराजक दुनियेत आपण मुलीचे निकोप संगोपन करू शकू का ? हा भावनिक ताणही त्यांना येतो. वडिलांची मनस्थिती आणि विविध भावभावना या कवितेत दिसून येतात.

**३.४ सारांश**

रफीक सूरज यांच्या 'इसेंट्रीक', 'पाटीचा काळा चौकोन', 'दुर्बीण', 'नखं' या कवितांतून सामाजिक आणि राजकीय समस्येवर केलेले भाष्य दिसून येते. 'इसेंट्रीक' या कवितेतून पर्यावरणाची संरक्षणाच्या जाणिवेवर भाष्य केले आहे. 'पाटीचा काळा चौकोन' या कवितेतून स्त्रियांना व्यापक आकाश उपलब्ध करून दिला पाहिजे ही जाणीव व्यक्त केली आहे. 'पाटीचा काळा चौकोन' या अर्थपूर्ण प्रतिमेचे उपयोजन करून कवीने 'अभिव्यक्तीसाठीचा मर्यादित अवकाश' सूचित केला आहे. 'दुर्बीण' या कवितेत कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर भाष्य केल्याचे दिसून येते. 'नखं' या कवितेत मुलीच्या वडिलांच्या विविध मनस्थितीचे दर्शन होते. समाज व्यवस्थेतील मुलीच्या वडिलांचे प्रतिनिधित्व करणारी ही कविता वडिलांची मनस्थिती आणि त्यांच्या विविध भावभावनांची आंदोलने निर्देशित करते. इसेंट्रीक झाड, पाटीचा काळा चौकोन, कवितेची दुर्बीण, नखं या विविध अर्थपूर्ण प्रतिमांचे उपयोजन करून कवीने कवितेतील आशयाचा अधिक नेमकेपणाने आविष्कार केला आहे. या प्रतिमांच्या उपयोजनामुळे वाचक आशयांशी जोडला जाऊन त्यात एक संवेदी अनुभव मिळतो.

**३.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ**

१. इसेंट्रीक - सेंटर सोडून असलेले, एकाच बाजूला सरकलेले

२. हेल्कावे - हेलकावे, झोका, आंदोलने

३. चिरफाळून - नष्ट करणे, तोडणे

४. अनबॅलन्सड् - असंतुलित, तोल गेलेले

५. प्रदक्षिणा - फिरणे , गोलाकार फिरण्याची क्रिया, परिक्रमा करणे

६. अंगलट - कठीण व वाईट स्थिती, खटला, विवाद, अंगावर शेकणे, तोट्यात येणे

७. विटंबना - उपहास, चेष्टा, टवाळी, खिल्ली उडवणे, अवहेलना, विडंबना, हेटाळणी

८. निर्बंध - प्रतिबंध, बंधन, नियंत्रण

**३.६ स्वयंअध्ययन प्रश्न**

**अ. बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न**

**योग्य पर्याय निवडा.**

१. गावाच्या मध्यभागी वडाचे झाड नेमके कोठे आहे?

अ. तळ्याच्या काठावर    ब. विहिरीच्या काळावर

क. मारुती मंदीराजवळ    ड. चौकात

२. मुलीने पाटीवर काय काढले?

अ. पाढे ब. रांगोळी

क. बाराखडी ड. चित्र

३. मुलीने कुणाला मारण्यासाठी पाटी उगारली?

अ. आईला ब. भावाला

क. वडिलांना ड. बहिणीला

४. 'पाटीचा काळा चौकोन' ही प्रतिमा काय दर्शविते?

अ. भूमिती आकार ब. मर्यादित अवकाश

क. अभ्यासाला नकार ड. चित्रांची आवड

५. कोणत्या दुर्बिणीतून कवीला पहायचे आहे?

अ. आयुष्याच्या ब. जीवनाच्या

क. कवितेच्या ड. निसर्गाच्या

६. नखं या कवितेतील चिमुरडी आईच्या गळ्यातील ----------------- चाचपत आहे.

अ. मंगळसूत्र ब. लॉकेट

क. बोरमाळ ड. नेकलेस

**३.७ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१. तळ्याच्या काठावर

२. चित्र

३. वडिलांना

४. मर्यादित अवकाश

५. कवितेच्या

६. मंगळसूत्र

**३.८ सरावासाठी स्वाध्याय**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. रफीक सूरज यांच्या 'इसेंट्रीक' कवितेचा आशय स्पष्ट करा.

२. ‘इसेंट्रीक’ कवितेतील पर्यावरण संरक्षणाची जाणीव स्पष्ट करा.

३. ‘पाटीचा काळा चौकोन’ या कवितेचा बहुस्तरीय आशय स्पष्ट करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. ‘दुर्बीण’ या कवितेतून रफीक सूरज यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न कशा प्रकारे मांडला आहे?

२. रफीक सूरज यांच्या ‘नखं’ या कवितेतील वडिलांच्या मनस्थितीचे वर्णन करा.

३. रफीक सूरज यांच्या कवितेतील प्रतिमांचे उपयोजन विशद करा.

**३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके**


१. ‘सोंग घेऊन हा पोर’, रफीक सूरज लोकवाङ्.मय गृह, मुंबई, २०११

२. दस्तक’, रफीक सूरज, मुस्लीम कवींच्या कवितांचे संपादन, दर्या प्रकाशन, पुणे, २०१२

३. ‘चिडीचूप्प’, रफीक सूरज शब्द पब्लिकेशन, मुंबई,२०२२


◆◆◆

घटक ४

# निवडक कविता : भाग –३.१

**मीनाक्षी पाटील**

**अनुक्रमणिका**

**४.० उदिष्ट्ये**

- मीनाक्षी पाटील यांच्या 'मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट', 'देवालय', 'शून्य गोळाबेरीज', 'बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना',या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,
- कवीला जाणवलेले स्त्रियांच्या भावविश्वाचे विविध कागोरे समजून येतील.
- कवितेतील स्त्री संवेदन, स्त्रियांच्या अस्तित्त्वाचे प्रश्न, स्त्रियांचे विविध पेच अभ्यासता येतील.
- स्त्रीवादी जाणिवेच्या नोंदी अभ्यासता येतील.
- कवीची स्त्रियांच्या प्रश्नाविषयी असलेली आस्था, भावबंध समजून येतील.
- स्त्रीत्वाविषयीचे सनातन प्रश्न, भवतालच्या कोलाहलात स्त्री म्हणून सामोरे जातानाची भावावस्था लक्षात येईल.
- कवितेतील लय, प्रतीक, प्रतिमा, या घटकाआधारे कवितेचे भाषिक सौंदर्य अभ्यासता येईल.

**४.१ प्रस्तावना**

९० च्या दशकाच्या काळाने उभे केलेल्या या वास्तवात साहित्यिकांची एक नवी पिढी घडत गेली. या दशकाने दिलेली खंडितता, असुसंगती, अतार्किकता, विस्कळीतता या पिढींनी अनुभवली आणि अनुभवाचे पडसाद तत्कालीन साहित्यनिर्मितीवर पडले. या समकालाचे पडसाद मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत दिसून येतात. स्त्रियांचे भावविश्व, स्त्रियांबाबतची समकालीन जीवनातली मूल्यात्मक पडझड सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील विसंगती, दाहक वर्तमानाची जाणीव, विखंडितता हे मीनाक्षी पाटील यांच्या कवितेचे आशयसूत्र आहे. जागतिकीकरण आणि महानगरीय संवेदन त्यांच्या कवितांमध्ये प्रतिबिंबित झाले आहे. 'स्व'चा शोध, स्त्रीवादी जाणिवा त्यांच्या कवितेत दिसून येतात. स्त्री ही अबला आहे. केवळ तिचा संसार आणि तिचा परीवार हे तिचे भावविश्व आहे. ही परंपरागत धारणा नाकारून आत्मशोध घेणारी कविता आहे. महानगरातील माणसांच शकलीकरण, सहजता संपून गेलेलं कृत्रिम जगण, बेगडी होत जाणारी भोवतालची माणसे, कमकुवत नातेसंबंध, नात्यातील एकमेकांना गृहीत धरणं, त्यातून निर्माण होणारी तगमग, तडफड आणि अगतिकता मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत दिसून येते. समाजाने लादलेल्या सनातन चौकटी मोडून परंपरेचे जोखड झुगारून देऊन माणूस म्हणून स्वत:कडे पाहता आले पाहिजे.

हा आशय मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते. समाज व्यवस्थेतील स्त्रीचे सनातन दु:ख या कवितांतून शब्दांकित झाले आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेत तिला दुय्यमत्व, संसाराचं भारवाहूपण, स्त्रियांचे आहोरात्र निमूटपणे राबणे या भावना त्यांच्या कवितेतून व्यक्त झाल्याचे दिसून येते. कवीा स्त्री-पुरुष भेद मान्य नाही. स्त्रीने स्वत:कडे एक स्त्री म्हणून न पाहता माणूस म्हणून पहाया हवे असे या कवितेतून सूचित होते. स्त्रीकडे बघण्याच्या पारंपारिक संकेतांना व चौकटीला छेद देऊन स्त्रियांनी माणूस म्हणून जगले पाहिजे हा आशय मीनाक्षी पाटील यांच्या कवितेत अधोरेखित होतो. स्त्री जीवनाच्या अनुभूतीतून साकार होणाऱ्या या कविता स्त्रियांच्या भावविश्वाच्या विविध कंगोरे शब्दबद्ध करतात.

**४.२ कवी परिचय – मीनाक्षी पाटील (जन्म:२०-०४-१९७०)**

मीनाक्षी पाटील यांची खानदेशी बोली भाषांमधील म्हणी व वाक्प्रचार: एक लोकाभ्यास '(२००१), 'उत्तर आधुनिकता आणि मराठी कविता' (समीक्षा) (२०२४) ही प्रकाशित पुस्तके आहेत तसेच त्यांचे ' इज इट इन युअर डीएनए'(२००९), 'ललद्यदस् ललबाय'(२०२२) हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत.

मीनाक्षी पाटील यांना पु. भा. भावे पुरस्कार, अभिधानंतर प्रकाशनाचा प्रथम पुरस्कार, मनोरमा साहित्य पुरस्कार, रुपाली दुधगांवकर राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, आदिशक्ती अक्षरशक्ती पुरस्कार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांचा यशस्विनी पुरस्कार, काव्ययोगिनी पुरस्कार महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा समीक्षा ग्रंथासाठीचा रा. श्री. जोग पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

**४.३ विषय विवेचन**

स्त्री-पुरुष नात्यात 'स्त्री'च्या वाट्याला येणारे दुय्यमत्त्व नाकारणारे 'स्त्रीवादी' संवेदन मराठी साहित्यात ८० च्या दशकात प्रकट झाले. नव्वदोत्तर कालखंडात हा पैस 'स्त्री'चं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, एक व्यक्ती असणं, पुरुषाच्या बरोबरीचं स्थान या धारणेपर्यंत ठळक होत गेले. 'इज इट इन युवर डीएनए' या काव्यसंग्रहातील 'मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट' ही कविता एकार्थाने आजच्या काळात 'स्त्री'चं असणं, तिचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे असेल याचे सुतोवाच करणारी कविता आहे. स्त्रीलिखित मराठी कवितेत स्त्रीवादी जाणीव विविध स्तरावर झालेली दिसते. कधी वैयक्तिक तर कधी समष्टीच्या चौकटीतून ही जाणीव व्यक्त होताना दिसते. मात्र या तुलनेत मीनाक्षी पाटील यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणीव ही 'व्यक्ती' म्हणून एका मर्यादित अवकाशात वावरताना दिसते. येथे पुरुष सत्तेविषयीचा तुच्छतावाद नाही, तर स्त्रीचं स्वतंत्र, वेगळं अस्तित्त्व असण्याची, जपण्याची अपेक्षा आहे. या संग्रहातील 'मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट' ही कविता कवयित्रीची स्त्रीवादी जाणीव अभिव्यक्त करणारी तर आहेच शिवाय आजच्या काळातले एका स्त्रीचे परखड निवेदन म्हणून या कवितेकडे पाहता येते.

मीनाक्षी पाटील यांनी लिहिलेल्या बहुतांशी कविता महानगरीय संवेदन व्यक्त करतात. महानगरीय वास्तवाचे 'चित्रण' महानगरीय संवेदन असलेल्या या कवितेतील दृश्यात्मकतेमुळे या कविता महानगरीय जगण्याचे छायाचित्रण वाटतात. जणू महानगरीय संवेदन हे या कवितेचे दीर्घ स्वगत आहे. भवताली घडलेल्या घटना-गोष्टी आहेत. व्यक्तिगत नातेसंबंधातले ताणे-बाणे आहेत आणि महत्त्वाचे म्हणजे महानगराने मानवी जीवन किती व्यापून टाकले आहे याचे चित्रण आहे. आपला भवताल इतका एकारलेला आहे की, लिहिणाऱ्या हाताला यात कुठे आणि कसे

व्यक्त व्हावे हा प्रश्न पडवा. भावनिक गुंता सोडविताना, जगण्यातली दमछाक अनुभवताना बऱ्याचदा 'व्यक्त' व्हावसं वाटूनही हे महानगरीय पर्यावरण क्षणाचीही उसंत मिळू देत नाही. ही आगतिकता या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. तर दुसरीकडे 'निव्वळ जगण्याचा आट्टाहास' करत राहणे एवढच या भवतालात शक्य आहे याची जाणीव तसेच महानगरीय जीवन किती कोलाहलाचे झाले आहे याचे भयावह चित्रण या कवितेतून समोर येते.

### ४.३.१ मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट

स्त्री म्हणून जगण्याकडे, समष्टीकडे, न पाहता एक व्यक्ती म्हणून पाहणे हे अधिक व्यापक असते. हे या कवितेचे आशयसूत्र आहे. आई मुलीला झोपताना, भरवताना गोष्ट सांगते. लुकलुकते डोळे करून मुलगी मनोभावे त्या गोष्टी ऐकते. गोष्ट ऐकताना तिला अनेक प्रश्न पडतात. कोल्हा कायम लबाडच का?, सुसर नेहमी दुष्टच का?, नावडती राणी चांगलीच का? पारंपरिक साचाच्या या गोष्टींना व त्यातील आशयाला मुलगी वैतागली. तिला नवीन गोष्ट ऐकायची आहे ज्यात एका राणीला आवडता आणि नावडता असे दोन राजे आहेत किंवा राजा नसलेली राणी आहे किंवा राणी नसलेला राजा आहे. तिला सुरुवातीपासून शेवटापर्यंत सगळ्या गोष्टी बदलून टाकाव्या असे वाटते. परंपरेच्या साच्यामध्ये अडकून बसलेल्या या गोष्टीच्या आशयांना नवा आयाम, नवा दृष्टीकोन देणे तिला महत्त्वाचे वाटते.

रोज सांगते मुलीला गोष्टी
झोपताना
भरवताना
डोळे करून लुकलुकते
ती पण पाहत राहते मनातल्या मनात
गोष्टीतल्या पात्रांना
कळत नाही तिला
कोल्हा कायम लबाडच का?
सुसर नेहमी दुष्टच का?
नावडती राणी चांगलीच का?
वैतागून एक दिवस म्हणाली मला
ममा सांग नवी गोष्ट
एक होती राणी तिला होते दोन राजे
एक होता आवडता
एक होता नावडता
किंवा एक होती राणी तिला नव्हता राजा

किंवा एक होता राजा त्याला नव्हती राणी
नाही तर एक कर ना.
बदलूनच टाक सगळया गोष्टी
सुरुवातीपासून शेवटपर्यंत!

या कवितेचे एक महत्त्वाचे 'कथन' म्हणजे जी पारंपरिक 'कथनं' आहेत ती नाकारणं. त्यामुळे ही जाणीव केवळ स्त्रीवादी जाणीव आहे असे म्हणता येणार नाही तर पारंपरिक गोष्टी नव्या जाणिवेतून स्वीकारल्या/नाकारल्या पाहिजेत अशी एक स्पष्ट भूमिका त्यामागे आहे. 'कोल्हा कायम लबाडच का?' / 'सुसर नेहमी दुष्टच का?' / 'ना आवडती राणी चांगलीच का?' हे प्रश्न कवितागत 'ती'ची निरीक्षणे स्वतःकडे आणि जगण्याकडे किती निकोपपणे पाहता येवू शकते याचा प्रत्यय देणारे आहेत. इथे केवळ 'स्त्री'त्वाची भलावण, श्रेष्ठत्वाचा अट्टाहास नाही, तर जे काल बरोबर होते ते आज चूक असू शकते ही समंजस धारणा उभी करणारे आहे. यातूनच,

'एक होती राणी तिला होते दोन राजे
एक होता आवडता,
एक होता नावडता'

असे एक नवे मिथक रचू पाहणारी ही धारणा आहे. म्हणजे पुरुषसत्ताक संस्कृतीने ज्या धारणा बिंबवल्या त्याला नुसता नकारच नाही तर त्याच्या दुसऱ्या बाजूने सुद्धा प्रसंगी उभे राहू शकता येते ही बंडखोर जाणीव रुजवणारी आहे आणि ही बंडखोर जाणीव 'बदलवून टाक सगळ्या गोष्टी, सुरवातीपासून शेवटापर्यंत' ही धारणा बळकट करू पाहणारी आहे. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व बहाल करणारी आहे

जर राजाला (परंपरागत) दोन राण्या असू शकतात तर 'स्त्री'ला का नाही? असा बंडखोर प्रश्न या कवितेत विचारला गेला आहे. तो याच अर्थाने की, यापुढे पुरुषसत्ताक पद्धतीचे कोणतेही नियम कवितागत 'ती' स्वीकारणार नाही. 'तू' जसा असशील तशीच 'ती'ही असू शकेल. असा एक गर्भित इशारा यातून समोर येतो. एकार्थाने ही 'स्त्री'च्या पूर्णतः स्वातंत्र्याची मागणी करणारी कविता आहे. अगदी कवयित्रीच्या शब्दात सांगावयाचे झाले, तर

'किंवा एक होती राणी तिला नव्हता राजा
किंवा एक होता राजा त्याला नव्हती राणी'

'स्त्री'चं भावविश्व हे तिचं एकटीचंही असू शकत असा एक आशावाद इथे समोर आला आहे.

मीनाक्षी पाटील यांच्या कवितांचे अजून एक वैशिष्ट्य इथे नोंदविता येईल ते म्हणजे केवळ 'स्त्रीवादी' संवेदन जपणारी, त्याची भलावण करणारी कविता नाही तर स्त्रीच्या अस्तित्त्वाविषयी, असण्याविषयी तिच्या व्यक्तित्त्वाविषयी तटस्थपणे संवादी होणारी ही कविता आहे. 'स्त्री' म्हणून असलेले अबलापण वा विशेष सवलत ही कविता नाकारते.

### ४.३.२ देवालय

'देवालय' ही कविता स्मरणरंजनातून साकार होते. शहरातले एकाच आवारात, एकाच रांगेत बसलेले कडीकुलूपात कोंडलेले केविलवाण्या नजरेचे देव पाहिल्यावर कवीला गावातील शांत देवालयातील देव आठवतात. या उलट गावातले देव प्रसन्न वाटतात. इथले देव एकदम खुल्ले असतात. ना कडी, ना दार देवाची घंटीसुद्धा वाऱ्याने वाजत असते. गावातला देव एकटा राहतो. निवांत एकांतात भेटतो. कवीच्या आठवणीच्या गाभाऱ्यात येतो.

गावामधले शांत देवालय
भेटत नाही या मायानगरीत
एकाच आवारात एकाच रांगेत
बसवलंय जास्तीत जास्त देवांना
अंबामाता शीतलामाता साईबाबा बालाजी झुलेलालजी
प्रत्येक जण येतो आपापल्या आराध्याला पूजता-पूजता
एकावर एक प्री प्रमाणे छातीवर हात टेकवत
लगबगीने का होईना नमस्कार होतो प्रत्येकाला
एका रांगेत कडीकुलपात कोंडलेल्या
देवांची नजर दिसते केविलवाणी
आरतीची थाळी सुट्ट्या पैशांसाठी
फिरत राहते लाजिरवाणी

शहरातील मंदिरांचे व्यापारीकरण झाले आहे. प्रसाद असलेले खडीसाखरेचे दाणे पुजारी मोजून हातात ठेवतो. परत परत प्रसाद मागणाऱ्या लहान मुलांवर खेकसतो. मुलांना देवाघरची फुले असे संबोधले जाते. पुजारी परत परत प्रसाद मागणाऱ्या देवघरच्या फुलांवर जोरदार खेकसतो. या काव्यओळीतून उपरोध जाणवतो.

पुजारी मात्र खडीसाखरेचे दाणे
परत परत मोजून हातावर ठेवतो
परत-परत प्रसाद मागणाऱ्या देवाघरच्या फुलांवर
जोरदार खेकसतो
प्रवचनकाराकडे दोन-चार वृद्ध सोडले तर
कुणाचंच नसतं लक्ष
तरीही तो उसवत राहतो थैल्या पुराणाच्या
एक हजार एक मेहनतान्याच्या

तरीही गर्दी येत राहते

गालातल्या गालात थपडा मारत

कान धरत नाक घासत साष्टांग करत

विभूती फासून स्वतःला शूचिर्भूत करून

लगबगीने दुसरी इनिंग खेळायला मोकळी होते

मंदिराच्या आवाराबाहेर विकतचं गवत विकतच्या गाईला भरवून

उरलेल्या छत्तीस कोटींना नमस्कार करून

समोरच्या रस्त्यावरच्या गर्दीत धक्काबुक्कीला सुरुवात होते

मंदिरात दोनचार वृद्ध सोडून प्रवचनकाराकडे कुणाचे लक्ष नसते. तो ही व्यावसायिक असल्यामुळे पैसे घेऊन पुराण सांगतो. मंदिरातले भाविक गर्दीने येतात. गालातल्या गालात थापडया मारतात. कान धरत, नाक घासत साष्टांग नमस्कार करतात. विभूती फासून स्वत:ला पावन करून घेतात. मंदिराच्या आवाराबाहेर विकतचे गवत घेऊन विकतच्या गाईला भरवून गाईच्या पोटात असलेल्या उरलेल्या छत्तीस कोटी देवांना नमस्कार करून समोरच्या रस्त्यावरच्या गर्दीत धक्काबुक्की करतात. भाविकांचा हा दांभिकपणा कवीने उपरोधिकपणे निर्देशित केला आहे. गाईत छत्तीस कोटी देव मानून गाईला नमस्कार करणाऱ्या व रस्त्यातल्या गर्दीतल्या माणसांना धक्काबुक्की करणाऱ्या दांभिक भाविकांपेक्षा गावातले भाविक जमलं तर मंदिरात जातात नाहीतर संध्याकाळी खाटल्यावर हरि हरि करत नामस्मरण करतात.

खेड्यातून शहराकडे येणे, महानगराकडे जाण्याचा प्रवास उत्तराधुनिक काळात अटळ होत गेला. तुमची इच्छा असो वा नसो स्वतःला सिद्ध करण्यासाठी, 'स्व'त्व टिकून ठेवण्यासाठी, आर्थिक स्थैर्यासाठी शहरांकडे, महानगरांकडे माणसाचे लोंढे वाढत गेले. तिथल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग बनले. तरीही गाव आणि शहर यातील मुलभूत फरक कवयित्रीला नॉस्टॉलजिक करतो. 'देवालय' ही कविता अशाच एका स्मरणरंजनाची गोष्ट आपल्याला सांगते. 'एकाच आवारात एकाच रांगेत/बसवलंय जास्तीत जास्त देवांना' जिथे माणसांना राहायला पुरेशी जागा नाही तिथे देवांसाठी कुठे असणार तो ही माणसासारखाच दाटीवाटीनं रहातोय. 'कडीकुलपात' कोंडलेल्या देवांची नजर दिसते केविलवाणी'. हे निरीक्षण मानवी आगतिकता दर्शविणारे आहे. माणूस केविलवाणा झालाय तसा देवही तसाच. कवितेतील दृश्यात्मकतेमुळे हा अनुभव जास्त विदारकपणे समोर येतो. मन विषण्ण होते.

### ४.३.३ शून्य गोळाबेरीज

'शून्य गोळाबेरीज' या कवितेत स्त्रित्त्वाच्या अनुभूतीतून आलेली हतबलतेची जाणीव, नात्याच्या पोकळ फोल असण्याची जाणीव, जगण्याची वाढत जाणारी कृत्रिमता, 'स्व' चा शोध ही आशयसूत्रे आहेत. स्त्रियांच्या भावविश्वात नवरा, मुले,आई-बाप, बहिण-भाऊ, भोवतालचे जग, देव यांना महत्त्वाचे स्थान असते. या साऱ्यांच्या विचारात तिचे आयुष्य व्यापते. परंतु या सर्वांना तिची दखल घ्यावी असे वाटत नाही. नवऱ्याला बायकोच्या मनाविषयी

फारसं देणं घेणं नसतं. कारण ते अमूर्त नसतं. मुलांना रडकी आई कंटाळवाणी वाटते. आई–वडिलांना मुलगी दिल्या घरी सुखी रहावी वाटते. बहिण– भावाचं प्रेम लहाणपणा पुरतच असतं. जगाच्या खिसगणतीत आपला विचार कधीच नसतो. देवही देव्हा–यातून गंमत पहात असतो. आपलं कुणी नाही ही भावना बळावत जाते. कंठ दाटून येतो, डोळे भरून येतात. सहज सोप्या भाषेत कवयित्रीने स्त्रियांचे दु:ख शब्दांकित केले आहे.

नवरा–बिवरा

त्याला बिचाऱ्याला मन या अमूर्त गोष्टीविषयी फारसं देणंघेणं नसतं

मुलं–बिलं

त्यांना बिचाऱ्यांना रडकी आई जाम म्हणजे जाम बोअर होते

आई–बाप

त्यांना बिचाऱ्यांना उभी गेलेली आडवीच यावी असं वाटत राहतं

भाऊ–बहीण

विचारे कधीतरी लहानपणी होते एव्हढंच आठवतं

जग–बिग

विचाऱ्याच्या खिसगणतीत तर आपण कधीच नव्हतो

देव–बिव

विचारा देव्हाऱ्याच्या बाल्कनीतून नुस्ता येडा गंमत बघतो

तीपण–हीपण

'नाहीच कुणी अपुले रे...' आठवून सतत दाटून येणारा कंठ व भरून

येणारे डोळे पुसणारी !

स्त्रीच्या भावविश्वाचे विविध कंगोरे, स्त्री म्हणून जगताना येणारे पेच आणि जगण्याच्या कोलाहलातून येणारी अस्वस्थता ही मीनाक्षी पाटील यांच्या कवितेतील मुख्य आशयसूत्रे आहेत. महानगरात माणसाचं शकलीकरण झालं, जगण्यातील सहजता संपली, सगळं कसं खोटखोट कृत्रिम, बेगडी होत जाणारी भोवतालची माणसं, कमकुवत नाते संबंध, नात्यातील गृहीत धरणं, हा भवताल, त्यातून वाट्याला येणारी तगमग, तडफड, अगतिक होत जाणं या कवितेतून जाणवते. 'स्व'च विखंडीकरण झालेल्या उत्तराधुनिक काळातला महानगरीय भवताल सहजीवन जगताना नात्याची वीण दोघांच्याही नकळत सैल करतो. एक रुटीन होत जाणारं एक नात तयार होत जाते. अर्थात या 'रुटीन' होत जाण्यामागे हतबलता आहे जी या महानगरीय जीवनातली अटळ अशी घटना आहे. तसेच इतर नातीही आपली दखल घेत नाहीत ही भावना दृढ होत जाते. आपण एकटे होत चालल्याची जाणीव बळावते.

उत्तराधुनिक कालखंडातून अपरिहार्यतेने आलेल्या विखंडीकरणातून, शकलीकरणातून 'स्त्रीत्वा'चे एकटेपण अधिकाधिक टोकदार झाल्याचे दिसून येते. या संवेदनाचे स्वरूप अनाहूतपणे कोसळलेल्या महानगरीय जीवन

जाणिवेशी असणाऱ्या संघर्षाचे असू शकते. या कोलाहलात एका 'स्त्री'चे जुळलेल्या, न जुळलेल्या नात्याचे संवेदन आहे. 'स्त्री' ही एकाकी नाही, तिच्यासोबत ती ज्याची अर्धांगिनी आहे तो तनामनाने तिच्यासोबत आहे. मुलांसाठी आई सदैव प्राणप्रिय असते. आईबापाचे माहेरचे दार कुठल्याही प्रसंगी मुलींसाठी सदैव उघडे असते, जगाला आपली कदर असते. देव संकटकाळी सदैव धावून येतो किंबहुना संकटेच येऊ देत नाही. तीपण हीपण सारेजणच आपले असतात. या भाबडया आणि पारंपरिक धारणांना छेद देणारी, या परंपरागत धारणा नाकारणारी ही कविता आहे. हरवलेपण, जडावलेपण, संभ्रमितता, विसंवाद, हतबलता आणि 'स्व'चे विखंडीकरण अशा खास उत्तराधुनिक युगाचे निरूपण करणारी ही कविता आहे.

**४.३.४. बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना**

'बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना' ही एक महत्त्वाची कविता आहे. ही कविता एका स्त्रीने एकूणच 'स्त्री'च्या अस्तित्त्वाचा शोध घेण्याचा केलेला प्रयत्न आहे. पूर्वी बाईला पुस्तके वाचता यायची नाहीत. आता बाई पुस्तके वाचते. पुस्तकाच्या जाहिराती व त्या पुस्तकाविषयी वाचकांची मनोभूमिका निर्माण करणारा दोन ओळीत लिहिलेला मजकूर वाचते. स्त्रियांनी स्त्रियांविषयी लिहिलेली तसेच स्त्रियांनी पुरुषाविषयी लिहिलेली पुस्तके ती वाचते. पुस्तकांच्या जाहिरातीतला मजकूर असा असतो:

'आई समजून घेताना' – उत्तम कांबळे

'आईच्या काबाडकष्टातून मोठ्या झालेल्या मुलाने

आईला सूमजून घेतानाचा ह्दयस्पर्शी आलेख'

बाई तिच्या आईच्या व तिच्या मुलाच्या नात्याचा

सगळ्या आईमुलांच्या नात्यांचा ताळेबंद जुळवू पाहते

अन् खिडकीतून अफू पाजून झोपवलेल्या मुलाला घेऊन

भीक मागणाऱ्या भिकारणीला एकटक पाहत बसते

आईवरच्या पुस्तकाचा मजकूर वाचताना तिला खिडकीतून अफू पाजून झोपवलेल्या मुलाला घेऊन भिक मागणारी भिकारीण दिसते. पुस्तकातील मजकूर आणि वास्तवातील तिला दिसलेले चित्र यातून ती आईमुलाच्या नाताच्या ताळेबंद जूळवू पाहते.

'हिंदू संस्कृती आणि स्त्री' आ.ह. साळुंखे'

'स्त्रियांचे पंख पध्दतशीरपणे कापण्याचे प्रयत्न कसे झाले,

तिला अबला कसे बनवले गेले, याचे मूळ शोधण्याचा एक प्रयत्न'

उपरोक्त पुस्तकाचा मजकूर वाचून पराशर आणि सत्यवतीचा विचार तिच्या मनात येतो. पराशर ऋषीने संमोहित करून सत्यवतीशी संभोग केला व व्यासांचा जन्म झाला. ज्या व्यासाने महाभारताची निर्मिती केली त्या व्यासाची जन्माची कथाच स्त्री शोषणातून असलेली दिसून येते. व्यासांनी महाभारत लिहिले तर पराशाराने अबला स्त्रीचे शोषण

करून समकालात स्त्री शोषणाचे महाभारत उभे केले

मूळ शोधण्यावरून बाईला अचानक आठवतं
विचारू नये ऋषी न नदीचं कुळमूळ
कारण नदी पण शेवटी बाईच अन् सत्यवती पण बाईच
अन् पराशर तर पक्का ऋषी
मग त्यांनी उभारलेलं महाभारत तर
आजही घडताना दिसतंय आजूबाजूला

स्त्रियांच्या शोषणाची सनातन परंपरा समकालातही दिसून येते. पुढे ती 'देवदासी आणि नग्न पूजा' हे उत्तम कांबळे यांचे पुस्तक वाचते. 'साक्षात परमेश्वराशी लग्न करूनसुद्धा ज्याच्या वाट्याला अन्याय आणि उपेक्षा येते अशा देवदासी विषयीचे समाजशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे पुस्तक' असा मजकूर त्यावर लिहिलेला असतो. त्यावेळी तिला खिडकीतून दिसणाऱ्या भिकारणी बरोबर परमेश्वर आणि देवदासीच्या मुलांना बाई थोपटत राहते. मानवी जगण्याची दांभिकता आणि उपरोध या कवितेत दिसून येतो. पुढे ती 'नारीगाथा' हे वसुधा जोशी यांच्या अनुवादीत पुस्तकाची जाहिरात व 'आव्हानांपुढे कच न खाणाऱ्या स्त्रियांच्या भावविश्वाचं दर्शन घडविणाऱ्या अनुवादित कथा' हा त्यावरील मजकूर वाचते. तिला प्रश्न पडतो 'बाईच्या दु:खाचा, आव्हानांचा अनुवाद खरचं आहे का शक्य?' त्यावेळी तिला खिडकीतून दिसणारी भिकारीण धाय मोकलून रडता रडता हळूहळू शांतपणे रडत बसलेली दिसते. पुढे ती 'घडता-घडविता'- संपा. रोहिणी गवाणकर व उषा ठक्कर या पुस्तकाचा मजकूर 'महिलांच्या सबलीकरणार्थ केलेल्या प्रयत्नांचे त्यांच्या स्वत:च्या शब्दात केलेले निवेदन' वाचते. त्यावेळी तिला रडून रडून शांतपणे भिंतीकडे एकटक पाहत असलेली भिकारीण दिसते. शेवटी ती हातातलं वाङ्‌मयवृत्त बंद करून मुखपृष्ठावरचं एन. पुष्पमालाचं छायाचित्र बघत बसते.

तिला कळत नाही छायाचित्रात अर्धवट दिसणारा पुरुष
दुःशासन असावा की कृष्ण?
शेवटी कंटाळून तो कुणीही असला तरी
द्रौपदीला काय फरक पडला असं म्हणून
ती खिडकीतून बाहेर बघते
तर भिकारणीचा ठिपका
पुसटसा होत जाताना दिसतो
दूरदूर रस्त्यावर
बाई पुस्तक वाचणं बंद करते

इथे द्रौपदीचा उल्लेख केल्यामुळे स्त्रियांच्या वाट्याचे भोग कसे कमी झाले नाहीत हे सूचित होते. मग तो कृष्ण

असला काय किंवा दुःशासन. स्त्रीत्वाचे भोग अटळ असतात. हा निराशावाद येथे दिसून येतो. आजच्या उत्तराधुनिक स्त्रीच्या मनातली ही विदग्ध जाणीव, स्त्रीत्वाची सनातन वेदना या कवितेतून व्यक्त होते.

**४.४ सारांश**

मीनाक्षी पाटील यांच्या एकूणच कवितेची घडण महानगरीय पर्यावरणात झाली आहे. तिथले प्रतिमाविश्व, व्यक्ती, तिथले नातेसंबंध, ताण–तणाव, जगण्यात येत गेलेली कृत्रिमता हे सगळ कवितेत अधोरेखित झाले आहे. आपला भवताल इतका एकारलेला आहे की, लिहिणाऱ्या हाताला यात कुठे आणि कसे व्यक्त व्हावे हा प्रश्न पडवा. भावनिक गुंता सोडविताना, जगण्यातली दमछाक अनुभवताना बऱ्याचदा 'व्यक्त' व्हावसं वाटूनही हे महानगरीय पर्यावरण क्षणाचीही उसंत मिळू देत नाही. ही आगतिकता या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. तर दुसरीकडे 'निव्वळ जगण्याचा आट्टाहास' करत राहण एवढच या भवतालात शक्य आहे याची जाणीव तसेच महानगरीय जीवन किती कोलाहलाचे झाले आहे याचे भयावह चित्रण या कवितेतून समोर येते. स्त्री–पुरुष नात्यात 'स्त्री'च्या वाट्याला येणारे दुय्यमत्त्व नाकारणारे 'स्त्रीवादी' संवेदन मराठी साहित्यात ८० च्या दशकात प्रकट झाले. नव्वदोत्तर कालखंडात हा पैस 'स्त्री'चं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, एक व्यक्ती असणं, पुरुषाच्या बरोबरीचं स्थान या धारणेपर्यंत ठळक होत गेले. 'इज इट इन युवर डीएनए' या काव्यसंग्रहातील 'मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट' ही कविता एकार्थाने आजच्या काळात 'स्त्री'चं असणं, तिचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे असेल याचे सुतोवाच करणारी कविता आहे, 'देवालय' या कवितेतून खेड्यातून शहराकडे येणे, महानगराकडे जाण्याचा प्रवास उत्तराधुनिक काळात अटळ होत गेला याची जाणीव तसेच गाव आणि महानगर यातील अंतर, शांती, पारदर्शी जगण्यातील निर्मळता सूचित होते.

'बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना' कवितेतून जाणवणारा 'दृश्यानुभव' हे या कवितेचं वैशिष्ट्य आहे. या दृश्यात्मकतेमुळे शब्दांतून व्यक्त होणाऱ्या आशयापेक्षा अधिकचा आशय वाचक या दृश्यांनुभवातून घेतो आणि आशय अनुभवतो. या अनुभवात टोकाची अलिप्तता असली तरी आदर्श आणि वास्तव हे पुस्तकातील मजकूर व भिकारीण या दोन प्रतिमेतले द्वंद्व चोखपणे वाचकापर्यंत पोहोचते. 'बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना' या कवितेत स्त्रीत्वाचे भोग अटळ असतात ही जाणीव होते. स्त्रियांच्या वास्तव प्रश्नांवर भाष्य आणि त्यातून प्रत्ययास येणारा निराशावाद 'शून्य गोळाबेरीज' या कवितेतून दिसून येतो. आजच्या उत्तराधुनिक स्त्रीच्या मनातली ही विदग्ध जाणीव स्त्रीत्वाची सनातन वेदना मीनाक्षी पाटील यांच्या कवितेतून दिसून येते.

**४.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ**

१. पात्र – भूमिका

२. सुसर – मगर

३. वैतागने – कंटाळा येणे

४. देवालय– मंदिर, देऊळ

५. शूचिर्भूत– शुध्द होणे, पावन होणे

६. सांजच्याला – संध्याकाळी

७. अमूर्त – आकाररहित, निराकार

८. खिसगणती – गणती, मोजदाद

**४.६ स्वयं अध्ययन प्रश्न**

१. 'मुलीने सांगितलेली गोष्ट' या कवितेत कोण कायम लबाडच असते ?

अ. कोल्हा　　ब. सुसर

क. राजा　　ड. राणी

२. 'मुलीने सांगितलेली गोष्ट' या कवितेत सुसर नेहमी कशी असते?

अ. सुष्ट　　ब. दुष्ट

क. प्रेमळ　　ड. दयाळू

३. गावामधले देवालय कसे आहे?

अ. ओसाड　　ब. गजबजलेले

क. शांत　　ड. उद्ध्वस्त

४. पुजारी प्रसाद म्हणून हातावर परत परत मोजून काय ठेवतो ?

अ. खोबऱ्याचे तुकडे　　ब. फुटाणे

क. बत्ताशे　　ड. खडीसाखरेचे दाणे

५. 'शून्य गोळाबेरीज' या कवितेमध्ये मुलांना कसली आई जाम बोर होते?

अ. रागवणारी　　ब. रडकी

क. प्रेमळ　　ड. चिडकी

६. बाई पुस्तकाच्या जाहिरातीतला काय वाचते?

अ. आशय　　ब. किंमत

क. मजकूर　　ड. शीर्षक

**४.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१. कोल्हा

२. दुष्ट

३. शांत

४. खडीसाखरेचे दाणे

५. रडकी

६. मजकूर

## ४.८ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'मुलीने सांगितलेली नवीन गोष्ट' या कवितेतील आशय स्पष्ट करा.

२. मीनाक्षी पाटील यांच्या कवितेतील आशयसूत्रे स्पष्ट करा.

३. मीनाक्षी पाटील यांच्या कवितेतील स्त्री संवेदन स्पष्ट करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'देवालय' या कवितेत गावामधले देवालय आणि मायानगरीतले देवालय हा भेद कसा व्यक्त केला आहे?

२. 'शून्य गोळाबेरीज'या कवितेतील स्त्रियांच्या भावविश्वातील एकटेपण विशद करा.

३. 'बायकांवरील पुस्तकांच्या जाहिराती वाचताना' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. डहाके वसंत आबाजी, कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद , १९९९

२. गुप्ते विश्राम, नवं जग नवी कविता, संस्कृती प्रकाशन, पुणे,२०१६

३. पाटील म. सु., सर्जनप्रेरणा आणि कवित्वशोध, मौज प्रकाशन, मुंबई


◆◆◆

घटक ४

# निवडक कविता : भाग –३.२

## प्रज्ञा दया पवार

---

### अनुक्रमणिका

### ५.० उदिष्ट्ये

प्रज्ञा दया पवार यांच्या 'डॉ.आंबेडकर', 'दार उघड बये, दार!', 'सिद्धार्थास', 'ही पुन्हा मांडामांड' या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

- कवीच्या स्त्रीवादी जाणिवा समजून येतील.
- या कवितेतून समाज व्यवस्थेत असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि लिंगभेदाची विषमता हे विदारक वास्तव लक्षात येईल.
- कवीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयीची आस्था, भावबंध समजून येतील.
- जात आणि वर्ग यांच्या समष्टीतून निर्माण झालेल्या स्त्रियांच्या दुःखाची अवस्था लक्षात येईल.
- कवीच्या संवेदनशीलतेला जाणवलेल्या स्त्री जीवनाच्या नोंदी अभ्यासता येतील.
- कवितेतील लय, प्रतीक, प्रतिमा, या घटका आधारे कवितेचे भाषिक सौंदर्य अभ्यासता येईल.

### ५.१ प्रस्तावना

नव्वदच्या दशकात मराठी साहित्यात मन्वंतर घडून आले. सामाजिक परिणामातून आणि वाङ्मयीन बदलत्या मूल्य संकल्पनेतून नवे आविष्कारण समोर आले. नव्वदच्या दशकात खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे खाजगगिकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या संकल्पना उदयास आल्या. जग  हे मुक्त आणि निर्बंध बाजारपेठ बनले. या ग्लोबल व्हिलेजचा प्रत्येक नागरिक एक महत्त्वाचा घटक आणि ग्राहक बनला. भौतिक समृध्दी बरोबर त्याचे अनेक विपरीत परिणामही झाले. राजकीय सत्ताकांक्षा वाढल्या. मंडलवाद, आयोध्या–बाबरी मशिद वाद, मुंबई बॉम्ब स्फोट, अनेक धार्मिय व जाती दंगली, गोध्राकांड या हिंसक घटनांचे परिणाम देशपातळीवर उकमटले. तसेच ते कलावंताच्या मनावर ओरखडे उमटवून गेले. जागतिकीकरण आणि महानगरीय संवेदन याचे प्रतिबिंब कलावंताच्या कलाकृतीवर पडले. १९९० नंतरच्या कालखंडात अनेक कवींनी लेखन केल्याचे दिसून येते. यामध्ये प्रज्ञा दया पवार हे महत्त्वाचे नाव. प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेतून समकालीन जीवनातील मूल्यात्मक पडझड दिसून येते. सामाजिक जीवनातील शोषण, सांस्कृतिक जीवनातील विसंगती, दाहक वर्तमानाची जाणीव ही प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील आशयसूत्रे आहेत. मानवी जीवनातील विसंगती त्यांच्या कवितेत दिसून येते. प्रज्ञा पवार यांची कविता स्त्री असण्याच्या पारंपारिक संकल्पनेला छेद देत वास्तववादी जाणिवेतून टोकदारपणे स्त्रीसंवेदन व्यक्त

करते. 'स्त्री' समजून घेण्याच्या पारदर्शी जाणिवा त्यांच्या कवितेत दिसून येतात. माणूस म्हणून जगणे नाकारणाऱ्या आणि शोषण करणाऱ्या प्रस्थापितांविरुद्ध बंडखोरी, विद्रोह, अन्यायाला नकार, आत्मसन्मानाची जाणीव, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मानवतावादी मूल्यांचा आविष्कार, परिवर्तनावर निष्ठा, जीवनानुभवाचा प्रांजळ आविष्कार इत्यादी अनेक गोष्टी प्रज्ञा पवार यांच्या कवितेत दिसून येतात. सम्यक परिवर्तनासाठी त्यांनी काव्यलेखन केल्याचे दिसून येते.

### ५.२ कवी परिचय – प्रज्ञा दया पवार (जन्म:११-०२-१९६६)

प्रज्ञा पवार यांचे 'अंतस्थ' (१९९३), 'उत्कट जीवघेण्या धगीवर' (२००२), 'मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा' (२००७), 'आरपार लयीत प्राणांतिक (२००९), 'दृश्यांच्या ढोबळ समुद्र' (२०१३) हे कविता संग्रह 'अफवा खरी ठरावी म्हणून' (२००९) हा कथासंग्रह, 'केंद्र आणि परीघ' (२००४), 'टेहलटिकोरी' (२०१५), 'अर्वाचीन आरण' (२०२०)हे ललित गद्य लेखन, 'धादांत खैरलांजी' (२००७) हे नाटक, 'मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे' (२००७), हे संपादन, 'विमुक्तांचे स्वातंत्र्य'(२०१८) हे सहसंपादन इत्यादी साहित्य संपदा प्रकाशित आहेत. प्रज्ञा पवार यांना बालकवी पुरस्कार, विशाखा पुरस्कार, शाम पनगंटी स्मृती पुरस्कार, कविवर्य बा.सी. मर्ढेकर पुरस्कार, रा. ना. पवार स्मृती पुरस्कार, इंदिरा संत विशेष पुरस्कार, महाकवी अश्वघोष पुरस्कार,वामन अनंत रेगे पुरस्कार, उषा दातार स्मृती पुरस्कार, कवी केशवसुत पुरस्कार, श्रीधर शनवारे स्मृती काव्य पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अनेक सामाजिक चळवळीत विशेषतः स्त्री-संघटनांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग आहे. प्रज्ञा पवार यांनी देशातील वाढत्या असहिष्णुतेच्या निषेधार्ह राज्यशासनाचे सर्व पुरस्कार २०१५मध्ये शासनाला परत केले. परिवर्तनाचा वाटसरू (पाक्षिक) या अंकाच्या त्या संपादक आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, तसेच मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मराठी संशोधन मंडळ या संस्थांच्या सन्माननीय सदस्यपदी त्या आहेत.

### ५.३ विषय विवेचन

१९९० नंतर च्या कालखंडातील महत्त्वाच्या कवयित्री म्हणून प्रज्ञा पवार यांची ओळख आहे. समाज व्यवस्थेत असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि लिंगभेदाची विषमता या विषयीचा विद्रोह, विषमतावादी व शोषित प्रवृत्तीचा निषेध, भूतकालीन जीवनाचे दर्शन घडविताना सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील प्रस्थापित व्यवस्थेने लादलेल्या गुलामीविषयीची अस्वस्थता, समाजातील सर्व वंचित, शोषित, उपेक्षित घटकांना न्याय मिळावा ही तळमळ, आदिम दुःखाची जाणीव, स्त्री-पुरुष नातेसंबंधाचा शोध, स्त्रीवादी जाणिवा ही प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील आशयसूत्रे आहेत. प्रज्ञा पवार यांच्या कविता बाईची दुःखे जाणणाऱ्या असल्या तरी स्त्री हे विषम समाजव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे हा आशय अधोरेखित करतात. त्यांच्या कवितेतील बाईची दुःखे समाजिक, राजकीय, कौटुंबिक आहेत. स्त्री-पुरुष नातेसंबंध, समाज आणि स्त्री यातील संबंध, समाजव्यवस्थेने, कुटुंबव्यवस्थेने स्त्रीला दिलेली अमानुषी वागणूकीचे दुःख त्यांच्या कवितांतून प्रकटत राहते. स्त्रियांना लिंगभेद विषमतेला सामोरे जावे लागते. त्यातून होणारी त्यांची तगमग, तडफड ही कविता व्यक्त करते. स्त्री-पुरुष नात्याचा शोध घेणारी जाणीव या कवितेतून अभिव्यक्त होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजातील महानायक. डॉ. बाबासाहेबांच्या

व्यक्तिमत्त्वाशी, कार्यकर्तृत्त्वाशी असलेले हळवे अनुबंध त्यांच्या अनेक कवितांतून प्रतिबिंबित झालेले दिसून येतात. प्रज्ञा पवार यांच्या कवितांतून स्त्रियांच्या भावविश्वाचे अनेक दुखरे, कंगारे अधोरेखित होतात. जीवनातील आदिम दुःखाची जाणीव त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त होते. प्रज्ञा दया पवार यांची कविता जात आणि वर्ग यांच्या समष्टीतून निर्माण झालेले स्त्रीचे वैश्विक दुःख निर्देशित करते. समष्टीच्या पातळीवर दुय्यम स्थानावर असलेली स्त्री जेव्हा उतरंडीच्या विषमतेचा अनुभव घेत जगते तेव्हा ती आख्खं आयुष्य बाईपणाच्या सरहद्दीशी इमान राखून लढते. प्रज्ञा पवार यांच्या कवितांतून ऐतिहासिक व सांस्कृतिक पटावरील बाईपणाची शोकांतिका निर्देशित होते.

### ५.३.१ डॉ.आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलेले कवीमन प्रस्तुत कवितेत दिसून येते. डॉ. बाबासाहेबांचे स्मृतीस्थळ म्हणजे चैत्यभूमी. वडिलांबरोबर चैत्यभूमीवर ओसंडत्या गर्दीत वडिलांचे हात पकडून गेल्याचे स्मरण कवीला होते तेव्हा पासून बाबासाहेबांचे नाव काळजावर कोरल्याचे स्मरते.

मी पाहिलं नाही तुला
तुझ्या राजस रूपाला
फितूर आकाश वेचणाऱ्या
बुलंद हातांना
दिशा धुडकावून लावणाऱ्या
मोकळ्या भौतिकाला
माणूस धुमसत ठेवणारा
तुझ्या शब्दांचा डंख
आमच्या किती पल्याड
किती पल्याड
अवघं अस्तित्व चिरत जाणारा
काळोखाचा झोत
आमच्या किती पल्याड
रक्तात रुजत ठेवलेलं
तुझं उत्क्रांतीचं स्वप्न

डॉ. बाबासाहेबांमुळे दलित समाजाला आत्मभान आले. प्रस्थापित समाज व्यवस्थेने दलित समाजाला अस्पृश्यतेची वागणूक देऊन त्यांच्यावर आत्याचार केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अन्यायाच्या, अवहेलनेच्या, शोषणाच्या दलदलित सापडलेल्या दलित समाजाला आत्मभान दिले. दलित समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व या मूल्यांवर आधारित समताधिष्ठीत नवसमाजाची निर्मिती केली.

प्रस्थापित समाजाने दलितांचे माणूस असणे नाकारले होते. डॉ. बाबासाहेबांनी त्यांना माणूस म्हणून हक्क दिले.

आम्ही घट्ट मिटून घेतली
आत्मशोधाची दारं
तडकलेल्या प्रतिबिंबाला
चेहरा समजण्याची चूक
केली पुन्हा पुन्हा
पूर्ण प्रकाशाची पहिली तिरीप
ओळखता आली नाही
वश झाली नाहीत आम्हांला
विदूषकाची हिंस्र नखं

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश दलित समाजाला दिला आणि क्रांतीचा इतिहास घडवला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्या शोषित आणि उपेक्षित जीवनाला आत्मभान दिले. या आत्मभानाचे प्रतिबिंब या कवितेत दिसून येते. ही कविता परिवर्तनसन्मुख आहे. १९६० नंतरच्या कालखंडात दलित साहित्याची चळवळ अधिक गतिमान झाल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित चळवळीचे ऊर्जाकेंद्र ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनशील विचारातून दलितांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त झाला परंतु आजही ही विषमता पूर्णपणे नष्ट झाल्याचे दिसत नाही.

प्रस्तुत कवितेत 'फितूर आकाश वेचणारे बुलंद हात', 'माणूस धुमसत ठेवणारा शब्दांचा डंख', 'अवघं अस्तित्व चिरत जाणारा काळोखाचा झोत', 'रक्तात रुजत ठेवलेलं उत्क्रांतीचं स्वप्न', 'विदूषकाची हिंस्र नखं' या प्रतिमा अर्थपूर्ण आहेत. या प्रतिमेच्या उपयोजनातून कवितेचा आशय अधिक टोकदार झालेला दिसून येतो.

**५.३.२ दार उघड बये, दार!**

'दार उघड बये, दार!' ही कविता स्त्रियांच्या आदिम दुःखाला अधोरेखित करते. पौरुषेय अंधारात बायका चुरडून बसलेल्या शोकग्रस्त बायका एकाएकी संहिते बाहेरच्या प्रकाशाकडे उठून चालू लागल्या आहेत. प्रस्तुत कवितेत अंधार हा पौरुषेय आहे. या आशयातून सूचित होते की, पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांचे शोषण केले, त्यांची घुसमट केली. उजेडाचे दान त्यांच्या पदरात पडू दिले नाही. त्यांच्या कर्तृत्त्वाचे पंख कापले.त्यामुळे त्यांच्या पदरात अंधाराचे दान पडले. म्हणून हा अंधार पौरुषेय आहे. या अंधारात बायका चुरडून बसल्या आहेत. 'चुरडून' या प्रतिमेतून दाबून, ठेचून, चेचून, कुचलून हा अर्थ ध्वनित होतो. यातून स्त्रियांचे शोषण, त्यांच्यावर केलेली भावनिक, मानसिक, शारिरीक हिंसा याचा प्रत्यय येतो.

पौरुषेय अंधार
चुरडून बसलेल्या

शोकग्रस्त बायका
एकाएकी उठून चालू लागल्या
संहितेबाहेरच्या फटफटीत प्रकाशाकडे
एकमेकींकडे प्रथमच पाहिलं त्यांनी
संस्कृतीच्या उदराबाहेर येत
नी
नीट गुंता समजून घेत घेत
अवघ्या बाईपणाचा
ठाम पाय रोवून उभ्या राहिल्या
जमिनीवर
थेट

मात्र आता या बायका 'संहिते'बाहेरच्या फटफटीत प्रकाशाकडे चालत आहेत. ही संहिता म्हणजे पुरुष सत्ताक व्यवस्थेने बायकांसाठी बनवलेली नियमावली, आचारसंहिता, कायदेकानून होय. या बायका आता या संहितेच्या बाहेर पडत आहेत. पौरुषेय अंधाराकडून त्या फटफटीत प्रकाशाकडे जात आहेत. संस्कृतीच्या उदरातून बाहेर येत बाईपणाचा गुंता समजावून घेत आहेत. पुरुषसत्ताक व्यवस्थेने शोषणाच्या धारणेतून धर्म आणि संस्कृतीच्या नावाखाली अवध्या बाईपणचा गुंता करून ठेवला आहे. मात्र आता त्या गुंता समजून घेत स्वत:ला मुक्त करत आहेत. आता त्या पाय थेट जमीनीवर पाय रोवून उभ्या राहिल्या आहेत. याचा अर्थ आता बायकांना आत्मभान आले आहे. सर्वार्थाने त्या स्वत:च्या पायावर उभ्या आहेत.

फासत राहिल्या सर्वांगाला
मातीचा रंग
रांगडा
फेडली एकेक वस्त्रं
मुळापासून हादरवत एकमेकींना
घातला गोंधळ आर्त
दार उघड बये, दार उघड
दार उघड बये, दार!

त्या सर्वांगाला मातीचा रंग फासत आहेत. एकेक वस्त्र फेडत आहेत यातून त्यांचे आदिम आणि पारदर्शी असणे सूचित होते. 'दार उघड बये, दार उघड, दार उघड बये, दार!' म्हणत त्या आर्त गोंधळ घालत आहेत. यातून गोंधळ हा देवीच्या उपासणेसाठी केला जाणारा विधी आहे. इथे देवी ही स्त्रीत्त्वाच्या उर्जेचं प्रतीक आहे.

आणि या उर्जेला साकडं घालत त्या आर्त गोंधळ घालत आहेत. पौरुषेय अ-पौरुषेय नसलेल्या पावसात अर्पय़ा शतकाची जागरणं करून त्या थकून क्लान्त झोपल्या आहेत. 'क्लान्त' या शब्दातून त्यांचा अस्तित्त्वासाठीचा अथक संघर्ष सूचित होतो. 'अर्पय़ा शतकाची जागरणं' या शब्दातून त्यांचा सनातन काळापासूनचा संघर्ष दिसून येतो. अर्थपूर्ण प्रतिमा, प्रतीकातून अत्यंत महत्त्वाचा आशय या कवितेतून सूचित झाला आहे.

**५.३.३ सिद्धार्थास...**

'सिद्धार्थास' ही एक मिथकीय कविता आहे. कवीने सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या प्रसंगाला काव्यात्म आशय देवून यशोधरेची वेदना अधोरेखित केली आहे.

न संपणाऱ्या दुःखाच्या अटळ शोधात

तू निघालास तेव्हा

उत्तररात्र उलटलेली...

तेव्हा विसावला क्षणभर तुझा हात

भुरभुरणाऱ्या रेशीमजावळात

यशोधरेच्या निद्रिस्त पापण्यांतला खोल डोह

तू ओलांडलास निग्रहाने

आणि काळ्याकुट्ट अंधारावर उमटला

एक ओरखडा जीवघेणा.

सिद्धार्थाचा गौतम बुद्ध होण्याचा प्रवास म्हणजे 'न संपणाऱ्या दुःखाचा अटळ शोध' होता.शाक्य कुळातील शुद्धोधनाच्या आणि मायावती पोटी सिद्धार्थाचा जन्म झाला. सिध्दार्थ गौतमाचे वय २० वर्षे पूर्ण झाल्यावर ते शाक्य संघाचे सदस्य झाले. 'आठव्या वर्षी एक घटना घडली. ती शुद्धोधनाच्या कुटुंबाकरिता दुःखाचे आणि सिद्धार्थाच्या जीवनाला निर्णायक वळण देणारे निमित्त ठरली. शाक्यांच्या राज्याच्या सीमेवरच कोलीयांचे राज्य होते. या दोन्ही राज्याच्या सीमा रोहिणी नदीने विभाजित केल्या होत्या. रोहिणीचे पाणी शाक्य आणि कोलीय दोघेही ओलिताकरिता उपयोगात आणीत असत. प्रत्येक हंगामाप्रसंगी शाक्य आणि कोलीयात रोहिणीचे पाणी प्रथम कोणी आणि किती घ्यावे याविषयी विवाद होत असे. अनेकदा या विवादाचा परिणाम भांडणात तर काही वेळा युद्धातही होत असे. सिद्धार्थ २८ वर्षाचा झाला. त्यावर्षी शाक्यांच्या सेवकात आणि कोलीयांच्या सेवकात पाण्यावरून मोठा संघर्ष झाला. संघर्षात दोन्ही पक्षातील लोक जखमी झाले. जेव्हा शाक्य आणि कोलीय यांना या घटनेची माहिती मिळाली तेव्हा दोन्ही पक्षांनी या विषयाचा युद्धाने कायमचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले.'७ सिद्धार्थाचा कोलीयांविरुद्धच्या युद्ध घोषणेसाठी विरोध होता. युद्ध घोषणेने हेतू सफल होणार नाही. युद्धाने दुसऱ्या युद्धाची बीजे पेरली जातील असा विचार सिद्धार्थाने केला. संघाच्या सेनापतीला सिद्धार्थाचा विचार मान्य नव्हता. 'संघाच्या कोलीयांविरुद्ध युद्धाच्या योजनेला आपण असाच विरोध करीत राहिलो तर त्याचे काय परिणाम होऊ शकतात याची सिद्धार्थाला जाणीव झाली. त्याच्यापुढे तीन पर्याय होते- सैन्यात दाखल व्हावे आणि युद्धात भाग घ्यावा. फाशीची किंवा

देशत्यागाची शिक्षा भोगावी किंवा त्यांच्या कुटुंबीयांनी सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे व संघाने त्याच्या कुटुंबाच्या जमिनी जप्त कराव्यात. प्रथम पर्याय त्याला ठामपणे अस्वीकृत होता. तिसऱ्या पर्यायाविषयी तो कल्पना देखील करू शकत नव्हता. प्राप्त परिस्थितीत त्याला दुसरा पर्यायच योग्य वाटला.'८ सिद्धार्थने आईवडीलांचा, पत्नी यशोधरेचा लहानगा पुत्र राहुलचा निरोप घेऊन गृह त्याग केला. अशा प्रकारे सिद्धार्थाचा गौतम बुद्ध होण्याचा प्रवास सुरू झाला.

यशोधरा जगत राहिले
मातीच्या पावलांनी
पुन्हा पुन्हा झेपावले उन्मत्त बहर
तिच्या मनाच्या काठावर
आणि तू उतरवत गेलास सहजतेने
फुलांची ऐहिक वस्त्रे.
ती समजावत राहिली
अवघ्या शरीराला... मनाला...
घट्ट अडसर घातला तिने
आयुष्यातल्या उजाड ऋतूंना.
तू परतून आलास
आभाळाएवढा उंच अथांग होऊन
उभा राहिलास तिच्यासमोर
असीम करुणेचे हात पसरून
देणार होती का यशोधरा
तुझ्याकडून अव्हेरल्याची ठसठसती वेदना
रक्तातून जखडलेलं तुझं अस्तित्व?
न संपणाऱ्या दुःखाच्या अटळ शोधात
तू निघालास तेव्हा
तुला दिसली का?
सिद्धार्था
यशोधरेच्या लख्ख डोळ्यांतून
निथळणारी अपार तृष्णा

सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या प्रसंगाला काव्यात्म आशय देवून यशोधरेची वेदना अधोरेखित केली आहे. सिद्धार्थ गृहत्याग करत होता तेव्हा उत्तर रात्र उलटली होती. कवितागत तिला वाटते, निघताना पुत्र राहुलच्या भुरभुरणाऱ्या रेशमी जावळात सिद्धार्थांचा क्षणभर हात विसावला असेल. यशोधरेचा निरोप घेताना सिद्धार्थाला गलबलून आले असावे तरीही निग्रहाने त्याने तिचा त्याग केला. 'यशोधरेच्या निद्रिस्त पापण्यांतला खोल डोह/तू ओलांडलास निग्रहाने आणि काळ्याकुट्ट अंधारावर उमटला/एक ओरखडा जीवघेणा/ यशोधरा जगत राहिली/मातीच्या पावलांनी/पुन्हा पुन्हा झेपावले उन्मत्त बहर' सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या प्रसंगाचे मिथक वापरुन कवयित्रीने यशोधरेचा विरह, बाईपणाचा संयम, बाईपणाची तगमग आणि तळमळ व्यक्त केली आहे. 'ती समजावत राहिली/अवघ्या शरीराला ... मनाला.../घट्ट अडसर घातला तिने/आयुष्यातल्या उजाड ऋतूंना.' सिद्धार्थ गौतमबुद्ध होऊन परत आले तेव्हा 'आभाळा येवढा उंच अथांग होऊन उभा राहिला तिच्या समोर असीम करुणेचे हात पसरून' तेव्हा कवितागत तिला वाटते की, सिद्धार्थाकडून आव्हेरल्याची ठसठसती वेदना रक्तातून जखडलेलं त्याचं अस्तित्त्व यशोधरा देणार होती का ? कवितागत ती सिद्धार्थांला अर्थातच गौतम बुद्धाला तळमळीने प्रश्न विचारते की, 'न संपणाऱ्या दुःखाच्या अटळ शोधात तू निघालास तेव्हा तुला दिसली का यशोधरेच्या लख्ख डोळ्यातून दिसणारी अपार तृष्णा ?' सहजीवनाची उत्कट आस बाळगून असलेली ही 'अपार तृष्णा' यशोधरेची असली तरी ती समग्र स्त्री जातीची वेदना आहे. बाईपणाचं आदिम दुःख आहे. प्रज्ञा पवार यांनी यशोधरेच्या या मिथकीय व्यक्तिरेखेला नकळतपणे बाईपणाच्या आदिम दुःखाशी जोडले आहे.

### ५.३.४ ही पुन्हा मांडामांड

'ही पुन्हा मांडामांड'ही एक अर्थपूर्ण कविता आहे. जीवनाच्या प्रगल्भ टप्प्यावर आलेली स्थितप्रज्ञता, तटस्थता, अलिप्तता या कवितेतून निर्देशित होते.

ही पुन्हा मांडामांड...<br>
नात्याची<br>
घराची<br>
भांड्याकुंड्यांची<br>
पुस्तकांची<br>
न् समष्टीची.<br>
हे असं अडकत जाणं कशाकशात<br>
हे असं सापडवून घेणं कशाकशात<br>
हे असं फडफडत राहणं कशाकशात

'ही पुन्हा मांडामांड' या कवितेत मानवी जीवनाचे वास्तव अधोरेखित होते. परिवर्तन ही अटळ गोष्ट असली तरी सुध्दा संवेदनशील मनासाठी 'ते का ? व कशासाठी ?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. मनाजोगी मांडामांड हे एक जगण्याचं आदर्श स्वप्न असतं जे वास्तवतेत माणसाला साकार करता येत नाही. वयाच्या उत्साहानुसार आणि

आकलनानुसार माणूस नव्या उमेदिने मांडामांड करत असतो. ही मांडामांड नात्याची असते, घराची असते, पुस्तकांची असते आणि समष्टीचही असते. परंतु वयाच्या आणि आकलनाच्या एका प्रगल्भ टप्प्यावर ही मांडामांड निरर्थक वाटते. आर्त उत्कटतेने स्वत:शी संवादी झाल्यावर, आंतर्यामीचा तळ गाठल्यावर, स्वत:च स्वत:ला गवसल्यावर भवताल हा निरर्थक वाटतो आणि कशाकशातच अडकत जायला नकोसे वाटते.

कशाकशाची करायची असते रंगसफेदी?

काय काय मिळत असतं बदलून पर्यायी?

आताशा कसलंच भय वाटत नाही

मूळ रंग असा खळखळत येतो

पाण्याच्या लोंढ्यासारखा

न् निघून जातो माझ्यावरून

निकुरा.

मी पुटपुटत राहते स्वतःशीच

आताशा कसलंच भय वाटत नाही.

आता जगण्याच्या या टप्प्यावर आता कुठल्याही मांडामांडीचं आकर्षण राहत नाही. आता कुठल्याही रंगसफेदीचं आकर्षण राहत नाही. मुळच्या पाण्याच्या रंगासारखे पारदर्शी असावे वाटते. 'आता कसलच भय वाटत नाही' या काव्य ओळीतून आत्मनिर्भर जगणे सूचित होते.

**५.४ सारांश**

परिवर्तनाची आस बाळगून असलेल्या कवीला समाज व्यवस्थेतील विषमतेला नेस्तनाबूत करावयाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलेले कवीमन 'डॉ. आंबेडकर' कवितेत या दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित चळवळीचे ऊर्जाकेंद्र ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाज परिवर्तनशील विचारातून दलितांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त झाला परंतु आजही ही विषमता पूर्णपणे नष्ट झाल्याचे दिसत नाही. 'दार उघड बये, दार!' ही कविता स्त्रियांच्या आदिम दु:खाला अधोरेखित करते. सनातन काळापासूनचा संघर्ष दिसून येतो.समाज व्यवस्थेमध्ये, कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्रियांची अवहेलना केली, तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ दिला नाही. स्त्री आता आत्मनिर्भर होत आहे. या सकारात्मक बदलाची नोंद ही कविता घेते. 'सिद्धार्थास' ही एक मिथकीय कविता आहे. कवीने सिद्धार्थाच्या गृहत्यागाच्या प्रसंगाला काव्यात्म आशय देवून यशोधरेची वेदना अधोरेखित केली आहे. प्रज्ञा पवार यांनी यशोधरेच्या या मिथकीय व्यक्तिरेखेला नकळतपणे बाईपणाच्या आदिम दुःखाशी जोडले आहे. 'ही पुन्हा मांडामांड'ही एक अर्थपूर्ण कविता आहे. जीवनाच्या प्रगल्भ टप्प्यावर आलेली स्थितप्रज्ञता, तटस्थता, अलिप्तता या कवितेतून निर्देशित होते.

### ५.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. राजस - देखना, सुकुमार, सुंदर

२. फितूर - शत्रूला सामील झालेला

३. बुलंद - उत्तुंग, उंच, प्रभावी

४. पौरुषय - पुरुषी, मानवी

५. क्लांत - थकलेला, निस्तेज, उदास

६. उन्मत्त - उत्तेजित, उन्मादी

७. अव्हेरणे - डावलणे, वगळणे

८. निकुरा - कठोर

### ५.६ स्वयं अध्ययन प्रश्न

१. कवीने कोणाचे नाव काळजावर कोरले आहे?

अ. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ब. वडिलांचे

क. आईचे ड. भावाचे

२. ओसंडती गर्दी कोठे होती?

अ. रेल्वेस्टेशनवर ब. चैत्यभूमीवर

क. गेटवे ऑफ इंडिया ड. हायकोर्टवर

३. 'दार उघड बये, दार!' या कवितेतील अंधार पौरुषेय कसा आहे?

अ. काळाकुट्ट ब. आमावस्येचा

क. पौरुषेय ड. अपौरुषेय

४. शोकग्रस्त बायका कशा बसलेल्या आहेत?

अ. मांडी घालून ब. डोक्यात हात लावून

क. गुडघ्यावर ड. चुरडून

५. न संपणाऱ्या दु:खाचा अटळ शोध घेण्यासाठी कोण गेले?

अ. डॉ. आंबेडकर ब. सिद्धार्थ

क. यशोधरा ड. राहूल

६. कोणाच्या डोळ्यातून अपार तृष्णा निथळत होती?

अ. गौतम बुध्दांच्या ब. सिध्दार्थाच्या

क. यशोधरेच्या ड. राहुलच्या

## ५.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे

२. चैत्यभूमीवर

३. पौरुषेय

४. चुरडून

५. सिद्धार्थ

६. यशोधरेच्या

## ५.८ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'डॉ. आंबेडकर' या कवितेतील आशय स्पष्ट करा.

२. प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील आशयसूत्रे स्पष्ट करा.

३. प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील स्त्री संवेदन स्पष्ट करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'सिद्धार्थास' या कवितेतील यशोधरेची वेदना स्पष्ट करा.

२. 'ही पुन्हा मांडामांड' या कवितेतील मनोवस्था स्पष्ट करा.

३. 'दार उघड बये, दार!' या कवितेतील प्रतिमा, प्रतीकातून सूचित झालेला कवितेचा आशय स्पष्ट करा.

## ५.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. प्रभा गणोरकर, मराठीतील स्त्रियांची कविता, लोकवाङ्‌मयगृह, मुंबई, २०१५

२. वसंत पाटणकर, कविता: संकल्पना, निर्मिती, समीक्षा, आर्ष प्रकाशन, पुणे, २०२२

३. दा. गो.काळे, कवितावकाश, बीज प्रकाशन, शेगाव, २०२३

◆◆◆

घटक ४

# निवडक कविता : भाग –३.३

## विनोद कुमरे

**अनुक्रमणिका**

**६.० उदिष्ट्ये**

विनोद कुमरे यांच्या 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोष्ट...', 'माड्या', 'झेल', 'फेसबुक' या कविता अभ्यासल्यानंतर आपणास,

- कवीचे आदिवासी जीवनाविषयी असलेले भावबंध समजून येतील.
- आदिवासी जीवनानुभवातील विदारक वास्तव लक्षात येईल.
- प्रस्थापित संस्कृतीच्या भयावह आक्रमणाने झालेली आदिवासी जीवनाचे झालेले शोषण लक्षात येईल.
- कवीच्या संवेदनशीलतेला जाणवलेल्या बदलत्या आदिवासी जीवनाच्या समस्या अभ्यासता येतील.
- कवितेतील लय, प्रतीक, प्रतिमा, बोली भाषाचे सौंदर्य अभ्यासता येईल.

**६.१ प्रस्तावना**

मानवी जीवनाचा परीघ जसजसा विस्तारीत गेला तसतसे वाङ्मयीन क्षेत्रही विशाल होत गेले. परिवर्तनसन्मुख असलेल्या साहित्याने उपेक्षितांचे आत्मभान जागृत केले. या आत्मभानाचे प्रतिबिंब ठळकपणे विविध साहित्य प्रवाहात दिसून येते. या साहित्याने प्रस्थापित समाजातील माणूसपण नाकारण्याच्या विचाराला आणि माणसाला उपेक्षित ठेवणाऱ्या व्यवस्थेला नकार दिला. त्यातूनच आधुनिक मराठी साहित्यात नवनवीन वाङ्मयीन प्रवृत्ती निर्माण झाल्या. साठोत्तरी मराठी साहित्यात अनेक सशक्त वाङ्मय प्रवाह उदयास आले. दलित, आदिवासी, ग्रामीण, मुस्लिम आणि ख्रिस्ती या विविध संवेदनेतून साहित्यनिर्मिती होवू लागली. या संवेदनेने मराठी कवितेला समृद्ध केले. त्यापैकी आदिवासी साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह होय. परंपरागत निसर्गाधिष्ठित जीवनशैलीचे संस्कार स्वीकारणारे, संस्कृती संपन्न असलेल्या आदिवासी जीवन पद्धतीला बदनाम करणाऱ्या प्रवृत्तीवर प्रहार करणारे, अवरोध करणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींना नाकारून, सर्वांगीण प्रगतीकडे घेऊन जाणाऱ्या परिवर्तनवादी विचारांना अधोरेखित करणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय. आदिवासींना आलेल्या नव्या आत्मभानामुळे आदिवासी साहित्याला व्यासपीठ मिळाले. निसर्गाच्या सानिध्यात राहणारे निर्मळ मनाचे हे आदिवासी आदिम काळापासून व्यवस्थेचे बळी आहेत. रामायणपूर्व काळापासून आदिवासींना वर्णव्यवस्थेला बळी पडावे लागले आहे. आर्यपूर्व काळापासून राजसत्तेची स्वतंत्र वहिवाट असून देखील वर्णवर्चस्ववादी प्रवृत्तीने त्यांच्यावर अन्यायच

केल्याचे दिसून येते. द्रोणाचार्यांनी एकलव्यासारख्या पराक्रमी धनुर्धाराचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून मागितला. आदिवासी कवी कवयित्रींनी आपल्या जगण्यातली घुसमट कवितेत व्यक्त केल्याचे दिसून येते. आपल्या अनुभूतीतून आदिवासी जीवनाचा प्रत्ययकारी काव्याविष्कार करणारे विनोद कुमरे हे महत्त्वाचे कवी आहेत. आदिवासी जीवन जाणिवांचे प्रतिबिंब आणि परिवर्तनवादी विचारांचे दर्शन त्यांच्या कवितेतून दिसून येते.

### ६.२ कवी परिचय – विनोद कुमरे (जन्म दि.२ जुलै १९७८)

विनोद कुमरे यांचा 'आगाजा' हा कविता संग्रह २०१५ साली प्रकाशित झाला. विनोद कुमरे यांचे 'कोयतूर' (२०२०) ही(कादंबरी), 'बारकोड' (एकांकिका), कथारंग (कथासंग्रह) (२०२२) व तिचा अवकाश (कथासंग्रह) (२०२१) या पुस्तकांचे संपादन केले आहे. तसेच त्यांनी 'आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा'हा लघुशोध प्रकल्प पूर्ण केला आहे. School of Econamics Public Policy Department, University of Mumbai यांचेसोबत TRTI करिता Fram work of Tribal Culture LanguageDevelopment Policy. या करिता ते कार्यरत आहेत. विनोद कुमरे यांना 'डॉ. मोतीरावण कंगाली पुरस्कार, 'उगवाई काव्यपुरस्कार' या पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे. तसेच आदिवासी साहित्यातील काव्य लेखनासाठी व एकूणच मराठी साहित्यातील महत्वाचा कवी म्हणून भारतातील साहित्य व कला क्षेत्रात कार्य करणारे रझा फाऊंडेशन, दिल्ली याचेकडून आयोजित 'Indian Poetry biennale2017-18, साठी'Most Important Indian Poet' म्हणून त्यांना निमंत्रत व सन्मानीत करण्यात आले आहे.

### ६.३ विषय विवेचन

विनोद कुमरे यांनी आदिवासी जीवनाचे दुःख, वेदना, शोषण आणि संघर्षाचे नेमके आकलन आपल्या कवितेतून शब्दबद्ध केले आहे. प्रस्थापित व्यवस्थेच्या संदर्भात कवीच्या प्रखर विरोध आणि विद्रोहाचा प्रत्यय येतो. प्रस्थापित व्यवस्थेने आदिवासी जीवनावर अन्याय करून त्यांची पिळवणूक केली आहे. ही भावना कवीला अस्वस्थ करते. आदिवासींचे निर्मळ, भाबडे आणि प्रस्थापितांचा जुलूम कवीच्या चिंतनाचा विषय बनतो. आदिवासींना आत्मभान आले आहे, त्यांना आपल्या स्वत्वाची जाणीव झाली आहे ही भावनाही त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झालेली दिसून येते. आदिवासींचा आदिम इतिहास, आदिवासींचे भावविश्व, बोलीभाषेची प्रवाहितता, प्रतीकात्मक सूचकता, दाहक उपरोध, बंडखोरीचे आव्हान ही त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींच्या आदिम इतिहासाचे भान कवीला आहे. आदिवासींचे स्वभूमीवरील हक्काचे अस्तित्व आणि परकीय लोकांनी नैसर्गिकरित्या त्याच्या वाट्याला आलेल्या भूमीवर कब्जा करून त्यांना उपेक्षित बनवले. हे विनोद कुमरे यांच्या कवितेचे आशयसूत्र असल्याचे दिसून येते. आदिवासी लोकांविषयी प्रस्थापितांना वाटणारा दांभिक कळवळा कवी जाणून आहे. म्हणून तो आपल्या हक्काविषयी सजग असल्याची जाणीव दिसून येते.

### ६.३.१ पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट...

'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट...' या कवितेत आदिवासी, गोंडी संस्कृतीचे जनक लिंगो यांचे स्मरण कवीने केलेले दिसून येते.

अरण्या, तेव्हा घडली होती क्रांती तुझ्या समक्ष
मानवी कल्याण, संस्कृतीच्या उत्थानासाठी
आणि आता करताहेत ते छुपा वार
जल, जमीन आणि जंगलावर हक्क सांगितला म्हणून
तुझ्या कुशीत कोयापुंगार फुलताना, लिंगोच्या डोळ्यात दाटले
अश्रू
आणि अपार मानवी महाकारुण्याच्या समुद्रात त्याला गवसले
मोती
माणसाने माणसाशी कसे वागावे हे सांगताना,
तो विसरला शत्रुच्या छुप्या कारवायांचा बोध,
कपट-कारस्थानाची राजनीती,
संस्कृती संपविण्यांचे षडयंत्र,
तो बुद्धाच्या अगोदरचा आदि-बुद्धच होता

कवितेच्या 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट' या शिर्षकात लिंगोच्या जन्माची लोककथा दडली आहे. या लोकथेनुसार लिंगोचा जन्म पाहांदी वृक्षाच्या फुलामध्ये झाला आहे.  या लोककथेनुसार, खूप मुसळधार पाऊस पडत होता. सर्व नद्या आणि नाले दुथडी भरून वाहू लागले. पैनगंगा नदीही पूर्ण वाहू लागली. सर्वत्र मोठा पूर आला होता. मेघगर्जनेमुळे पृथ्वी हादरू लागली. नदीकाठी पाहांदीचे झाड फुलांनी बहरले होते. ती तेजस्वी ठिणगी त्या झाडाच्या एका फुलावर पडली. यामुळे सर्व फुले नदीत पडली आणि काही वेळाने त्याच ठिकाणी एक भोवरा दिसला. सर्व फुले त्यात पडू लागली आणि फिरू लागली. पाऊस, विजा आणि वादळाच्या गर्जना यामुळे सर्वत्र पृथ्वी हादरू लागली. बऱ्याच दिवसांनी या सर्व हालचाली शांत झाल्या. ज्या ठिकाणी भोवरा फिरत होता ती जागा निघून गेली पण तिथे असलेला फुलांचा गुच्छ तरंगत राहिला आणि पाहांदीच्या झाडाखाली आला. त्याच फुलांवर एक सुंदर आणि तेजस्वी मूल दिसले. त्याचे संपूर्ण शरीर चांदीसारखे चमकत होते. म्हणूनच त्याचे नाव 'रुपोलंग' ठेवण्यात आले. रूपोलंग हा शब्द गोंडी भाषेतील आहे. पाहांदीच्या झाडाच्या फुलापासून लिंगोचा जन्म झाला. म्हणूनच त्यांना 'पारी कुमार लिंगो' म्हणतात. त्या मुलाची बातमी राजा आणि राणी पुलशिव आणि हिरबा यांना देण्यात आली. तिथे त्यांनी मुलाला घेतले आणि त्याला आपला मुलगा म्हणून स्वीकारले. पुढे, हा लिंगो एक महान माणूस बनला. ज्या पाहांदी वृक्षापासून लिंगोचा जन्म झाला. त्या झाडाला 'कटसावरी' म्हणतात. गोंडी भाषेत

याला 'कटोरा' म्हणतात. गोंड आदिवासी समुदाय त्याला त्यांचे दैवी झाड, देववृक्ष मानतो. या झाडांच्या पानांपासून तीन आणि चार देव निर्माण झाले अशी लोकप्रिय श्रद्धा आहे.

त्यांने मांडली शांतीच्या साम्राज्याची आकांक्षा
अफाट मानवी कारुण्याने दाटलेली न्यायनीती...
आणि अहिंसेचे तत्त्वज्ञान
त्याला करायची होते हे अरण्यबेट निशस्त्र,
जगभर फुलवायचा होता लाल पुंगार

आदिवासींच्या गोंडी संस्कृतीचे आदिम जनक लिंगो यांना मानले जाते त्यामुळे कवी त्यांचा उल्लेख 'तो बुद्धाच्या अगोदरचा आदि-बुद्धच होता' असा करतात. जेव्हा परकीय आक्रमणाने आणि प्रस्थापितांच्या शोषणाने आपल्या कटकारस्थानाची राजनती वापरून आदिवासी संस्कृती संपवण्याचे षडयंत्र रचले तेव्हा कवीला लिंगो या आदिमानवाची, आदिबुद्धाची अर्थातच या संस्कृतीच्या जनकाचे स्मरण होते. जो मानवी कल्याण आणि संस्कृतीच्या उत्थानासाठी लढला. ज्याने शांतीचे साम्राज्य निर्माण केले. ज्याने मानवी कारुण्याची न्यायनिती प्रस्थापित केली. ज्याला अरण्यबेट निशस्त्र करून अहिंसेचे तत्त्वज्ञान सांगायचे होते.

अरण्या,
तुला आठवत असेल... त्यावेळी
लिंगोबाच्या एका शिष्याने, हिरवे पान तोडताना
तुला क्षमा मांगितली असेल...
उपकृत, नतमस्तक होऊन ओंजळ पसरली असेल...
लिंगोबाने दिलेला मंत्रही सांगितला असेल.
आणि दिली असेल निळ्या आभाळाची आशा
कारण त्याला संपवायचा होता युद्धप्रिय समाज
आणि निर्माण करायचा होता शांतीप्रिय बुद्ध
या अरण्यबेटावर बुद्ध जन्माला आला तेव्हा
त्याने विश्वासाने दिला हात... सोडला निःश्वास
त्याला वाटले असावे आता तरी या पृथ्वीवर शांतीचे राज्य
प्रस्थापित होईल ?

कविला वाटते लिंगोबाचे तत्त्वज्ञान प्राणापेक्षाही अधिक प्रिय माननाऱ्या त्याच्या शिष्याने लिंगोबाचे तत्त्वज्ञान इतके आचरणात आणले होते की झाडाचे हिरवे पान तोडतानासुद्धा झाडाची, अरण्याची क्षमा मागितली असावी. उपकृत नतमस्तक होऊन ओंजळ पसरली असेल. लिंगोबानेही निळ्या आभाळाची आशा देऊन मंत्र सांगितला

असेल. कारण त्याला युद्धप्रिय समाज संपवायचा होता. शांतीपूर्ण बुद्ध निर्माण करायचा होता. आरण्य बेटावर जेव्हा बुद्ध जन्मला आला तेव्हा आपले शांतीचे कार्य पुढे चालविणारे कुणीतरी आहे असा दिलासा त्याला वाटला असावा. नि:श्वास सोडून 'त्याला वाटले असावे आता तरी या पृथ्वीवर शांतीचे राज्य प्रस्थापित होईल?'

प्रस्तुत कवितेत लिंगोच्या लोककथेचे उपयोजन कलात्मक पद्धतीने केले आहे. गोंडी भाषेतील आणि लोकधारणेतील विविध प्रतिमा प्रतीकांचे उपयोजन करून कवीने महत्त्वपूर्ण आशय विशद केला आहे.

**६.३.२ माड्या**

'माड्या' ही कविता आदिवासी समाजाच्या शोषणावर भाष्य करते. माड्या म्हणजे माडिया आदिवासी लोक. परंपरेने पिढ्यानपिढ्या आदिवासींचे शोषण केले आहे. प्रस्तुत कवितते आदिवासींचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, शोषण याचा प्रत्यय येतो. शासकीय अधिकारी वन खात्याचे अधिकारी, कर्मचारी, पोलिस, व्यापारी इ. कडून आदिवासींवर होणारा अत्याचार, अन्याय, आदिवासी स्त्रियांचे लैंगिक शोषण हे या कवतेचे आशयसूत्र आहे.

ह्या धरतीतून उगवलेल्या कोंबासरका
त्यो ह्या दुनियात आला...
मेला म्हंजे गावाबाहीरच्या उरस्कलातला
दूरच्या डोंगरावरचा दगुड सांगून जाईन...!
मी उरस्कलाबद्दल विचारले...
तो म्हणाला, 'हे मेलेल्या माड्यांच्या नावाचे दगूड'
तो... मोठ्ठा आमच्या मुखियाचा... पुढचा लहान... पाटलाचा...
तो सरपंच्याचा आन् ह्या लहान मह्या... बापाचा...!
सबेन माडे जंगलातच मेले, त्यांचे हे दगूड...!
मग मी सरकारबद्दल विचारले
– त्याने उडत्या पाखरांकडे बोट दाखविले
खपाटी गेलेल्या पोटात दीर्घ श्वास ओढला
मी जंगलाबद्दल बोल्लो... तेव्हा झाडा-वाऱ्यासारखा शहारला
त्याने इंद्रावतीच्या गाळ्यात रुतलेल्या
पावलांच्या खुणांबाबतही सांगितले

शासकीय यंत्रणांकडून आदिवासींचा विकास होणे अपेक्षित होते परंतु या यंत्रणा आणि योजना आदिवासीपर्यंत पोहोचल्या का? हा एक गहन प्रश्न आहे. आदिवासी लोकांवर अनेक प्रकारचे अत्याचार झाले. त्यांच्या आदिवासावर धरणांचे प्रकल्प योजिले गेल्यामुळे त्यांना आपल्याच जन्मभूमीला मुकावे लागले. त्यांच्या विस्थापिताचा प्रश्न शासन यंत्रणेला सोडवता आला नसल्यामुळे त्यांच्या वाट्याला उपेक्षित व उपरे जीवन वाट्याला

आले. स्थानिक व्यापारी शासकीय अधिकारी आदिवासींच्या संपर्कात आले आणि आदिवासी स्त्रियांना लैंगिक शोषणाला बळी पडावे लागले.

फडफडत्या पापण्यांतून त्याचा श्वास क्षीण थरथरला
सायब सांगतो रातीसाठी दारू-कोंबडीसकट
पोरी-बायकांची बिदागी-मग
ह्या इंद्रावती पल्याडच्या वाऱ्यानं उधळून लावले सारे खूर
ते उन्मत्त घोडे आता लगाम शिनगारून येतात
बोलल्यासारखा-त्याने तेंदुपत्ता, बांबुकटाई सांगितली
लबाड कोल्ह्यांचे रण माजले मनला जंगलात...
काडतूस त्याले ठेवू पायते काबूत
उघड्या थानावरचा पदर वाऱ्यानं हाल्ला,
कां त्ये वकतात विख
आता जंगल वढू पायतेय चोळी
त्यानं तल्लोई पडलीय दुचित, दुखावला गेला हंकार

आदिवासींचे संरक्षण आणि विकास करण्यासाठी नेमलेले अधिकारी आदिवासींकडून दारू-कोंबडीची मेजवणी घेत असत. शिवाय त्यांना त्यांच्या बायका पोरींनाही त्यांच्याकडे पाठवावे लागे. स्त्रियांचे लैंगिक शोषण होई.

प्रस्तुत कवतेत 'वाऱ्यानं उधळून लावले सारे खूर', 'उन्मत्त घोडे', 'लबाड कोल्ह्यांचे रण' या प्रतिमा अर्थपूर्ण आहेत. दमनयंत्रणा आणि शोषणयंत्रणेच्या सूचित करणाऱ्या या प्रतिमा आहेत.

**६.३.३ झेल**

प्रस्तुत कवितेत प्रस्थापित व्यवस्थेतले स्थानिक व्यापारी, फेरीवाले, सावकार आदिवासींचे शोषण कसे करतात हे लोकगीताच्या रचनेतून कवीने सांगितले आहे. 'एक लिंबू झेलू ग बाई... दोन लिंबू झेलू' हे भोंडल्याचे सुप्रसिध्द स्त्री गीताच्या आधारे कवीने आदिवासींच्या शोषणावर भाष्य केले आहे.

एक लिंबू झेलू ग बाई... दोन लिंबू झेलू
तीन लिंबू झेलू ग बाई... चार लिंबू झेलू
एक होता कावळा काव काव करायचा
रस्त्यानं जाणाऱ्या पाण्याच्या घड्यावर तुटून पडायचा
चार पाण्याचे थेंब वरचेवर चोरायचा

प्रस्तुत गीतातील कावळ्याच्या आणि गिधाडाच्या प्रतिमेतून शोषणकर्ते निर्देशित केले आहेत. मणेरीवाला

उस्मानभाई, शामलाल, गणपतबेपारी हे प्रस्थापित व्यवस्थेतील लोक आदिवासींच्या भोळ्या स्वभावाचा फायदा घेतात. कोहळा देऊन पोवळा घ्यावा या प्रमाणे किरकोळ गोष्टी आदिवासींना विकून त्याच्या मोबदल्यात त्यांच्याकडून जंगलातल्या मौल्यवान चीज वस्तू घेतल्या जातात.याच वस्तू आदिवासींनी बाजारपेठेत विकल्या तर त्यांना अधिक मोबदला मिळाला असता. परंतु आदिवासींच्या अज्ञानाचा ते फायदा घेताना दिसून येतात.

आला आला मणेरीवाला उस्मानभाई,
गर्दी जमती बायका-पोरं
अरे ये साला... आदेवासी...
ले... ले... पावडर... इस्नु... ले... ले... कंगी
एक शेर कुटकी में... ले... ले किलिप
एक किलो जेवारी में ले... ले किरिम...
एक बाटली सयद के बदले...
ले ले रिबिन...
लाल लाल रिबिन... पिला पिली रिबिन...
उस्मानभाई सायकलनं वस्तीत फिरायचा
कॅरिअरवर बांधलेल्या कागदी खोक्याच्या बदल्यात
गोणीभर रानमेवा भरायचा

मणेरीवाला उस्मानभाई सायकलवर आदिवासी वस्तीत वस्तू विकत फिरायचा. किरकोळ, दीड दमडीच्या वस्तूसाठी आदिवासींकडून भलामोठा रानमेवा घ्यायचा. पावडर, स्नो, कंगवा, क्लिप, रंगबेरंगी रिबीणी तो विकायचा. सायकलच्या कॅरिअर बांधलेल्या कागदी खोक्याच्या बदल्यात जाताना आदिवासींकडून गोणीभर रानमेवा मिळवायचा. एक शेर कुटकी (औषधी जडीबुटी) घेऊन तो बदल्यात क्लिप द्यायचा, एक किलो ज्वारीच्या बदल्यात तो क्रिम द्यायचा. एक बाटली मधाच्या बदल्यात तो रिबीणी द्यायचा. किरकोळ रकमेच्या वस्तू भलामोठा मोबदला घेऊन तो आदिवासांना फसवायचा, त्यांचे शोषण करायचा.

शामलाल, गणपतबेपारी सुगीच्या हंगामात हसायचे
बाजाराच्या रस्त्यावर गिदाडासारखे बसायचे
रानातला रानमेवा वरचेवर झेलायचे
बाजार में क्यो तकलिफ करते हो
आम्ही आहे तय्यार
नगद पैसा नगद पैसा
बेईमानी करेगा तो बाप दुसरा

डिंक द्या, नगद पैसा
मोह द्या, नगद पैसा
जेवारी बाजरी द्या. नगद पैसा
असली मरद की दवा नगद पैसा
कापूस द्या, नगद पैसा
माल दे दो पैसा नगद ले लो
नगद ले लो ब्याज पे भी ले लो
एक लिंबू झेलू ग बाई, दोन लिंबू झेलू
तीन लिंबू झेलू ग बाई, चार लिंबू झेलू

शामलाल, गणपत हे व्यापारी सुगीच्या हंगामात आदिवासींचे शोषण करायचे. आदिवासी जंगलातील रानमेवा प्रत्यक्ष बाजारात नेत असताना ते गिधाडासारखे रस्त्यात बसायचे. त्यांच्या रानमेव्यावर डोळा ठेवत 'बाजारात जाण्याची तसदी कशाला घेता आम्ही रोख रक्कम देऊन तुमचा माल घेऊ म्हणायचे' डिंक, मोह, ज्वारी, बाजरी,औषधीय जडीबुटी, कापूस या वस्तू ते आदिवासींकडून किरकोळ रोख पैशाच्या बदल्यात घेत.

माल है हमारा हम नै देगा
बाजार मे जायेंगा किंमत मे बेचेंगा
पैसा भी मिलेगा खण्णा खण्णा
ये हरामखोर ज्यादा शानापणा नही
निकालू क्या पैजामेसे रामपुरी
घुसड डालू क्या तेरे उंगली करेगा तो मरेंगा
पडा लिखा गवार साला आदेवासी
एक लिंबू झेलू ग बाई दोन लिंबू झेलू
तीन लिंबू झेलू ग बाई चार लिंबू झेलू

आदिवासीने चतुराईने व बंडखोरीने 'माल आमचा आहे आम्ही प्रत्यक्ष बाजारात विकून पैसे मिळवू' असे म्हणत त्यांना माल देण्यास नकार दिला तर ते रामपूरी चाकूचा धाक त्यांना दाखवत शिव्या देत.

कवितेचे 'झेल' हे शीर्षक अर्थपूर्ण आहे. 'झेल' हा इथे द्विअर्थी शब्द आहे. लोकगीताच्या अर्थाने झेल म्हणजे पकडणे, झेलणे. काव्याशयाच्या अर्थाने झेल म्हणजे झेलणे, सहन करणे.

लोकगीताचा बाज असलेल्या या कवितेला लय आहे. विविध अर्थपूर्ण प्रतिमा, प्रतीकाच्या उपयोजनातून आदिवासींच्या शोषणाचे चित्र उभे केले आहे.

**६.३.४. फेसबुक**

प्रस्तुत कवितेचे आदिवासींविषयी कवीची असलेली आस्था, भूतकाळातील रम्य आठवणी, आदिवासींचे उपेक्षित जगणे, दैन्य, दारिद्र्य, कुपोषण हे आशयसूत्र आहे. 'फेसबुक' या प्रतिमेच्या आधारे कवीने आदिवासींविषयी असलेल्या आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. फेसबुक हे सोशल नेटवर्कींग आहे जिथे लोक एकमेकांशी तत्परतेने एकमेकांशी जोडले जाऊन एकमेकांशी संवादी राहतात. एकमेकांना फोटो, व्हिडीओ, इतर माहिती शेअर करतात. संपर्कात नसलेल्या लोकांशी त्वरीत संपर्क शोधता येतो.

मागे राहिलेल्या मित्रांसाठी वाटतं शोधावं

फेसबुक अरण्याच्या अंगाखांद्यावर खेळतानाच्या आठवणी

डोळ्याच्या खोबणीत क्लीक केलेले फोटो

डाऊनलोड करावे नि द्यावे कॉमेन्ट्स

अरण्यात उमटलेल्या पाऊलखुणांवर

अरण्या, तुझ्या अंगाखांद्यावर खेळताना

भुकेचे सिद्धांत मांडता मांडता

येऊन धडकलो जागतिकीकरणात

प्रश्नांचं नैमित्य आणि उत्तराच्या उपेक्षेसह

कवीला मागे राहिलेल्या मित्रांना फेसबुकवरून शोधाव वाटतं. 'फेसबुक' ही प्रतिमा उपयोजल्यामुळे नवीन दृष्टीकोनातून विचार करण्यास आणि कवितेचा आशय अधिक नेमकेपणाने व्यक्त करण्यास मदत होते. प्रस्तुत कवितेत कवीला फेसबुकवर अरण्याच्या अंगाखांद्यावर खेळतानाच्या आठवणी डोळ्याच्या खोबणीत क्लीक केलेले फोटो डाऊनलोड करावे वाटतात आणि अरण्यात उमटलेल्या पाऊलखुणांवर कॉमेन्ट्स द्याव्या वाटतात. 'भुकेचे सिद्धांत' ही संकल्पना कवीने अत्यंत मार्मिकपणे उपयोजली आहे. भूक ही मानवाची मुलभूत गरज आहे. कवी भुकेचे सिद्धांत मांडताना प्रश्नांचं नैमित्य आणि उत्तराच्या उपेक्षेसह जागतिकीकरणात येतो. जागतिकीकरणाने केवळ प्रस्थापितांचा विकास झाला आहे आणि आदिवासी मात्र जागतिकीकरणामुळे विस्थापित झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आदिवासींच्या भुकेचा सिद्धांत मांडताना उत्तराची उपेक्षा होणार आहे किंवा उत्तरेच मिळणार नाहीत याचा कवीला खेद वाटतो.

कवीला गुगलवर आठवल्या प्रश्नांची उत्तरं शोधताना चौकटीत फक्त यू ट्यूब क्लिप्स गवसल्या. चित्रातून कारुण्यावर, व्यथेवर विविध रंगसंगती रेखाटतात येतात परंतु या कारुण्याचे व्यथेचे दुःखाचे मूळ कोणी जाणून घेत नाही. याचा खेद कवीला वाटतो.

कुठल्यातरी प्रकल्पाच्या अहवालाच्या निमित्तानं

आयुष्याला अनुदान पण असतं रे

अनुदानाच्या निमित्तानं का होइना
मुख्य प्रवाहाशी जोडून घेतल्याच्या भावना जागतात
आमचे प्रश्न संपता संपत नाही
आणि तो त्याची भूमिका मांडतो ठासून
आता जागतिकीकरणात पण तुमची ओरड नुसती
लेकांनो, तुमच्यासाठी आम्ही आता एवढं केलं
तरी तुमचं समाधान होत नाही
जरा आमची वेबसाइट उघडून बघा
तुमच्या आयुष्याला कसं मांडलं चौकटीत
चौकटीवर क्लिक केलं की
तुमच्या संस्कृतीसह कुठलापण अहवाल
त्या कुपोषित पोरींचं चित्र बघितलं का?

प्रस्थापितांनी, शासनाने आदिवासींच्या विकासाचे आलेख उंचावून दर्शवले असले तरी खरे वास्तव हेच आहे की, प्रस्थापितांचा, शासनाचा विकास-योजना आदिवासींपर्यंत पोहोचल्याच नाहीत. आदिवासींच्या कुपोषणाचे चित्र पहायचे असेल तर अरण्याच्या फेसबुकची आदिवासींची बेबसाइट उघडून बघायचे आव्हान कवी करतो.

आमचे कॅमेरे नेहमी सज्ज असतात
तुमच्या प्रिमिटिव्ह ॲक्टिव्हिटीसाठी
कधीतरी आमच्याही कॅमेऱ्यानं बघा
तुमच्या कुपोषणातलं सौंदर्य
खपाटी गेलेल्या पोटांचे आकार
आम्ही केलेल्या ॲक्टिविटीला किती कमेन्ट्स मिळतात
फेसबुकवर
आम्ही नसतो तर तुम्हाला कळालीसुद्धा नसती
तुमच्या भुकेतली आग तुमच्या दारिद्र्यातली रंगसंगती

प्रस्थापितांच्या पोटभरू दुनियेतल्या डाएट करून झालेल्या जाणिवपूर्वक केलेल्या कुपोषणाला सौंदर्य समजून कमेन्ट्स मिळतात. परंतु खरे कुपोषण, भुकेची आग, दारिद्र्याची कारुण्यमय रंगसंगती पहायची असेल तर अरण्याच्या फेसबुकची आदिवासींची बेबसाइट पहायला हवी असे कवीला वाटते. कवी दाहक प्रश्न करतो की, 'आमच्या एनजीओला फुकट नाही मिळालं अवार्ड आणि कोट्यावधीची मदत पण तुम्ही सुधारता सुधारत नाही कसे आपसूक नि तुम्ही सुधारलेत तर मग आमच्या एनजीओचं काय ?'

मला कुठलाच मित्र कसा भेटत नाही फेसबुकवर

का अरण्यातल्या पाखरांसारखे तेही झालेत आऊट ऑफ रेंज

की कोंडले गेलेत आर्ट गॅलरीत

की अरण्याच्या वणव्यात होरपळून संपले सारे

उपरोक्त काव्यओळीतून आदिवासी पर्यावरणाच्या ऱ्हासाची कैफियत कवीने मांडली आहे. जागतिकीकरणातल्या औद्योगिकीकरणामुळे अरण्यातले पाखरे नाहीशी होत आहेत. 'पाखरांचे आउट ऑफ् रेंज' होणे ही प्रतिमा आदिवासींच्या पर्यावरणीय ऱ्हासाची नोंद करते. 'की कोंडले गेलेत आर्ट गॅलरीत' ही प्रतिमा प्रस्थापितांची दमनयंत्रणा आणि दांभिकतेचे सूचन करते. प्रस्थापितांना जिवंत पाखरांचे संरक्षण करण्याऐवजी चित्रातील पाखरे आर्ट गॅलरीत लटकवणे ही कला वाटते.

कवीला वाटते 'आता आयुष्यातल्या कुठल्याही क्षणांना क्लिक आणि डाऊनलोड करता येतं पण अरण्या, तुझ्या गर्भातल्या वेदनेला आणि तू आरंभलेल्या मूकपणाला कुठलीही निगेटिव्ह बंदिस्त करू शकणार नाही. हजारो वर्षांपासून अरण्यकांड घडत आलेलं आहे. आदिम भूमीवर, लोकांवर प्रस्थापितांनी आक्रमण केल्याचा सनातन इतिहास रक्तरंजीत आहे.माणसानं माणसाच्या संस्कृतीसाठी क्रूरपणे आरंभलेली रक्तक्रांती कवीला अस्वस्थ करते. प्रस्थापितांनी केलेल्या या अन्यायाला आणि शोषणाला 'महाकाव्या'ची गोंडस नावे दिली. 'अरण्यबेट' लुटलं जाणं हे एक वैश्विक दु:ख आहे.

अमेरिका काय भारत काय आफ्रिका काय?

अरण्यबेट लुटलं जातंय तेव्हाही नि आत्ताही

माणसाची संस्कृती अरण्यात जन्मली

अरण्यात वाढली अरण्यानं जपली जीवापाड

आपल्या पानापानात नि ढिगाऱ्यात

अरण्य साक्षी

माझ्या उजाड संस्कृतीच्या कारुण्याला

मूल निवासी असलेल्या आदिवासींवर आर्यांनी आक्रमणे केली. अमेरीकेने मूल निवासी असलेल्या रेडइंडियन लोकांवर आक्रमण केले. आणि आपल्या वसाहती निर्माण केल्या. भारतीय आदिवासी असो वा रेड इंडियन असो त्यांची 'अरण्यबेटं' लुटून त्यांची संस्कृती उजाड करून त्यांना विस्थापित केले गेले. हे एक वैश्विक व सनातन सत्य आहे. त्यामुळे या जाणिवेने अस्वस्थ झालेल्या कवीला त्याच्या उद्ध्वस्त अरण्य-संस्कृतीची वेबसाइट क्रिएट करून फेसबुक पंचायत करावी वाटते.

प्रस्तुक कवितेत प्रस्थापितांचे 'फेसबुक' ही प्रतिमा वापरून कवीने अत्यंत टोकदारपणे आदिवासींच्या जीवनातील अंतर्विरोध दर्शविला आहे. अंगभूत भाषिक लय, गोंडी भाषेतील शब्दकळा, आशयाच्या गरजेनुसार उपयोजलेली इंग्रजी भाषेतील शब्द, अर्थपूर्ण प्रतीक, प्रतिमांचे उपयोजन, आव्हात्मकता ही या कवितेची वैशिष्ट्ये

आहेत. आदिवासींची कैफियत मांडणारी ही अत्यंत अर्थपूर्ण कविता आहे.

### ६.४ सारांश

विनोद कुमरे यांनी आदिवासींच्या विस्थापित जगण्याची, उपेक्षिततेची, दाहक वास्तवाची, उपेक्षिततेची कैफियत कवितातून मांडली आहे. आदिवासी हे या कवितेचे आस्था केंद्र आहे. विनोद कुमरे यांनी 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट...' कवितेत लिंगोच्या लोककथेचे उपयोजन करून आदिवासींच्या आदिम जगण्याचा अन्वयार्थ लावला आहे. आदिवासी आणि निसर्ग यांच्या सनातन नात्याचा शोध ही कविता घेते. गोंडी भाषेतील आणि लोकधारणेतील विविध प्रतिमा प्रतीकांचे उपयोजन कलात्मक पद्धतीने कवीने महत्त्वपूर्ण आशय विशद केला आहे. 'माड्या' ही कविता अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या आदिवासी स्त्रियांच्या लैंगिक शोषणावर भाष्य करते. 'झेल' या कवितेत प्रस्थापित व्यवस्थेतले स्थानिक व्यापारी, फेरीवाले, सावकार आदिवासींचे शोषण कसे करतात हे लोकगीताच्या रचनेतून निर्देशित केले आहे. 'एक लिंबू झेलू ग बाई... दोन लिंबू झेलू' हे भोंडल्याचे सुप्रसिद्ध स्त्री गीताच्या आधारे कवीने आदिवासींच्या शोषणावर भाष्य केले आहे. लोकगीताचा बाज असलेल्या या कवितेला लय आहे. 'फेसबुक' या कवितेचे आदिवासींविषयी कवीची असलेली आस्था, भूतकाळातील रम्य आठवणी, आदिवासींचे उपेक्षित जगणे, दैन्य, दारिद्र्य, कुपोषण हे आशयसूत्र आहे. विनोद कुमरे यांनी प्रस्तुत कवितांतून आदिवासी समाजाच्या शोषणावर भाष्य केले आहे. परंपरेने पिढ्यानपिढ्या आदिवासींचे शोषण केले आहे. प्रस्तुत कवितांतून आदिवासींचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, शोषण याचा प्रत्यय येतो. विविध अर्थपूर्ण प्रतिमा, प्रतीकाच्या उपयोजनातून आदिवासींच्या शोषणाचे चित्र उभे केले आहे. दमनयंत्रणा आणि शोषणयंत्रणेच्या सूचित करणाऱ्या या प्रतिमा आहेत. 'फेसबुक' या कवितेतून कवीने अत्यंत टोकदारपणे आदिवासींच्या जीवनातील अंतर्विरोध दर्शविला आहे. लोककथेतील संदर्भ, लोकगीतांचा वापर, अंगभूत भाषिक लय, गोंडी भाषेतील शब्दकळा, आशयाच्या गरजेनुसार उपयोजलेली इंग्रजी भाषेतील शब्द, अर्थपूर्ण प्रतीक, प्रतिमांचे उपयोजन, आव्हानात्मकता हे या कवितांचे भाषिक सौंदर्य आहे. आदिवासींची कैफियत मांडणारी या अत्यंत अर्थपूर्ण कविता आहेत.

### ६.५ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. पारी – व्यवस्था, रीति, नीति

२. लिंगो – ज्ञानी, ज्ञानवान, सर्वोच्च, निराकार, शून्य

३. पारी कुपार लिंगो – ज्ञानी माणूस

४. उरस्कल – मृत्यखांब, मृतदेह जमीनीत पुरल्यानंतर त्या जागेवर विधीवत एक दगड रोवला जातो

५. बिदागी – पाठवणी, पाठवणूक, घरी आलेल्या पाहुण्यांना बोळवण करताना दिली जाणारी रक्कम

६. शिनगार – शृंगार, अलंकार, सजावट

७. तह्लोई – हेतुपुरस्सर, जाणीवपूर्वक, उद्देशाने केलेले

८. दुचित – दु:खी, उदास, अश्रीत, खिन्न

९. माड्या – माडिया या आदिवासी संस्कृतीशी संबंधित लोक

१०. झेल – पकडणे, झेलने, सहन करणे

**६.६ स्वयं अध्ययन प्रश्न**

**अ. बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न**

**योग्य पर्याय निवडा.**

१. 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोष्ट' या कवितेत लिंगोने कोणते तत्त्वज्ञान सांगितले आहे?

अ. हिंसेचे | ब. अहिंसेचे
क. भुकेचे | ड. आदिवासीचे

२. 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोष्ट' या कवितेत लिंगोला कोणता समाज संपवायचा आहे?

अ. युद्धप्रिय | ब. शांतीप्रिय
क. प्रस्थापित | ड. आदिवासी

३. 'माड्या' ही कविता कशावर भाष्य करते?

अ. लिंगोच्या तत्त्वज्ञानावर
ब. आदिवासी समाजाच्या शोषणावर
क. आदिवासी कवितेवर
ड. जीवनाच्या तत्त्वज्ञानावर

४. 'झेल' या कवितेत शोषणकर्ते निर्देशित करण्यासाठी कोणत्या पक्षांच्या प्रतिमा वापरल्या आहेत?

अ. चिमणी व मोर | ब. टिटवी व तरस
क. पोपट व कबुतर | ड. कावळा व गिधाड

५. फेसबुकवर कुणाच्या खांद्यावर खेळतानाच्या आठवणी डाऊनलोड करायाच्या आहेत?

अ. अरण्याच्या | ब. वडाच्या
क. आजोबांच्या | ड. वडिलांच्या

६. अरण्यात कोण आऊट ऑफ रेज झाले आहे असे कवीला वाटते?

अ. झाडे ब. पाऊस

क. आदिवासी ड. पाखरे

## ६.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. अहिंसेचे

२. युद्धप्रिय

३. आदिवासी समाजाच्या शोषणावर

४. कावळा व गिधाड

५. अरण्याच्या

६. पाखरे

## ६.८ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोष्ट' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

२. 'माड्या' या कवितेचा आशय सांगून या कवितेतील प्रतिमांचे उपयोजन विशद करा.

३. कवितेच्या घटका आधारे विनोद कुमरे यांच्या प्रस्तुत कवितांचे विश्लेषण करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. विनोद कुमरे यांच्या कवितेत आदिवासी शोषणाचा प्रश्न कशा प्रकारे मांडला आहे?

२. विनोद कुमरे यांच्या 'झेल' या कवितेतील आदिवासी शोषणाचे चित्र स्पष्ट करा.

३. 'फेसबुक' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

## ६.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. काळे अक्षयकुमार, अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९

२. वसंत पाटणकर , कवितेचा शोध, मौज प्रकाशन, मुंबई, २०११

३. म.सु. पाटील, कवितेचा रूपशोध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९९

◆◆◆

# घटक : १

# कादंबरी: एक वाङ्मयप्रकार

## १.१ उद्दिष्टे

**या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हाला;**

१. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची संकल्पना लक्षात येईल.

२. मराठी कादंबरीचे स्वरूप, परंपरा, प्रवृत्ती, प्रवाह यांचा परिचय होईल.

३. कादंबरीची संरचना कोणकोणत्या घटकातून आकाराला येते, याचा परिचय होईल.

४. कादंबरीचे प्रकार लक्षात येतील.

५. मराठी कादंबरीची वाटचाल लक्षात येईल.

## १.२ प्रास्ताविक

कादंबरी हा वाङ्मयप्रकार एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर मराठीमध्ये उदयास आला. अल्पावधीतच या वाङ्मयप्रकाराने आपले आवाहकत्व सिद्ध केले. आरंभी सामाजिक, रंजनात्मक, ऐतिहासिक प्रवाह–प्रवृत्तींनी कादंबरी वाटचालीच्या दिशांचे सूचन केले. स्वातंत्र्यपूर्वकाळात तिचे स्वरूप हे काही अपवाद वगळता रंजनप्रधान, तंत्रप्रधान राहिले. भालचंद्र नेमाडे यांच्या कोसला कादंबरीने रूपबंधाच्या पातळीवर नवीनतेच प्रत्यय घडवला. पुढे त्यांच्या वास्तववाद, नैतिकता, देशीवादी विचाराचा प्रभाव मराठी कादंबरीवर राहिला. तत्कालीन काळातील समाज–सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतरांचा प्रभावही तिच्यावर राहिला. काळानुरूप आशयाबरोबर कादंबरीच्या रूपामध्येही मूलभूत स्वरूपाचे बदल झाले. कादंबरीची संरचना अधिक खुली आणि प्रसरणशील झाली. ही कादंबरीची संरचना ज्या घटकांमधून आकारित होते त्याचा संक्षेपाने विचार प्रस्तुत प्रकरणात करायचा आहे. एक वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीचे वेगळेपण कशात आहे, याचा हा शोध आहे.

## १.३ विषय विवेचन

मराठी साहित्यपंपरेत मौखिक वाङ्मयाला महत्त्व आहे. कथा हा वाङ्मयप्रकार प्रस्तुत वाङ्मयधारेचा प्रमुख स्रोत होता. कालांतराने ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले. शिक्षण आणि छपाई कला ही महत्त्वपूर्ण तंत्रे

भारतात विकसित झाली. या स्थित्यंतरामुळे देशातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडून आले. एक नवशिक्षित पिढी उदयास आली. त्यामुळे विविध क्षेत्रामध्ये परिवर्तन घडू लागले. याला वाङ्मयक्षेत्रही अपवाद नव्हते.

इंग्रजांच्या आगमनानंतर भारतीय भाषांमधील लिखित वाङ्मय परंपरा अभ्यासली असता, प्रांरभीचे साहित्य भाषांतरित स्वरूपाचे निदर्शनास येते. किंबहुना भारतीय वाङ्मयावर पाश्चात्त्य वाङ्मयाचा विशेष प्रभाव होता. मराठी साहित्याच्या जडणघडणीच्या या प्रक्रियेत, काही जुने वाङ्मयप्रकार नव्याने विकसित झाले, तर काही नवे वाङ्मयप्रकार निर्माण झाले. त्यापैकीच 'कादंबरी' हा एक वाङ्मयप्रकार होय. कादंबरीच्या निर्मितीसंबंधीही अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आहेत. कादंबरी म्हणजे महाकाव्याचा आधुनिक अवतार अशी भूमिका काही अभ्यासकांची आहे. त्यांच्या मते, दोन्ही वाङ्मयप्रकारात काही समान घटक आहेत. तर काही अभ्यासकांच्या मते युरोपमधील साम्राज्यवाद व वसाहतवाद या तत्कालीन समाजातील महत्त्वपूर्ण बदल कादंबरीनिर्मितीस पूरक ठरले.

## १.४ कादंबरी : संकल्पना व स्वरूप

कादंबरी हा महत्त्वाचा कथात्म वाङ्मयप्रकार आहे. कादंबरी म्हणजे काय? कोणत्या स्वरूपाच्या लेखनाला कादंबरी म्हणायचे, यासंदर्भात काहीएक विचार झालेला आहे. कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी समीक्षकांनी केला आहे. समग्र मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे तसे कठीण आहे. याबाबत श्री. मा. कुलकर्णी म्हणतात की, 'कादंबरी हा अनिर्बंध व शिथिल असा प्रकार असल्यामुळे अमुक एक लिखाण कांदबरी आहे की नाही हे ठरविणे कठीण जाते. कादंबरीची निश्चित शब्दांत व्याख्या करणे यामुळेच अवघड आहे.' तरीही काही आभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आढावा घेवून कादंबीच्या स्वरूपाविषयी काहीएक चर्चा करता येईल.

### बापट-गोडबोले

'सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्‌वलम्बित जीवित घटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य-वाङ्मय विभाग.' (बापट-गोडबोले, १९३८ पृ.३७).

### भालचंद्र नेमाडे

'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग-अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्यकृती असते.' (भालचंद्र नेमाडे, १९९० पृ. १९८).

**उषा हस्तक**

'कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. तिला किमान लांबी तरी हवीच, त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची किमान आणि कमाल मर्यादा सूचित करण्यासाठी शब्दसंख्येचा आधार घेण्यात आला आहे.'

'घटना, व्यक्ती, वातावरण इत्यादी घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय व्यामिश्र रूपांचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी सामान्यतः स्थलकालाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.' (उषा हस्तक, १९९३, पृ. २१).

वरील कादंबरीच्या व्याख्यांवरून कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट होते. कादंबरीची वैशिष्ट्ये इतर वाङ्मयप्रकारामध्ये ही आढळतात. कांदबरीच्या जन्माआधी अस्तित्वात असणाऱ्या कथात्म वाङ्मयामध्ये महाकाव्ये, खंडकाव्ये, पुराणकथा, दंतकथा, लोककथा, नीतिकथा, प्रवासकथा, साहसकथा, अद्भुतकथा इत्यादींचा समावेश आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार कथात्म वाङ्मयामध्ये मोडणारा असल्यामुळे कथात्म वाङ्मयाच्या परंपरेशी असलेले त्याचे नाते पूर्णपणे तुटलेले नाही. अनेक शतकांची परंपरा असलेल्या कथात्म वाङ्मयाकडून कादंबरीने जे स्वीकारले आहे आणि नव्या जाणिवांपोटी जे नव्याने निर्माण केलेले आहे, त्यातून तिचे रूप-स्वरूप घडत गेलेले आहे.

## १.५ कादंबरीचे घटक

कादंबरी हा बहृद असा वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीची संरचना ही अधिक लवचिक असते. ती कथानक, पात्र, निवेदन, भाषा यातून आकारास येते. या घटकांचा विचार कादंबरी समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

### १.४.१. कथानक

कादंबरीच्या कथानकाचा पैस विस्तृत असतो. अनेक पात्रांचा जीवनानुभव त्यात सामावलेला असतो. घटना, प्रसंग, पात्रे, निवेदनपद्धती या घटकांचा समावेश कथानकामध्ये येत असतो. त्यांच्या परस्परसंबंधातूनच विविध क्रिया-प्रतिक्रिया घडत कथानक पुढे सरकत असते. कथानकाचा सर्वांत लहान घटक म्हणजे घटना. या घटना नैसर्गिक व मानसिक स्वरूपाच्या असतात. त्या घटना कादंबरीतील पात्रांकडून विशिष्ट प्रसंगी, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट वेळी घडत असतात. कादंबरीतील घटना लेखक, निवेदक, इतर पात्रे यांच्या जीवनविषयक दृष्टीमधून साकार होत असतात. कादंबरीतून या तिघांचे हेतू स्पष्ट होत असल्यामुळे ती प्रत्यक्षातील घटना न राहता, तयार केल्यासारखी वाटते. कथानकाची व्याप्ती कादंबरीच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत असते. त्यामुळे कथानक थोडक्यात सांगणे अवघड जाते. केवळ घटना सांगता येतात. घटनांची अनुक्रमाने साखळी जोडत गोष्ट सांगता येते. कथानक हे प्रवाही ठेवावे लागते. एका घटनेतून दुसरी घटना अशी घटनांची साखळीबद्ध रचना असावी लागते. आशयाला अनुसरुन भाषा वापरत लहान-लहान

वाक्यांच्या आधारे निवेदनाला गती प्राप्त करून घ्यावी लागते. थोडक्यात कथानक ही व्यापक गोष्ट आहे. म्हणून कथानकात कादंबरीतील पात्रे, निवेदनपद्धती, वातावरण निर्मिती भाषा या सर्वंच घटकांचा समावेश होतो.

### १.४.२. पात्रचित्रण

कादंबरीच्या आकृतिबंधातील महत्त्वपूर्ण घटक म्हणजे 'पात्ररचना' होय. हा घटक कथानकाला गतिमान करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. व्यक्तीच्या विविध कृती उक्तीतून समाज व संस्कृतीचे दर्शन घडत असते. मुळातच कादंबरी हा वाङ्मयप्रकार मानवी जीवनातील परस्परसंबंध व समन्वयाचे पारदर्शी चित्रण करत असतो. कादंबरीतील पात्रे या भूमिकेतून विभागलेली असतात. ही पात्रे प्रमुख व गौण या दोन प्रकारात वर्गीकृत केलेली असतात. यासंदर्भात समीक्षक कुसुमावती देशपांडे म्हणतात की, ''कादंबरीमध्ये जीवनाचे चित्रण मानवी पात्रांच्या माध्यमातून केले जाते. म्हणून पात्र हे कादंबरीचे माध्यम आहे.'' या विवेचनावरून पात्र म्हणजे प्रत्येक व्यक्तीची व्यक्तिगत वैशिष्ट्ये असतात. यामध्ये त्याच्या रूपाची, स्वभावाची, वर्तनाची वेगवेगळी वैशिष्ट्ये येतात. ही व्यक्तिगत वैशिष्ट्ये शब्दबद्ध करणे म्हणजेच पात्रचित्रण. कादंबरीत, पात्रे, नायक, खलनायक, नायिका अशा वेगवेगळ्या भूमिकेतून वावरत असतात.

कादंबरीतील कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्र करीत असते. एखाद्या कादंबरीमध्ये किती पात्रे असावीत याला कोणतेही बंधन नाही. मुळातच कादंबरी हा साहित्यप्रकार समाजजीवनाबरोबर वाढत जाणारा असल्यामुळे समाजजीवन, संस्कृती व्यवहार, माणसामाणसांमधील संबंध, मानवी भाव-भावना यांच्या केंद्रस्थानी 'माणूसच' असतो. कादंबरीकार या पात्रांच्या इच्छा, आकांक्षा, क्रिया-प्रतिक्रिया यांचे दर्शन घडवून ते खरेखुरे वाटावे, असे चित्रण करत असतो.

### १.४.३. निवेदन

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. कादंबरी ही निवेदनातून आकारास येते. प्रभावी निवेदनातून कादंबरीची वाचनीयता वाढत असते. कादंबरीला आकार देण्यासाठी घटना, प्रसंग, अनुभवांचे विविध तपशील पुरविण्यासाठी कांदबरीकार 'निवेदना'चा उपयोग करत असतो.

कादंबरीचे निवेदन करण्यासाठी कधी प्रथमपुरुषी (मी, आम्ही) निवेदक असतो. कधी तृतीयपुरुषी (तो, ती, ते/ते, त्या, ती) निवेदक असतो. निवेदन हे सर्व घटना प्रसंगांना धरून येत असल्यामुळे त्यात वर्णनात्मकताही असते. पात्रापात्रांमध्ये संभाषण असते, संवाद असतात. तर कधी एकाच पात्राच्या मनातील स्वभाषण असते. घटनाप्रसंगावरची भाष्येही असतात. निवेदनाची अनेक माध्यमे आहेत. प्रथमपुरूषी निवेदक प्रमुख पात्राच्याद्वारे निवेदन करतो. तृतीयपुरुषी निवेदक हा बाहेरून निवेदन करत असतो. पत्रे-दैनंदिनी यांच्याद्वारेही निवेदन केले जाते. तृतीयपुरुषी निवेदक हा एकप्रकारे सर्वसाक्षी असतो. सर्व घटनाप्रसंगांच्या वेळी तो स्वतः उपस्थित असतो. पात्रांच्या मनातील हालचालीही त्याला कळत असतात. प्रथमपुरूषी निवेदनामध्ये मात्र निवेदकाच्या चिंतनाला, त्याच्या अंतर्मुखतेला अधिक वाव असतो. निवेदनाप्रमाणेच

निवेदनाचा स्वर अतिशय महत्त्वाचा असतो. निवेदक कधी तटस्थ असतो, तर कधी आपल्या पात्राविषयी सहानुभूती प्रकट करीत असतो. तर कधी त्याचा स्वर उपहासाचा असू शकतो. कादंबरीचे निवेदन प्रवाही असते. कादंबरीमध्ये काही ठिकाणी कथन तर काही ठिकाणी वर्णन असते. कादंबरी नाटकासारखी समोर दिसत नसते. म्हणून ती निवेदन करावी लागते. कादंबरीच्या इतर घटकांच्या तुलनेत महत्त्वाचा व आधारभूत घटक म्हणजे निवेदन किंवा कथन होय.

### १.४.६. भाषा

भाषा हे मानवी भावभावनांच्या अभिव्यक्तीचे प्रमुख माध्यम आहे. साहित्यातून साकारणारी भाषा ही संहितानिष्ठ असते. परंतु त्या भाषेला स्थलकाल परिस्थितीचे व्यापक संदर्भ प्राप्त होत असतात. विस्तृत कालावकाश त्यातून साकार होत असतो. भाषेच्या दृष्टिकोणातून कादंबरीचा अभ्यास केला असता, त्यावर बोलीभाषेच्या उपयोजनाचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात दिसून येते. ज्या संस्कृतीचा आविष्कार आपल्याला साहित्यातून आविष्कृत करायचा असतो, तो बोलीभाषेच्या वापरामुळे जिवंत होतो. किंबहुना भाषा हे मानवी समाजजीवनातील संदेशवहनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. साहित्याच्या पातळीवरील भाषेचा विचार करता अनेक भाषिक प्रयोग साहित्यिक करत असतात. कारण बोलीभाषेत भावात्मकता, उत्कटता, सत्यता, साधेपणा तीव्रतेने येतो आणि तोच जीवनाचे पारदर्शी चित्रण करण्यास उपयुक्त ठरत असतो.

कादंबरीमध्ये दीर्घ कालावकाश असतो. त्यामुळे कादंबरी घडणीची जी पक्रिया असते त्या प्रक्रियेत परिसराला खूप महत्त्व असते. कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा ज्या परिसरात राहते किंवा ज्या परिसरात ती वावरते त्या सबंध परिसराचे व्यापक चित्रण कादंबरीत स्वाभाविकपणे येत असते; परंतु हा सभोवताल जिवंत करण्याचे सामर्थ्य सर्वस्वी भाषेवर अवलंबून असते.

### १.५. कादंबरीचे प्रकार

कादंबरी ही इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत अधिक लवचिक असते. कादंबरीचे संकल्पना व स्वरूप, कादंबरीचे घटक पाहिल्यानंतर आपण कादंबरीचे प्रकार पाहणार आहोत. कादंबरीचे सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, संज्ञाप्रवाही, ग्रामीण, दलित कादंबरी प्रकार करता येतात. अर्थात त्यामध्ये एक सूत्रबद्धता राहावी आणि अभ्यासाची सोय व्हावी, हा हेतू असतो.

### १.५.१. सामाजिक कादंबरी

कादंबरी ह्या साहित्यप्रकाराचा उदय, समाजव्यवस्थेचा व्यक्तींवर, व्यक्तींच्या वर्तनावर काय परिणाम होत असतो, या विचारांमधून झालेला आहे.१८५६ साली विधवा विवाह कायदा पास झाला आणि १८५७ साली बाबा पद्मनजी यांनी 'यमुनापर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी लिहिली. महाराष्ट्रातील विधवांच्या तत्कालीन स्थितीचे वर्णन या कादंबरीमध्ये आहे. त्यानंतर म. वि. रहाळकर यांनी 'नारायणराव व गोदावरी' (१८७९) ही कादंबरी. ह. ना. आपटे, नाथमाधव इत्यादींनी सामाजिक समस्या मांडणाऱ्या कादंबऱ्या

लिहिल्या. १९२० नंतर पु. य. देशपांडे, भा. वि. वरेरकर, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर या लेखकांनी सामाजिक कादंबरी लिहिली

१९५० नंतर सामाजिक कादंबरीचे स्वरूप बदलले. विभावरी शिरूरकर यांनी 'बळी' (१९५०) ही सामाजिक कादंबरी वेगळ्यावळणाची आहे. जयवंत जळवी यांची 'चक्र' (१९६३) ही या काळातील महत्त्वपूर्ण कांदबरी आहे. याकादंबरीमध्ये दळवी यांनी सामूहिक जीवनातील वासना, विकृतीचेसरळ, थेटचित्रण केले आहे. त्याचबरोबर मधु मंगेश कर्णिक यांनी 'माहिमची खाडी' (१९६९) या कादंबरीतून जुगार, भांडणे, मारामाऱ्याचे, विकृती तसेच भूक चित्रण केले आहे. मनोहर शहाणे यांच्या 'धाकटे आकश' (१९६३), 'झाकोळ' (१९६५), 'देवाचा शब्द' (१९६८) या तीन कादंबऱ्यातून मध्यमवर्गीय जीवनचे दर्शन घडते. चंद्रकांत खोत यांची 'उभायान्वयी अव्यच' (१९७०) ही कांदबरी लैंगिकतेचे, समलिंगी संबंधाचे थेट चित्रण करते. किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' (१९७४) ही महत्त्वाची कादंबरी आहे. ह. मो. मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' (१९७२) नोकरीसाठी वणवण भटकणाऱ्या बेकार व हताश तरुणांची करुण कहाणी आहे. जेलर ग्लाड आणि वीरभूषण पटनाईक नावाचा नक्षलवादी तरुण यांच्यातल्या संघर्षाची कहाणी सांगणारी अनिल वर्बे यांची 'थँक्यू मिस्टर ग्लाड' (१९७५) ही महत्त्वपूर्ण सामाजिक कादंबरी आहे.पुढच्या टप्प्यावर दीनानाथ मनोहर, राजन गवस, कविता महाजन, यांनी सामाजिक समस्या केंद्रवर्ती ठेवत कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

**१.५.२.ऐतिहासिक कादंबरी**

मराठी कादंबरीच्या आरंभापासून ऐतिहासिक कादंबरी लेखन विपुल प्रमाणात झाले आहे. या कादंबरीलेखनातून शिवकाळ आणि पेशवेकाळ विस्ताराने साकारला आहे.ऐतिहासिक कादंबरी ही इतिहासाच्या आधारे लिहिलेली असते. इतिहासकालीन जुनी कागदपत्रे, ग्रंथ यांचा आधार घेऊन पात्रे, स्थळकाळ घटनांची उभारणी केली जाते.१८७१ साली रा. भि. गुंजीकर यांनी लिहिलेली 'मोचनगड'ही पहिली ऐतिहासिक कादंबरी होय. त्यानंतर चिंतामन मोरेश्वर आपटे यांची 'पुतळाबाई' (१८८९) ही कादंबरी उल्लेखनीय ठरली. नाथमाधव यांच्या 'वीरधवल' (१९१३), 'स्वराज्यातील संकट' (१९२३), 'स्वराज्याचा कारभार' (१९३२)या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कादंबऱ्या होतं. याच काळात हरी भाऊ आपटे यांनी सामाजिक कादंबऱ्याबरोबर ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. 'उषः काल' (१८९५), 'गड आला पण सिंह गेला' (१९०३), 'चंद्रगुप्त व चाणक्य' (१९०२), 'वज्राघात' (१९१३) या त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या विशेष लोकप्रिय ठरल्या. ऐतिहासिक कादंबरीला खऱ्या अर्थाने प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम केले.

स्वातंत्र्योत्तर काळात ऐतिहासिक कादंबरीने नवे वळण घेतले. या काळात रणजित देसाई, ना. स. इमानदार, गो. नी. दांडेकर, स. रा. देसाई, शिवाजी सावंत या लेखकांनी ऐतिहासिक कादंबरी लेखन केले. रमा-माधवाच्या भावजीवनाची उदात्त कहाणी सांगणारी 'स्वामी' (१९५९) ही कादंबरी रणजित देसाई यांनी लिहिली. रमा-माधवच्या खाजगी जीवनाचे नाजूक, हळवे आणि सुंदर भावबंध त्यातून साकारले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' (१९६८) ही बह्हद अशी कादंबरी लिहिली.

'पावनखिंड' (१९८१) या कादंबरीतून इतिहासातील एका महत्त्वाच्या रणसंग्रामाचा धांडोळा घेतला. या काळात गो. नी. दांडेकर यांनी 'कादंबरीमय शिवकाल' या मालिकेमध्ये 'बया दार उघड', 'हर हर महादेव', 'दर्या भवानी', 'झुंजार माची' आणि 'ही तर श्रींची इच्छा' अशा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. समाज, घनदाट निसर्ग, तत्कालीन श्रद्धा, लोकाचार, औषधे, तत्कालीन किल्ले, वनस्पती, रीतिरिवाज या साऱ्यांचे महत्त्वाची वर्णने त्यांच्या कादंबऱ्यात आहेत. ना. स. इनामदार यांनी त्रिंबकजी डेंगळेच्या जीवनाचे दर्शन घडविणारी 'झेप', यशवंतराव होळकरच्या झुंजीचे दर्शन घडविणारी 'झुंज' (१९६६), पहिला बाजीराव आणि मस्तानी यांच्या प्रेमाची कथा सांगणारी 'राऊ' (१९७२) औरंगजेबाच्या जीवनावर आधारीत 'शहेनशहा' या महत्त्वपूर्ण कादंबऱ्यांचे लेखन केले.शिवाजी सावंत यांची छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील 'छावा' (१९७९) ही कादंबरी लोकप्रिय ठरली. विश्वास पाटील यांची 'पानिपत' (१९८८) ही कादंबरी पानिपतच्या युद्धाचा समग्र अवकाश कवेत घेते. १९९० नंतर त्र्यं. वि. सरदेशमुख, नंदा खरे, दीनानाथ मनोहर, विलास सारंग यांनी ऐतिहासिक कादंबरी लेखन केले. नंदा खरे यांची 'अंताजीची बखर' (१९९०) ह्या कादंबरीमध्ये नागपूरकर भोसले घराण्याचा इतिहास रेखाटला आहे. दीनानाथ मनोहर यांची 'मन्वंतर' (१९९९) ही कादंबरी इंग्रजी राजवट, वसाहतींच्या काळातील नर्मदा शंकर आणि समकालीन काळातील गौतम यांच्या सामाजिक-राजकीय लढ्याचे चित्रण करते. संजय सोनवणे यांची 'आणि पानिपत' (२०१०) या कादंबऱ्यामधून ऐतिहासिक कादंबरी लेखनाचे नवे प्रयोग साकारले. एकूणच इतिहासाचे नवे भान देण्याचे काम हे लेखक करतात. आजवर तयार इतिहासविषयक झालेली दृष्टी बदलवतात. दडपलेला इतिहास उजागर करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे या काळातील ऐतिहासिक कादंबरी ही महत्त्वाची उपलब्धी आहे.

### १.५.३. पौराणिक कादंबरी

पौराणिक कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीचाच एक उपविभाग मानले तरी तिचे स्वरूप ऐतिहासिक कादंबरीपेक्षा वेगळे असते. ऐतिहासिक कादंबरीत येणाऱ्या काळाच्या मानाने पौराणिक कादंबऱ्यांमध्ये येणारा काळ फार मागचा असतो. निश्चित घटना, पत्रव्यवहार, पुरावे यांना पोराणिक विषयांतून येणारा अनुभव बांधलेला नसल्यामुळे लेखकाला एका अर्थाने खूपशी मोकळीक मिळत असते. पण ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच पौराणिक व्यक्तिमत्त्वासंबंधी समाज मनात रागलोभ, अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया निर्माण झालेल्या असतात. ''एक प्रकारची रंजकता जरी या लेखनाला लाभली तरी मुळापासून हादरून टाकण्याचे, चिंतन आणि विचारप्रवृत्त करणारे वर्तमान भान अधिक प्रगल्भ आणि डोळस करणारे अस्तित्ववाचक भान आणि सामर्थ्य त्यात येऊ शकले नाही. जिथे विचारांपेक्षा भावनेला, शोधापेक्षा रंजकतेला आणि बदलापेक्षा आहे तेच टिकवून पाहण्याकडे कल असतो, त्या आपल्या समाजरचनेत प्राक्‌कथांकडे बघण्याचा दृष्टिकोणही परंपरेपलीकडे जाण्यापेक्षा परंपरेच्या उदात्तीकरणाकडेच आणि जीवनातील गहनगूढ समस्यांना या परंपरेतून रेडीमेड उत्तर शोधून देण्याकडेच झुकलेला दिसतो आणि त्याचा फार मोठा परिणाम आणि फायदा लेखकांना मिळते असतो. मराठीतल्या पौरणिक कादंबऱ्यांच्या मोठ्या यशामागचे हे कारण सांगता येईल.'' पौराणिक कादंबरीचे लोकप्रियतेचे रहस्य येथे अविनाश सप्रे यांनी सांगितले आहे.

एकंदरीत पौराणिक कादंबरी ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे चरित्रनायकांचे उदात्तीकरण करताना दिसते. त्याची बाजू मांडताना दिसते. मराठीमध्ये पौराणिक कादंबरीची सुरुवात वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' (१९५९) या कादंबरीपासून झाली. गो. नी. दांडेकरांची 'मोगरा फुलला' दि. बा. मोकाशी यांची 'आनंद ओवरी' (१९७४) ह्या महत्त्वपूर्ण पौराणिक कादंबऱ्या आहेत. त्याचबरोबर सुमती क्षेत्रमाडे यांची 'मैथिली', शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' (१९६७) आनंद साधले यांची 'महापुरुष' (१९६९), रणजित देसाई 'राधेय' (१९७३) या महत्त्वपूर्ण पौराणिक कादंबऱ्या आहेत.

### १.५.५. प्रादेशिक कांदबरी

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत, रीती, समूहजीवनातील भावनाट्य आणि या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडवण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात, त्यांना प्रादेशिक कादंबरी असे म्हणतात. स्वातंत्र्यपूर्व काळात र. वा. दिघे यांनी 'पाणकळा' (१९४०) ही कादंबरी लिहून एक नवीन प्रयोग केला. त्यानंतर श्री. ना. पेंडसे यांची पहिली कादंबरी 'सोन्याची खाण' (१९४९) मध्ये प्रकाशित झाली. गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, रणजीत देसाई, चिं. वि. जोशी या कादंबरीकरांचाही उल्लेख प्रादेशिक कादंबरीकार म्हणून केला जातो. गाव, लोकसंस्कृती, आलुतेदारी, बलुतेदारी, निसर्गाचे वर्णन करणारी रणजित देसाई यांची 'माझा गाव' ही कादंबरी. चिं. वि. जोशी 'आमचा पण गाव'. विदर्भातील जीवन, लोकसंस्कृती चित्रित करणारी उद्धव शेळके 'धग' ही कादंबरी. औंध संस्थानातील ओसाड माळरानावरील धनगर वस्तीचे, लहरी निसर्गावर विसंबून असलेल्या जीवनाचे चित्रण करणारी व्यंकटेश माडगूळकर 'बनगरवाडी' ही कादंबरी. गोव्याच्या संस्कृतीचे वर्णन करणारी बा. भ. बोरकर यांची 'भावीण' ही कादंबरी. शंकर पाटील यांची 'टारफुला' या प्रादेशिक कादंबऱ्या महत्त्वपूर्ण ठरल्या.

लेखक ज्या प्रदेशात वाढला, जगला जी माणसं त्यांनी जवळून बघितली, तिथला निसर्ग मनसोक्त पाहिला. त्या सबंध परिसराला तिथल्या रंगगंधासह, जीवननाट्यासह, बऱ्यावाईट अनुभवासकट जिवंत करण्याची धडपड करीत असतो. श्री. ना. पेंडसे व गो. नी. दांडेकर यांचा कोकण परिसर, माडगूळकरांचा माणदेश परिसर, उद्धव शेळके यांचा वऱ्हाडचा परिसर, आनंद यादव यांचा पश्चिम महाराष्ट्र, बा. भ. बोरकर आणि मधु मंगेश कर्णिक यांनी गोव्याचा परिसर आपल्या कादंबऱ्यातून साक्षात केला आहे.

### १.५.६. दलित कादंबरी

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्य प्रवाह निर्माण झाला. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून दलित लेखक लेखन करू लागले. कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन अशा विविध वाङ्मयप्रकारात त्यांनी लेखन केले. दलित कादंबरीकार म्हणून सुरूवात करणारे अण्णा भाऊ साठे यांच्या 'वारणेच्या खोऱ्यात' (१९५१), 'चित्रा' (१९५१), 'फकिरा' (१९५९), 'वैजयंता' (१९६३), 'अलगुज' (१९६२), 'वारणेचा वाघ' (१९६८) इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कादंबऱ्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायक हा बेडर,

ध्येयनिष्ठ, बंडखोर, माणूसकी जपणारा आहे. खरे तर त्यांना दलित कादंबरीकार या चौकटीत बंदिस्त करणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. त्यानंतर शंकराराव खरात यांची 'हातभट्टी' (१९७०) ही कादंबरी झोपडपट्टीतील जीवनाचे दर्शन घडविणारी आहे. अनाथ आश्रमात वाढलेल्या मुलाची कथा 'मी मुक्त। मी मुक्त' (१९७१) या कादंबरीत मांडली आहे. फासे पारध्यांची पांढरपेशी समाजात वावरताना होणारी जीवनाची हेळसांड शंकरराव खरातांनी 'पारधी' (१९८०) या कादंबरीत रेखाटली आहे.

ना. रा. शेंडे यांच्या 'शृंगारलेले प्रेत' (१९३८), 'काळजी रात्र' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'गायत्री' (१९७८) या सर्व कादंबऱ्या दलित जीवन चित्रण करणाऱ्या आहेत. त्यानंतर नामदेव व्हटकर यांची एक अनाथ तरुणाची कथा सांगणारी 'अपराधी' (१९४४) व तमासगीरांच्या जीवनाचे दर्शन घडविणारी 'सोळा शिणगार' या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. केशव मेश्राम यांच्या 'हकीकत आणि जटायू' (१९७२), 'पोखरण' (१९७९) ह्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. त्यानंतरच्या कालखंडात ज. वि. पवार यांची 'बलिदान' (१९७०), भीमसेन देठे यांची 'इस्कोट' (१९८०), नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' (१९८१), अशोक व्हटकर 'मेललं पाणी' (१९८२), शरणकुमार लिंबाळे यांच्या 'दंगल' व 'परपुरुष', उत्तम बंडू तुपे 'झुलवा', बाबुराव बागुल यांची 'सूड' या महत्त्वपूर्ण दलित कादंबऱ्या आहेत.

दलितांच्या वाट्याला आलेले दुःख, वेदना, याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुक्तिसंग्राम, त्यांची चळवळ, त्यांनी केलेले धर्मांतर याचे काही चित्रण दलित कादंबऱ्यातून आले आहे. दलित कादंबरीमध्ये पिढ्यानपिढ्या वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा, अन्यायाविरुद्धचा प्रक्षोभ आहे. महार, मांग, भटक्या जमाती, तमासगीर, वाघ्यामुरळी, वेठबिगार, झोपडपट्टी, हातभट्टी, फुटपाथवरील जीवन, स्त्रियांवरील अत्याचार, फासेपारधी, अनाथांची समस्या, आदिवासी, अस्पृश्यांनी धर्मांतर केल्यावर निर्माण झालेल्या समस्या, दलितांमधील गटबाजीचे राजकारण इत्यादी विविध विषयांवर कादंबरी लेखन केले आहे.

**१.६. मराठी कादंबरीची वाटचाल**

मराठी कादंबरीची निर्मिती इंग्रजी भाषेतील 'Novel' या वाङ्मय प्रकारातून झाली. इंग्रजी भाषेच्या संपर्कातून 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार अस्तित्वात आला. प्रारंभी या वाङ्मयाचे स्वरूप भाषांतरित स्वरूपाचे होते. १८४१ मध्ये पाश्चात्त्य कादंबरीकार बुनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेसचे' हरी केशवजींनी 'यांत्रिकीक्रमन' असे मराठीत भाषांतर केले. या कादंबरीपासून मराठीत कादंबरीनिर्मितीस सुरुवात झाली. मराठीत स्वतंत्रपणे पहिली कादंबरी लिहिण्याचा सन्मान 'बाबा पद्मनजी' यांच्या १८५७ साली प्रकाशित झालेल्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीत मिळतो. विधवा स्त्रियांच्या समस्येवर आधारित ही कादंबरी आहे. परंतु त्यानंतर १८६१ मध्ये लक्ष्मणशास्त्री हळबेंनी 'मुक्तामाला' नावाची कादंबरी लिहिली. तिचे स्वरूप अद्‌भुतरम्य होते. याच धर्तीवर त्या काळात अनेक कादंबऱ्यांची निर्मिती झाली. सदाशिव रिसबूड 'मंजुघोषा' (१८६६), 'विश्वासराव' (१८७०), केशव जोवरेकर 'विचित्रपुरी' (१८७०) स्त्री कादंबरीकार साळुबाई तांबवेकर यांची 'चंद्रप्रभा विरहवर्णन' (१८७३) इ. रंजनप्रधान व अद्‌भुतप्रधान कादंबऱ्यांची निर्मिती झाली. याच दरम्यान रा. भि. गुंजीकर यांनी 'मोचनगड' (१८६७) ही पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहिली. १८६१ ते १८८६ या

कालखंडात रंजनप्रधान अद्‌भुत, ऐतिहासिक विषयांवर आधारीत कादंबऱ्या लिहिल्या गेल्या तर दुर्मिळ स्वरूपात सामाजिक प्रश्न मांडणाऱ्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यापैकी रामकृष्ण नाईक, म. वि. रहाळकर, वि. ज. पटवर्धन, गणेश लिमये इ. लेखकांचा समावेश होतो.

१८८५ ते १९२० हा कालखंड ह.ना. आपटे यांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. त्यांनी दहा सामाजिक आणि अकरा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. रेनाल्ड या लेखकाच्या 'माय स्टोरीज ऑफ ओल्ड लंडन' या कादंबरीचे 'मधली स्थिती' (१८८५) या नावाने त्यांनी मराठीत भाषांतर केले. ही कादंबरी 'पुणे वैभव' मधून क्रमशः प्रकाशित झाली. 'पाश्चिमात्य शिक्षण म्हणजेच पाश्चिमात्य व्यसनांचे अनुकरण' असे समजणाऱ्या काही आंग्लशिक्षितांची वर्तणूक कशी बेताल होते व त्यांची व्यसनाधिनता तात्कालिक स्त्रियांचा कसा छळ करते, याचे अत्यंत वेधक चित्र या कादंबरीत आहे. 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीत यमुनेचा झालेला अनन्वित छळ स्वतः यमुनेने या कादंबरीत सांगितला असून, कोणत्याही सहृदय रसिकाच्या हृदयास पीळ पाडेल, अशी ही छळकथा आहे.'उषःकाल'या कादंबरीत शिवाजी महाराजांनी इ. स. १६४६ साली तोरणा किल्ला (सुलतानगड) जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले हे मुख्य कथानक आहे.'केवळ स्वराज्यासाठी' (१८९८) या कादंबरीमध्ये विषय औरंगजेबाने संभाजीला कैद करून त्याचा वध केला, त्या बरोबरच रायगड जिंकून मराठी राज्याची धूळधाण करून टाकली असता अशा प्रसंगी छत्रपती राजारामाच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी औरंगजेबाशी स्वराज्य रक्षणासाठी जो निकराचा लढा दिला, त्याचे चित्रण आहे. ना. ह. आपटे यांची 'अजिंक्यतारा' ही ऐतिहासिक कादंबरी असून, त्यांची ती पहिलीच कादंबरी आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ताराबाई यांनी सातारचा 'अजीम' किंवा 'अजिंक्यतारा' किल्ला जिंकून घेतला, या घटनेवर आधारित ही कादंबरी आहे.'लांच्छित्त चंद्रमा' (१८८५) ही कादंबरी राजस्थानच्या इतिहासासंबंधीची असून, स्थल, काल दोषाने डागाळलेली आहे. तरीही ही कादंबरी त्यांच्या सर्व ऐतिहासिक कादंबऱ्यांत सर्वोत्कृष्ट आहे. मुळातच या कादंबरीचे कथानक अद्भुतरम्य असून, अशा कथानकामुळे मात्र ही कादंबरी आकर्षक झाली आहे.

याचकाळात ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून नाथमाधव (द्वारकानाथ माधवराव पितळे)यांना ओळखले जाते. त्यांची 'सावळ्या तांडेल' (१९०८) साली प्रसिद्ध कादंबरी आहे. ती मराठीतील पहिली आरमारविषयक कादंबरी आहे. नाथमाधव यांनी मराठ्यांच्या इतिहासाचे बृहद चित्र त्यांनी कादंबरी प्रकल्पातून रेखाटले आहे. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या या काळात लोकप्रिय ठरल्या.

इ. स. १९२१ ते १९५० या कालखंडात श्री. व्य. केतकर वा. म. जोशी, ना. सी. फडके, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, यांनी महत्त्वाचे असे कादंबरी लेखन केले.यातील श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी परांगदा, आशावादी, ब्राह्मणकन्या, विचक्षणा, भटक्या अशा महत्त्वाच्या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांमागे समाजशास्त्रीय भूमिका आहे. सामाजिक समस्यांची नेमकी चिकित्सा त्यांची कादंबरी करते. वा. म. जोशी यांना 'तात्त्विक कादंबरीचे जनक' म्हणून ओळखले जातात. 'आश्रमहरिणी'नावाची कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत परशुराम पुराणाची एक जुनी पोथी सापडली

असून, त्यातील कथा आपण सांगतो आहोत, अशी बतावणी करून या कादंबरीतील वातावरण थेट जुन्या काळातील ऋर्षीच्या आश्रमापर्यंत त्यांनी नेऊन भिडविले आहे. राजकीय थाटाची एक लहानशी 'नलिनी' ही कादंबरी प्रकाशित झाली. 'इंदू काळे व सरला भोळे' (१९३५) या कादंबरीच्या रूपाने वा. म. जोशी यांनी पत्रात्मक कादंबरीचा एक नवा फॉर्म कादंबरीत आणला.

ना. सी. फडके यांनी 'अटकेपार' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'निरंजन' (१९३२) या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या असून 'अल्लाहो अकबर' या कादंबरीनंतर त्यांच्या ज्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या, त्यामध्ये कुशल स्वभावचित्रण व प्रसन्न अशी भाषाशैली आहे. या बळावरच या कादंबऱ्या यशस्वी झाल्या आहेत.सुशिक्षित पांढरपेशा वर्गाच्या प्रेमकथा त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये केंद्रस्थानी आहेत. हौस, मौज, श्रृंगार, मनमोकळे वागणे, नवमतवाद, कलासक्त जीवन, संवादरहस्य, निरगाठ कल असे काहीसे नवे तंत्रही यात वापरले आहे. तसेच स्त्री-पुरुषांच्या प्रणयाचे शारीरिक चित्रण फडके यांनी रेखाटले आहेत; परंतु या रेखाटनातही खास अशी प्रसन्नता त्यांनी आणली आहे. ना. सी. फडके यांनी 'कलेकरिता कला' या मताचा पुरस्कार केला. तर वि. स. खांडेकर यांनी 'जीवनाकरिता कला' या तत्त्वाचा आग्रह केला होता.

ना. सी. फडके यांच्या नंतर वि. स. खांडेकरांनी कादंबरीलेखन महत्त्वाचे आहे. त्यांची 'हृदयाची हाक' (१९३०), 'कांचनमृग' (१९३१), 'दोन ध्रुव' (१९३४), 'रिकामा देव्हारा' (१९३९), 'सुखाचा शोध' (१९३९), 'पहिले प्रेम' (१९४०), 'क्रौंचवध' (१९४२), 'अमृतवेल', 'ययाती' या वि. स. खांडेकर यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत. शेतकऱ्यांच्या व स्त्रियांच्या उद्धारासाठी, सुधारणेसाठी, स्वातंत्र्यासाठी खांडेकरांचे नायक भूमिका घेतात. नवा ध्येयवाद रूजवण्याचे काम करतात. तसेच बऱ्याच अंशी लेखकाने पाहिलेल्या ग्रामीण जीवनाचे व स्वीकारलेल्या शिक्षकी पेशाचे स्वच्छ प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यात आहे. कादंबऱ्यामधून मानवी जीवनासंबंधीचे भाष्य आणि आंतरिक काव्यामयता प्रत्ययास येते. खांडेकरांची 'ययाती' (१९५९) या कादंबरीस सर्वाधिक प्रसिद्ध मिळाली. या रुपकात्मक कादंबरीने वाचकांची अभिरूची विकसित केली. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात या कादंबरीने महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केले.

ग. त्र्यं. माडखोलकर हे या काळातील महत्त्वाचे लेखक. त्यांची 'मुक्तात्मा' (१९३३) प्रकाशित झालेली पहिली कादंबरी. त्याचबरोबर 'भंगलेले देऊव' (१९३४), 'शाप', 'कांता', 'दुहेरी जीवन', 'नागकन्या', 'नवे संसार' ह्या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. भा. वि. वरेरकर यांनी एकूण २८ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची 'संसार की संन्यास' व 'चिमणी' या दोन कादंबऱ्या स्त्री जीवनावर आधारलेल्या आहेत. त्याचबरोबर 'धावता धोटा' (१९२६), 'परतभेट' (१९३४), 'गोंदू गोखले' (१९३४), 'कुलदैवत' या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. वि. वा. हडप यांनी वयाच्या सतराव्या वर्षात 'झाकली मूठ' ही कादंबरी लिहिली. त्यांच्या 'बहकलेली तरुणी', 'वाकडे पाऊल', 'इष्काचा प्याला', 'माझा सम्राट' या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. हडप हे फडके, खांडेकर व माडखोलकर यांच्या पिढीतील कादंबरीकार असून आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वामुळे ते समकालीनांहून वेगळे ठरतात. इ. स. १९२१ ते १९५० या कादंबऱ्यांना

नवीन वळण लागव्याचे काम पु. य. देशपांडे यांनी केले आहे. देशपांडे यांनी 'बंधनाच्या पलीकडे' (१९२७), 'सुकलेले फूल' (१९३१), 'सदाफुली' (१९३३), 'विशाल जीवन' (१९३९), 'काळी राणी' (१९४१), 'नवे जग' (१९४१) या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित आहेत. देशपांडे यांनी आपला सर्वच कादंबऱ्यामधून नवतेचा पुरस्कार केला आहे. याच काळात १९३४ साली विभावरी शिरूरकरांची 'हिंदोळ्यावर' या नावाची कादंबरी प्रकाशित झाली आणि या कादंबरीने सर्वत्र खळबळ उडवून दिली. त्याबरोबर शिरूरकारांनी 'बळी' सारखी विलक्षण कादंबरी लिहिली. या कादंबरीत गुन्हेगार वस्तीतल्या मांग-गारुडी समाजाच्या तरुणाची भीषण, हृदयद्रावक कहाणी आहे.

तरुण-तरुणींचे तारुण्यसुलभ प्रेम, त्यांचे सांसारिक जीवन, वडील पिढीशी त्यांना करावा लागणारा संघर्ष व मिश्कील भाषेतून खेळकरवृत्तीने कादंबऱ्यांतून वि. वि. बोकील साकार केले आहेत.या काळात गीता साने यांनी सामाजिक प्रश्न कादंबरीतून मांडले आहेत. त्यांनी 'हिरवळीखाली' (१९३६), 'लतिका' (१९३७), 'आविष्कार' (१९३७), आणि 'धुके आणि दहिवर' (१९४२) ह्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून वेश्येच्या वास्तवजीवनाचे चित्रण केले.शांता शेळके यांच्या प्रकृतीची मुख्य धारा कवयित्रीची असूनही त्यांनी विपुल कादंबरीलेखन केले आहे. 'विझती ज्योती' (१९४६), 'कोजागिरी' (१९४७), 'स्वप्नतरंग' (१९४९), 'ओढ' (१९५०) व 'सुखाची सीमा' (१९५१) या त्यांच्या कादंबऱ्या आहेत. प्रेमाबाई कंटक यांची 'काम आणि कामिनी' (१९३७) ही कादंबरी आहे. गांधींजींच्या वैवाहिक ब्रह्मचर्याच्या तत्त्वावर आधारलेली आहे. त्यांची दुसरी कादंबरी 'अग्रियान' (१९४२) ही कादंबरी गांधीजींच्या रचनात्मक स्वराज्य कार्यक्रमाशी निगडित आहे. पहिली कादंबरी सामान्य असून, दुसरी कादंबरी गांधीजींच्या कार्यक्रम तत्त्वज्ञानाशी एकरूप झाली आहे. गांधीवादाचा जीवनमार्ग पत्करून ध्येयाची वाटचाल करणाऱ्या साने गुरुजींनी आपल्या बोधाच्या प्रचारासाठी अनेक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'श्यामची आई' ही साने गुरूजींची पहिली कादंबरी आहे. त्यानंतर 'धडपडणारी मुले' (१९३७), 'गोड शेवट' (१९४३), 'यति की पती' (१९४३), 'तीन मुले' (१९४४) व 'रामाचा शेला' (१९४४) या त्यांच्या लोकप्रिय कादंबऱ्या. दयाराम, भारती, मनोहर, मुकुंदराव, स्वामी या पात्राचे गुणधर्म साने गुरूजींच्या स्वभावाशी अत्यंत मिळतेजुळते आहेत.

र. वा. दिघे यांनी 'पानकळा' (१९३९), 'सराई' (१९४३), 'पूर्तता' (१९४४), 'रानजाई' (१९४६), 'गाणलुब्ध मृगनयना' (१९४७) या कादंबऱ्या लिहिल्या असून, 'पानकळा' व 'सराई' या दोन त्यांची प्रतिभा प्रामुख्याने वन्यप्रदेशात मुक्त विहार करणारी असून, थोडासा नागर जीवनाशीही तिचा परिचय आहे; परंतु निसर्ग सान्निध्यात रसरशीत वाटणारी त्यांची पात्रे नागरी जीवनात येताच मात्र निष्प्रभ होऊन जातात. हा प्रकार 'पानकळा' मध्ये घडला आहे.'सराई' मधील पावसाळ्याचे वर्णन पाहिले की, त्याची सत्यता पुन्हा पटते. त्यांची निसर्गवर्णने ही पूर्णपणे कादंबरीतील व्यक्तिरेखा व वातावरण यांच्याशी एकजीव झालेली आहेत, यात शंका नाही.

विश्राम बेडेकर यांनी 'रणांगण' ही कादंबरी १९३९ साली लिहिली. ती मराठीतील पहिली संज्ञाप्रवाही कादंबरी आहे. तिला दुसऱ्या महायुद्धाचा ठळक संदर्भ आहे. चक्रधर आणि हार्टा यांच्या विफल प्रेमाची ही कहाणी आहे. त्यांच्या प्रेमपूर्तीमध्ये राजकीय अडसर येतात. शेवटील हार्टा आत्महत्या करते, असा शेवट आहे. समकाळाचे दाहक असे चित्रण करणारी मराठीतील ही एक महत्त्वाची कादंबरी आहे.

बा. सी. मर्ढेकर यांनी संज्ञाप्रवाह पद्धतीचा जाणीवपूर्वक प्रयोग बा. सी. मर्ढेकर यांनी 'रात्रीचा दिवस' (१९४२), 'तांबडी माती' (१९४३), व 'पाणी' (१९४८) या कादंबऱ्यातून केला आहे. मर्ढेकर यांच्या कादंबरीत मानवी जीवन दुःखाने भरले आहे. सद्विचारी, सद्विवेकी, लोकांच्या वाट्यालाच जास्त दुःख येते, हे कठोर वास्तव मर्ढेकरांनी सांगितले आहे. बा. भ. बोरकर यांनी एकूण चार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांची 'मावळता चंद्र' (१९३८) साली आलेली पहिली कांदबरी आहे. त्यानंतर त्यांच्या 'अंधारातील वाट' (१९४३), 'जळते रहस्य' (१९४५) आणि 'भावीण' (१९५०) या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. या सर्व कादंबऱ्यातून समाजजीवनातील वैगुण्यांवर प्रकाश टाकला आहे.

बी. रघुनाथ यांनी एकूण सात कादंबऱ्या लिहिल्या असून, त्या सर्व कादंबऱ्यांतून आशयविषयाचे वेगळेपण जाणवते. त्यांनी 'ओ' ही पहिली कादंबरी १९३६ मध्ये लिहिली आहे. त्यानंतर 'हिरवे गुलाब' (१९४३), 'बाबू दडके' (१९४४), 'उत्पात' (१९४५), 'म्हणे लढाई संपली' (१९४६), 'जगाला कळलं पाहिजे' (१९४९) व 'आडगावचे चौधरी' (१९५४) अशा त्यांच्या कादंबऱ्या आहेत. या सर्व कादंबऱ्यांतून त्यांनी त्यांचा काळ उभा केला आहे. निजामाच्या जुलमी राजवटीचे वर्णन केले आहे. तसेच त्यांनी तत्कालीन सामाजिक प्रश्न व समस्या यांचे वर्णन केले आहे.स्त्री कादंबरी लेखनात प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी'-(१९४२). व शकुंतला परांजपे 'वज्रलेख'(१९४६) या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल.

या दशकातील कादंबरी प्रादेशिक आणि ग्रामीण स्वरूपाची होती. श्री. ना. पेंडसेंची 'गारंबीचा बापू'(१९५१) या कादंबरीने कोकणातील भूप्रदेश अधोरेखित केलेला आहे. तर गंगाधर गाडगीळांची 'लिलीचे फूलं'-(१९५५) ही कांदबरी समकालीन कादंबरीपेक्षा वेगळ्या आशयाची आहे. जी स्त्रीच्या जीवनातील मानसिक आंदोलने टिपते आणि पारंपरिक मूल्यांचा आणि जीवनपद्धतीचा ऱ्हास कसा होत आहे, याचे दर्शन घडवते.व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी'(१९५५) या कादंबरीने फडके खांडेकरी कांदबरीचा रंजनवादी आकृतिबंध त्यांनी धुडकावून लावला. प्रांजळपणे खेड्यातील अस्सल जगणे चित्रित केले. उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी खेड्यातील जीवनसंघर्ष मांडते.

अण्णाभाऊ साठे यांच्या 'वारणेच्या खोऱ्यात'(१९५१), 'चित्रा'(१९५१),'फकिरा'(१९५९), 'वैजंयता' इ. कादंबऱ्यातून दलित समाज व संस्कृतीचे चित्रण येते. शोषितांच्या इतिहासाचे पुनर्वाचन त्यांच्या कादंबरीत आले आहे. ना. रा. शेंडे यांनी 'काजळीराव' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'विलासिनी' (१९५४) इ. कादंबऱ्या लिहिल्या. जीवनाचे यथार्थ चित्रण करताना मानवी मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

१९६० ते  १९८० या कालखंडातील कादंबरीचा विचार करता, १९६० नंतर मराठी साहित्यक्षेत्रात विविध वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. एका विशिष्ट समूहाच्या जीवनजाणिवा, संस्कृती, भाषा या घटकाचा स्वतंत्रपणे विचार कादंबरीतून होऊ लागला. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, विज्ञान इ. मुख्य वाङ्मयप्रवाहातून मोठ्या प्रमाणात कादंबरीची निर्मिती होऊ लागली.

१९६० ते १९७० च्या दशकात उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०), विभावरी शिरूरकर यांची 'शबरी' (१९६२), पु. शि. रेगे 'सावित्री' (१९६२), रणजित देसाई 'स्वामी' (१९६२), जयवंत दळवी 'चक्र' (१९६३), चिं.त्र्यं. खानोलकर यांची 'रात्री काळी घागर काळी' (१९६३), भालचंद्र नेमाडे 'कोसला' (१९६३), बाबूराव बागूल 'सूड' (१९७०), ज. वि. पवार 'बलिदान' (१९७०) इ. कादंबऱ्या आशय व विषयांच्या दृष्टिकोनातून विशेष उल्लेखनीय ठरल्या. या दशकात ग्रामीण व दलित प्रवाहाच्या तुलनेत स्त्रीवादी प्रवाहातील लेखन संख्यात्मकदृष्ट्या अल्प आहे.प्रस्तुत कादंबऱ्या मानवी जीवनातील वास्तवाचे पारदर्शी चित्रण करतात. त्याचबरोबर अनेकविध मानवी प्रवृत्तींचे यथार्थ दर्शन घडवितात.

मराठी कादंबरीचा एक महत्त्वाचा वळणटप्पा म्हणून भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीकडे पहावे लागते. मराठी नव कादंबरीची सुरूवात या कादंबरीपासून होते. ही कादंबरी आशय आणि रूपाच्या पातळीवर सर्वार्थाने नानविन्यपूर्ण ठरते. 'बिढार', कादंबरीपासून नेमाडे यांनी वास्तवदाची कास धरल्याने पुढील काळात वास्तववादी कादंबरी मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. भाऊ पाध्ये, मधु मंगेश कर्णिक, जयवंत दळवी, अनंत कदम, किरण नगरकर या लेखकानं महानगरीय जीवनाचे चित्रण केले. भाऊ पाध्ये यांनी समग्र महानगर आपल्या चित्रण कक्षेत आणले. ग. प्र. प्रधान यांची 'साता उत्तराची कहाणी' या कादंबरीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय विचार प्रणालीची मीमांसा आहे.

याच अनुषंगाने १९७० ते १९८० च्या दशकातील कादंबरीचा विचार करता, अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' (१९७३), शंकर पाटील 'टारफुला' (१९७१), ज्योत्स्ना देवधर यांची 'उत्तरयोगी' (१९७३), सुमती क्षेत्रमाडे 'जीवनस्वप्न' (१९७५), आनंद यादव 'नटरंग', 'गोतावळा' (१९७१),  रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' कमल देसाई 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई' (१९७५), माधव कोंडविलकर 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' (१९७९) इ. या दशकातील विशेष कादंबऱ्या आहेत.

१९८० नंतरच्या काळात दीनानाथ मनोहर, राजन गवस यांनी महत्त्वपूर्ण सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. देवदासी, आदिवासी, साहित्य चळवळ प्रश्नांना केंद्रवर्ती ठेवत त्यांनी कादंबरी लेखन केले. श्याम मनोहर यांनी 'कळ', 'उत्सुतेने झोपलो', 'आम्ही हळहळ पावलो',  या सारख्या कादंबऱ्या लिहिल्या त्यांची प्रत्येक कादंबरी आशय आणि आविष्कारदृष्ट्या वेगळी आहे.

या पार्श्वभूमीवर १९९० नंतरच्या कादंबरीचा विचार करता भालचंद्र नेमाडे 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' (२०१०), विश्वास पाटील 'पांगिरा' (१९९०) 'झाडाझडती' (१९९१), राजन गवस 'तणकट' (१९९४), 'ब-बळीचा' (२०१३), रंगनाथ पठारे 'ताम्रपट' (१९९४), 'नामुष्कीचे स्वगत' (१९९२),'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९), शेषराव मोहिते,'असं जगणं तोलाचं' (१९९४), 'धूळपेरणी'

(२००१) भारत काळे,'ऐसे कुणबी भोपाळ' (२००१), कृष्णात खोत, 'गावठाण' (२००५), रौंदाळा (२००८), 'धुळमाती', (२०१४), महेंद्र कदम, 'धूळपावलं', 'आगळ', आनंद विंगकर, 'अवकाळी पावसाच्या दरम्याची गोष्ट' (२०११), 'दस्तावेज' (२०२३) सीताराम सावंत, 'देशोधडी', 'भुई भुई ठाव दे' (२०१५) मोहन पाटील, 'बांडगुळ आख्यान',सदानंद देशमुख, 'तहान', 'बरोमास' (२००२), 'चारीमेरा', प्रवीण बांदेकर 'चाळेगत' (२००९), 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' (२०१६), गणेश आवटे, 'भिरूड' (२००७), रमेश इंगळे उत्तादकर, 'निशाणी डावा अंगठा' (२००५), 'सर्व प्रश्न आनिवार्य' इ. कादंबरीकरांचे लेखन देशीयतेच्या अनुषंगाने झाले आहे. एकंदरीत भू-प्रदेश, विशिष्ट संस्कृती, भाषा इ. घटकांच्या अनुषंगाने विचार करता वरील लेखकांच्या कादंबरी लेखनात देशीयतेची बीजे सापडतात. या लेखकांनी कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या सामर्थ्य शक्यता लक्षात घेऊन लेखन केले.

याबरोबर नव्याने कादंबरी लेखन करणारे नीरजा यांची 'थिजलेल्या काळाचे अवशेष', (२०२२)किरण गुरव 'जुगाड' (२०१९), सुनीता बोर्डे-खडसे, 'फिंद्री', मेघा पाटील, 'सुलवान' रमेश रावळकर 'टिश्यू पेपर' (२०२०), प्रसाद कुमठेकर 'बगळा', 'बारकुल्या बारकुल्या ष्टोऱ्या' अवधूत डोंगरे 'स्वतःला फालतु समजणाची गोष्ट', संतोष जगताप 'विजेने चोरलेले दिवस' (२०२२), देवीदास सौदागर 'उसवण' (२०२२), प्रणव सखदेव 'कोळेकरडे स्ट्रोक' ज्ञानेश्वर जाधवर 'यसन' शिल्पा कांबळे, 'निळ्या डोळ्याची मुलगी' नवनाथ गोरे, 'फेसाटी' (२०१८) प्रदीप कोकरे, 'खोल खोल दुष्काळ डोळे' (२००३) इ. लेखक नवनवे विषय घेऊन कादंबरी लेखन करीत आहेत. ही गोष्ट मराठी कादंबरीसाठी आश्वासक आहे.

**१.७. समारोप**

एकंदरीत काळानुरूप कादंबरीच्या रूपाशयात बदल झाले. ती अधिकाधिक प्रयोगशील झाली. तिचा परीघ विस्तारला, हे आपण पाहिले. कादंबरीची व्याख्या, तिचे स्वरूप, कादंबरीचे विविध प्रकार, कादंबरीचे घटक या सर्व घटकांचा विस्तृत विचार केला. विद्यार्थी मित्रांना याचा परिचय व्हावा, यामागचे प्रयोजन आहे. 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराविषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये अभिरूची निर्माण व्हावी. हा यामगचा महत्त्वाचा उद्देश आहे. एकूणच कादंगरी हा वाङ्मयप्रकाराचे विशेष या प्रकरणातून आपल्या लक्षात येतील. कादंबरीचा अभ्यास कोणकोणत्या पातळ्यावर होणे आवश्यक आहे. हेही आपल्या लक्षात येईल.

**१.८ स्वाध्याय**

**प्र. योग्य पर्याय निवडा.**

१. मराठीतील पहिली संज्ञाप्रवाही कादंबरी कोणी लिहिली.

१. भालचंद्र नेमाडे २. बा. सी. मर्ढेकर

३. विश्राम बेडेकर ४. विलास सारंग

२. 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरी कोणी लिहिली.

१. रणजीत देसाई   २. शिवाजी सावंत

३. वि.स. खांडेकर   ४. रा. भि. गुंजीकर

३. मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी कोणती.

१. वि. का. राजवाडे   २. उषा हस्तक

३. रा. भि गुंजीकर   ४. नारायण फडके

४. 'ययाती' ही कादंबरी कोणत्या प्रकारात मोडते

१. ऐतिहासिक   २. सामाजिक

३. संज्ञाप्रवाह   ४. पौराणिक

५. 'मराठी कादंबरी पैस आणि परीघ' हा समीक्षा हा ग्रंथ कोणाचा आहे.

१. नदंकुमार मोरे   २. किशोर सानप

३. राजन गवस   ४. नीतीन रिंढे

६. 'मराठी कादंबरीः समाजशास्त्रीय समीक्षा' हा ग्रंथ कोणाचा आहे.

१. अविनाश सप्रे   २. प्रविण बांदेकर

३. रवींद्र ठाकूर   ४. भालचंद्र नेमाडे

७. विश्राम बेडेकर यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'रणांगण' ही कादंबरी कोणत्या साली प्रकाशित झाली.

१. १९३९   २.१९३०

३. १९२०   ४. १९०१

८. 'कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे.' हे विधान कोणी केले आहे.

१. अविनाश सप्रे   २. भालचंद्र नेमाडे

२. प्रेमाबाई कंठक   ४. उषा हस्तक

**प्र. लघुत्तरी प्रश्न**

१. मराठी कादंबरीची वाटचाल स्पष्ट करा?

२. कादंबरी या वाङ्मय प्रकाराची संकल्पना स्पष्ट करा?

**प्र. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. कादंबरीच्या व्याख्या सांगून, प्रकार स्पष्ट करा?

२. कादंबरीच्या घटकांचा विस्ताराने परामर्श घ्या?

३. मराठीतील कादंबरी लेखनाची परंपरा विशद करा?

## १.८ संदर्भ


१. नेमाडे, भालचंद्र : टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१५

२. तुकदेव, रोहिणी : मराठी कादंबरीचे प्रारंभिक वळण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१४

३. नीतीन रिंढे : मराठी कादंरबी पैस आणि परीघ, शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, २०२१

४. थोरत, हरिश्चंद्र : कादंबरी : एक साहित्यप्रकार, शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, २०१०

५. कुलकर्णी, अनिरुद्ध (संपा) : प्रदक्षिणा खंड-२, कॉन्टिनेन्टल पब्लिकेशन्स, मुंबई, २०२४

६. बापट प्र. वा. व गोडबोल, ना. वा. (संपा) : मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे. १९७३

७. राजवाडे, वि. का : कादंबरी, आनंद प्रेस, सातारा, १९५०

८. हस्तक, उषा : कादंबरी आणि मराठी समीक्षा, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९३


◆◆◆

## घटक : २

# नांगरमुठी आशयसूत्रे

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषयविवेचन

२.३ 'नांगरमुठी' कादंबरीचे कथानकाचे स्वरूप

२.३ 'नांगरमुठी' - आशयसूत्रे

२.३.१ कृषिनिष्ठ जाणीवा

२.३.२ गावातील राजकारणाचे स्वरूप

२.३.३ वेतोबाच्या मंदिराचा जिर्णोद्धार

२.३.४ ऊस आंदोलन

२.३.५ औतेरावचं आजारपण आणि शेतीची कामे

२.३.६ हरिपंतांचे शेवटचे दिवस

२.४ समारोप

२.५ स्वाध्याय

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१. नांगरमुठी कादंबरीतील आशयसूत्रांचा परिचय होईल.

२. नांगरमुठी कादंबरीतील कृषीजाणीवेचे स्वरूप समजून येईल.

३. नांगरमुठी कादंबरीतील समूहभावनेचा परिचय होईल.

४. नांगरमुठी कादंबरीतील कथानकाचे स्वरूप लक्षात येईल.

## २.१ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत घटकामध्ये आपण पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' या कादंबरीच्या आशयसूत्रांचा आणि कथानकाचा विचार करावयाचा आहे. कादंबरी हा इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत वेगळा आणि लोकप्रिय असा वाङ्मयप्रकार आहे. कथात्म साहित्याच्या अभ्यासामध्ये हा वाङ्मयप्रकार व्यापक, गुंतागुंतीचा निवेदनात्मक असा आहे. हा वाङ्मयप्रकार वेगवेगळ्या पद्धतीने हाताळल्यामुळे तिची वेगवेगळी रूपे तयार झालेली आहेत. त्यामुळे कादंबरी हा वाङ्मयप्रकार अधिक विस्तीर्ण आणि गुंतागुंतीचा आहे. लेखक कादंबरीमधून समाजातील विविध अंगांचे दर्शन घडवित असतो. एकाचवेळी मानवी जीवनातील दुःख, आनंद, कष्ट, उदासीनता कादंबरीत चित्रित करीत असतो. त्यामुळे अभ्यासकांना आकलनाच्या बाबतीत आव्हान देण्याचे मोठे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात असल्याचे सर्वमान्य आहे. या दृष्टीने पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीच्या कथानकाचे स्वरूप आणि आशयसूत्रे पाहू.

## २.२ विषयविवेचन

पांडुरंग पाटील यांची 'नांगरमुठी' ही कादंबरी सर्वच पातळ्यांवर वैशिष्ट्यपूर्ण अशा स्वरूपाची आहे. या कादंबरीच्या कथानकाचा आणि कादंबरीत येणाऱ्या आशयसूत्रांचा सविस्तरपणे विचार प्रस्तुत घटकात करावयाचा आहे. कथनात्मक साहित्याचा विचार करता एखाद्या साहित्यकृतीमधील पात्रं, भाषा, निवेदन या गोष्टींचा स्वतंत्रपणे विचार करता येतो तसाच कलाकृतीच्या कथानकाचा आणि आशयसूत्रांचाही स्वतंत्रपणे विचार करता येतो. आशयसूत्रांच्या माध्यमातून लेखक आपल्या साहित्यकृतीचे स्वरूप सिद्ध करत असतो. लेखक आपल्या साहित्यकृतीच्या माध्यमातून जी एक मध्यवर्ती कल्पना पुढे आणत असतो तीच त्या साहित्यकृतीचा आशय असते. एखाद्या साहित्यकृतीमध्ये एक किंवा एकाहून अधिक आशयसूत्रे असतात. तर बऱ्याचदा एखाद्या मुख्य आशयसूत्राबरोबर इतर अनेक छोट्या आशयसूत्रांची गुंफण करून साहित्यकृती सिद्ध केली जाते. मुळात कादंबरी हा वाङ्मयप्रकार व्यापक स्वरूपाचा असल्याने एका बरोबर अनेक आशयसूत्रांना सामावून घेत असतो. यादृष्टीने पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीचा विचार करता येईल. कादंबरीत पाटील यांनी निसर्गाच्या कुशीत वसलेल्या एका खेडयातील एका शेतकरी कुटुंबाचे, त्याच्या संघर्षाचे चित्रण

केले असले तरी कथानकातून आणि आशयसूत्रांच्या माध्यमातून एका गावचा, तिथल्या लोकजीवनाचा विस्तृत पट वाचकांसमोर उभा राहतो.

### २.३ 'नांगरमुठी' कादंबरीचे कथानक–

कादंबरीत काय सांगितले आहे त्यास कथानक म्हणतात. या कथानकात अनेक घटना प्रसंगाची साखळी गुंफलेली असते. कथानकात केवळ घटनाप्रसंग कालानुक्रमे मांडून चालत नाहीत तर त्यामध्ये कार्यकारणभाव महत्त्वाचा असतो. कादंबरीमध्ये एखादी गोष्ट असतेच. त्या गोष्टीमध्ये अनेक घटकतत्त्वे एकापाठोपाठ एक अशी रचलेली असतात. त्यातूनच कादंबरीचे कथानक सिद्ध होत असते.

कादंबरीत घटना घडत असतात. पात्रांकरवी घटना घडविल्या जातात. घटना, प्रसंग, पात्रे, निवेदन पद्धती या सर्व घटकांचा समावेश कथानकात होतो. हे सर्व घटक एकत्र येण्याने कथानक एकात्म होते. कादंबरी बहुकेंद्री असल्याने कादंबरीच्या कथानकामध्ये उपकथानकेही सामावलेली असतात. कादंबरीकार कथानक आकर्षक व्हावे यासाठी काही तंत्रांचा अवलंब करीत असतो. त्यामध्ये आरंभ, मध्य, शेवट या तंत्राचा वापर करून कथानकाला कलाटणी देण्याचे काम लेखक करतो. कादंबरीतील कथानकात आशय कोणता यावरून कादंबरीचे स्वरूप ठरत असते. कादंबरीला कथानकामुळे गतीमानता प्राप्त होत असते, त्यामुळे कथानक हा कादंबरीतील महत्त्वाचा घटक मानला जातो.

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीचे कथानकही वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचे आहे. औतेराव आणि त्याची पत्नी रखमा, हरिपंत यांच्या कुटुंबाची, त्यांच्या संघर्षाची कहाणी प्रस्तुत कादंबरीत आली आहे. साधारण दोन–तीन वर्षाच्या कालावकाश कादंबरीत येतो. औतेरावचा संघर्ष कादंबरीत येतोच पण आसाराम लोमटे म्हणतात त्याप्रमाणे 'हंगामागणिक बदलणारे ऋतुचक्र, मातीचे उमाळे–उसासे आणि रानाचा आदिमगंध याचा जिवंत साक्षात्कार घडवणारी पांडुरंग पाटील यांची ही कादंबरी आहे. तसेच विठ्ठलावर सारा भरवसा ठेवून कष्टणारी माणसं, इरल्यावर पाऊस झेलत रान भांगलणाऱ्या आयाबाया, या माणसांनी जीवाजतन मायेने सांभाळलेलं जितराब आणि या सगळ्यांच्याच जगण्याला लाभलेला एक भूमिनिष्ठ तोल!' या गोष्टींचे कथन कादंबरीत आले आहे. नांगरगाव गावातील कृषिनिष्ठ जाणीवांचा वेध पाटील यांनी कादंबरीत घेतला आहे. सुगी, पेरणी, पिकाची काढणी, भांगलणी, पीकासाठी कुटुंबासाठी करावा लागणारा संघर्ष, गावातील सत्तासंघर्ष, लोकांच्या ठिकाणी असणारा श्रद्धाभाव, एकमेकांसाठी अडीअडचणीच्या प्रसंगी धावून जाणाच्या माणूसकीचा अनोखा समूहभाव अशा अनेक गोष्टींचा पट कादंबरीत उभा केला आहे. या सर्वातून कादंबरीचे सकस असे कथानक आकाराला येते.

निसर्गाच्या कुशीत वसलेल्या नांगरगाव या छोट्याशा खेडेगावातील औतेराव आणि त्यांच्या कुटुंबाच्या संघर्षाबरोबर कादंबरी मुख्यकथानकाला पुरक अशी उपकथानकेही येतात. यातूनच कादंबरीत कृषिजीवनाचा पट कादंबरीत समर्थपणे उभा राहिला आहे. औतराव मोऱ्यांच्या घरावरील संकटाने कादंबरीचा प्रारंभ होतो.

औतराव हा हाडाचा शेतकरी. शेती करत त्याने ऊस ओढण्यासाठी साखर कारखान्याला बैलगाडी लावलेली असते. पावसाळ्यामध्ये बैलांना चरण्यासाठी सोडलेले असताना अस्वल्या बैलाच्या गळ्याला फास लागून अपघाती मृत्यू होतो. अखंड पावसाळभर गुडघ्याएवढ्या गाळातनं पेंडी वडून जनावरं तयार केली अन् अचानक काळाचा घाला पडला. बैलाच्या जाण्याची नि उद्याच्या जगण्याची काळजी औतेरावच्या जीवाला घोर लावीत होती. अशातच शामुदा आणि सर्व गाडीवान मित्र मिळून त्याला मदत करताना आणि दहा हजार रूपये नवीन बैल घेण्यासाठी देतात. त्यामुळे औतेरावचा गाडा पुन्हा रूळावर येतो.

सुगीचे दिवस सुरू होतात. भातकापणीसाठी औतेराव आणि वडील हरिपंत तयारीला लागतात. खळं तयार केले जाते. शेतातील मांगोर दुरूस्त केला जातो. पाऊस उघडलेला पाहून औतेराव भात कापायची जोडणी घालतो. भातकापणीसाठी पैरकऱ्यांना सांगून येतो. कोंडबा लव्हाराकडून खुरप्यांना दात्र्या काढून आणतो. शेतात दहीभाताचा नैवद्य दाखवून, पूजा करून भातकापणीला सुरुवात केली जाते. मळणीची तयारी केली जाते. त्यातच सलग दोन दिवस पाऊस सुरू होतो. त्यामुळे कामाचा खोळंबा होतो. दोन दिवसानंतर औतराव मळणीची तयारी करतो. शेतकऱ्याच्या जीवनाम पेरणी आणि मळणी शेतकऱ्यासाठी एक प्रकारची लढाईच असते. गावातील गड्यांना सांगून औतराव भाताची मळणी करून घेतो. मळणी झाल्यावर खळ्यावरील भात नीटवार केले जाते. पिंजार वाळवले जाते. व्हळी घातली जाते. खळ्यावर वाळवलेले भात पोत्यात भरून घरी आणले जाते. औतरावची बायको साखरू तुकडपाणी टाकून भात घरात घेते.

हरिपंताचा भाऊ हाणमा मुंबईला आपला संसार घेऊन असतो. तो गिरणीकामगार म्हणून काही काळ काम करत होता. पण गिरणी कामगारांच्या संपानंतर इतर कामगारांसारखे गावी न येता तो मुंबईतच मिळेल ते काम करत राहिला आणि स्थिरावला. दोघांमधील शेती मात्र हरिपंतच पाहत होते. त्याचे आधीमधी पत्र येत असते. बैल गेल्याचं कळवलं नसल्याने हाणमा नाराज होतो. नवीन बैल घेण्यासाठी पैसे हवे असल्यास कळवा असं पत्रातून सांगतो. हरिपंताना आपल्या भावाची काळजी होती. हरिपंत हाणमाला कळवत होते की, ''तुला तिथं काम निबत नसल तर गावाकडं ये. अर्दी भाकरी दोघांत खाऊ.''

सुगी संपली देवस्थानच्या जमीनीचा खंड गोळा करण्याचं काम सुरू झालं. त्यासाठी सरपंच नरसिंगआण्णा, हरिपंत, पोलीस पाटील राघो ढेलजकर आणि वारकरी मंडळी एकत्र जमली. वेतोबाची तांबर पंधरा मण भात. वाघजाईचा पठार दहा मण भात, नाचणं दहा मण, भैरीच्या शेताचे दहा मण. असा पस्तीस मण भाताचा खंड नि नाचण्याचा दहा मण खंड गोळा झाला होता. नेहमीप्रमाणे शिवा पंड्या आणि पपेराव सावंत खंड गोळा करण्यावरून वाद निर्माण करतात. खंडातून गोळा झालेलं भात विकून त्या पैशातून गावच्या मंदिराचे काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला जातो. पण दोन गटात यावरून मतभेद होतात. पंत मध्यस्ती करून वाद मिटवतात व मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे बैठकीत ठरले जाते.

डोंगर रानातलं नाचणं, वरी, भुईमुगाची काढणी होते. शेताशिवारातील धान्य घरात टोपल्यात भरली जातात. हळूहळू सारं शिवार उजाड दिसू लागतो. निसर्गाचं रूप पालटू लागतं. जमिनी भेगाळू लागतात. रानामाळात नांगरटी सुरू होतात. औतेराव ऊस वढायला कारखान्याला गाडी लावतो. साखरूला पहाटे उठून

तोडलेल्या ऊसाचे भारे बांधयला जावं लागतं. ऊसतोडणीच्या कामातून सवड काढून औतेरावनं आपल्या शेतातील नांगरटी पूर्ण केल्या. लोकांच्या शेतातही नांगरटीसाठी गेला त्यामुळे भाड्याचे चार पैसे आले. औतेरावचा मुलगा तान्या हळूहळू मोठा होत होता. आता तो शाळेला जाऊ लागला. औतरावबरोबर हरिपंत आणि रखमाची मोठी मदत होत होती. घरात लागणारी मिरची जुंधळं, भुईमूग, कडधान्य, माळवं दळवं, नाचणं, वरी, तीळ ही पिकं औतेराव शेतात पिकवायचा फक्त साबणसोडाच विकत घ्यावा लागत होता. शेताला शेणखत वापरायचा. रासायनिक खतं तोकडं वापरलं जायचं. एकूणच कष्टाचा आणि काटकसरीचा संसार सुरू होता.

अशातच दसरा दिवाळी सण येऊन जातात. दिवाळीला बऱ्याची दिवासांनी साखरूचा भाऊ दिगू येतो. दोघा बहिणभावांची सणाच्या निमित्ताने भेट होते. आठवडाभर आहे तोवर येऊन जा. असे तो साखरूला सांगतो. पावसानं पूर्ण दडी मारली होती. डोंगरकपारीतल्या समद्या गावाच्या समाईक डागत गवात कापायला भल्या पहाटे माणसांची रांग लागलेली असे. गवताची एक एक काडी म्हणजे सोन्याच्या किमतीची. गवत कापनीचा लोकांना खूप त्रास व्हायचा. या सगळ्या कामाच्या घाईतच गावात पडद्यावर 'साधी माणसं' हा बोलपट लोकांना दाखवला जातो. शिणलेल्या लोकांना तेवढाचा विरंगुळा. याबरोबरच होळी, इटाबाईच्या मांडावर होणारे खेळे, सुबराव शाहिराचं गाणं यामुळे नांगरगावातील लोकांना काही करमणूकीचा आनंद घेता येत होता.

नदीचं पाणी आटलं. शाळेला सुट्टी पडलेली त्यामुळं गावातील सगळी पोरं नदीकाठाला! मग कैऱ्या तोडायच्या. मव्हाळ्या काढून मध चाखायचा, चिंचा, जांभळाची तर वखरणच. आंब पिकलं की प्रत्येकाच्या माळ्यावर पिंजरात आंब्यांची पिकवानं. ज्यांच्याकडं झाडं नव्हती ती पोरं आंब चोरून शेतातल्या पेडंत माती उकरून आड्या घालायचीत. आंबं खाऊन टाकलेल्या कोयांचं डाव गल्ली वटारात पोरं मांडायची.

औतेरावाचा ऊसाचा सिझन झाला होता. शिवारातला जुंधळा मळून घरी आला होता. कडब्याची बुचाडं बसलेली होती. नांगरट होऊन समदं रान तापत पडलं होतं. उसाला गाडी लावून आलेलं पैसं मिळतील तसं गाडीवानास्नी देऊन औतेराव 'छब्या' बैलाच्या ऋणातनं रिकामा झाला होता. सोगा तटला तवा समदं गाडीवान भावासारं मदतीला धावून आलं होतं. म्हणून त्यांच्याविषयी औतेराव कृतज्ञ होता. माणूस ऋणातून मुक्त होतो. त्यासारखा आनंद नाही. आता मिरगापर्यंत शेतकऱ्यांना फारसं काम नव्हतं. रखमानं घरात बाळूमामाचं नवस फेडायला जायाचं म्हणून भुणभुण लावली होती. पाडव्याच्या आदल्या एकादशीला बाळूमामाचा भंडारा होता. समद्या सिझनला बैलांनी चांगला धंदा केला होता. कुठं कधी तटली – नाहीत. तवा भंडाऱ्याला जावावं, तान्याचा नवस फेडावा नि बैलावरनी भंडारा बी – टाकून यावं असं औतेराव ठरवतो आणि बाळुमामाच्या यात्रेला जाऊन येतो.

सरवडेच्या बाजारच्या दिवशी बाजार करून घरी परतताना कुसाचा विज पडून मृत्यू होतो. आणि कुसाच्या आयुष्याची कायमची फरपट थांबते. दोन वर्ष बघता बघता निघून जातात. नांगरगावात अनेक बदल होतात. हळूहळू जगण्याची रितभात बदलून जाते. पण कष्ट काही संपत नाहीत.

शेवटच्या दोन भागात पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीचे कथानक गतीने पुढे सरकताना दिसून येते. काळाम्मावाडी धरणाचं काम पुरं झाल्यामुळे धरणातून टप्प्याटप्प्याने नदीला पाणी सोडलं जाऊ लागतं. नदीच्या काठावर इंजन बसू लागली. नांगरगावात ऊसाचे क्षेत्र वाढू लागते. नदीला पाणी आलं तसं शेतकऱ्यांची धांदल उडाली. नदीकाठची हिरवीगार गवताची कुरणं नाहीशी झाली. त्यावर झुलणारे फुलपाखरांचे थवे दिसेनासे झाले. दिवाळीनंतर सारं गवत कापलेलं रान मोकळं असायचं. गावची म्हसरं हुंदडत दात घासत फिरायची. गावातील पारांचे छन्नी-दांडूचे, गोट्याचे डाव रंगायचे ते आता कायमचे बंद झाले. गावात जर्सी गाई आल्या तसे गोबरगॅसही आले. दारात पान्याचे नळ आले. बायकांची पाण्याकडून सुटका झाली. यामुळे डासांचं साम्राज्य वाढलं. रोग बळावले. यंदाच्या पावसाळ्यात वेतोबाच्या भिंतीला भगदाड पडतं त्यामुळे मंदिराचा जीर्णोद्धार करणे गरजेचे ठरते. हरिपंत यामध्ये पुढाकार घेतात.

नांगरगावचे 'वेतोबा' हे ग्रामदैवत. गावच्या लोकांचे श्रद्धास्थान असलेले मंदिर जुने असल्याने पावसाळ्यात मंदिराची खूप पडझड झाली होती. भिंतीला मोठे भगदाड पडले होते. एका बाजूने खापऱ्या घेऊनच एक पाक खाली आलेले होते. गावातील जुने वाद बाजूला ठेवून दिवाळीनंतर वारकरी मंडळींना हरिपंत एकत्र करतात. देवळाचं पांघरान काढण्याचं काम हाती घेतले जाते. या कामासाठी गावातील माणसेदेखील मदत करतात. हळूहळू मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी गावातील लोक भरघोस मदत करू लागतात. नरसिंगआण्णा वेतोबाच्या देवस्थानाचा तीन वर्षाचा खंड जीर्णोदरासाठी देतात.

मंदिरावर साध्या खापऱ्या असतात. त्या बदलून मंगलोरी खापऱ्या घालण्याचे ठरते. यासाठी बरेच लाकूड सामान लागणार असते. त्यासाठी धावडा, जांभळासारखी टनक झाडे विकत घ्यावी लागणार होती. एका भिंतीचे नव्याने बांधकाम करावे लागणार होते. मंदिरासाठी आवश्यक लाकूडसामान आणले जाते. विटा, दगड, माती आणण्यासाठी गावातल्या गाडीवान बैलगाड्या जुंपून मदत करतात. सुतारकामासाठी सुतार मदत करतो. गवंडी देवळाच्या भिंतीचे बांधकाम करू लागतात. सदा भूतल, रामा पवार, इठोबा मोरे ही निरपेक्ष भावनेने गवंडी-सुताराच्या हाताखाली राहून मदत करू लागतात. गावातले लोक आपापल्या कामातून सवड काढून काम करत होते. मंदिर उभा राहणं ही गावच्या गरजेची गोष्ट असल्याने मदतीचे हात पुढे येत होते. मंदिरासाठी कमी पडणाऱ्या लाकडाची व्यवस्था सदा भूतल आणि लेझीम मंडळाची पोरं करतात. पुढे वनअधिकारी त्यांची चौकशीही करतो. अशातच पंतांची बायको रखमाचा मृत्यू होतो. बायको गेल्याचे दुःख बाजूला सारून पंत मंदिराच्या कामासाठी स्वतःला झोकून देतात. मंदिरावर मंगलोरी खापरी बसते. फरशी, आतील गिलावे यासारखी कामे पूर्ण करण्याची जबाबदारी तरुण मंडळे उचलतात. मुंबईतील गिरणी कामगारांनी मंदिरासमोरील गाळाने मुजलेला आड रिकामा केला. त्यावर नवे रहाट बसवले. गावच्या लोकांना या आडाचे पाणी मिळणार होते, त्यामुळे गावातील स्त्रिया खुश झाल्या. दीपमाळेचे निसटलेले दगड नीट बसून डागडुजी केली. आता मंदिराचा आवार स्वच्छ आणि प्रशस्त दिसू लागतो. मंगलोरी खापरी बसलेला, रंगवलेला मंदिराचा कळस गावच्या वेशीतून लक्ष वेधून घेत होता. शेती भातीची कामे आटपून गावातले लोक मंदिरासाठी मदत करत होते. नव्या उमेदीने काम करत होते. विस्कटलेली मनांची एकजूट करून पंतांनी

सर्वांना देवाच्या कामासाठी प्रवाहित केलं होतं. देवासाठी आणि गावासाठी त्यांनी आपलं दुःख पाठीवर टाकून मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण केला, त्यामध्ये ते यशस्वी झाले.

आता माळरानात पेरणीची लगबग सुरू होते. यातच गावात ग्रामपंचायतीची निवडणूक लागते. नदीला बारमाही पाणी आले त्याचा रंग निवडणूकीत दिसू लागला. टोकाची ईर्ष्या निर्माण करणाऱ्या निवडणूकीने गावची रीतभात बदलून टाकली. पपेरावचे पॅनल निवडूक जिंकते. धरणाच्या पाणीसाठ्यामुळं बरीच गाव उठली. कालव्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी जाऊन ते भूमिहिन झाले होते. त्यामुळे नांगरगावात बरीच उलथापालथ झाली होती. गावात डांबरी रस्ते आले. शाळा शिकून बेरोजगार तरूणांची संख्या वाढू लागली. गल्लीच्या तिकटी तिकटीवर पानाच्या टपऱ्या दिसू लागल्या. बैल कमी होऊन ट्रक्टर येऊ लागले. घरचं पारंपरिक बियाणं साठवायचा शेतकरी कंटाळा करू लागला. संकरीत वाण शेतात आलं. किटकनाशक, तणनाशकांचा मारा सुरू झाला. पाण्याची उपलब्धता भरपूर झाल्याने तगाची रानं आता पानतुंबी झाली. नापिक झाली. माळाचं मळं झालं नि मळ्यांची गोठणटक्की झाली. गावात आता सर्वच स्तरावर परिवर्तन होत होतं. गाव बदलत होतं.

अशातच सुगीची धांदल सुरू होते. औतेरावला मुतखड्याचा त्रास सुरू होतो. या आजाराने तो हैराण होतो. कामाचा सगळा भार साखरूवर येऊन पडतो. आपला मुलगा तान्याला घेऊन ती नांगरठी करून घेते. बैलाच्या शिंगाला जखम होते. त्यामुळे इच्छा नसताना बैल विकावा लागतो. औतेराव शेतात ऊसाचं पीक घेतो. औतेराव ओढ्यावर कर्लोस्करच इंजिन बसवतो. त्यातच शेतकऱ्याचा कणा मोडणारा असा ऊसावर मावा रोग पडतो. त्यामुळे रोगावर नियंत्रण करण्यासाठी औषध फवारणी करावी लागते. इकडे ऊसाला जादा भाव मिळण्यासाठी शेतकरी आणि कारखानदार यांच्यात आंदोलन सुरू होतं. त्यामध्ये शेतकऱ्यांना यश मिळत. ऊसाला चांगला दर मिळतो. हरिपंत खचू लागतात. त्यांना आपला अंतकाळ समोर दिसू लागतो. यावर्षीची पंढपूरची वारी चुकणार याचं त्यांना वाईट वाटत होतं. औतराव वारी करतो. आता औतेरावही विठ्ठलभक्तीकडे वळला होता. त्यालाही भजन, कीर्तन आवडत होते. कामातून सवड मिळेल तशी तो तुकदेवाकडे मांगरात जाऊन पेटी वाजवायला शिकत होता.

नांगरगाव आता पार बदलू लागला. गावात बैलं क्वचितच आहेत. ट्रॅक्टर शेतात मशागती करत आहेत. गोठ्यात जर्सी गाई आहेत. त्यांच्या शेणामुतांनी उकिरडे भरून वाहात आहेत. सगळीकडं दिवसासुद्धा डासांचं साम्राज्य! मातीची घरं ढासळून सिमेंटच्या पॅकबंद पेट्या उभ्या राहात आहेत. त्याला थंडोसा नाही मातीच्या घरासारखा. मातीची भुई जाऊन फरशी आली. आता आयुष्यभर राबराब राबून हाडाची काडं झालेल्या म्हाताऱ्या आई-बाबाला ठेवायचं कुठं? त्यांचा पाय फरशीवर धरत नाही. म्हातारं माणूस चुकून हागलंमुतलं तर फरशीवरची घाण काय धुऊन सरळ जात नाही. वास राहातोच. मग त्येंच्या पोटाला घालायचं नाही. उपाशीपोटी डोळं झाकायचं. कित्येकांनी आई-बापाची सेप्रेट सोय लावलेली आहे. जुना ढोरांचा सोपा नाहीतर रानामाळातलं घर! येणारा काळ असा बदलत आहे. हरिपंतांनी अंथरून धरलं. त्यांची अन्नपाण्यावरीची वासना उडाली. हळूहळू पाणीही सोडलं. मृत्यूच्या शेवटच्या समयी अडतीस तास हरिपंत

मुखात परमेश्वराचं नामस्मरण करत राहतात. हरिपाठ म्हणत होते.आख्खी पंचक्रोशी हरिपंतांचं शेवटचं दर्शन घेण्यासाठी येते. पंताचा भाऊ हाणमाही मुंबईहून येतो. शेवटी मुलगी मुक्ताही येते. पंतांची प्राणज्योत मालवते. भागातील सर्व वारकरी भजन करीत पंताना अखेरचा निरोप देतात. तेथेच कादंबरीचा शेवट होतो.

## २.३ 'नांगरमुठी' कादंबरीतील आशयसूत्रे

मराठीतील अलीकडील गेल्या दशकातील ग्रामीण कादंबरीचा विचार करता पांडुरंग पाटील यांची 'नांगरमुठी' कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. दर्या प्रकाशन कडून २०२४ साली ही कादंबरी प्रकाशित झाली. अल्पावधीतच या कादंबरीने मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. या कादंबरीमध्ये शेतीमध्ये रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांची, त्याच्या संघर्षाची गोष्ट लेखक पात्रांसमोर ठेवतो. ग्रामीण जीवनशैलीचे विविध पैलू कादंबरीत चित्रित झाले आहेत. शेतकरी, त्याची शेती करण्याची पद्धती, शेतीसाठी करावे लागणारे काबाडकष्ट, ग्रामीण जीवनातील  रीतीभाती, सामाजिक संबंध, शेतीसमोरील आव्हाने, प्रश्न, समस्या यांचे चित्र कादंबरीमध्ये येते.

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीत येणारी आशयसूत्रे ही तिच्या प्रादेशिक वैशिष्ट्यातूनच आलेली आहेत. वेळोवेळी बदलणारे ऋतुचक्र, शेतीमातीविषयी शेतकऱ्यांच्या मनात असणारे अपार  प्रेम आणि कृतज्ञता भाव, बारा महिने शेतात काबाडकष्ट करणारे शेतकरी, निसर्गाची अवकृपा, निसर्गासमोर हतबल होणारा कष्टकरी शेतकरी, त्याच्या आयुष्यातील चढउतार, गाव, निसर्ग, निसर्गाचा लहरीपणा, सुगी, गावातील एकमेकांमधील समूहभाव, गावचे राजकारण, हरिपंत आणि गावकरी यांच्यातील ऋणानुबंध, पंढरपूरच्या विठ्ठलाविषयी मनात असणारा श्रद्धाभाव, गावपांढरीविषयी प्रेम, शेतात पिकवलेल्या पिकासाठी योग्य भाव मिळावा लागणार संघर्ष इत्यादी आशयसूत्रे 'नांगरमुठी' कादंबरीत आलेली आहेत. थोडक्यात वरील आशयसूत्रांचा विचार करू.

### २.३.१ कृषिनिष्ठ जाणिवा

कृषिनिष्ठ जाणीव हे 'नांगरमुठी' कादंबरीतील मुख्य आशयसूत्र आहे. 'नांगरमुठी' कादंबरीत नांगरगाव या छोट्याशा खेडेगावाचे चित्रण येते. गावातील लोकांचे जगण्याचे साधन म्हणजे शेती. शेतीवरच गावातील लोकांची कुटुंबे अवलंबून असलेले दिसून येतात. याच शेतीवर काही जोडधंदे असल्याचे दिसतात. शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी, त्याचे कष्ट, लहरी निसर्गाशी करावा लागणारा संघर्ष, शेतीमातीविषयी मनात असणारा कृतज्ञता भाव या साऱ्या गोष्टींचे चित्रण कादंबरीत आलेले आहे. कादंबरीत औतेराव आणि साखरू या कष्टकरी शेतकरी जोडप्याचा जीवन संघर्ष आहेच, त्याबरोबर गावातील इतर कष्टकरी शेतकऱ्यांचे जीवनही चित्रित झाले आहे. शेतकऱ्याच्या जीवनात त्यांच्यासोबत कष्ट करणारे शेतकऱ्याचा आधार समजले जाणारे बैल यासारख्या प्राण्यांचा गोतावळा येतो. त्यांच्याविषयी प्रेम येते. पिकांची पेरणी, कापणी, मळणी, झोडणी करण्यापासून ते नांगरट करण्यापर्यंतचा श्रम संस्कृतीचा लेखाजोखा पांडुरंग पाटील यांनी 'नांगरमुठी' कादंबरीत

मांडला आहे. त्यामुळे कृषिनिष्ठ जाणीवा कादंबरीतील मुख्य असे सूत्र असून त्याभोवती अनेक पुरक आशयसूत्रे आली आहेत.

शेतीमातीविषयी शेतकऱ्यांच्या मनात कृतज्ञता आणि श्रद्धाभाव असलेला दिसून येतो. कादंबरीत अनेक ठिकाणी त्याचे चित्रण आले आहे. शेतकऱ्यांसाठी शेती हा केवळ एक जमिनीचा तुकडा नसून त्याच्यासाठी ते सर्व काही असते. आपल्या परंपरेत भूमीविषयी असणारा आदरभाव शेतकरी भूमीची पूजाअर्चा करून प्रकट करताना दिसतो. शेतीशी निगडीत असणाऱ्या वेगवेगळ्या विधीविधानांमधून त्याच्या ठिकाणी असणारा कृतज्ञताभाव दिसून येतो.

भुईंब पुजनाच्या विधीचे वर्णन पाहता येईल. 'अशातच भुईंब आली. साखरूनं नवी कोरी बेळाची बुट्टी सारवली होती. तिला चुन्याच्या पाच पाकळ्या काढल्या. पाच जागी मधोमध वर्तुळ रेखली. आता वर्षभर ही 'अन्नपूर्णा' शेताकडं जेवणखान भरून जाणार होती.

भाताची कापणी पूर्ण झाल्यानंतर समद्या कुरवाडणी 'सीतामाई' म्हणून लोंबीसकट भाताचं पाच आवं ठेवतात. 'सीता' ही धरित्री आईची लेक. शिजलेल्या भाताच्या दाण्याला 'सीत' म्हणतात. इतका जवळचा संबंध आपल्या जगण्याशी पूर्वजांनी जोडलेला आहे. सीता ही फक्त रामायणातील प्रभू श्रीरामांची पतिव्रता स्त्री न राहता कृषिसंस्कृतीतील अस्मितेचे प्रतीक ठरते.

साखरूनं समदं निवद बोनं बुट्टीत भरून गाडीत नेऊन ठेवलं. घरातली समदीजण आज भुईंब पुजायला बैलगाडीतनं निघाली होती. जेंची शेतं लांब होती त्या प्रत्येकाच्या बैलगाड्या घरातली माणसं घेऊन शेताकडे दौडत निघाल्या होत्या.

शेतात आल्यावर 'सीतामाईच्या' पुढ्यात साखरूनं डबरा काढला. त्यात दसऱ्यातलं सोनं, कुंभ-दर्भ-लव्हाळा घातला. इथं दर्भ म्हणजे 'कुश' आणि लव्हाळा म्हणजे 'लव'. ही सीतेच्या मुलांचीच नावं येतात. दहीभात धरतीच्या पोटात घालून साखरूनं डबरा बुजवला. त्यावर नवं कापड घडी करून अंथरले. खांडव्यात नदीकडून आणून पूजलेलं पाच खडं होतं. ते धुवून चुण्यानं रंगवलं नि कापडावर ठेवलं. तेला हळद-कुंकू लावून फुलं घातली. नवरात्रीची मंदिरातून आलेली वात ठावक्यात तेल घालून लावली. दिवा ओवाळला. रखमानं काळ्या आईपुढं हात जोडलं नि म्हणाली,

आई अशीच धनधान्यानं तुझी वटी भरू दे. पोरंबाळं, गुरंढोरं तवानी हुंद्यात!' (पृ.४२-४३) पेरणी, भात कापणी वेळी ही शेतीची पूजा केली जाते. शेतीमातीविषयीचा शेतकऱ्यांच्या मनातील कृतज्ञता भाव या ठिकाणी दिसून येतो. पेरणी करताना पेरणीसाठी वापरली जाणारी औजारे त्यांची पूजा केली जाते. पेरणी करण्यापूर्वी कुरीची पुजा केली जाते. जमीनीला पडून असणारी रखमाही पेरणीच्यावेळी उत्साहाने उठते.

तसेच भातकापणीला सुरुवात करतानाही शेतीची पूजा करून, शेतामध्ये दहीभात शिंपडून कापनीला सुरुवात केली जाते. 'औतेरावानं बैलं गाडीला जुपली नि तो खळ्यावर आला. बैलं सोडून झाडाच्या सीवलीला बांधली. गाडीतलं समदं सामान उतरून मांगरापुढच्या खोपीत ठेवलं. दहीभात काढला. उदबत्ती

लावली. रासमोरी फूडा करून नारोळ वाढविला आणि मैरी देवाला हात जोडलं. प्रसाद काढून बांधावर ठेवला. दहीभाताची शितं भोतीभर फेकली आणि खुरपं घेऊन भात कापायला बसला.'(पृ.१६)

शेतकऱ्यांच्या जीवनात पेरणी आणि मळणी ही शेतकऱ्यांसाठी एक लढाईच असते. पावशा पक्षी पाऊस येण्याचा सांगावा घेऊन आला की पेरणीची लगबग सुरू होते. शेतकऱ्याला पेरणीचे वेध लागतात. अंथरूण धरलेली रखमा पेरणी वेळेत झाली पाहिजे यासाठी उत्साहाने उठते. ''पेरणी पाण्याचं दिस आलंत. माझ्या भोवती घर गुतपळून बसलं तर शिवार पेरायचा कधी मलाच झाडझाड करून उठून बसलं पाह्यजे.' असं म्हणून रखमा पेरणीच्या दिवशी कुरीच्या पूजेची तयारी करू लागते. ती म्हणते ''आज रोह्यन्या निघल्या न्हवं? भात पेराय म्होतूर करायचा.''

त्यावेळी साखरूने फडताळातून सुई-दोरा नि बिब्बा काढून दिला. रखमानं बिब्बा दोऱ्यात वोवला. पंज्याचं फडकं फाडून तुकडा घेतला. पाण्यात हाळद कालवून रंगवला. त्यात गवराबाईच्या वटीतलं तांदूळ बांधलं. ती वटी कुरीला बांधायला दिली.

साखरूनं दारात वावभर जागा सारवला. पंतांनी सुताराकडून बांधून आणलेली कुरी त्या जागेवर ठेवली. कुरीच्या चाड्यावर डुईची फटकुराची टापर घातली. साखरूनं शेणाची बुडुकली करून बेवळा भरला. त्यावर झाकण लावून चार फणाजवळ चार अशी ठेवली. दाराच्या चौकटीत बसून रखमा तो सोहळा बघत होती. सवास्नीनी कुरीला हळदीकुंकू वाहिलं. फुलं घातली.

आगं रखमाआत्तीला हळद-कुंकू लावा की गंऽऽ व्हिना तर तरंगत बाहीरपातूर आलिया. कुणीतरी स्त्री म्हणाली.

रखमाला कुंकू लावलं तसं तिच्या चेहऱ्यावर हासू उमटलं. थरथरत्या हातानी तिनं कुरीला दोनदा हात जोडल. नि म्हणाली,

भरली बांधली माझी मैनाऽ असंच प्वाट पाणी पिकू दे! गुरंढोरं मायंदाळा चारा खाऊद्यात. गडी माणसं, पोरं बाळं सुखात राहूद्यात!!'' (पृ.९८)

पेरणी बरोबर सुगीतील भात कापणी आणि मळणीचे चित्रही कादंबरी येते. शेतातील ही खूप महत्त्वाची कामे. वर्षभर राबून शेतातील भातपीक घरात आणेपर्यंत सर्व कामे शेतकऱ्यांसाठी खूप त्रासदायक आणि कष्टकारक असतात. भातकापणी तसेच मळणीसाठी गावातील माणसे गोळा करण्यापासून मळणी, झाडणीपर्यंत शेतकऱ्याला खूप कसरत करावी लागते. त्याचे सूक्ष्म तपशीलवार चित्रण कादंबरीत येते.

''भाजलेल्या शेंगांचं चार चार दाणं तोंडात टाकीत गडी घुत्तीला डसलंत. कवळीला हात घातला की हाताला चटका बसत होता. मासळी परमाळती तसा वास घुत्तीतनं येत हुता. एका फेऱ्याचं घुत्ताड ठेवून सगळं भात खळाभर इस्कटलं. रुळ फिरू लागला.

बरं मंडळी आता च्या घ्या. हरिपंत म्हणालंत तसं प्रत्येकानं वाटकं भरून चहा घेतला. बचक्याएवढी एक एक वर्की वाटणीला आली. वर्कीसंगट गडी चहा व्हरपू लागलं. घटकाभर बैलं फिरली जरा थांबवली.

तिसरा फेर वडून झाला. पुन्हा रुळ गडगडत फिरू लागला. पंतांनी आभाळाकड बघितलं पावसाचा माडं मोडला होता. चंद्र मावळतीला उतरला होता. काजव्यांचे घोस झाडपीत इ्याकऽ पुकऽ करीत होते.

तासभर मळाप झालं. रानबानं पिंजराच्या घसाड्याचं शेंडं धगावर धरलं. एकबी लाही उडली नाही. तसा तो मळणकऱ्यांना म्हणाला,

''मळाप नंबर एकच झालंय. खरडासुद्धा लोंबटाला हायल्याला न्हाई.

तशी तळझाडणी सुरू झाली. खाली वाकून पिंजार वडून हालविलं तसं भाताचं दाणं वाळूगत पायावर बरसत होतं. पिंजरातनं तोंड घालून फटकुऱ्या बैल भाताच्या मदनाचं तोबरं वळू लागला. आता कोण कुणाशी बोलत नव्हतं. निमूटवाणी जो तो झपाट्यानं कामाला जुपला होता. सूर धरून विलक्षण गती घेतलेली साखळी पुढे सरकू लागली. मळणकऱ्यांची पाठवानं भरली. पहाटेच्या गारठ्यातही अंग आंबून गेलं. घामानं पाठीचं नळ पाझरू लागलं. पण कुणीच तिकडं लक्ष दिलं नाही. पेरणी आणि मळणी ही शेतकऱ्यांसाठी एक लढाईच आसती.

तळ झाडणी झाली. तसा गड्यांनी तोंडात आलेला खाकरा काढला. घामानं चिंब झालेली तोंडं पुसली. पाणी पोटात गेल्यावर जरा त्यांची ध्यायी थंड झाली. रुळानं परत पिंजार बस्तं केलं आणि औतेरावानं रुळ बाहेर काढला. बैलं सोडून मांगरात नेऊन बांधली.

पुन्हा एकदा अखेरचं झाडाप सुरू झालं. झोडल तसं पिंजार खळ्याबाहेर कडपीला पडू लागल. त्या कडप्या वाळवायला रिकाम्या वावरात जाऊन पडल्या. दम, ताकद आणि कामाची टग्गळ असणारा गडीच मळणीला टिगतो. लेच्या-पेच्या गड्याचं ते काम नव्हं.'' (पृ.२५) सुगीतील भातमळणी हे एक शेतकऱ्यासाठी आव्हानात्मक काम असते. या कामाबरोबर शेतात वर्षभर अनेक कामे सुरू असलेली दिसून येतात. गवत कापणीही खूप कष्टाचे काम असे.

''गवताची एक एक काडी सोन्याची! चार महिने उसाचा सिझन सोडला तर नांगरगावात ढोरास्नी चाऱ्याचा प्रश्न मोठा होता. डोंगरउतारावर पूर्वी सागाचं घनदाट जंगल होतं. त्यातील झाडांची बरीच तोड झाली. गवत वाढू लागलं.

डोंगरावर समदी माणसाची पांढर फुलली होती. पाता धरून माणस गवात कापत होती. शेड गवात असलं की काय वाटत नव्हत. पण गजानीच गवान कापताना खुरप्यातनं एखादी काडी राहिली नि मूठ ओढली तर बोटाच्या हाडापर्यंन काडी कापायची, कुसळटीच्या गवताचं आग्या काम होतं. ऊन लागल तसं धुसकाट नाकातोंडात जात होतं. तुऱ्याची कुसळ बायकाच्या अंगावर पडत. त्याला बाणासारखं तोड. माणसाची हालचाल जशी होईल तसं ते ब्यान कापडातनं बाहेर येत नाही तर आतच शिरत. आंगाचा आग-डोम होतो. खांजळायचं तरी किती

असा आगीचा बंब कचाकचा टोचत गवात कापायचं. उतारावर चेपल्या धरत नव्हत्या. म्हणून साखरूनं काढून ठेवल्या होत्या. अनवाणी पायाच्या टाचत सड्या घुसत होत्या. रक्ताचे थेंब गळत होतं. खरं त्याकडं लक्ष देऊन तेगार करायला वेळ हाय कुणाकडं

एका डागंत शंभर माणूस! त्यांची तहानबी तशीच. जीभ तुटलेल्या नळ्यातनं पाणी पडतंय तसं माणसं नुकती घटाघटा पाणी प्यायची. दिवसभर पाणी आणायला चौघं गडी ठेवल्यालं. त्यात हांडे पाटलानी बदलाला आणलेला बोरवडंचा पाव्हणा होता.

चार दिवस असं कडा येंगून कापलेलं गवत आणायला मग घाई सुरू व्हायची. औतेरावानं उसाकडे खाडा केलेला. मेसकाटीची बेळं काढून सांजच्यालाच त्याने जोडणी केलेली. निम्मा ध्याडा भारं घालण्यात गेला. वाडीच्या दोन बायका जादा सांगितल्या होत्या. दुपारनं फुडं चाळीसभर भारा कड्याच्या करपाडीतून पायाची बोटं रुतवत तळवटात उतरला. पायाच्या पेंढऱ्या, छाताड भरलं. दम टाकायला येईना.

बैलगाडी भरायची. डोंगराच्या घसारतीला सोग्याला शाना बैलच पाहिजे. धिंदरा बैल झाला तर गाडी उलटलीच म्हणून समजा. गवताच्या गाड्या कुडनात आणून भारं सोडायचं. तळाला घाणेरीचं कळकीचं काटवान हुंदीर लागूने म्हणून टाकायचं. त्यावर गवताचं फेर धरून गंजी रचायची. (पृ.५९)

नाचणी काढणे, जुंधळा राखण, भातावरील घोंघाण रोग, ऊसावरील मावा रोग घालवण्यासाठी शेतकऱ्याला जीवाचे रान करावे लागते. ज्यावेळी ऊसावर मावा रोग शेतकरी जीवनाचा कणा मोडणारा रोग वाटतो. या रोगाचं भयानक वास्तव कादंबरीत येते. 'कारखाना सुरू झाला. एकरभर उसाचं रान खडसलं तरी ट्रॉली भरेना उसाला तोटार दिसेना. उसाचं भारं बांधायचं कशानं उसाचं कवळं मारून ट्रॉल्या भरायच्या. ट्रॉलीची वडणी व्हावी म्हणून नारळीची पानं आणून टापचं भारं बांधून वर चढवायचं. ढोरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला. चांगली दुधाळ ढोरं वैरणीअभावी विकायची पाळी शेतकऱ्यावर आली. पुढंपाटी पोरास्नी उसाचं कांडंतरी खायला मिळतंय का न्हाई कुणास ठाऊक असं वाटू लागलं. किती डुया झाल्या पण हा मावा पूर्वी कधी पाहिला नव्हता. पहिल्यांदाच उसावर ही बलामत आली होती. त्यात शेतकरी जीवनाचा कणाच मोडला.'

उसाला लागलेलं खत, इंजनाचं तेल, औतनी, औषध फवारणी, भांगलण, तोडणी हा सारा खर्च वजा जाता फारसं काही हाती लागतं नाही. फायदा होता तो माव्यानं खाल्ला. सगळी रक्कम सोसायटीच्या कर्जाला वजा झाली. कर्ज शेतकऱ्याला ओरबडून काढतं. त्यात तो सत्व आणि स्वत्व गमावून बसतो. त्याचं जगणं केविलवाणं होतं.(पृ.१४७)

तसेच आपल्या ऊसाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी रस्त्यावर उतरावे लागते. संघर्ष करावा लागतो. ग्रामीण भागातील शेतकरी शेतीबरोबर जोडधंदा म्हणून पशूपालन करत असतो. शेळी, म्हैशी, गाय, शेतीच्या कामासाठी बैल यासारखा गोतावळा त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला असतो. याची अनेक उदाहरणे कादंबरीत आली आहेत. औतरावचा अस्वल्या बैलाचा अपघाती मृत्यू होतो, त्यावेळी

औतेराव पूर्णपणे खचून जातो. त्याचे जीवनच बैलांवर अवलंबून असते. तसेच गोठ्यातील एक बैल आजारी पडतो त्यावेळी घरातला माणूस आजारी असल्यासारखं सर्वांना वाटते. बैल आजारी पडला म्हणून तो विकायचा हे त्याला पटत नाही.

शेती आणि शेतीभोवती गुंफलेले ग्रामजीवन हे या कादंबरीचे मुख्य आशयसूत्र आहे. शेती हा इथला जीवनाचा कणा आहे. ते त्यांचे जीवन आहे. काळ्या आईला दैवत्व बहाल करून शेतकरी कोणतीही तक्रार न करता जगत असतो. औतेराव आणि त्याचे कुटुंब तसेच नांगरगावातील अनेक शेतकरी, शेतीवर अवलंबून असणारे मजूर या सर्वांचे जीवन शेतीवर अवलंबून असते. त्यामुळे कादंबरीतील अनेक घटनाप्रसंग हे शेतीमातीशी निगडीत असलेले दिसून येतात. या कृषिनिष्ठ जाणिवांचा शेतकऱ्याला तग धरून उभे राहायला सहाय्यभूत ठरत असतात.

**२.३.२ गावातील राजकारण आणि ग्रामपंचायत निवडणूक**

'नांगरमुठी' कादंबरीत एका छोट्याशा खेडेगावात घडणाऱ्या घटना आणि प्रसंगाचे चित्रण येते. हरीपंत हे गावातील मंदिराच्या जीर्णोद्धाराचं काम पुढाकाराने करत होते. या कामातही राजकीय हस्तक्षेप होतो. गावातील काही लोकांचा या कामासाठी अंतर्गत विरोध असतो. पंताच्या माघारी देवळासाठी जंगलातून चोरून आणलेले सागवानची बातमी फॉरेस्टयला कोणीतरी देतं; त्यातून तणाव निर्माण होतो हा सुद्धा राजकारणाचाच एक भाग आहे. गावात नरसिंगआण्णा आणि पपेराव सावंत असे दोन गट असतात. या दोघांमध्ये नेहमी राजकीय कुरघोडी घडत असते. मंदिराच्या जीर्णोद्धारावरून दोन्ही गट एकमेकांसमोर वादावादी करतात. नरसिंगआण्णा जगताप हे वीसेक वर्ष गावचे सरपंच होते. गावातील एक प्रतिष्ठित सावकार घराणं म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जाते. गावात एकरभर जागेत तटबंदी असलेला जगतापांचा मोठा वाडा होता. पूर्वापार चालत आलेल्या सव्वाशे एकर जमिनीचे ते मालक होते. दोन फरसबंदी लांबरुंद खोलीच्या विहिरी शेतात होत्या. त्यावरती मोठी इंजिन होते. त्यामुळे सर्व गाव त्यांच्या शेतात राबत होते. त्यांचा मुलगा धनंजय कोल्हापूरला डॉक्टर होता. एकूणच नरसिंगअण्णांना गावात मान होता, त्यामुळे गावावर त्यांचा वचक होता. पण पपेराव सावंतामुळे त्यांच्या गावातील वर्चस्वाला शह बसण्याची चिन्ह होती.

पपेराव हा मुंबईला गिरणी कामगार म्हणून काम करत होता. गिरणी संपात तो कामगारांचा लीडर होता. त्यामुळे तशा प्रकारची लीडरशिप तो गावात करू पाहत होता. त्याला गावात मुंबईहून परतलेल्या गिरणी कामगारांचा पाठिंबा होता. तसेच त्याने गावात दूध डेअरी काढली होती. या जोरावर पपेराव गावात आपली राजकीय ओळख निर्माण करत होता. याउलट सहकारी सोसायटी, दूध डेअरी, ग्रामपंचायत असणाऱ्या नरसिंगआण्णांना पपेराचा गावातील राजकारणातला शिरकाव खुपत होता. त्यांचं राजकारण कसं मोडीत काढायचं याचा ते विचार करत होते. देवस्थानच्या जमिनीच्या लिलावावेळी त्यांच्यामध्ये वाद होतो, गावात दोन राजकीय गट निर्माण होतात याचा परिणाम सर्व गावावर होतो. गावात भावाभावात घरावरून, शेतीच्या बांधावरून, भांडण होऊ लागते यातून कोणी शेतीचे पाणी अडवू लागते तर कोणी रस्ता अडवू लागतात, यातूनच पुढे कोर्टकचेरी होऊ लागते. यामुळे गावातलं सगळं वातावरण दूषित होऊ लागते.

सहकारात राजकारण शिरते आणि गावची शिस्त बिघडते. गावच्या ग्रामपंचायतच्या निवडणुकीमध्ये हे दोन्ही गट एकमेकांसमोर उभे ठाकतात. ग्रामपंचायतीच्या नऊ जागेसाठी नरसिंगआण्णांच्या विरुद्ध पपेराव सावंत दंड थोपटून उभे राहतो. अशातच तिसऱ्या वेळी निवडणूक जिंकून वरच्या राजकारणात शिरण्याचा आण्णांनी चंग बांधलेला असतो. मंदिराच्या कामातली त्यांची भूमिका, देवस्थानच्या जमिनीच्या घरकुलाचा प्रश्न या गोष्टी त्यांच्या इमेजला धक्का लावणाऱ्या होत्या, हे मुद्दे घेऊनच पपेराव आण्णांच्या विरोधात प्रचार करू लागतो. या निवडणुकीत साम-दाम-दंड-भेद या नीतीचा वापर करून दोन्ही गटांमध्ये रस्सिखेच सुरू होते. यातच पंतांनी समोपचाराने तोडगा काढून निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी केलेले प्रयत्नही फारसे कामी येत नाहीत.

नदीला बारमाही पाणी आलं होतं. त्याचा रंग ह्या निवडणुकीत दिसू लागला. दारूचं गुत्तं फुल्ल झालं. हापापलेल्या माणसांना पैसे, साड्या वाटून त्यांच्याकडून यल्लमाच्या परडीवर हात मारून शपथा घेतल्या गेल्या. रात्री-बेरात्री कुणाच्यातरी दारावर थाप पडून गुप्त मत फोडाफोडी चालली. शेताशिवारात चोरून गाठीभेटी सुरू झाल्या. त्या अमिषाला जो बळी पडत नव्हता त्याच्यापुढे तू कसा अडचणीत येणार ही भीती घालण्यात आली. दारुडे, फुकटे आणि काही मजबूर लोक पैसे घेऊन चुपचाप बसले. पण उद्या आपल्या तोंडाला पानं पुसली जाणार आहेत हे कळूनही त्यांनी आपल्या मताचा पवित्र अधिकार गमावला होता.

एक नंबरच्या वार्डात गणपा बारडाच्या विरोधात भाऊ वाइंगड्या उभा होता. त्यांच्यात तर पहिल्यापासून टोकाची ईर्षा होती. एकमेकांस बघून घेण्याची भाषा झालेली होती. गावातलं तंग वातावरण पाहून पोलिसांची छावणी पडली होती.

निवडणुकीचा दिवस उजाडला. सकाळपासूनच कार्यकर्ते कामाला लागले होते. सकाळी थोडी पातळ असणारी मतदारांची गर्दी बारानंतर वाढू लागली. पपेरावानं बाहेर कामाला असणारी माणसं गाडी करून आणली होती. वाघजाईजवळ त्यांना थांबवलंय हे कळताच नरसिंग आण्णांची माणसं तिकडं धावली. प्रकरण हातघाईवर आलेलं बघून पोलिसांनी गर्दी पांगवली. मतदारांना सुरक्षितपणे केंद्रावर आणलं. किरकोळ वादावादी सोडता मतदान शांततेत पार पडलं.

निकालाचा दिवस उजाडला. दोन्ही बाजूचे उत्साही कार्यकर्ते गाड्या घेऊन तालुक्याला हजर! मतमोजणी सुरू झाली. दुपारी एकनंतर वॉर्डवाईज निकाल बाहेर पडू लागला. एक नंबरच्या वॉर्डाचा निकाल बाहेर पडला. पपेरावानं तो वॉर्ड जिंकला. गणपा बारडाच्या विरोधात भाऊ वाइंगड्या नऊ मतांनी जिंकला. तसा त्यांचा एकच जल्लोष सुरू झाला.

''त्येच्या मायला वडरांच्याऽ... बेन्यानी डाव दिलाऽऽ... कशी गावात ऱ्हात्यात ते बघतोचऽऽ!'' गणपा दात, ओठ खात शिव्या देऊ लागला. पण नरसिंगरावांनी त्याला शांत केलं. दुसऱ्या वॉर्डात नरसिंग आण्णांच्या शिटा पंचवीस मतांनी वाढून आल्या. तसा त्या गटानं गुलाल उधळायला सुरुवात केली. तिसऱ्या वॉर्डाकडं लक्ष लागलं. त्यात पपेरावच्या दोन शिटा काटावर आल्या तर आण्णांची शीट तातोबा पवारचा पोरगा बंडा पंधरा मतांनी निवडून आला. हरिपंतांच्या खास मर्जीतील ही पवाराची माणसं. कित्येक वर्ष

त्यांचा घरोबा होता. शेताशिवारात पैरा चालत आला होता. पण नरसिंग आण्णांनी दलाल बंडाला बरोबर हेरून आपल्याकडं फोडलं होतं. पण तरीही पपेराव पाच-चारनं निवडणूक जिंकला. नरसिंग आण्णांच्या आशा धुळीस मिळाल्या. हा पराभव त्यांच्या जिव्हारी लागला.

रात्री पपेरावची भव्य मिरवणूक गावात निघाली. लेझीम, ढोल, ताशांचा कडकडाट सुरू होता. फटाकड्या, बाँब फुटत होते. नरसिंग आण्णांची माणसं आपल्या सहकारी संस्थेच्या दारातल्या पायरीवर बसलेली होती. मिरवणूक समोर आली नि एकानं फटाकड्यांची माळ त्या लोकांच्या पुढ्यात लावली. तशी संस्थेत टोणगं घेऊन बसलेली लोकं मिरवणुकीवर तुटून पडली. गणपा बारड सर्वात पुढे होता. काठीचं तडाखं बसून कुणाचं डोकं फुटलं, कुणाचा हात मोडला तर कोण पळू लागला. पपेरावची लोकं सावरली. काहींनी शेजारच्या घरात शिरून हाताला गावेल ते घेऊन धावण केलं. जोराची दगडफेक सुरू झाली. कोण कुणाला मारतंय ते अंधारात कळेना झालं. बायकांच्या किंकाळ्यांनी नि जमावाच्या ओरडण्यानं परिसर आक्रंदून गेला. यातून बोध घेऊन काहींनी राजकारणी माणसाची कायमची संगत सोडली. काही बदला घ्यायची भाषा बोलू लागले. गावची रीतभात बदलून गेली.

**२.३.३ वेतोबाच्या मंदिराचा जिर्णोद्धार**

नांगरगावचे 'वेतोबा' हे ग्रामदैवत. गावच्या लोकांचे श्रद्धास्थान असलेले मंदिर जुने असल्याने पावसाळ्यात व मंदिराची खूप पडझड झाली होती. भिंतीला मोठे भगदाड पडले होते. एका बाजूने खापऱ्या घेऊनच एक पाकं खाली आलेले होते. अशा पडक्या अवस्थेत असणाऱ्या मंदिरात दसऱ्याला नवरात्री राहून जातात. देवळात भजन, हरिपाठही होत होता. हरीपंतांना मात्र या मंदिराच्या अवस्थेची काळजी वाटत होती. त्यामुळे पंत देवळाच्या जिर्णोद्धाराचे काम करायचं निश्चय करतात. गावातील जुने वाद बाजूला ठेवून दिवाळीनंतर वारकरी मंडळींना ते एकत्र करतात. देवळाचं पांघरान काढण्याचं काम हाती घेतले जाते. या कामासाठी गावातील माणसेदेखील मदत करतात. हळूहळू मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी गावातील लोक भरघोस मदत करू लागतात. नरसिंगआण्णा वेतोबाच्या देवस्थानाच्या तीन वर्षाचा खंड जिर्णोद्धारासाठी देतात.

मंदिरावर साध्या खापऱ्या असतात. त्या बदलून मंगलोरी खापऱ्या घालण्याचे ठरते. यासाठी बरेच लाकूडसामान लागणार असते. त्यासाठी धावडा, जांभळासारखी टनक झाडे विकत घ्यावी लागणार होती. एका भिंतीचे नव्याने बांधकाम करावे लागणार होते. यासाठी पंत धावपळ करत होते. मंदिरासाठी लागणारे साहित्य गोळा करण्यासाठी पंत सतत घराबाहेर असत. मंदिरासाठी आवश्यक लाकूडसामान आणले जाते. विटा, दगड, माती आणण्यासाठी गावातल्या गाडीवान बैलगाड्या जुंपून मदत करतात. सुतारकामासाठी सुतार मदत करतो. गवंडी देवळाच्या भिंतीचे बांधकाम करू लागतात. सदा भूतल, रामा पवार, इठोबा मोरे ही निरपेक्ष भावनेने गवंडी-सुताराच्या हाताखाली राहून मदत करू लागतात. इठोबाची गाडी तर नदीतून पाणी आणण्यासाठी हौद घेऊन देवळाजवळच होती. गावातले लोक आपापल्या कामातून सवड काढून काम करत होते.

मंदिर उभा राहणं ही गावच्या गरजेची गोष्ट असल्याने मदतीचे हात पुढे येत होते. पंतांच्या घरी सुतार, गवंडी जेवायला येत. अशातच मंदिराच्या शेवटच्या कामासाठी लाकूड कमी पडते. मंदिराचं काम थांबते. पंत त्यासाठी काहीतरी मार्ग काढण्याचा विचार करत होते. अशा अवस्थेत एका रात्री सागवानाच्या दोन गाड्या लाकूड गावच्या गावंदरीत आणून पिंजराच्या व्हळीखाली लपवले जाते. रात्रीच्यावेळी मंदिरासाठी लागणारे लाकूड तासून मंदिराकडे नेले जात होते. हरिपंतांना या गोष्टीची काहीच माहिती नसते. ते पैशाची जमवाजमव करण्यात गुंतलेले असतात. या गोष्टीची फॉरेस्टरला माहिती होते. फॉरेस्टची माणसे आणि फॉरेस्टर छापा टाकतात. लाकूड पकडले जाते. त्यावेळी पंतांना या गोष्टीची कल्पना येते. जंगलातून चोरून सागवान कोणी आणले? कधी आणले? याचा शोध सुरू होतो. हरिपंतांवर लाकूड चोरून आणल्याचा आरोप केला जातो. लोक काहीही बोलू लागतात. हरिपंताची चौकशी होते. त्यांची बाजू घेण्यासाठी कोणी पुढे येत नाही. शेवटी सदा भूतलने लेझीम मंडळाची पोरं घेऊन रात्रीचे सागवान चोरल्याची तो फॉरेस्टपुढे कबुली देतो, की साहेब माझ्यासाठी नाही गावच्या देवळासाठी मी चोरी केलीया. खरं आतापातूर ज्यांनी ज्यांनी घराला सागवान आणलंय त्यास्नीबी अटक व्हायला पाहिजे! मी तुरुंगात जायला तयार हाय. त्यावेळेस साहेब विचारात पडतात. पंतांना मात्र या गोष्टीचे खूप वाईट वाटते.

अशातच पंतांची बायको रखमाचा मृत्यू होतो. बायको गेल्याचे दुःख बाजूला सारून पंत मंदिराच्या कामासाठी स्वतःला झोकून देतात. मंदिरावर मंगलोरी खापरी बसते. याबरोबरच मंदिराचे अपूर्ण असणारे कामही पूर्ण करावे लागणार होते. फरशी, आतील गिलावे यासारखी कामे पूर्ण करण्याची जबाबदारी तरुण मंडळे उचलतात. मुंबईतील गिरणी कामगारांनी मंदिरासमोरील गाळाने मुजलेला आड रिकामा केला. त्यावर नवे रहाट बसवले. गावच्या लोकांना या आडाचे पाणी मिळणार होते, त्यामुळे गावातील स्त्रिया खूश झाल्या. मंदिराच्या आवारात मोडक्या बैलगाड्या, कुणाचं घरचं काढलेले सामान अशा अनेक टाकाऊ वस्तू पडलेल्या होत्या, त्या सर्व बाजूला करून मंदिराचा आवाज स्वच्छ केला जातो. दीपमाळेचे निसटलेले दगड नीट बसून डागडुजी केली. आता मंदिराचा आवार स्वच्छ आणि प्रशस्त दिसू लागतो. मंगलोरी खापरी बसलेला, रंगवलेला मंदिराचा कळस गावच्या वेशीतून लक्ष वेधून घेत होता. शेती भातीची कामे आटपून गावातले लोक मंदिरासाठी मदत करत होते. नव्या उमेदीने काम करत होते. विस्कटलेली मन एकजूट करून पंतांनी सर्वांना देवाच्या कामासाठी प्रवाहित केलं होतं. देवासाठी आणि गावासाठी त्यांनी आपलं दुःख पाठीवर टाकून मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण केला, त्यामध्ये ते यशस्वी झाले.

**२.३.४ ऊस आंदोलन**

नांगरगावाला धरणाचे पाणी आल्याने आता उसाचे क्षेत्र वाढले होते, पण उसाला म्हणावा तसा भाव मिळत नव्हता. शेतात उभ्या असणाऱ्या पिकाला जादा भाव मिळावा असे प्रत्येक शेतकऱ्याला वाटत होते ऊसाचा उत्पादन खर्च धरला तर सध्याच्या दरामध्ये शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नव्हते, त्यामुळे ऊसाला योग्य हमीभाव मिळावा ही शेतकऱ्यांची मागणी योग्यच होती. ऊसाचा गाळपसिझन सुरू होण्याअगोदर ऊस आंदोलनासाठी जनमत तयार होत होते. यासाठी कारखानदारांची मोर्चेबांधणी सुरू होते.

आतापर्यंत कारखानदारांचा ऊस दर ठरलेला असायचा. साडेपाचशे रूपये पहिला हप्ता काढायचा, तो शेतकऱ्यांनी काढलेल्या सोसायटीला जमा व्हायचा. नंतर पाऊस सुरू होण्यापूर्वी दीड-दोनशे रुपयांचा दुसरा हप्ता जमा केला जात असे. त्यातून पुन्हा एखाद्या सणाला देवू वाटला तर पन्नास रुपये प्रमाणे तिसरा हप्ता जमा केला जात असे. असे मिळून प्रति टनामागे ऊसाला आठशे ते साडेआठशे दर मिळत असे. हा दर शेतकऱ्याचा ऊसावरील सर्व उत्पादन खर्च वजा जाता खूपच तुटपूंजा होता. तसे पाहता त्या तुलनेने सोन्याचा दर वाढला पण ऊसाचा दर आहे तसाच होता. राजकीय पक्ष गावातील पुढारी या गोष्टींकडे फारसे लक्ष देत नव्हते. नोकरी नसल्याने शेतीकडे वळलेला तरुण वर्ग मात्र याविषयी अधिक जागरूक झाला होता. सत्ताधाऱ्यांची खुर्ची पालटण्याची ताकद या तरुण वर्गात होती. त्यामुळे त्यांच्यात एकजूट होती.

साऱ्या पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी ऊस आंदोलनाने जोर धरला होता. शेतकऱ्यांनी निवडून दिलेले कारखानदार मालक होऊन बसले होते. त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी काही देणंघेणं नव्हतं. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊस आंदोलनाचा संघर्ष पेटला होता. त्यातच नांगरगावातील अंतर्गत राजकारण खूप गढूळ झाले होते. पपेराव आणि नरसिंगआण्णा यांतील संघर्ष चालू होता. काही कारखान्यांनी पोलीस बंदोबस्तात ऊसतोडी चालू केल्या होत्या. आंदोलनानंतर जो दर ठरेल तो द्यायला तयार आहोत अशी भूमिका कारखान्यांनी स्पष्ट केली होती. पण आंदोलनाचे स्वरूप तीव्र असल्याने कारखानदारांचे काही चालेना, गावागावांमध्ये ऊस तोडी बंद पडत होत्या. ऊसाने भरून जाणारी वाहने शेतकरी आडवत होते. हा संघर्ष नव्या उद्रेकाच्या वळणावर येऊन ठेपला होता. नरसिंगआण्णांनी मात्र हा ऊस संघर्ष आपल्या अंगावर घेतला होता. 'येणाऱ्या कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी पॅनेलमधून हमखास तिकीट देतो.' असा शब्द चेअरमन साहेबांनी दिल्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक ऊसाची तोड आपल्या रानात घातली होती. त्यासाठी त्यांनी आपल्या माणसांना बंदुक घेऊन तयार ठेवलं होतं. ''जेलात जायला लागलं तरी चालेल, खरं आडवा ईल त्याला ठेवायचा नाही.'' (पृ.१६४) असा आदेश आण्णांनी आपल्या बंदुकधारी माणसांना देऊन ठेवला होतो.

ऊस आंदोलनामुळे बाहेरच्या बीड, परभणी या ठिकाणच्या मजुरांच्या टोळ्या ऊस तोडणीसाठी आलेल्या नव्हत्या. गावात जे काही ऊसतोडपे होते त्यांच्याच टोळ्या कार्यरत होत्या. त्यातले हे लोक शेतकरी असल्याने त्यांनीही विळे खाली ठेवले होते. पण नरसिंगआण्णांच्या भितीमुळे गावातील टोळी त्यांच्या शेतात ऊस तोडायला तयार झाली होती. आपल्या शेतातल्या तुटलेल्या उसाच्या ट्रॉली बरोबर अण्णा खांद्यावर बंदूक ठेवून बुलेटवरून ट्रॅक्टर बरोबर जात होते. पण गावाबाहेर आंदोलनकर्ते रस्ता अडवून बसले होते. त्यामध्ये आपलीच काही माणसं आपल्या विरोधात आंदोलनात सहभागी असल्याने अण्णा शांत होते. एकजण अण्णांना म्हणतो की, ''पोरांच्या नादाला कशाला लागता हीतनं ट्रक्टर गेला तरी दुसऱ्या गावात लोक आडिवणारच. काय जगाबरोबर हुईल ते हुईल.'' या आंदोलनात औतेरावचा मुलगा तान्ह्याही होता. त्याचा औतेरावला राग आला. तो तान्याला शिव्या देतो. त्यावेळी वयस्क दत्तूआबा म्हणतो की, ''जलमसारी नुकतं औत मारलंसाऽ फुकट मेलासाऽ आता पोरं भांडत्यातऽ भांडूद्यात''(पृ.१६६) या बोलण्याने

औतेरावही शांत होतो. साखरूचा तान्याला आणि आंदोलनाला पाठिंबा असतो. त्यामुळे औतेराव काही करू शकत नाही.

ऊस आंदोलनामुळे कारखान्याचा हंगाम सुरू होण्याची चिन्हे दिसेनात. कारखाने बंद होते. आंदोलनाला विध्वंसक स्वरूप लागले. पोलीस आणि आंदोलनकर्ते यांच्यात धरपकड सुरू झाली, दगडफेक होऊ लागते. या आंदोलनात काही पोलीस जखमीही झाले. एस. टी. बस गाड्यांचे नुकसान झाले. यानंतर मात्र शेतकऱ्यांच्यावरील अन्यायाला वाचा फुटली. शेतकरी आंदोलनाचे नेते आणि कारखानदार यांच्यात वाटाघाटी झाल्या. ऊसाला एकरकमी बाराशे पन्नास हमीभाव देण्याचे जाहीर केले. शेतकऱ्याच्या लढ्याला संघटीत स्वरूपामुळे आंदोलन यशस्वी झाले. ऊसाला साडेआठशे रुपयावरून एकदम एकरकमी साडेबाराशे रुपये दर मिळाला यामुळे शेतकऱ्यांनी काढलेल्या कर्जाची परतफेड होऊन त्यांच्या हाती चार पैसे शिल्लक राहणार होते, याचे शेतकरी वर्गात समाधान होते. आंदोलनाला मिळालेल्या यशाबद्दल लोकांनी हलगी कैचाळ्याच्या ठेक्यात साखर वाटून आनंद साजरा केला.

### २.३.५ औतेरावचं आजारपण आणि शेतीची कामे

धोंडबा मुकादमाबरोबर भात झोडपणीचा पैरा केला होता. सुगीचे दिवस असल्याने कामाचा सपाटा चालू होता. औतेराव धोंडबाच्या माळात भात कापणीसाठी गेला होता. अशातच त्याचे बरेच दिवस अंगावर काढलेले मुतखड्याचे दुखणं पुन्हा नव्याने सुरू झालं होतं. कामाच्या घाईत औतेरावला खूप त्रास होत होता. वर मरणाच्या उन्हाच्या झळा. समोर कामाचा डोंगर आणि दुखणं यात औतेराव हैराण झाला होता. मरणाच्या कळा सोसत औतेराव काम करत होता. औतेरावला होणारा त्रास बघून साखरू अस्वस्थ होती पण लोकांच्या शेतात आपल्या नवऱ्याला थोडी विश्रांती घ्या, असेही ती म्हणू शकत नव्हती. औतेरावची जेवणावरची वासनाच उडाली होती. बरं वाटत नसलं तर, लेका घरला जा रंऽ जीवापरीस काम मोठं नाही. असं धोंडोबाची बायको यश्वदा म्हणते. पण रोजच दुखणं आहे म्हणून तो परत कामाला लागतो. मुकादमही घरी जायला सांगतो, पण औतेराव म्हणतो, पावसात रास उघडी टाकून जायला मी कोळसं कुरवाडी व्हय गा? राशीत मरण आलं तर यू देत.

डॉक्टरांनी औतेरावला मुतखड्याचा ऑपरेशन करायला सांगितलेले असते, पण ऑपरेशनसाठी पैसे कुठून आणायचे? हा त्याच्यासमोर प्रश्न असतो. साखरूला नवऱ्याचा त्रास पाहवत नाही, ती औतेरावला म्हणते, आसं अंगावर दुखणं किती रोज काढणार? त्यापरीस एकदा कंडकाच पाडलेला बरा. दिगूला फोन करूया. कोल्हापुरात त्याच्या माहितीचं मस्त डॉक्टर हायीत. तिथं जाऊया. पण पैशाचं काय करायचं या औतेरावच्या प्रश्नाला उत्तर देताना साखरू इंजन घेण्यासाठी घरात ठेवलेले पैसे वापरूया असे म्हणते. पण औतेराव तयार होत नाही.

औतेरावचा त्रास वाढू लागतो. जेवणापाण्यावरची त्याची वासना उडते. पोटात अन्नाचा कण जात नाही. कावीळ झाल्यागत सारं अंग पिवळं फटफटीत दिसू लागते. त्याचं घरातन बाहेर पडणं मुश्किल होते. अशातच हरिपंत लेकीकडे भात कापणीला मदतीला गेले होते. एवढं होऊनही औतेराव दवाखान्याला जायचं

मनावर घेत नव्हता. कामाचा सगळा भार साखरूवर येऊन पडला होता. औतेराव कुणाचे ऐकत नव्हता. अशातच तो एकुंडीचं झाडपाल्याचे औषध खाऊन येतो. भातकापणी झाल्यामुळे भात कापलेल्या रानाच्या नांगरटी करावयाच्या होत्या. त्यामुळे साखरूला चैन पडत नव्हता. घरात बैल आहे, पण औत करणारा नाही. त्यामुळे ते विचारात पडलेली होती. अशा विचारात ती आपल्या तान्याला म्हणते, तानं आम्ही औतं घ्यून जाऊया व्हय रं शेताकडं! त्यावेळी नाही व्हय करत तान्या तयार होतो. आपल्या मुलाला औतासाठी साखरू तयार करते. शेतात तान्याकडून नांगरट करून घेते. बाळाकराम तान्याचं कौतुक करतो. एका रात्री औतेरावला मुतखड्याचा खूप त्रास होऊ लागतो. जीव मेटाकुटीला येतो. तो ढोरासारखा ओरडू लागतो. एकोंडीच्या झाडपाल्याच्या औषधामुळे त्याचा मुतखडा पडतो. तो बरा होतो. औतेरावची या दुखण्यातून सुटका होते. हळूहळू तो हिंडू फिरू लागतो. शेताभाताला जाऊ लागतो. शेतीची कामे करू लागतो.

**२.३.६ हरिपंतांचे शेवटचे दिवस**

हरिपंत 'नांगरमुठी' कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा. वारकरी संप्रदाचे संस्कार असणारे हरिपंत हे हाडाचे शेतकरी. सर्वांना एकत्र घेऊन जाणाऱ्या पंतांना गावात मान होता. गावच्या मंदिराचा जीर्णोद्धार हरिपंताच्या पुढाकाराने झाला. गावातील सर्वांच्या मनात हरिपंताविषयी आदरभाव होता. हरिपंत हाडाचे शेतकरी होते, तसेच ते गळ्यात तुळशीमाळ, मुखात अखंडपणे विठ्ठलाचे नामस्मरण करणारे, दरवर्षी पंढरपूरची वारी करणारे वारकरी होते. अशा पंताचे शेवटचे दिवस आणि मृत्यू सर्व गावाला आश्चर्यचकीत करणारा होता. पंत आजारी पडल्याने त्यांनी अंथरून धरले होते. त्यामुळे हरिपंताना पहायला औतरावच्या घरी पै-पाहुणे सतत ये जा करत होते. शेती आणि घरातलं करताना साखरूची दमछाक होत होती. औतेरावने डॉक्टरांना बोलावून पंतांना दाखवले. पण पंताच्या तोंडाला काहीच गोड लागेना. अन्नावरील वासनाच उडाली. पंत अंथरूणावर निपचिप पडून राहू लागले.

श्रावणात पंत औतरावला म्हणाले, ''श्रावण निघाला व्हय रं ''

''निघाला की आबा''

''औंदा घरात पुस्तक कसलं लावणार''

''तुमाला बरं नाही नि कशाला ग्रंथ लावायचा''

''नित्यनेम नामी तो प्राणी दुलर्भ। लक्ष्मी वल्लभ तयाजवळी ।। लेका घरात चालत आलेला नेम मोडू नको. बारका सारखा लाव नि दोन रोजात वाचून आटीप. ''

पंतांची निर्वाणीची भाषा ऐकून औतेरावला वाईट वाटलं. शिवलीलामृत ग्रंथ लावला. पंताना अन्नपाणी घोटेना झाले. पंत क्षीण आवाजात सांगू लागले,

''आता मला बोलवू नका. मी देवाचं नामस्मरण करतो.''

''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारी साधियेल्या

हरिमुखे म्हणा ऽऽ हरि मुखे म्हणा ऽऽऽ  पुण्याची गणना कोण करी।।''

असे अखंड अडतीस तास उलटले तरी हरिपंताच्या मुखात हरिपाठ अखंडपणे सुरू होता. तुळशीदलातून अधूनमधून गंगाजल सोडलं जात होतं. पंचप्राण गोळा झालेले होते. तरीही त्या पवित्र देहाची पुण्यवंत वाणी देवाचं अखंड नामस्मरण करीतच होती. तुळशीदल, बुक्का तिथं वर्षत होता. हरिपंतांच्या मृत्यूच्या अखेरच्या क्षणाचं कवतिक हाऽऽऽ हा म्हणता साऱ्या पंचक्रोशीत पसरलं होतं. माणसं भारावून बोलत होती,

''इथून मागं माळकरी झाल्यालं ऐकीवात हायीत खरं असं अडतीस तास हरिपाठ म्हणत देवलोकी निघालेला वारकरी पहिल्यांदाच बघितला.'' (पृ.१७६)  औतराव उशाला मांडी देऊन बसला होता. त्याच्या डोळ्यातून भीमा चंद्रभागा वाहत होती. अशातच मुंबईहून पंताचा भाऊ हाणमाही आला होता. पंताचं दर्शन घेतलं आणि हाणमा म्हणाला, ''दादाऽऽ आता मी काय म्हणू काय म्हणू जीवाची मुंबई करीत बसलो. घडीभर तुझ्या संगतीत मी नाही बसलो. मला कळलंऽ माझ्यापरास इथलं दगडधोंडं पवित्र हायीत. ते तुझ्या संगतीत होतं.'' (पृ.१७७)

अंतसमयी भगवंताचं स्मरण करीत जो देह ठेवतो तो भगवंतालाच जाऊन मिळतो. याची अनुभूती सारी पंचक्रोशी घेत होती. पंताची अखेरची घरघर सुरू होती. त्यांची मुलगी मुक्ता अजून आली नव्हती. मुक्ताला घेऊन मोटारगाडी गावाकडं धावत होती. रस्ता काही केल्या संपंत नव्हता. वडीलांच्या आठवणीनं मुक्ताचं अंतःकरण भरून येत होतं. मुक्ताची भेट झाल्यानंतर पंतानी आपला देह ठेवला.

पंताच्या देहाला अखेरचं स्नान घातलं. गंधबुक्का लावून तुळसमंजिरींची माला गळ्यात घातली. सुवासिनींनी आरती ओवाळली. तुळशीदलांनी झोकाळलेल्या मृत्यूशय्येवर देह ठेवण्यात आला. खांदेकऱ्यांनी खांदा दिला अन्  पुंडलिक वरदाचा गजर होऊन दिंडी चालली. सारे रूढ संकेत बाजूला ठेवून अंत्ययात्रेचा मार्ग विठ्ठल मंदिराकडे वळवण्यात आली. विठू परमात्म्याचं 'पायवणी' तीर्थ पंतांच्या देहावर शिंपडण्यात आलं. घरादारातून बायका हात जोडत होत्या. दुतर्फा पुष्पवृष्टी सुरू होती. विठुरायाचं दर्शन घेऊन तो महान भक्त अखेरच्या प्रवासाला निघाला. बारा वाटांनी वाहात येणारे पाण्याचे ओग नदीत मिसळावे तशी माणसं त्या अंतयात्रेत सामील होत होती. नांगरगाव एका पुण्यपुरुषाला कायमचं अंतरलं होतं.

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी'तील या आशयसूत्रांबरोबर गावातील लोकांमध्ये दिसणारा समूहभाव, बाळुमामा यात्रा, पंढरपूरची वारी यासारखी आशयसूत्रे कादंबरीला अर्थसघन करतात.

## २.४ समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीच्या कथानकाचा आणि आशयसूत्रांचा सविस्तर विचार केला. कादंबरीतील आशयसूत्रांचा विचार करताना एका कष्टकरी शेतकरी कुटुंबाच्या संघर्षाची कहाणी समोर येते. त्याबरोबर एका गावचा आणि गावातील सामाजिक सांस्कृतिक

स्तराचा तिथल्या चढउताराचा पटही वाचकांसमोर येतो. हा सारा पट उभा करताना पाटील यांनी मुख्य कथानकाला अधिक संपृक्त करणारी आशयसूत्रांचे केलेले उपयोजन कादंबरीला वैशिष्ट्यपूर्ण बनवते. हे या कादंबरीचे श्रेष्ठत्व आहे असे म्हणता येईल. ग्रामीण भागातील कष्टकरी माणसाची जिद्द, निसर्ग, शेती-मातीविषयी असणारे प्रेम, गावपांढरीविषयी असणारा जिव्हाळा, काळाबरोबर बदल स्वीकारून पुढे जाण्याची तयारी या सर्व गोष्टी 'नांगरमुठी' च्या रूपाने वाचकांसमोर येतात. या कादंबरीविषयी आसाराम लोमटे म्हणतात की, या कादंबरीतील कहाणी एका कुटुंबाची न राहता, पाहता पाहता समस्त कुळवाडींच्या आयुष्याचा नकाशा म्हणून आपल्यासमोर उभी राहते. याची प्रचिती आपल्याला येते.

**२.५ स्वाध्याय**

२.५.१ योग्य पर्याय निवडा.

१. औतेरावने कोणत्या बाजारातून छब्या बैल विकत घेतला.

अ) निपाणीच्या ब) सरवडेच्या

क) मुरगूडच्या ड) कोल्हापूरच्या

२. नरसिंगरावच्या आईचे नाव काय आहे.

अ) भागीरथी ब) रखमा

क) वैजयंता ड) केरुबाई

३. नांगरगावात पडद्यावर कोणता सिनेमा दाखवला जातो.

अ) हिच खरी दौलत

ब) साधी माणसं

क) बन्या बापू

ड) माहेरची साडी

४. अंगावर वीज पडून कोणाचा मृत्यू होतो.

अ) ईटाबाई ब) आनसा

क) कुसा ड) तुळसा

५. नांगरगावच्या ग्रामदैवताचे नाव काय आहे.

अ) वेतोबा ब) खेतोबा

क) विठ्ठल ड) भूतोबा

६. मंदिरासाठी जंगलातून सागवान चोरून आणलं ही बातमी फॉरेस्टरला कोणी दिली.

अ) गणपा बारड ब) सदा भूतल

क) धोंडबा मुकादम ड) बाळकराम

७. सोनाचा नवरा कोणत्या ठिकाणी कामावर जात असे.

अ) कारखान्यात ब) दुकानात

क) मिलमध्ये ड) सेंट्रिंगच्या

८. गणपा बारडच्या विरोधात भाऊ वाइंगड्या किती मतानी जिंकला.

अ) दहा ब) पाच

क) नऊ ड) वीस

उत्तरे–१. क) मुरगूडच्या २. अ) भागीरथी ३. ब) साधी माणसं ४. अ) मुक्ता ५. क) कुसा

६. अ) वेतोबा ७. अ) गणपा बारड ८. ड) सेंट्रिंगच्या ९.अ) नंदीनी १० क) नऊ

**२.५.२ लघुत्तरी प्रश्न**

१. नांगरमुठी कादंबरीतील राजकारणाचे स्वरूप सांगा

२. नांगरमुठी कादंबरीतील ऊस आंदोलनाचे स्वरूप सांगा.

३. नांगरमुठी कादंबरी कादंबरीतील समूहभावना उलगडून दाखवा.

**२.५.३ दीर्घोत्तरी प्रश्न**

१. नांगरमुठी कादंबरीतील आशयसूत्राचा सविस्तर आढावा घ्या.

२. नांगरमुठी कादंबरीतील कृषिनिष्ठ जाणीवांचे स्वरूप स्पष्ट करा.

३. नांगरमुठी कादंबरीतील कथानकाचे वेगळेपणा अधोरेखित करा.

४. नांगरमुठी कादंबरीच्या आधारे औतरावच्या कुटुबांचा संघर्ष स्पष्ट करा.

**पुरक वाचन**

१. पाटील, पांडुरंग, नांगरमुठी, दर्या प्रकाशन, पुणे, २०२४.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. थोरात, हरिश्चंद्रः निवेदक-कथात्म साहित्य, मराठी वाङ्मयकोश, खंड ४, विजया राज्याध्यक्ष (संपा.) महाराष्ट्र राज्य संस्कृती आणि साहित्य मंडळ, मुंबई,२००२

२. नेमाडे, भालचंद्र : साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७ अ.) दर्या प्रकाशन

३. कोत्तापले नागनाथ : साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे

४. ठाकूर, रवींद्र : मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१३.

५. खोले, विलास(संपा.), गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००२


◆◆◆

# घटक : ३

# नांगरमुठी' : पात्रचित्रण, वातावरण

३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ पात्रचित्रण

३.३.१ हरिपंत

३.३.२ औतेराव

३.३.३ साखरू

३.३.४ रखमाई

३.३.५ इतर पात्रे

३.४ वातावरणनिर्मिती

३.५ जीवनदृष्टी

३.५.१ विवाहसंस्थेविषयी विचार

३.५.२ मूक प्राण्यांवरील प्रेम

३.५.३ मानवी मूल्यांचा पुरस्कार

३.५.४ भावंडभावाची रुजवणूक

३.६ सारांश

३.८ मूलभूत वाचन

३.९ पूरक वाचन

### ३.१ उद्दिष्ट्ये

१. कादंबरी' या साहित्यप्रकाराची ओळख होऊन बलस्थाने लक्षात येतील.

२. नांगरमुठी' कादंबरीतील पात्रचित्रणाचा परिचय होईल.

३. नांगरमुठी' कादंबरीतील वातावरणनिर्मिती/स्थलावकाश समजेल.

४. नांगरमुठी' कादंबरीतील जीवनमूल्यांचे स्वरूप संमजेल.

५. पांडुरंग पाटील यांच्या लेखनविश्वाचा परिचय होईल.

### ३.२ प्रस्तावना

कादंबरीचा मुख्य घटक असलेल्या कथानकाला गतिमान करण्याचे काम कादंबरीतील पात्रे करीत असतात. कादंबरीत पात्रांची निवड करताना कादंबरीकाराला खूप विचार करावा लागतो, कारण या पात्रांवरच कादंबरीचे यश अवलंबून असते. त्यामुळे पात्र हा घटक कादंबरीत फार महत्त्वाचा असतो. कादंबरीमध्ये मुख्य पात्रांबरोबर इतर गौण पात्रेही असतात. पात्रांच्या माध्यमातून कादंबरी आकारास येते. लेखक आपल्या मनातील विचार अथवा दृष्टिकोन पात्रांकरवी मांडत असतो. मानवी स्वभावाचे विविधांगी दर्शन कादंबरीकार पात्रांकरवी घडवत असतो. माणसातील राग, लोभ, प्रेम,असूया, भीती, द्वेष, आश्चर्य इत्यादी भावनांचे चित्रण कादंबरीकार पात्रांकरवी करीत असतो. या पात्रांची सर्व सूत्रे कादंबरीकाराच्या हाती असतात. लेखकाचे अनुभवविश्व तो पात्रांद्वारे साक्षात होत असते. अशा पात्रांच्या स्वभावरेखटनातून कादंबरी अधिक गतिमान बनते.

कादंबरी हा प्रदीर्घ भाषिक अवकाश असणारा वाङ्मयप्रकार आहे. मानवी जीवनाचे समग्र दर्शन घडविण्याची क्षमता या वाङ्मयप्रकारामध्ये आहे. हे दर्शन पात्रांच्या जीवनदृष्टीतून घडत असते. या व्यक्तिरेखा मुख्यता दोन गटामध्ये विभागलेल्या असतात. काही व्यक्तिरेखा या मुख्य व्यक्तिरेखा तर काही व्यक्तिरेखा दुय्यम, साहाय्यक, गौण असतात. कादंबरीमधील प्रकर्षाने कृतिशील असणारी पात्रे म्हणजे मुख्य व्यक्तिरेखा होय, तर घटनाप्रसंगाला अनुरूप साहाय्यभूत ठरणारी इतर पात्रे म्हणजे गौण व्यक्तिरेखा होय.

### ३.३ पात्रचित्रण

पांडुरंग पाटील यांची नांगरमुठी'ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा/ पात्रचित्रणांचा विचार खालीलप्रमाणे करता येईल.

#### ३.३.१.हरिपंत

नांगरमुठी' कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणून हरिपंत या व्यक्तिरेखेचा विचार करावा लागतो.हरिपंत हे वारकरी आहेत. सतत विठ्ठलाचे चिंतन, मनन करणे, भजन, कीर्तन करीत जनसमुदायाला उपदेशपर मार्गदर्शन करणे, दारात आलेल्या प्रत्येक गरजू व्यक्तीला मदत करणे, मुक्या जनावरांवर माया करणे, गाथेतील

ओव्यांचे, अभंगांचे स्पष्टीकरण करणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. हे सगळे करीत असताना हरिपंत हाडाचे शेतकरी आहेत. वारकरी तत्त्वज्ञानानुसार कर्म आणि भक्ती यांचा सुंदर मिलाप त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे.

हरिपंतांनी गावापासून सात-आठ किलोमीटरवर असलेल्या सरवडे येथील शाळेत सातवीपर्यंतचे शिक्षण घेतले. तत्कालीन काळात इतके शिक्षण घेतलेल्या माणसाला सहजच शिक्षकाची नोकरी मिळत असे. परंतु हरिपंतांनी शिक्षकाची नोकरी न स्वीकारता नांगर हातात घेतला. लहानपणीच वडिलांचे निधन झाले होते. वडिलांच्या निधनानंतर आई जाईबाई हिने नेटाने संसार करून मुलांना सांभाळले. मुलांची लग्ने केली. हरिपंतांचे लहान भाऊ हाणबाचे शेतात मन लागत नव्हते. त्याने मुंबईला जाण्याचे ठरविले. शेवटी हरिपंतांना नांगर हातात घेऊन भूमातेची सेवा करावी लागली.अख्खं आयुष्य शेतात राबत असताना, संसार चालवत असतानासुद्धा त्यांनी कधी पंढरीची वारी चुकविली नाही. हरिपंतांच्या मुखातून सतत अभंग, ओव्या, तुकारामांच्या अभंगांचे दाखले उद्धृत होत असतात. गावामध्ये एक सज्जन, नम्र, दयाळू, संत पदास पोहोचलेले वारकरी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना समाजात मानाचे आणि आदराचे स्थान होते. देव आणि भक्तामधील संदेशाचं वहन होत असतं, यावर हरिपंतांचा विश्वास आहे. देव भक्ताच्या हाकेला साथ देतो, भक्ताला मदत करतो, ही त्यांची धारणा आहे. जोरदार पावसात पुराच्या पाण्यात वाहून जात असताना अचानक तिथे बाळाराम येतो आणि हरिपंतांना वाचवतो. यावेळी देवानेच बाळारामाला तिथे पाठविले असावे, अशी हरिपंतांची भावना आहे.

हरिपंत माणसांवर जसे प्रेम करतात, माया करतात त्याच पद्धतीने मुक्या जनावरांनासुद्धा जीव लावतात. त्यांचा मुलगा औतेरावने म्हशीला धार देत नाही म्हणून मारणे किंवा औत हाकताना बैल थांबला म्हणून त्याला चाबकाचे फटके मारणे हरिपंतांना आवडत नाही. म्हैस धार देत नाही म्हणल्यावर ते म्हशीला आस्वलीच्या मुळ्या भाकरीतून खायला देतात, म्हशीच्या अंगावरून हात फिरवितात. तिला गोंजारतात. तिचे दुःख समजून घेतात, त्यामुळे म्हैस दूध द्यायला लागते. जनावरांवर माया केली तर तिही माणसाचे मन ओळखतात, यावर हरिपंतांची श्रद्धा असल्याचे दिसते. जनावरांवर केल्या जाणाऱ्या ग्रामीण उपचारपद्धती हरिपंतांना माहीत आहेत. गावातील कित्येक लोक या संबंधाने त्यांच्याकडे सल्ला, मार्गदर्शन घेण्यासाठी येत असतात.हरिपंतसुद्धा आवडीने, तन्मयतेने इतरांना समजावून सांगतात. म्हशीचे मेलेलं रेडकू नेण्यासाठी आलेल्या पिलुमा तराळला टोपल्यातले भात उपसून गठळे बांधून देतात. हे पाहून त्यांची बायको रखमाई चिडचिड करते. त्याकडे हरिपंत दुर्लक्ष करतात. गरजवंताला मदत करण्याची त्यांची वृत्ती संपूर्ण कादंबरीभर जाणवते. एकदा सदा भूतल सशाची पिल्ले पकडून आणतो. त्याला काही पैसे देऊन औतेराव ती पिल्ले आपल्या मुलाला खेळण्यासाठी देतो, हे हरिपंतांना पटत नाही. पिल्लांचे दुःख हे आपले दुःख मानून ते सदा भूतलला जादा पैसे देतात व ती पिल्ले पुन्हा जंगलात त्यांच्या आईकडे सोडून येतात.हरिपंतांची ही भूतदया लेखकाने अनेक ठिकाणी चित्रित केलेली आहे. याचवेळी हरिपंत सदा भूतलला आणि औतेरावला प्राणीमात्रांवर माया करण्याचे महत्त्व समजावून सांगतात. पुढे हाच व्यसनी सदा भूतल आपले दारूचे व्यसन सोडतो.हरिपंतांनी सशाच्या पिलांचे दिलेले पैसे मोडण्याची इच्छा सदा भूतलला होत नाही. तो ते पैसे

हरिपंतांना परत देतो. सदा भूतलसारख्या व्यसनी माणसाला सुधारण्याची किमया हरिपंतांनी केलेली आहे. सदा भूतलच्या मोडलेल्या संसाराची घडी बसविण्याचे काम हरिपंत आपल्या सात्विक वर्तनातून करतात. त्यांचे हे सात्विक व्यक्तिमत्त्व त्यांचा लहानभाऊ हाणबाच्या बाबतीत सुद्धा जाणवते. त्यांचा लहान भाऊ हाणबा मुंबईला नोकरीला जातो. त्यामुळे हरिपंतांना शेतात राबावे लागते. पण जेव्हा हाणबाची मुंबईतील नोकरी जाते, तेव्हा हरिपंत आपल्या भावाला गावी परत येण्याचे सांगतात. मिळेल त्यात दिवस काढू' असे म्हणतात. यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सात्विकपणा लक्षात येतो.

ग्रामीण भागातील राजकारण हे पाहण्यासारखे असते. लहानसहान गोष्टीवरून हाणामारी होते. हरिपंतांच्याही गावात अशाच पद्धतीचे राजकारण असते. गावातील दोन गटाच्या राजकारणात हरिपंत मध्यस्थाची भूमिका घेत असतात. गावासाठी संरक्षक ढाल म्हणून हरिपंतांची ओळख आहे. वंचित बहुजनांविषयी असणारा कळवळा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष आहे. स्वतःच्या कर्म, भक्ती आणि नीतिमत्ता यांच्या जोरावर त्यांनी गावात मानाचे स्थान मिळविले आहे. हरिपंत भेदाभेद करीत नाहीत. त्यामुळे गावात जनमत त्यांच्या बाजूने असते. याचा फायदा घेण्यासाठी नरसिंगआण्णा आणि पपेराव सावंत हरिपंतांना आपल्या पार्टीत घ्यायला इच्छुक असतात. पण सरळमार्गी हरिपंत राजकारणाच्या फंद्यात पडत नाही. विठ्ठलभक्ती, भजन, कीर्तन, प्रवचन आणि कृषिसेवा यामध्येच ते सुख मानतात. गावाच्या विकासासाठी प्रसंगी ते सत्याची आणि न्याय भूमिका घेत असतात. गावातील वेतोबाच्या मंदिराचा जिर्णोद्धार करण्याची हरिपंतांची इच्छा असते. तीही इच्छा गावकऱ्यांजवळ बोलून दाखवितात. होय-नाही करीत मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे काम सुरू होते. हरिपंत पायाला भिंगरी बांधून मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी लागणाऱ्या पैशांची तजवीज करायला फिरू लागतात. यावेळी त्यांचे घराकडे आणि शेतातल्या जित्राबाकडे दुर्लक्ष होते. पण ते थांबत नाहीत. ठराविक काम झाल्यानंतर मंदिराचे काम बंद पडते.हरिपंतांचे वारकरी मन मंदिराचं रखडलेलं काम पाहू शकत नव्हते. हरिपंतांची ही अस्वस्थता पाहून सदा भूतल जंगलातून लाकडे चोरून आणतो. हरिपंतांना यातले काहीही माहीत नसते. या प्रकरणात हरिपंतांना नाहक त्रास होतो.गावातील लोक याची नकारात्मकतेने चर्चा करतात. हरिपंतांचा सत्यावर विश्वास असतो. यातच हरिपंतांच्या बायकोचे, रखमाईचे निधन होते. रखमाचे जाण्याचे दुःख बाजूला ठेवून हरिपंत मंदिराच्या पूर्णतेसाठी प्रयत्न करतात.

हरिपंतांना आपल्या मुलाची काळजी आहे. मुलगा औतेराव कारखान्याला बैलगाड्याने ऊस ओढण्याचे काम करतो, वेळ काढून शेतात औत हाकतो. त्यातूनही आपला मुलगा भजनाला जातो, अभंग म्हणतो, पेटी वाजवायला शिकतोय, याचे हरिपंतांना कौतुक आहे. हरिपंत वृद्धत्वामुळे वारीला जाऊ शकत नाहीत. आपली ही वारीची परंपरा औतरावाने पुढे चालू ठेवावी, अशी हरिपंतांची इच्छा असते. हरिपंतांच्या इच्छेनुसार औतेराव वारीला जातो, माळ घालून येतो, याचा हरिपंतांना प्रचंड आनंद होतो. दरवर्षी श्रावण महिन्यात घरात एखादा तरी ग्रंथ हरिपंत वाचत असतात. लोकांना त्या ग्रंथाचे निरूपण करून सांगतात. आजारपणाच्या काळात ते औतेरावाला ग्रंथाचे पारायण करायला लावतात. दिवसभर काम करून थकलेल्या जीवांना तेवढाच विरंगुळा मिळावा, ज्ञानप्राप्ती व्हावी, हा त्यांचा उद्देश असतो. वारकऱ्याने वारकरी तत्त्वज्ञान उपयोजनात आणावे, असे हरिपंतांना मनोमन वाटते. कित्येक वारकरी लोक वारकरी तत्त्वज्ञानाप्रमाणे वागत

नाहीत, याची त्यांना प्रचंड चीड येते. घरात आपली बायको रखमाई मरण पावली तरी शेतात पेरणी करणारे हरिपंत औतेरावाला धीर देतात, पेरणी पूर्ण करतात. वेळ कुणाची चुकत नाही, पण पेरणीची वेळ चुकली तर पुढील सगळा संसार कोलमोडतो.' याचे पक्के ज्ञान हरिपंतांना असल्याचे जाणवते. गावच्या राजकारणात माळावर पसरलेली वडरांची घरे जळून भस्मसात होतात. वडर लोक रस्त्यावर येतात. गाव सोडून जायचा विचार करतात, त्यावेळी हरिपंतच त्यांना धीर देतात. तुम्ही या गावचे रहिवासी आहात, इथेच राहा. निर्वासितांचे जगणं फार वाईट असते', असे त्यांना बजावतात. यातूनच हरिपंतांचा वंचितांविषयीचा कळवळा कळतो.

### ३.३.२. औतेराव

नांगरमुठी' कादंबरीतील औतेराव ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. कादंबरीच्या पूर्वार्धात हरिपंतांचा मुलगा अशी औतेरावाची ओळख असते, पण कादंबरीच्या उत्तरार्धात स्वतंत्र औतेराव लक्षात येतो. प्रचंड रागीट पण नंतर सहानुभाव आलेला, आई-वडिलांविषयी प्रचंड आदर असणारा, मुक्या जनावरांवर, बैलांवर प्रेम करणारा, स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या शेतात पैऱ्याने औत हाकणारा, कारखान्याला बैलगाडीने ऊस ओढणारा, वडिलांची वारी पुढे चालू ठेवणारा, वडिलांच्या विचारांचा वसा आणि वारसा जपणारा औतेराव येथे लेखकाने चित्रित केलेला आहे.

औतेरावाचा शेतकरी कुटुंबात जन्म झाल्याने जन्मापासूनच त्याला शेती, बैल, बैलगाडी, औत, नांगर यामध्ये विशेष रस आहे. लहानपणापासूनच त्याच्यावर वडिलांकडून वारकरी संस्कार झालेले आहेत. शेतामातीत राबताना त्याच्यातील कुणबाऊपणा लक्षात येत राहतो. आस्वल्या आणि फटकुऱ्या या बैलांवर त्याचा प्रचंड जीव असतो. परंतु फटकुऱ्या बैलाच्या मृत्यूमुळे औतेराव निराश होतो. आता घरसंसार कसा चालवायचा, याची चिंता त्याला लागून राहते. पण त्याच्या सद्गुणी वर्तनामुळे काही लोक त्याला मदत करायला पुढे येतात. त्यातून तो आस्वल्याच्या जोडीला दुसरा बैल घेतो. कारखान्याला बैलगाडी करून ऊस ओढण्याचे काम करतो. उसाच्या सीजनमधून आलेले पैसे तो ज्यांनी त्याला बैल घेण्यासाठी मदत केलेली असते, त्यांना देऊन टाकतो. कारखान्याचे क्लिनिंग असताना औतेरावाला सुट्टी मिळते, परंतु तो घरात न बसता पाबळकरांच्या शेतात मजुरीने पाणी पाजायला जातो. यातून त्याची घरसंसाराची काळजी आणि त्याचा कष्टाळूपणा लक्षात येतो. प्रसंगी कारखान्याला खाडे करून शेतातले काम करतो, औत ओढतो, पेरणीच्या हंगामात स्वतःच्या शेतात नांगरण्याबरोबरच इतर अल्पभूधारक शेतकरी यांच्याकडेही नांगरठीसाठी जातो. गवत ओढतो. कामाचा कितीही त्रास होत असला तरी सगळ्यांची गरज पूर्ण करण्याची त्याची वृत्ती येथे लेखकाने चित्रित केलेली आहे.

म्हैस दूध देत नाही हे पाहून म्हशीला काठीने मारणारा औतेराव जेव्हा तीच म्हैस महापुरात वाहून जात असते, तेव्हा तिला वाचविण्यासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता महापुरात उडी मारून म्हशीला वाचवितो. बायको साखरुचे झोपेत थोडेसे अंगावरचे कपडे वरती गेल्यावर हातातल्या चाबकाचा फटका मारणारा औतेराव त्याच बायकोवर मनापासून प्रेम करतो. बायकोविषयी औतेरावाच्या मनात जिव्हाळा, प्रेम

आहे. पण तो कधीच व्यक्त करीत नाही. वरून तापट वाटणारा औतेराव आतून विचारी असल्याचे जाणवते. शेतीभाती सांभाळणारा औतेराव यातून प्रकट होतो. आई रखमाईच्या आजारपणात तो तिची मनापासून सेवा करतो. आईला उठताबसता येत नाही, याची काळजी वाटल्याने त्याला गलबलून येते. आईने केलेले कष्ट, प्रसंगी पोटाला चिमटा देऊन केलेला संसार सगळे औतेरावाला आठवते. आईच्या संस्कारातूनच औतेराव समंजस झाला आहे. परंतु आईच्या निधनानंतर औतेराव दुःखी होतो. त्याचे हे दुःख वाचकाला अस्वस्थ करून जाते. शेतातील पेरण्या खोळंबलेल्या असतात, त्यामुळे औतेराव आपले आईच्या जाण्याचे दुःख बाजूला सारून लोकांच्या खोळंबलेल्या पेरण्या पूर्ण करण्यासाठी दिवसरात्र राबतो. दुसऱ्यांना मदत करण्याची शिकवण त्याला त्याच्या वडिलांकडून, हरिपंतांकडून मिळालेली आहे. आपल्या वडिलांना गावात मान आहे, आदर आहे याचा औतेरावाला अभिमान आहे. वडिलांच्या ग्रंथावर कोंबड्या नाचतात, हे औतेरावाला पटत नाही. त्यासाठी तो कोंबड्याच विकण्यासाठी आईला समजावताना दिसतो. वडिलांच्या इच्छेखातर तो पंढरीला वारीला जातो, माळ घालून येतो. याचा वडिलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून त्याला आपल्या जन्माचे सार्थक झाले, असे वाटते. वारीला जाऊन आल्यापासून औतेरावाच्यात प्रचंड बदल झालेला आहे. क्षणाक्षणाला चिडणारा, रागीट स्वभावाचा औतेराव आता शांत आणि संयमी झाला आहे. त्यातूनच त्याला भजनाची, कीर्तनाची आवड लागली आहे. तो तुकदेवाकडे पेटी वाजवायला शिकण्यासाठी जातो आहे. त्याच्यातील हा अंतर्बाह्य बदल लेखकाने प्रभावीपणे चित्रित केलेला आहे.

औतेरावाचे निसर्गावर, पशुपक्ष्यांवर, प्राण्यांवर, पिकांवर प्रेम आहे.झाडे आपल्याला सावली देतात. आग्याऊन झेलून मानवाला तृप्ती, समाधान देतात. परंतु माणूस त्याच झाडावर कुऱ्हाड घालतो', हे औतेरावाला पटत नाही. मानवाची ही आत्मकेंद्री वृत्ती संपूर्ण जीवसृष्टीवर घाला घालणारी आहे, याची जाणीव त्याला आहे. विहिरीत चिमण्यांनी घरटी केलेली असतात. परंतु पावसाळ्यात विहिरीमध्ये प्रमाणापेक्षा जास्त पाणी साचल्याने चिमण्यांची घरटी त्यात बुडून जातात. हे पाहून औतेराव त्या चिमण्यांसाठी हळहळताना दिसतो. आपले दुःख या चिमण्यांच्या दुःखापुढे काहीच नाही, याची त्याला जाणीव होते. मुक्या प्राण्यांच्या दुःखाशी समरस होणारा औतेराव लेखकाने इथे चित्रित केलेला आहे. औतेरावाची पुतणी, वैजयंताच्या लग्नात पैशाची अडचण येते, त्यावेळी साखरू आपल्या गळ्यातील बोरमाळ नवऱ्याला न विचारता वैजयंताला देते व लग्न पार पाडते. साखरुच्या या कृतीचा औतेरावाला राग न येता उलट तो तिला पाठिंबा देतो. तिच्या निर्णयाचे कौतुक करतो. वर्षानुवर्षाचे भावभावकीचे भांडण विसरून मदतीस तयार होणारा औतेराव इथे लेखकाने लक्षात आणून दिला आहे.

कालव्यामुळे शेतीपर्यंत पाणी येते. सगळीकडे उसाचे पीक घेतले जाते. औतेरावसुद्धा काबाडकष्ट करून उसाचे पीक जोरात पिकवितो. उसाच्या येणाऱ्या पैशातून भविष्याची स्वप्ने रंगवितो. परंतु उसावर पडलेला लोकरी मावा पाहून तो निराश होतो. उसाची वाढ खुंटते. अशावेळी तो पाठीचा कणा मोडेस्तोवर शेतात औषध फवारणी करतो. यातूनच त्याला त्याचा मुलगा ताना आणि मुलगी नंदिनी यांच्या शिक्षणाची चिंता लागून राहते. उसाला तोड येण्यासाठी तो गटावर जात राहतो. यातच उसाला योग्य हमीभाव मिळावा, यासाठी शेतकरी संघटनेचे आंदोलन उभा राहते. उसाचे उभे पिक कोमेजून जाते. ताना या आंदोलनात

सहभागी होऊन सरपंच नरसिंगआण्णांच्या विरोधात उभा राहतो. आपल्या मुलाने या आंदोलनात सहभागी होऊ नये, अशी औतेरावाची इच्छा असते. या मोठ्या पुढारी लोकांशी आपण पंगा घेऊ नये, अशी त्याची सरळमार्गी धारणा असते. राजकारणातील डावपेचामुळे नरसिंगआण्णा ऊस तोडायला विलंब करतो आहे, अडचणी निर्माण करतो आहे, याची जाणीव औतेरावाला होते.

शेतात राबराब राबणाऱ्या औतेरावाला मुतखड्याचा त्रास सुरू होतो. डॉक्टरांनी त्याला मुतखड्याचे ऑपरेशन करायला सांगितले आहे. पैशाअभावी औतेराव ऑपरेशन करण्याचे टाळत असतो. साखरू औतेरावाला ऑपरेशन करू म्हणते, पण औतेरावाला कष्टाने साठवलेले पैसे इंजिन खरेदी करायला ठेवायचे आहेत. गावाची औते करून, उसाची बैलगाडी हाकून, प्रसंगी पोट मारून जमा केलेले पैसे दुखण्यासाठी, आजारपणासाठी खर्च करणे औतेरावाला पटत नाही. तो आजारपण अंगावर काढतो. पोटात प्रचंड दुखत असताना भाताचा पैरा फेडण्यासाठी धोंडबा मुकादमाकडे भात कापायला जातो. आपल्या आजारपणात बायकोने आणि मुलाने औत हाकणे त्याला अस्वस्थ करून जाते. गावठी औषध घेऊन मुतखड्यावर इलाज करीत राहतो. आपल्या आजारपणात कामाचा त्रास झाल्याने बायको पोरीवर राग काढते, याचे त्याला वाईट वाटते. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, ही त्याची इच्छा आहे. काही दिवसानंतर मुतखडा पडतो. औतेराव पुन्हा पहिल्यासारखा होऊन कामाला लागतो. शिल्लक राहिलेल्या पैशातून इंजिन घेतो, मुलाबाळांना कपडे घेतो, साखरुला साडी घेतो, सणवार करतो. यातून औतेरावाचा समंजसपणा लेखकाने चित्रित केलेला आहे.

### ३.३.३. साखरू

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीतील साखरू ही महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. खेडेगावातील अस्सल कुणबी कुटुंबातील कष्टकरी स्त्रीचे प्रातिनिधिकचित्रण साखरूच्या माध्यमातून लेखकाने केले आहे. संसार सांभाळणारी, नवऱ्याला शेतीत मदत करणारी, घरातल्या माणसांवर माया करणारी, नवऱ्याच्या आज्ञेत राहणारी, इतरांना मदत करणारी, दुसऱ्याच्या शेतात काम करायला जाणारी, मुलांनी शिकून मोठे व्हावे, अशी सहजसुलभ इच्छा असणारी, समंजस, धाडसी, दयाळू, वेळप्रसंगी आक्रमक अशी स्वभाव वैशिष्ट्ये साखरू या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून चित्रित झालेली आहेत.

साखरू शाळेत हुशार होती. इयत्ता नववीत तिचा शाळेत पहिला नंबर आलेला होता. पण त्या वेळेच्या रीतीभातीनुसार वडिलांनी साखरुपेक्षा कमी शिकलेल्या औतेरावाशी लग्न लावून दिल्यामुळे लहान वयातच तिच्यावर संसाराची जबाबदारी येते. ती शेवटपर्यंत संसाराचा गाडा नेटाने हाकते. नवऱ्याला शेतीच्या कामात मदत करणे, घरातील घरकाम करून दुसऱ्याच्या शेतात भांगलणीसाठी, भात कापणीसाठी पैरा फेडायला जाणे, घरात जनावरांची देखभाल करणे, धारा काढणे, शेणघाण काढणे, नदीपासून घरापर्यंत डोईवरून पाणी आणणे, सारवण करणे अशी खेडेगावातील प्रत्येक स्त्रीच्या वाट्याला आलेली कामे साखरू आनंदाने करते. नवरा रागीट स्वभावाचा आहे, मारझोड करतो, शिव्या देतो, आपल्यापेक्षा कमी शिकलेला आहे याचा तिने कधीच तिरस्कार केला नाही. उलट ती कुटुंबातील प्रत्येकावर माया करते, प्रेम करते, आदर करते. सासू कितीही खाष्ट स्वभावाची असली तरी संसार नीटनेटका चालविण्याची तिची धारणा साखरू समजून घेते.

सासरे हरिपंत देवमाणूस आहेत, समाजात त्यांना मान आहे, याचा तिला अभिमान आहे. हरिपंत हे तिला सतत आधारवड वाटत असतात.

ऐन भात कापणीच्या हंगामात साखरू आजारी पडते. तिला उठताबसताही येत नसते. अशा परिस्थितीतसुद्धा तिला घरकाम करावे लागते. घरातील स्त्रीने झोपून राहणे तिला पटत नाही. आपण काम केले नाही तर नवऱ्याचे, सासऱ्यांचे, मुलांचे कोण करणार? याची चिंता तिला असलेली दिसते. त्यातूनच ती इंजेक्शन, औषधे घेऊन अंगात ताप असताना भात कापणीचा पैरा फेडण्यासाठी ती दुसऱ्याच्या शेतात कामाला जाते. काम करून थकून आलेल्या साखरुला घरात येऊन पुन्हा कामाचा डोंगर उपसावा लागतो. यातून एखादी चूक झालीच तर सासूची बोलणी खावी लागतात. मनासारखे काहीतरी करून खावावे तर तेही तिला खाता येत नाही. औतेराव कामाचा राग साखरूवर काढतो. तो तिला सतत शिव्या देत राहतो. या सगळ्यांमध्ये तिला हरिपंत आधारवड वाटतात. हरिपंत तिला आपल्या मुलीसारखे वागवतात. साखरुसाठी हरिपंत बायको, मुलाशी भांडतात. असे असले तरी साखरू संसारात सुख मानते. नवऱ्याच्या रागीट स्वभाव समजून घेऊन त्याच्या कामात आनंदाने मदत करते. सासूच्या आजारपणात तिची मनापासून सेवा करते. औतेराव कारखान्याला ऊस ओढण्यासाठी बैलगाडी करतो. साखरू याही कामात औतेरावाला मदत करीत असते. उसाच्या मोळ्या बांधणे, गाडी भरायला मदत करणे, औतेरावाला डबा करून देणे, औतेराव कारखान्याला गाडी घेऊन गेल्यानंतर स्वतःच्या हिमतीने शेताला पाणी पाजणे, भात कापणे यासारखी कष्टाची कामे ती करीत असते.

दारात आलेल्या सुया, दोरावाली काशीबाईचे दुःख साखरूला आपले दुःख वाटते. तिच्या दुःखाने साखरू कळवळते. साखरू तिला भाकरी, कोरड्यास खायला देते, तिची मनापासून चौकशी करते, तिला आधार देते. काशीबाई उठून जात असताना साखरू तिला थांबवून सुपभर भात तिच्या पाठीत घालते. जुनं पाताळ आणि आपल्या मुलाचा जुना ड्रेस काशीबाईला देते. यातून साखरुचा दयाळूपणा लेखकाने चित्रित केलेला आहे. आपणाला पुढे शिकता आले नाही पण मुलाने पुढे खूप शिकावे, ही तिची इच्छा आहे. डॉक्टराच्या पोराने डॉक्टर, पुढाऱ्याच्या पोराने पुढारी नि शेतकऱ्याच्या पोराने शेतकरीच का व्हावे?' असा प्रश्न ती दुकानदार दामूआण्णाला विचारते. यातून तिची शिक्षणाकडे पाहण्याची दृष्टी प्रत्ययास येते.

हरिपंत पंढरीच्या माघ वारीला गेल्यानंतर साखरूवर कामाचा ताण पडतो. नवरा औतेराव बैलगाडीने कारखान्याला ऊस ओढत असतो. पण साखरू डगमगत नाही. डोंगरावर पुरुषांच्या बरोबरीने ती गवत कापायला जाते. उतारावर चपला निसटतात म्हणून अनवाणी पायाने गवत कापते. सडा पायात घुसतो व त्यातून रक्त सांडू लागते. पायातून प्रचंड कळा येत असतात पण साखरू गवत कापण्याचे काम थांबवत नाही. यातून साखरुचा कष्टाळूपणा आणि घरादाराची असलेली काळजी लक्षात येते. रवण बसवलेल्या कोंबडी आणि पिल्लांना विकण्यासाठी डोक्यावर डालगं घेऊन साखरू सरवडेच्या बाजाराला जाते. बाजाराचे कोणतेही ज्ञान नसताना ती केवळ सासूची आज्ञा म्हणून कोंबड्या विकायला बाजाराला आलेली असते. गिऱ्हाईकाने कमी किमतीत कोंबड्या मागितल्यावर साखरू हतबल होते. मी माझ्या मनाने काही करू शकत नाही', असे

ती गिऱ्हाईकाला प्रामाणिकपणे सांगते. सासुबाईने सांगितलेल्या रकमेलाच ती कोंबड्या विकते व घरातला बाजार करते. स्वतः कोणताच निर्णय घेता येत नसल्याचे क्षणभर तिला दुःख होते, पण ती अशाही संसारात आनंदी आहे. सासूच्या आज्ञेत राहणारी साखरू इथे प्रत्ययास येते. कामातून वेळ काढून साखरू चार दिवस माहेरात राहून येते. चार दिवसाची राहिलेली सगळी कामे तिलाच करावी लागतात. चार दिवसाचे धुणे धुण्यासाठी ती नदीला जाते. नदीवर कोणीच नसते. अशातच पावसाला सुरुवात होते. अचानक कुठूनतरी तिला हाक दिल्याचा आवाज येतो. साखरू प्रचंड घाबरते. ती घराकडं पळत सुटते. घरात आल्यावर तिला दरदरून ताप भरतो. ती अंथरून धरते. लवकरच ती याही आजारपणातून बाहेर पडते व आपल्या दैनंदिन कामाला लागते. ग्रामीण भागातील रीतीभाती, प्रथा, परंपरा, भुताखेतांवरील विश्वास कसा असतो, याचा प्रत्यय येथे येतो.

गावातील वेतोबाच्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सासरे हरिपंत यांची धावपळ आणि नवऱ्याची कारखान्याला बैलगाडीने ऊस ओढताना होणारी ओढाताण पाहून साखरू दुसऱ्या बाळंतपणाला भाऊ नेण्यासाठी आला असता जायला तयार होत नाही. परंतु सासऱ्यांच्या आग्रहामुळे ती जाते. ओल्या अंगाची बाळंतीण असतानाच घरातील अडचणीमुळे ती लवकर परत येते व कामाला लागते. दिराची मुलगी वैजयंताच्या लग्नात पैशांच्या अडचणीच्यावेळी साखरू आपल्या गळ्यातील बोरमाळ वैजयंताला देते. बोरमाळ मोडून वैजयंताचे लग्न पार पडते. औतेरावाला साखरुच्या या कृतीचा राग न येता त्याला तिचा अभिमान वाटायला लागतो.

नवरा औतेरावला मुतखड्याचा त्रास असतो. अशा त्रासातही औतेराव पैरा फेडण्यासाठी भात कापायला जातो. तेथे त्याची होणारी तगमग साखरूला पाहवत नाही. ती औतेरावाला घरी जाण्यास सांगते. कामं काय होत राहतील, पण माणूस त्यासाठी जिवंत राहायला हवा' अशी ती त्याला सुनावते. औतेरावाला ऑपरेशन करण्याचे सुचविते. नवऱ्याने गावठी औषध घेणे, आजारपण अंगावर काढणे तिला आवडत नाही. त्यावेळी आपली मुलगी नंदिनीच्या नावावर ठेवलेली ठेव मोडून ऑपरेशन करावे, अशी विनवणी करते. आजारपणात साखरू गडीमाणसासारखे काम करते. शेतीवाडी बघते. भात कापून घरी आणते. राबराब राबते. नवरा मुतखड्यावरील गावठी औषध खाण्यासाठी उपाशी बाहेर गावी गेला तर साखरुसुद्धा दिवसभर त्याच्या काळजीत उपाशी राहते. नवरा आजारी आहे, झोपून आहे, शेतात नांगरठ करणे आवश्यक आहे, अशावेळी साखरू स्वतः हिमतीने बैलं जुपून नांगरट करायला जाते. मुलगा तान्याच्या मदतीने सगळा शिवार नांगरून घरी येते. रानात नांगरट करताना साप दिसतो, त्यावेळी ती भयभीत होते. ती देवाला साकडे घालते, नवऱ्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते.

एकूणच खेडेगावातील कुणबी कुटुंबातील कष्टकरी स्त्रीचे प्रातिनिधिक रूप म्हणजे साखरू होय. वाईट माणसांना चपलीने बडवणारी, फटकुऱ्या बैलाला कसाबाला विकण्यास विरोध करणारी, मुलांवर, नवऱ्यावर, अतोनात प्रेम करणारी, सासू-सासऱ्याचा आदर करणारी, घरदार सांभाळून कष्ट करणारी, प्रत्येकाला मदत करणारी, आधार देणारी आणि संस्कृती टिकवून ठेवणाऱ्या साखरुचे लेखकाने प्रभावी चित्रण केले आहे.

### ३.३.४. रखमाई

नांगरमुठी' या कादंबरीतील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा म्हणून रखमाईचा विचार करता येईल. हरिपंतांची बायको, औतेरावाची आई आणि साखरुची सासू अशी सतत कादंबरीत ओळख येत असली तरी रखमाईचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कादंबरीभर लक्षात येते. ग्रामीण अर्थशास्त्र पक्के असणारी, काटकसरीचा प्रपंच करणारी, हरिपंतांच्या सहवासात राहूनही थोडीशी रागीट स्वभावाची, जाऊशी या-ना त्या कारणाने भांडणारी, साखरुसारख्या सुनेशी हटकून वागणारी, नातवांचा लाड करणारी, व्यावहारिकता जपणारी रखमाई वाचकांचे लक्ष वेधून घेते.

हरिपंत हे अस्सल कुणबी शेतकरी आहेत. ते शेतीभाती पाहत विठ्ठलभक्ती, भजन, कीर्तन, प्रवचन करतात, याचा रखुमाईला एकीकडे आनंद तर एकीकडे राग आहे. घरकाम, शेतीची कामे करताना रखमाई त्रासून जाते. याचा राग नेहमी हरिपंतांच्या विठ्ठलभक्तीवर निघताना दिसतो. औतेरावावर संस्कार करण्याचे काम रखमाई उत्तम पद्धतीने पार पाडते. औतेरावाला लहानपणापासून शेतीची आवड निर्माण करण्यात रखुमाईचा हातभार आहे. आपला दीर ऐन उमेदीच्या काळात मुंबईला जाऊन राहिला, त्यामुळे शिकलेल्या हरिपंतांवर नांगरमूठ धरण्याची वेळ आली, याचा रखमाईला आतून राग आहे. हा राग ती आपल्या जाऊवर काढत असते. म्हैस धार देत नाही म्हणून औतेराव म्हशीला मारतो, त्यावेळी रखमाई त्याला म्हैस विकून टाकण्यास सांगते. एकीकडे हरिपंत, औतेराव जनावरांवर, मुक्या प्राण्यांवर माया करतात तर त्यांच्या संगतीत राहून रखमाई मात्र जनावरांचा तिरस्कार करते. पिलुमा भात मागण्यास आला असता रखमाई त्याला भात देण्यास नकार देते. या पाठीमागे पिलुमा तराळने वेळप्रसंगी कामास मदत केली नसल्याचा राग रखमाईला असतो. ग्रामीण भागात कुटुंबातील एखाद्या सदस्यांमध्ये असा व्यावहारिकपणा सर्रास पाहावयास मिळतो.

रखमाईमध्ये ग्रामीण अर्थशास्त्र पाहायला मिळते. 'काडीकाडी गोळा केली तर गरजेला जनावरांच्या पुढ्यात कवळा टाकायला गावतोय' हे तिचे तत्त्वज्ञान अफलातून आहे. दारावर आलेलं गारेगार घेण्यासाठी नातू तान्याला पैसे हवे असतात, पण ती पैसे देत नाही. घरात भुईमुगाच्या शेंगा असल्या तरी त्या खाण्यासाठी वापरत नाही. फक्त तेलासाठीच त्या शेंगा ती वापरते. घरात कोण आलं, काय नेलं, किती दिलं याकडे रखमाईचे बारीक लक्ष असते. प्रपंचा करताना काटकसर महत्त्वाची असते, हे तिचे विचार रखमाईच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देतात.

साखरू माहेराला थोडीशी विश्रांती म्हणून राहायला गेली असता रखमाईवर कामाचा बोजा पडतो. ती कामाने वैतागून जाते. साखरू माहेरातून परत आल्यानंतर चार दिवसांची धुणे, भांडी रखमाई तिला करायला लावते. यातून साखरू आजारी पडते. शेवटी रखमाईलाच तिची सेवा करावी लागते. आजारातून सून लवकर बरी व्हावी, अशी तिची मनापासून इच्छा असते. प्रसंगी खेडेगावातील रीतीभातीनुसार भुताखेतांचे हे काम असेल म्हणून साखरूवरून उतारा उतरून टाकते. साखरू किती खाते याचे मोजमाप करणारी रखमाई इथे तिची काळजी घेताना दिसते. साखरुच्या दुसऱ्या बाळंतपणात साखरुची आई काहीतरी गोडधोड पदार्थ करून आलेली असताना रखमाई विहीणबाईशी आपुलकीने बोलत नाही. साखरुच्या दुसऱ्या बाळंतपणात घराची

सर्व जबाबदारी रखमाईवर येऊन पडते, याचा राग कुठेतरी तिच्या मनात असतो. औतेरावाचा सांभाळ करीत असताना रखमाईने औतेरावावर चांगले संस्कार केले आहेत. लहानपणी औतेराव आई-वडिलांसोबत पंढरपूरच्या वारीला गेलेला असतो. तेथे तो दोन केळी चोरतो. रखमाईला हे लक्षात येताच ती औतेरावाला दोन फटके देते. त्या दोन केळ्यांचे पैसे ती केळेवालीला देते. औतेरावाला शिकवण देताना सांगते की, 'कोणाची चोरी, लबाडी करू नये. म्हणजे आपल्याला काहीही कमी पडत नाही. देवाला आपली काळजी असते. तोच आपला रक्षणकर्ता असतो.' यातून कितीही रागीट, व्यावहारिक असणारी रखमाई समंजस आणि प्रामाणिक दिसते.

एका प्रसंगात रखमाईचे आणि सुनेचे भांडण होते. रखमाई रुसून आपल्या मुलीकडे, मुक्ताकडे राहायला जाते. तिथे गेल्यावर ती आजारी पडते. डॉक्टर रक्त चढवण्याचा सल्ला देतात. मुलगी मुक्ता दवाखान्याचे बिल भरण्यासाठी रखमाईचे चिताक मोडायचे ठरवते, पण रखमाई चिताक मोडायला तयार होत नाही. वडिलांनी फार कष्टाने लग्नात चिताक घातले आहे. एक वेळ मरण पत्करेन पण चिताक मोडणार नाही' असे ती मुक्ताला बजावते. रखमाई गावी परत येते. आजारपणात आपण कोणावर बोज होऊ नये, असे रखमाईला वाटते. साखरू रखमाईची चांगली सेवा करते. साखरूबरोबर भांडणारी रखमाई आता तिच्याशी नीट वागू लागते. साखरुची सेवा पाहून रखमाईला गहिवरून येते. आपल्या आजारपणात कुणाचेच शेतीभातीत लक्ष नाही, सगळा संसार मोडून पडेल, म्हणून ती प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर उठून बसते. घरातल्यांना धीर येतो. सगळी कामे सुरळीत सुरू होतात. त्यातच रखमाईचे निधन होते.

### ३.३.५. इतर व्यक्तिरेखा

प्रस्तुत कादंबरीतील हरिपंत,औतेराव, साखरू, रखमाई या प्रमुख व्यक्तिरेखांबरोबरच काही साहाय्यक व्यक्तिरेखांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल. 'ताना' हा औतेरावांचा मुलगा आहे. लहानपणी हरिपंतांच्या मांडीवर बसून शेतीभातीविषयी प्रश्न विचारणारा ताना शाळेत हुशार आहे. हरिपंत आणि साखरुचे त्याच्यावर वारकरी संस्कार झालेले आहेत. तानाला दहावीची परीक्षा झाल्यावर सुट्टीसाठी मामाच्या गावी जाण्याची इच्छा असते. पण वडील आजारी असल्यामुळे शेताची कामे करण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडते. भुईमूग काढणे, औत हाकणे यासारखी कामे इच्छा नसतानाही तान्याला करावी लागतात. फटकुऱ्या बैलाच्या शिंगात जखम झाल्यामुळे त्या बैलाला विकावे, असे तो आपल्या वडिलांना सांगतो. बैलाच्या आजारपणामुळे घरात कोणालाही आजार होऊ नये, अशी त्याची रास्त भावना असते. यातून त्याची कुटुंबाविषयी असणारी काळजी प्रत्ययास येते. फटकुऱ्या बैलाला विकताना आपल्या वडिलांना बंडा व दलालाने फसवले, याचे त्याला वाईट वाटते. तो वडिलांशी या विषयावर भांडतो. वडिलांना व्यवहार कळत नाही, असे त्याला वाटते. परंतु वडिलांनी समजावल्यावर तानाला खरी परिस्थिती समजते. पुढे ताना ऊस दराच्या आंदोलनात सहभागी होतो. नरसिंगआण्णाचा उसाने भरलेला ट्रॅक्टर अडवतो. घोषणाबाजी करतो. आण्णाची माणसे हत्यारबंद असतानाही तो घाबरत नाही. उसाला योग्य हमीभाव मिळावा, ही त्याची धारणा आहे. एकूणच वारकरी शेतकरी कुटुंबातील संस्कारातून तानाची घडण झाली आहे.

नरसिंगआण्णा' ही साहाय्यक व्यक्तिरेखा खलभूमिका पार पाडताना दिसते. गावचे सरपंच म्हणून नरसिंगआण्णांचा गावभर दबदबा आहे. खानदानी सावकारकी, सव्वाशे एकर जमिनीचे मालक, विहिरींना मुबलक पाणी, विहिरींवर इंजिन, नदीवर मोटर, उंच वाडा असणारे नरसिंगआण्णा गावावर वर्चस्व ठेवून आहेत. नरसिंगआण्णांचा मुलगा व सून दोघेही डॉक्टर असून ते शहरात राहतात. त्यांची बायको मात्र सुशील आणि प्रेमळ होती. नवऱ्याचा आब राखून ती गावातल्या लोकांना जमेल तेवढी मदत करीत असते. गणपा बारडाच्या दादागिरीच्या जोरावर नरसिंगआण्णांचे दडपशाहीचे राजकारण सुरू होते. गावच्या मंदिराचा जीर्णोद्धार हरिपंत पुढाकार घेऊन करतात, याचा नरसिंगआण्णांना राग होता. ते मंदिराच्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न करतात. पपेराव आपल्या विरोधात बोलतो, म्हणून त्याला दडपण्याचा प्रयत्न करतात. शेतकरी संघटनेचे उसाला योग्य हमीभाव मिळावा म्हणून आंदोलन सुरू असते. परंतु कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी गटाकडून उमेदवारी मिळावी म्हणून नरसिंगआण्णा कारखानदारांच्या संगतीत जातात. बळजबरीने ऊस तोडून कारखान्याला घालण्याचा प्रयत्न करतात. यामध्ये ज्यांनी विरोध केला त्यांच्यावर डूख धरतात. या प्रसंगात औतेरावाच्या मुलाने आण्णांना विरोध केला म्हणून आण्णा औतेरावचा ऊस तोडला जाऊ नये म्हणून प्रयत्न करतात. गावातील अशा विविध वृत्ती-प्रवृत्तींचा धांडोळा लेखकाने घेतला आहे.

'सारजा' ही नवऱ्याच्या व्यसनीपणाला कंटाळलेली, आपल्यावरील अन्यायाला वाचा न फोडू शकणारी, असहाय्य, गरीब, कष्टकरी, मजुरी करून पोट भरणारी साहाय्यक स्त्री व्यक्तिरेखा आहे. पांडुरंग पाटील यांनी सारजाच्या माध्यमातून कष्टकरी, मजूर स्त्रीच्या दुःखाची जाणीव करून दिली आहे. नरसिंगआण्णांचा भाऊ बाळू जगतापाची सारजावर वाईट नजर असते. नवरा व्यसनी असून तो सारजाला मारझोड करायचा, यातून सारजा घर सोडून जाते. परंतु हरिपंतांच्या विनंतीवरून सारजाचा नवरा सदा भूतल सुधारतो. सारजा घरी परत येते, मोलमजुरी करून संसार हाकत राहते. दुसऱ्याच्या शेतात भांगलणीसाठी जात असते. अशावेळी तिच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन बाळू जगताप तिचा हात धरतो. सारजा कशीबशी सुटका करून घेते. बाळू जगताप तिला जीवे मारण्याची धमकी देतो. सारजा भयभीत होते आणि घरातून बाहेर पडायचे बंद करते. अशावेळी साखरू तिला आधार देते, तिला बळ देते. त्यानंतर सारजा भिती सोडून देते व आत्मविश्वासाने जगायला लागते.

या व्यक्तिरेखांबरोबरच बाळू जगताप, शिवणाप्पा, भिकशेठ गिरणवाला, शामा पाटील, कुसा तराळीन, वामन गुरव, हणमंता, पपेराव सावंत, सदा भूतल, पिलुमा तराळ, धोंडबा मुकादम, परसराम यासारख्या साहाय्यक व्यक्तिरेखा कादंबरीत येतात. पांडुरंग पाटील यांनी या व्यक्तिचित्रणातून अस्सल ग्रामजीवन अधोरेखित केले आहे.

**३.४ वातावरणनिर्मिती**

कादंबरीच्या रचनेत पात्रांप्रमाणेच वातावरण हा घटकही महत्त्वाचा असतो. कादंबरी हा वाङ्मयप्रकार संपूर्ण मानवी जीवनाला कवेत घेणारा आहे. मानवी जीवन हे विशिष्ट स्थळकाळात, अवकाशात घडत असते. कादंबरीतील घटना कोणत्यातरी काळात घडत असतात. तसेच अवकाशाची उभारणीही त्यातून होत असते.

त्यातूनच वातावरणनिर्मिती होते. कादंबरीतील व्यक्तींच्या आंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातावरणामध्ये असते. कादंबरीकार त्याच्या या सामर्थ्याचा उपयोग करून कादंबरीची रचना करीत असतो. त्यामुळे कादंबरीतील वातावरण हा घटक कादंबरीला आकार देण्यासाठी खूप उपयोगी असतो. 'नांगरमुठी' कादंबरीतील वातावरणनिर्मितीतून एक दृश्यचित्र आकारत जाते.

प्रस्तुत कादंबरीत खेडेगावाचे चित्रण येते. खेडेगावातील सणवार, उत्सव, रितीभाती, प्रथा, परंपरा, सामाजिक, सांस्कृतिक जीवन यांचे विविधांगी दर्शन लेखकाने प्रस्तुत कादंबरीत घडविले आहे. प्रत्येक ऋतुमानानुसार ग्रामीण जीवनात येणारे वेगवेगळे सण, उत्सव, प्रथा, परंपरा आणि त्याच्यानुसार शेतातील बदलत जाणाऱ्या मशागती, पिके याचे चित्रण लेखकाने केले आहे. कादंबरीच्या सुरुवातीस लेखकाने रिपरिप पावसाचे वर्णन करून शेतकरी आणि पाऊस यांच्यातील संबंध दृढ करून शेतीच्या कामाची रेलचेल प्रकट केली आहे. 'पाऊस उघडझाप करू लागला. डोंगरउताराचं पाणी घेऊन धावणाऱ्या सारणी ओहळांना उतार आले. चिघळलेली रानं घट्ट झाली. नेबळून पडल्यालं नाचणं मानवर करून उठून बसलंत. मिटलेली बोंडंउलघडली. हाताच्या पाची बोटागत वाऱ्याच्या झुळकीसंगट नाचू लागली. भुईमुगाच्या शेंगा भरू लागल्या. पिवळ्या तिळाची फुलं कडेनं उमलली. हिरव्यागार पातळावर जरीचा काठ असल्यागत दुरून दिसू लागलं. माळा मुरडातली हावळी भातं घवळायला लागली.ढोरागुरांच्या चाऱ्याला तजेला आला. शिवारात माणसांचा वावर वाढला. पावसाळभर शिणहाळ असणारं शिवार गजबजू लागलं.' (पृष्ठ क्र. १२) पहिला पाऊस पडून गेल्यानंतर शेतातील पिकांमध्ये झालेले बदल आणि शेतकऱ्याची कामाची धांदल लेखकाने इथे चित्रित केली आहे.

प्रस्तुत कादंबरीत लेखकाने ग्रामीण भागातील सणांचे चित्रण करून शेतकऱ्यांच्या आयुष्यातील सणांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. लेखकाने प्रस्तुत कादंबरीत 'दसरा' या सणाचे वर्णन करून वातावरणनिर्मिती केली आहे. पावसाची उघडझाप सुरू होताच सगळ्यांना दसऱ्याची चाहूल लागते. बायका घर झाडून पांढऱ्या मातीने सारवून घेतात. घराच्या बाहेरच्या भिंतीवर कोळ्यांनी चुण्यानं चौकं काढलं. मधोमध जोंधळ्याची थाटं रेखाटली. त्या बदल्यात त्यांना भात मिळते. पानतंबाखू खाणाऱ्यांनी चुना विकत घेऊन लोटकी भरली. बुरुड, कोरवी यांच्या दारात मेसकाट्या येऊन पडल्या. त्यांचे नवीन तट्टे, टोपली, सुपं, बुट्ट्या बनविण्याचे काम सुरू होते. कुंभारांची गणपती बनविणे, मोगे बनविणे, रंगीत बैल,पोपट, वाघ अशी खेळणी बनविणे यासारखी कामे सुरू होतात. लोहार लोक खुरपी, नांगराचे फाळ तयार करायला लागतात. सुतार लोक नांगर, नांगराचे जोडकाम करू लागतात. तराळ लोकांनी वाजापाचं साहित्य दुरुस्त करून घेतलं. वडार लोक जाती, खलबुतं, पाठं, वरुटं घडवू लागले. दसऱ्यादिवशी घट बसले. याच काळात मिळणारी पिवळी फुले घटावर घातली जाऊ लागली. नवरातकरी लोक उपवास करून दिवस दिवसभर शेतात राबू लागले. संध्याकाळी तरुण पोरं लेझीम खेळू लागली. काही वस्ताद लोक मुलांना दांडपट्टा शिकवू लागले. पहाटे सनई,भोंगा व सुरपेटीमुळे नांगरगाव' जागू लागलं. देवाचा जागर झाला. लोकांनी वेतोबाला कुंभ, लव्हाळा, दर्भ, कडाकणी, गोंड वाहिली. हलगी, ताशा कडाडू लागले. सासनकाट्या नाचू लागल्या. रात्री देवाची पालखी निघाली. शिलंगणाला माळावर मातीच्या मैदानात कुस्त्या रंगल्या. अंधार पडू लागल्यावर लोकांनी सोनं

लुटलं. पालखीला सोनं घालून एकमेकाला देऊन सोनं घ्या सोन्यासारं रहावा'चा गजर होऊ लागला. दसरा या सणाचे वर्णन करून लेखकाने जनमाणसात संचारलेला उत्साह या निमित्ताने चित्रित केलेला आहे.

दसरा संपल्यानंतर शेतकऱ्यांची भात कापणीची लगबग सुरू होते. ग्रामीण भागात भात कापणी म्हणजे एक प्रकारचे दिव्यचअसते. अशा भात कापणीच्या वर्णनातूनशेतकऱ्यांची कष्टमयता साक्षात होते. भात कापणीच्या आधी भात मळणीसाठी खळं तयार करावं लागतं. हरिपंत आणि इतर शेतकरी दिवसभर राबून खळं तयार करतात. भात कापणीच्या जोडणीसाठी शेतकऱ्याला विविध गोष्टी कराव्या लागतात. भात कापणीसाठी पैरेकऱ्यांना विनवणी करणे, खुरप्यांना धार काढणे, भात भरून आणण्यासाठी पोती शोधणे,पिंजार हलवण्यासाठी आकड्या काढून ठेवणे अशी आधीची अनेक कामे करावी लागतात. भात कापणीच्या दिवशी पहिल्यांदा दहीभाताचा नैवेद्य दाखवला जातो. नारळ वाढविला जातो. दहिभाताची शीतं शेताभोवती टाकली जातात. देवाचे नाव घेऊन पात धरून भात कापायला सुरू केले जाते. नंतर एक एक पैरेकरी शेतात येऊ लागतो. भात कापण्यासाठी पाता धरल्या जातात. मध्ये मध्ये पाणी पिण्याचा फेर होत असतो. भाताचे भारे बांधण्यासाठी बेळे काढले जातात. भात कापता कापता बायकांमध्ये एकमेकीला शाब्दिक डिवचण्याची स्पर्धा सुरू होते. दुपारच्याला सगळेजण एकत्र जेवतात. पावसाचा अंदाज घेऊन कामाला गती येते. बेळावर भारे बांधले जाऊ लागतात. व्हळीमध्ये भारे येऊन पडतात. संध्याकाळी डेअरीच्या भोंग्याला भाताची व्हळी तयार होते. भोंगा झाल्यावर बायकांची पळापळ सुरू होते. गडीमाणसं व्हळी रचून उद्या सकाळी मळणी काढण्याचा विचार करतात. पुन्हा माणसांची जमवाजमव करण्याची जबाबदारी शेतकऱ्यावर येऊन पडते. अशातच पावसाला जोरदार सुरुवात होते. शेतकऱ्याला उद्याच्या मळणीची काळजी लागते. खळ्यातून पाणी बाहेर जायला दोन दिवस जातात. दोन दिवसांनी मळणी सुरू होते. बैलं सुरात फिरायला लागतात. मळणकरी आनंदाने गाणी म्हणतात. मळणकऱ्यांना चहा व वरकी दिली जाते. तास-दोन तास मळणी चालते. मळणी चांगल्या प्रकारे झाल्याची खात्री केली जाते. तळझाडणी सुरू होते. पिंजार हलवून भात खाली पाडले जाते आणि पिंजार बाहेर टाकले जाते. बाहेर टाकलेले पिंजार वाळवण्यासाठी पसरून टाकले जाते. काही पैरेकरी पिंजराच्या घुत्या डोईवर घेऊन घरी जातात. मळणी उलागली जाते. भात उन्हात वाळवले जाते. भाताला वारे दिले जाते. स्वच्छ केलेल्या भाताची रास पाहून शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा असतो. सदरचे वर्णन लेखकाने अत्यंत तन्मयतेने केले आहे. त्यामुळे भात कापणीचे हे दृश्य वाचकांपुढे जसेच्या तसे उभे राहते.

प्रत्येक गावागावात कमालीचे राजकारण पाहायला मिळते. राजकारणाची इर्षा अगदी टोकाला जाऊन पोहोचलेली असते. ग्रामीण समाजजीवनात सत्ताधारी गट, विरोधी गट, पुढारी, कार्यकर्ते, सर्वसामान्य लोक आणि राजकारण इत्यादी बाबींना महत्त्वाचे स्थान असते. पांडुरंग पाटील यांनी प्रस्तुत कादंबरीत ग्रामीण भागातील राजकारणाचा पट उलघडला आहे.

नांगरगावात नरसिंगआण्णा यांचा एक गट तर पपेराव सावंत यांचा एक गट असे राजकारण सुरू असते. सुगी संपल्यानंतर देवस्थानच्या जमिनीचा खंड गोळा करण्यावरून या दोन गटात बाचाबाची होते. हरिपंत या

दोन गटांच्या भांडणात मध्यस्थाची पण रास्त भूमिका घेत असतात. यावेळी जमाखर्चाचा हिशोब करीत असताना एकमेकांवर पैसे खाल्ल्याचे आरोप केले जातात. याप्रसंगी एकमेकाला बघून घेण्याची भाषा बोलली जाते. चर्चेचे रूपांतर हाणामारीकडे होत असताना हरिपंत सर्वांना शांत करतात. नरसिंगआण्णा विसेक वर्षे सरपंच असतात. गावात त्यांचा दरारा असतो. तर पपेराव सावंत मुंबईतील गिरणी बंद पडल्याने गावाकडे येऊन दूध डेअरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संघटित करण्याचे काम करतात. त्याचा राजकारणातला शिरकाव आण्णांना खूपत होता. यातूनच भावाभावात भांडण लागून घरात भिंती रचल्या जातात. गावात दोन गट पडले होते. बांधावरून एकमेकांची डोकी फुटतात. कुणाचं पाणी अडवलं जातं, तर कुणाचा रस्ता अडवला जातो. गावातले वातावरण अगदी दूषित होऊन जाते. गावातून दोन्ही गटाचे लोक खांद्यावर कुऱ्हाड घेऊन फिरू लागतात. एकमेकांना अडकवण्यासाठीचे प्रयत्न सुरू होतात. ज्यांची डोकी फुटली त्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या कोर्टाच्या वाऱ्या सुरू होतात आणि पुढारी लोक याची मजा लुटत बसतात. राजकारणाच्या शिरकावामुळे ग्रामीण समूह जीवनाला कसे तडे गेले, याचे सुतोवाच करणारे हे वर्णन आहे.

अशातच ग्रामपंचायतची निवडणूक लागते. नरसिंगआण्णा विरुद्ध पपेराव सावंतने दंड थोपटले. पपेरावने देवस्थानच्या जमिनी, मिळणारा खंड, बेघरांच्या घरकुलाचा प्रश्न या मुद्द्यांच्या साह्याने स्वतःचे जनमत तयार केले. दोघांकडेही सहकारी संस्था होत्या. यातूनच पैशाचे व्यवहार होऊ लागले. एकमेकांकडे बघून खाकरा काढणे सुरू झाले. साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर करून प्रचार सुरू होतो. हरिपंत बिनविरोध निवडणूक होण्यासाठी आग्रह धरतात. त्यांना गावचे हे राजकारण आणि त्यातून होणारा संघर्ष नको होता. पण तोडगा निघाला नाही. दारूचे गुत्ते माणसांनी फुलले. पैसे, साड्या वाटायला सुरुवात झाली. यल्लामाच्या परडीवर शपथा घेतल्या जाऊ लागल्या. गुप्त मतं फोडण्यात येऊ लागली. शेताशिवारात चोरून गाठीभेटी सुरू झाल्या. गावातलं तंग वातावरण पाहून पोलिसांची छावणी गावाभोवती पडली. निवडणुकीच्या दिवशी बाहेर कामाला असलेली माणसं आणण्यासाठी चढाओढ लागली. गाड्या सगळीकडे पाठवण्यात आल्या. बाचाबाची, हातघाईवर आलेली गर्दी पांगवत त्या दिवशीचे मतदान पार पडते. या निवडणुकीत पपेरावच्या पाच सीटा व नरसिंगआण्णांच्या चार सिटा निवडून येतात. नरसिंगआण्णांची वीस वर्षाची सत्ता उलथवली जाते. प्रत्येक गावागावात दिसणारे हे दृश्य लेखकाने कादंबरीत चित्रित करून त्यानिमित्ताने तयार झालेल्या वातावरणाचे नेमके चित्रण लेखकाने केले आहे.

ऋतुमानाच्या बदलांचे चित्रण लेखकाने अत्यंत पद्धतशीरपणे केलेले आहे. ग्रामीण समाजजीवनात शेतकरी कुटुंबामध्ये ऋतूंना फार महत्त्व असते. प्रत्येक ऋतुमानानुसार शेतीची कामे, सणवार, जीवनपद्धती बदलत असते. हा बदल लेखकाने चपखलपणे प्रस्तुत कादंबरीत चित्रित केलेला आहे.

''भुईबच्या बुट्टीतनं थंड आली. पहाटेला म्हातारी कोतारी माणसं ढग करून बसू लागली. खंडू न्हाव्याच्या कट्टीवर सकाळीच ही गर्दी! काटकुट काटकुट करीत मशीनच्या दातऱ्या लागतील तशी पोर ठणाणा ओरडत होती नि खंडूचं मधीच उठून चहाला घरात पळणं! रेडिओवर सकाळच्या बातमीत क्रिकेटची बातमी आली की वस्ताऱ्याचा हात गिऱ्हाईकाच्या गालावरच थांबणार. तोवर खापरीतनं कुशीरडा

कुणाच्यातरी शर्टाच्या कॉलरतनं आत टपाकलेला. सकाळची पहिली किरणं वेतोबाच्या कळसावर पडली, तशा पिपरणीवर जाग्या झालेल्या चिमण्या चुटूचुटू उडत डांबाच्या तारेवर बसल्या. बरीच लांबलचक अशी त्यांची ओळ तयार झाली.''(पृष्ठ क्रमांक ४५)

ग्रामीण समाजजीवनात ऋतूंना आणि ऋतूनुसार आलेल्या सणांना प्रचंड महत्त्व असते. उन्हाळा संपतासंपता सुरू झालेल्या जत्रा, शेताच्या मशागतीची कामे, पावसाळ्याच्या सुरुवातीला कामांची उडालेली धांदल, दसरा सणाची तयारी, पावसाळ्यानंतर हिवाळ्याची लागलेली चाहूल, बदलत्या महिन्यानुसार शेतीची बदलत जाणारी कामे, ऋतुमानानुसार शेतातील पिकांची वर्णने, निसर्गाचे वर्णन इत्यादीतून उभारलेले वातावरण भारावून टाकणारे आहे.

काळाम्मावाडी धरणाच्या निर्मितीमुळे गावात झालेला बदल लेखकाने चित्रित करून पालटलेल्या वातावरणाचा धांडोळा घेतला आहे. काळाम्मावाडी धरण बांधल्यानंतर धरणातून टप्प्याटप्प्याने नदीला पाणी सोडले जाऊ लागले. बंधाऱ्याववर भोई लोकांच्या गस्ती ठेवल्या गेल्या. नदीच्या दोन्ही काठावर आठवडा आठवडा पाणी उपसण्याचे ठरवलं जातं. नदीला पाणी आले तसे शेतकऱ्यांची धांदल उडाली. उसाचे क्षेत्र वाढले. नदीकाठची हिरवीगार गवताची कुरणं नाहीशी झाली. त्यावर झूलणारे पशुपक्ष्यांचे, फुलपाखरांचे थवे दिसेनासे झाले. नदीला पाणी येण्याआधी दिवाळीनंतर सारं गवत कापलेलं रान मोकळं असायचं. गावाची जनावरंहुंदडत दात घासत फिरायची. पोरांचे छन्नी-दांडूचे, गोट्यांचे डाव रंगायचे. पण नदीला पाणी आल्यामुळे अशा मोकळ्या जागा शिल्लक राहिल्या नाहीत. त्या जागेवर सगळीकडे उसाचे पीक घेतले जाऊ लागले. गावात संकरीत जर्सी गाई येऊ लागल्या. चुली जाऊन गोबरगॅस आले. घरांच्या दारात पाण्याचे नळ आले. त्यामुळे घागरीने डोईवरून पाणी ओढून केस गेलेल्या बायकांची त्यातून सुटका झाली. पण या सगळ्या गोष्टींमुळे डासांचं साम्राज्य वाढले. रोग बळावले. प्रदूषण वाढले.

गावात डांबरी रस्ते आले. शाळा शिकून बेरोजगार तरुणांची संख्या वाढू लागली. नोकऱ्या मिळेनाशा झाल्या. जनावरं पाळून दुधाचा धंदा सुरू करण्यावर तरुणांचा कल वाढला. गल्लीगल्लीत पानाच्या टपऱ्या दिसू लागल्या. तरुणांमधली व्यसनाधिनता वाढू लागली. बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली. संकरित वाण आले. कीटकनाशक, तणनाशकांचा वापर वाढला. पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे पाणी वापरायला धरबंद उरला नाही. रानांचा कस कमी झाला. कृषिजनसंस्कृतीत झालेल्या या पालटाचे नेमके चित्रण लेखकाने केले आहे.

ऊस शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यातील संघर्ष चित्रित करून लेखकाने ग्रामीण भागातील वास्तवाचे दर्शन घडविले आहे. उसावर माव्याचे आक्रमण झाल्याने ऊस पिक कमी झाले. त्यामुळे साखरेचा भाव वाढला. किमान आतातरी उसाला जादा भाव मिळावा, अशी शेतकऱ्यांची इच्छा होती. त्यातूनच उसाच्या वाढीव दराबाबत शेतकरी आंदोलन उभे राहते. साखर कारखानदारांचीसुद्धा मोर्चेबांधणी सुरू होते. आंदोलन दडपण्यासाठी कारखानदार एकत्र येऊन पुढील योजना आखतात. परंतु शिकला सवरलेला तरुणवर्ग नोकरीअभावी शेतात राबू लागला होता. त्यांच्यामध्ये जागृती आली होती. त्यामुळे ऊसतोडणी बंद झाली होती. ऊस दराचे आंदोलन भडकल्यामुळे बाहेरच्या मजुरांच्या टोळ्या ऊसतोडणीसाठी आल्या नाहीत. काही

कारखान्यांनी गावातील गरजवंत शेतकऱ्याला, अल्पभूधारक शेतकऱ्याला हाताशी धरून त्यांच्या टोळ्या करून पोलीस बंदोबस्तात ऊसतोडी सुरू केल्या. पण शेतकरी आंदोलनाची धग एवढी वाढली होती की, तिच्यापुढे कारखानदारांचा टिकाव लागत नव्हता. उसाने भरलेली वाहने अडवणे, जाळपोळ करणे, फोडाफोडी करणे यासारख्या घटना सगळीकडे घडू लागल्या. याही परिस्थितीत कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी पॅनेलमधून उमेदवारी मिळेल म्हणून नरसिंगआण्णांनी दबाव टाकून आपल्या शेतात ऊसतोड सुरू केली. कोणतीही अडचण येऊ नये म्हणून त्यांनी हत्यारबंद माणसे तयार ठेवली होती. स्वतः आण्णा खांद्यावर बंदूक अडकून बांधावर बसले होते. जेलात जायला लागलं तरी चालेल, खरं आडवा येईल त्याला ठेचायचा' हा त्यांचा पवित्रा होता. यामध्ये आण्णांना ग्रामपंचायत निवडणुकीतझालेल्या पराभवाचा वचपा काढायचा होता. सगळा नांगरगाव तंग झाला होता. परंतु नरसिंगआण्णांचा उसाने भरलेला ट्रॅक्टर रस्त्यात लाकडं, दगड टाकून, टायर पेटवून अडवला जातो. काही तरुण आणि नरसिंगआण्णांच्या माणसांमध्ये बाचाबाची होते. आपलीच माणसं आपल्या विरोधात पाहून नरसिंगआण्णांचा जोर कमी होतो. ते माघार घेऊन एकेकाला वेगळ्या मार्गाने अडचणीत आणण्याचा विचार करू लागतात. कारखान्याचा हंगाम सुरू होण्याची चिन्हं दिसेनात. आंदोलनाला विध्वंसक स्वरूप लागलं. धरपकड सुरू होते. दगडफेकीत पोलीस जखमी झाले. एसटी. बस गाड्यांचे नुकसान झाले. शेवटी शेतकरी आंदोलनाचे नेते आणि कारखानदार यांच्यात वाटाघाटी होऊन एकरकमी बाराशे पन्नास हमीभाव जाहीर होतो. शेतकऱ्यांच्या लढाईला संघटित स्वरूप मिळाल्यामुळे आंदोलन यशस्वी होते. ऊस हंगामात प्रत्येक खेडेगावात दिसणारे हे दृश्य चित्रित करून लेखकाने ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव प्रस्तुत कादंबरीत चित्रित केले आहे.

याचबरोबर शेतकऱ्यांचे शेतातील कष्ट, कष्टकरी मजूर स्त्रीचे दुःख, शेतकऱ्यांच्या अडचणी, भात पेरणी, भात कापणी, मळणी, गवत कापणी, सरवड्याचा बाजार, हरिपंतांचे निधन यासारख्या घटनाप्रसंगांच्या वर्णनांनी कादंबरीतील वातावरण भारीत झाले आहे.

**३.५ जीवनदृष्टी**

'कादंबरी' या साहित्यप्रकारातील आशय लेखकाच्या जीवनदृष्टीतून प्रतिबिंबित होत असतो. वाचकही त्याच जीवनदृष्टीतून कादंबरीकडे पाहतो. कादंबरीचे अर्थनिर्णयन करण्यासाठी त्याला ही जीवनदृष्टीच साहाय्यभूत ठरते. प्रस्तुत कादंबरीतील हरिपंत, औतेराव, साखरू यांसारख्या प्रमुख पात्रांच्या वर्तनातून, त्यांच्या संवादातून ही जीवनदृष्टी या कादंबरीत साक्षात झाली आहे. त्यातून या लेखकाचा समाजजीवनाकडे पाहण्याचा रोख लक्षात येतो.तो कोणत्या विचारांचा पुरस्कर्ता आहे, याचाही अदमास येतो. तो परंपरेकडे कसे पाहतो, बदलत्या जीवन जाणिवांकडे कसे पाहतो, सबंध जीवसृष्टीविषयी त्याच्या काय धारणा आहेत, कुटुंब, समाजाविषयी त्याची मते कशी आहेत, याचा प्रत्यय लेखकाच्या जीवनदृष्टीतून येतो. ही जीवनदृष्टी वाचकालाही प्रभावित करते. वाचकालाही दृष्टी देण्याचे काम करते. नांगरमुठी' या कादंबरीतून पांडुरंग पाटील यांनी ते साधले आहे. या जीवनदृष्टीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### ३.५.१ विवाहसंस्थेविषयी विचार

समाजजीवनात विवाह संस्थेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विवाह संस्थेतूनच कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था आकारास येते. प्रस्तुत कादंबरीत हरिपंत आणि रखमाई, औतेराव आणि साखरू, पिलुमा तराळ आणि कुसा तराळीन, सदा भूतल आणि सारजा या पात्रांच्या माध्यमातून विवाह संस्थेविषयी विचार प्रकटले आहेत. रखमाई रागीट, चिडखोर स्वभावाची असली तरी हरिपंताशी लग्न झाल्यामुळे तिच्यात हरिपंतांचा सात्विकपणा, प्रामाणिकपणा आला आहे. हरिपंतांच्या सानिध्यात रखमाई आंतर्बाह्य बदलून जाते. हरिपंतांच्या विठ्ठल भक्तीचा रागराग करणाऱ्या रखमाईला हरिपंतांना समाजात आदर आहे, लोक त्यांच्याकडे सल्ला, मार्गदर्शन घेण्यासाठी येतात, याचे कौतुक वाटते. शेतकरी कुटुंबातील स्त्रीला घरकामाबरोबर शेतातील अनेक कामे करावी लागत असतात. परंतु रखमाईने कधीही या संबंधित तक्रार केलेली नाही. पतीशी असणारी निष्ठा किती तीव्र आहे, याची जाणीव येथे होते.

औतेराव आणि साखरू यांच्यामध्ये साखरू जास्त शाळा शिकलेली असताना आपल्यापेक्षा कमी शिकलेल्या औतेरावाशी लग्न करते. सुरुवातीला साखरू नाराज असते पण नंतर साखरू औतेरावावर मनापासून प्रेम करू लागते. औतेरावाला कारखान्याला ऊस तोडण्याच्या कामात, शेतीच्या कामात, औत हाकण्याच्या कामात साखरू त्याला मदत करते. औतेराव मुतखड्याच्या आजाराने हैराण असताना त्याची काळजी घेते. पैशांपेक्षा जीव महत्त्वाचा म्हणून ती औतेरावाला ऑपरेशन करण्याचे सुचविते. नवीन लग्न झालेल्या दिवसात औतेरावाशी धड बोलताही येत नसल्याचे तिला दुःख होते, पण रीतीभाती, प्रथा, परंपरानुसार ती स्वतःला सिद्ध करीत राहते. नवरा शिव्या देतो,मारझोड करतो, कामाचा होणारा त्रास तो तिच्यावर काढतो. असे असले तरी साखरुची नवऱ्या प्रती निष्ठा आहे.

प्रस्तुत कादंबरीतील साहाय्यक व्यक्तिरेखा असणाऱ्या पिलुमा तराळ आणि त्याची बायको कुसा तराळीन, सदा भूतल आणि त्याची बायको सारजा यांच्या चित्रणातूनसुद्धा विवाहसंस्थेविषयी विचार प्रतिबिंबित झाले आहेत. नवऱ्याला काम करता येत नाही म्हणून कुसा दिवसरात्र काबाडकष्ट करते. संसार चालविताना तिची ओढाताण होते. पण त्यातच ती आपले सुख मानते. घरकाम करून, मोलमजुरी करून ती संसाराचा गाडा हाकत राहते. तर सदा भूतल हा दारूच्या आहारी गेलेला आहे. सदा बायकोला मारझोड करतो. प्रसंगी सारजा घर सोडून जाते. परंतु हरिपंतांनी समजवल्यावर सदा भूतल दारू पिणे सोडतो व सारजाला घरी घेऊन येतो. सारजाही काहीही आडेवेडे न घेता घरी परत येते. एकूणच विवाह संस्थेविषयीच्या या विचारांवर पारंपरिकतेचा पगडा असला तरी, ही संस्था अबाधित कशी राहील याकडे हे विचार निर्देश करतात.तोडण्यापेक्षा जोडण्यावर भर देतात, हे महत्त्वाचे आहे.

### ३.५.२ मूक प्राण्यांवरील प्रेम

प्रस्तुत कादंबरीतील हरिपंत, औतेराव यांचे मूक प्राण्यांवरील प्रेम विशेष भावते. बैल हे शेतकऱ्याचे सोबती असतात. बैलांना चाबकाने मारणे हरिपंतांना आवडत नाही. म्हैस धार देत नाही, म्हणून औतेराव म्हशीला काठीने मारतो, हे हरिपंतांना पाहवत नाही. जसा माणूस आहे तशीच ही जनावरे आहेत, त्यांनाही

मन असतं, भावना असते, अशी हरिपंतांची धारणा आहे. सदा भूतलने पिशवीतून सशाची पिल्ले पकडून आणलेली असतात. ती पिल्ले औतेराव सदा भूतलकडून वीस रुपये देऊन विकत घेतो व आपला मुलांना खेळण्यासाठी देतो, हे हरिपंतांना रुचत नाही. ते स्वतः सदा भूतलला जादाचे पैसे देऊन ती सशाची पिल्ले विकत घेतात व जंगलात सोडून येतात. पशूपक्ष्यांवर, जनावरांवर माया करणारे हरिपंत रानात, पिकांवर बसलेल्या पाखरांना न हाकलता त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात.

औतेरावसुद्धा शेतकरी आहे. त्याचे आपल्या आस्वल्या आणि फटकुऱ्या बैलांवर प्रचंड प्रेम आहे. त्यांच्या जीवावरच आपला संसार चालतो आहे, याची जाणीव औतेरावला आहे. फटकुऱ्या बैलाच्या शिंगात जखम झालेली असताना औतेराव प्रचंड दुःखी होतो. तो रात्रंदिवस फटकुऱ्या बैलाची सेवा करतो. वेगवेगळे औषधोपचार करतो. जखम बरी झाली नसल्यामुळे बैलाची होणारी तगमग औतेरावला पाहवत नाही. बैल कसाबाला न विकता तो एका शेतकऱ्याला सांभाळण्यासाठी देतो. पुराच्या पाण्यात म्हैस वाहून जात असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता औतेराव पुरात उडी टाकून म्हशीला वाचवतो. विहिरीत पाणी वाढल्याने चिमण्यांची घरटी पाण्यात बुडतात, हे पाहून औतेराव हवालदिल होतो. चिमण्यांचे दुःख आपल्या दुःखापेक्षा कितीतरी जास्त असल्याचे त्याला वाटते.अशा अनेक उदाहरणातून मूक प्राण्यांवरील प्रेम अधोरेखित झाले आहे.

### ३.५.३ मानवी मूल्यांचा पुरस्कार

या कादंबरीमध्ये मानवी मूल्यांचे दर्शन सातत्याने घडते. हरिपंत हे विठ्ठलभक्त, भजन, कीर्तन, प्रवचन यामध्ये रमणारे आहेत. वारकरी तत्त्वज्ञानानुसार आचरण करणाऱ्या हरिपंतांमध्ये माणुसकी पाहायला मिळते. ग्रामीण भागात अजूनही बलुतेदारी पद्धत जपून आहे. पिलुमा तराळ भातमळणी सुरू असताना खळ्यावर येतो. परंतु एकावेळी पिलुमाने कामास मदत न केल्यामुळे रखमाई त्याला भात देण्यास नकार देते. त्याचवेळी हरिपंत त्याला भात देतात. गरजवंताला मदत केली पाहिजे' असे ते रखमाईला सुनावतात. दारात आलेल्या सुया, दोरावाली काशीबाईला साखरू मदत करते. तिचे दुःख आपले दुःख मानून साखरू काशीबाईला जेवायला देते, आपलं जुनं पातळ, मुलाचा जुना ड्रेस, सुपभर भात देते. यातून साखरुच्या माणुसकीचा परिचय होतो.औतेराव कारखान्याला बैलगाड्याने ऊस ओढत असतो. कारखान्याच्या बसपाळीमध्ये तो इतर शेतकऱ्यांच्या शेतात औत करायला जातो. दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती औतेरावामध्ये दिसते. आईच्या निधनाचे दुःख बाजूला ठेवून औतेराव लोकांच्या खोळंबलेल्या पेरण्या पूर्ण करण्यासाठी त्यांना मदत करतो. मुतखड्याच्या आजाराने त्रस्त असताना पैऱ्याने दुसऱ्याच्या शेतात भात कापायला जातो. औतेरावाची माणुसकी यामधून प्रकट होते. औतेरावाचा फटकुऱ्या बैल आजारी पडून मरतो. त्यावेळी इतर गाडीवान औतेरावाला दुसरा बैल घेण्यासाठी पैसे गोळा करून मदत करतात. कृषिजन संस्कृतीशी निगडीत समूहजीवनामध्ये मानवी मूल्ये अजून शाबूत आहेत. त्याची रुजवणूक होत असल्याचे या वर्णनावरून लक्षात येते.

### ३.५.४ भावंडभावाची जाणीव

शहरी अवकाशातून नामशेष होत असलेला भावंडभाव ग्रामीण समूहजीवनात काहीएक प्रमाणात का असेना अजून अबाधित आहे, असे म्हणता येईल. हरिपंत त्याकाळी सातवी पास झालेले आहेत. त्या काळाचा विचार करता त्यांना कोठेही शिक्षकाची नोकरी मिळाली असती. पण हरिपंतांचे लहान भाऊ हणमंता नोकरीसाठी मुंबईला निघून जातो. त्यामुळे हरिपंतांना नांगर हातात घेऊन शेतीत राबावे लागते. याविषयीची खंत हरिपंतांना वाटत नाही. याच्या उलट हणमंताची मुंबईतील गिरणीतील नोकरी गेल्यामुळे हवालदिल झालेल्या हणमंताला ते गावी येऊन राहण्यास सांगतात. 'मिळेल ती मीठभाकर खाऊन दिवस काढू' असे ते हणमंताला म्हणतात. यातून त्यांची बंधुत्वाची भावना प्रतीत होते.औतेरावाची पुतणी, वैजयंताच्या लग्नात पैशांची अडचण निर्माण होते, त्यावेळी वर्षानुवर्षाचे भांडण विसरून साखरू आणि औतेराव भावाला मदत करतात. साखरुच्या गळ्यातील बोरमाळ मोडून आलेले पैसे ते वैजयंताला देतात. त्यातून लग्न पार पाडले जाते.तसेच कोणाचे औताचे काम, पेरणीचे काम मागे राहिले असल्यास एकमेकांना मदत केली जाते. सर्वांना सोबत घेतले जाते. सुख-दुःखात तितक्याच आत्मीयतेने सहभागी होतात. त्यामुळे या समूहजीवनात एकटेपणाची जाणीव निर्माण होत नाही.

याचबरोबर रखमाई-औतेराव, साखरू-ताना, नंदिनी यांच्यातील मातृभाव, हरिपंतांचे सात्विक, सत्य, सदाचारी, अहिंसा,शुचिता, प्रामाणिकपणा, करूणा या गुणांनी युक्त असणारे आचरण, औतेरावांचा वडिलांविषयीचा आदर, गावातील लोकांमध्ये हरिपंतांविषयी असणारा आदरभाव, जिव्हाळा, प्रेम, हरिपंतांनी ओव्या, अभंगांच्याद्वारे दिलेले अनेक दाखले, सारजाला साखरुविषयी वाटलेला जिव्हाळा आणि आधार यांसारख्या गोष्टींतूनही एक नवी जीवनदृष्टी वाचकांना मिळते.

### ३.६ सारांश

या घटकामध्येमुख्यत्वे कादंबरीतील पात्रचित्रण, वातावरण आणि जीवनदृष्टीचा विस्ताराने धांडोळा घेतला आहे.

या कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या एकूण व्यक्तिरेखा ह्या खूप वेगवेगळ्या स्वभाव, वृत्ती-प्रवृत्तीच्या आहेत. हरिपंत, औतेराव, साखरू, रखमाई या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. तर सारजा, नरसिंगआण्णा, पपेराव सावंत, सदा भूतल, हणमंता, कुसा तराळीण अशा अनेक साहाय्यक व्यक्तिरेखा आहेत. नरसिंगआण्णा यांची व्यक्तिरेखा खलप्रवृत्तीची आहे. या व्यक्तिरेखांमधून समाजातील विविध वृत्ती-प्रवृत्ती, स्वभाव, मानसिकतचे विविध कंगोरे साक्षात झाले आहेत. तर लेखकाने ऋतुचक्रातील हंगामागणिक बदलांचा अप्रतिम वापर वातावरणनिर्मितीसाठी केला आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील सणवार, उत्सव, रूढी, परंपरा, प्रथा, विविध घटनाप्रसंग यांचे चित्रण करून लेखकाने कादंबरीत एकप्रकारची गतिमानता आणली आहे. हा स्थलावकाश कादंबरीच्या आशयाला ठळक करतो. या कादंबरीतून लेखकाची प्रकटलेली जीवनदृष्टी वाचकांना अधिक उन्नत करणारी आहे. या कादंबरीतून आलेला विवाह संस्थेविषयीचा विचार समकाळात ही उपयुक्त ठरणार आहे. मूक प्राण्यांवरील प्रेम, स्त्रियांचा आदर, मानवी मूल्यांची रुजुवात, भावंडभाव यातून

कादंबरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वाचकांना कसे वागावे, याचे सूचन करते. त्यामुळे या कादंबरीचे मोल अधिक वाटते.

**३.७ स्वाध्याय**

**अ) बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. हरिपंतांनी कोणत्या शाळेत सातवीपर्यंतचे शिक्षण घेतले?

अ) राशिवडे　　ब) सरवडे

क) भोगावती　　ड) मिणचे

२. गावातील कोणत्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी हरिपंत प्रयत्न करतात?

अ) वेतोबा　　ब) भैरोबा

क) म्हसोबा　　ड) नाईकबा

३. हरिपंत यांच्या व्यक्तिमत्त्वावर कोणत्या संप्रदायाचा प्रभाव आहे?

अ) नाथ　　ब) महानुभाव

क) वारकरी　　ड) यांपैकी नाही

४. औतेरावाच्या आईचे नाव काय?

अ) काशीबाई　　ब) रमाबाई

क) जनाबाई　　ड) रखमाई

५. दारात आलेल्या कोणाचे दुःख साखरुला आपले दुःख वाटते?

अ) रखमाई　　ब) काशीबाई

क) कुसा तराळीन　　ड) यांपैकी नाही

**ब) टीपा लिहा**

१. 'नांगरमुठी' कादंबरीतील विवाह संस्थेविषयीचा विचार

२. 'नांगरमुठी' कादंबरीतील हरिपंतांचा सात्विकपणा

३. 'नांगरमुठी' कादंबरीतील 'दसरा' सणाचे वर्णन

**क) लघुत्तरी प्रश्न**

१. 'नांगरमुठी' कादंबरीतील बदलत्या ऋतुमानांचे चित्रण स्पष्ट करा.

२. हरिपंतांच्या स्वभावाचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

३. ग्रामीण भागातील मजूर, कष्टकरी स्त्रीचे दु:ख तुमच्या शब्दात लिहा.

**ड) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. 'नांगरमुठी' कादंबरीतील पात्रचित्रणाचा थोडक्यात आढावा घ्या.

२. 'नांगरमुठी' कादंबरीतील वातावरण कादंबरीच्या आशयास पोषक आहे, स्पष्ट करा.

३. 'नांगरमुठी' कादंबरीतील जीवनमूल्यांचा परिचय करून द्या.

## ३.८ मूलभूत वाचन

१. पाटील, पांडुरंग : नांगरमुठी', दर्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०२४.

## ३.९ पूरक वाचन

१. थोरात, हरिश्चंद्र : 'कादंबरी : एक साहित्यप्रकार', शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१०.

२. थोरात, हरिश्चंद्र : 'कादंबरीविषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.

३. खोले, विलास (संपा.) : 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय प्रकाशनगृह, मुंबई, २००२.

◆◆◆

## घटक : ४

# नांगरमुठीः कादंबरीचा रूपबंध

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषयविवेचन

४.४ ‘नांगरमुठी’मधील कथन

४.५ दृश्यात्मकता

४.६ स्थळ-काळाचा विचार

४.७ संवादात्मकता

४.८ कृषीजनसंस्कृतीचे कथन

४.९ वारकरी कथनाची प्रभावशीलता

४.१० भाषाविशेष

४.११ शब्दयोजना

४.१२ नांगरमुठीतील बोलीरूपे

४.१३ परिसरभाषा

४.१४ समारोप

४.१५ स्वाध्याय

## ४.१ उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१. नांगरमुठी कादंबरीचा रूपबंधाचे वेगळेपण लक्षात येईल.

२. नांगरमुठी कादंबरीच्या भाषेचे स्वरूप समजून येईल.

३. नांगरमुठी कादंबरीतील कथनाचे स्वरूप लक्षात येईल.

४. नांगरमुठी कादंबरीतील परिसरभाषा, बोलीभाषा, शब्दयोजनेचे स्वरूप लक्षात येईल.

## ४.२ प्रस्तावना

प्रस्तुत घटकामध्ये आपण पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीचा वाङ्मयीन विशेषांचा विचार करणार आहोत. हा विचार कादंबरीतील कथनव्यवस्था, भाषेच्या अनुषंगाने करावयाचा आहे. कादंबरी हा इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत वेगळा आणि लोकप्रिय असा वाङ्मयप्रकार आहे. कथात्म साहित्याच्या अभ्यासामध्ये हा वाङ्मयप्रकार व्यापक, गुंतागुंतीचा असा आहे. हा वाङ्मयप्रकार वेगवेगळ्या पद्धतीने हाताळल्यामुळे तिची वेगवेगळी रूपे तयार झालेली आहेत. त्यामुळे कादंबरी हा वाङ्मयप्रकार अधिक विस्तीर्ण आणि गुंतागुंतीचा आहे. लेखक कादंबरीमधून समाजातील विविध अंगांचे दर्शन घडवित असतो. त्यामुळे अभ्यासकांना आकलनाच्या बाबतीत आव्हान देण्याचे मोठे सामर्थ्य या वाङ्मयप्रकारात असल्याचे सर्वमान्य आहे.

इतर साहित्यप्रकाराच्या रचनेच्या तुलनेत हा वाङ्मयप्रकार वेगळा आहे. कथात्म वाङ्मयप्रकाराचे गुणविशेष या वाङ्मयप्रकाराला लागू पडतात. निवेदन, पात्ररचना, लेखकाचा दृष्टिकोन यासारखी वैशिष्ट्ये या वाङ्मयप्रकारात दिसून येतात. मानवी जीवनातील कल्पित आणि वास्तव तसेच जीवनाविषयी गंभीर विवेचन कादंबरी करते. त्याचबरोबर मानवी जीवनातील अद्भूत, ऐतिहासिक, पौराणिक, राजकीय, सामाजिक अशा विविध अंगाना कादंबरी स्पर्श करते. त्यामुळे हा वाङ्मयप्रकार जीवनप्रवाहाबरोबर चालणारा, वाहणारा तसेच सतत बदलत जाणारा साहित्यप्रकार आहे. तसेच घटना, कथानक, पात्र, निवेदन, भाषा इत्यादी घटकांवर कादंबरीची संरचना उभी असते. हा वाङ्मयप्रकार निवेदनप्रधान असल्याने यामध्ये सांगण्याजोगा भरपूर मजकूर असतो. हा वाङ्मयप्रकार आधुनिक काळातील महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे.

## ४.३ विषयविवेचन

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीच्या रूपबंधाचा अभ्यास प्रस्तुत घटकात आपणास करावयाचा आहे. रूपबंधाचा विचार हा कथन, संवाद, बोलीभाषा, शब्दविशेष, परिसरभाषा, शेती संस्कृतीतील कथन, वारकरी रूपविशेष, अन्य वाङ्मयीन विशेष, भाषाविशेष या मुद्यांच्या अनुषंगाने करावयाचा आहे. 'नांगरमुठी' कादंबरी कथन, भाषिक पातळीवर कशी वैशिष्ट्यपूर्ण ठरते याचा विचार या

घटकात आपण करणार आहोत. मुळात कादंबरीचे आशयविश्व हे कथन आणि भाषेतून आकार घेत असते. पांडुरंग पाटील यांनी 'नांगरमुठी'मध्ये कृषीजीवनाशी निगडीत असे संवेदनविश्व उभे केले आहे. वरील मुद्यांच्या आधारे या संवेदनविश्वाचा विस्ताराने आपण विचार करणार आहोत.

**४.४ 'नांगरमुठी'मधील कथन**

'नांगरमुठी'मधील कथनव्यवस्था अभ्यासण्यापूर्वी आपण या संकल्पनेचा थोडक्यात विचार करू. कोणतीही कादंबरी ही कथनाच्या माध्यमातून आविष्कृत होत असते. कादंबरीमध्ये कथनकर्ता कथा अथवा गोष्ट सांगण्याचे काम करत असतो. मात्र त्याचे हे कार्य कथनापुरते मर्यादित नसते. या संदर्भात हरिश्चंद्र थोरात यांचे मत विचारात घेतले तर अधिक कथनासंदर्भात स्पष्टता येईल. ''कथनात्मक संहितेची आंतरिक जुळणी करणे, आपल्या परिभाषितामधून श्रोत्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणे, कथेचे स्वतःबरोबरचे संबंध स्पष्ट करीत जाणे, कथेला विशिष्ट वैचारिक भूमिका प्राप्त करून देणे यासारखी कार्येही निवेदकाकडून केली जातात.'' यावरून निवेदकाचे कार्यक्षेत्र लक्षात येते. निवेदनाची प्रक्रिया ही कथन, वर्णन, भाष्य आणि संवाद या प्रकारांद्वारे चालते. लेखक आशयाच्या मागणीनुसार या कथनप्रकाराचा कमी-अधिक वापर करत असतो.

कथन अथवा निवेदन पद्धतीचा विचार करता प्रथमपुरुषी निवेदन आणि तृतीयपुरुषी निवेदन असे मुख्य प्रकार पडतात. व्याकरणिक स्वरूपावरून ही वर्गवारी करण्यात येते. ज्यावेळी कथेतील एखादे पात्रच निवेदन करत असते तेव्हा ते प्रथमपुरुषी निवेदन असते. याउलट निवेदक कथेतील पात्र नसतो तर तो सर्व घटना-प्रसंगाचे बाहेरून कथन करत असतो. तेव्हा त्यास तृतीयपुरुषी निवेदक म्हटले जाते. या ठिकाणी हा कथनकरता त्रयस्त असतो. त्यामुळे तो तृतीयपुरुषी व्याकरणिक रूपे वापरतो. यालाच कथाबाह्य निवेदक असेही संबोधले जाते. यामधून निवेदनाची किंवा सांगण्याची वरवर वाटणारी प्रक्रिया किती व्यामिश्र, जटील स्वरूपाची असते हे लक्षात येते.

'नांगरमुठी' कादंबरी एकून पाच विभागात समाविष्ट झाली आहे. या कादंबरीमधील कथन अभ्यासताना असे दिसते की, कादंबरीचा कथनकर्ता हा त्रयस्थ आहे. अर्थात तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीमध्ये कादंबरीचे कथन येते. पांडुरंग पाटील 'नांगरमुठी' कादंबरीत ग्रामीण जीवनाचे आणि परिसराचे अनेक पदर कथनाच्या माध्यमातून वाचकांसमोर ठेवतात. निसर्ग, गावातील माणसांच्या वृत्तीप्रवृती, कष्ट, जगण्याची पद्धत, समूहभाव या सर्व गोष्टी कथनाच्या माध्यमातून कादंबरीत येतात. काही मुद्यांच्या अनुषंगाने ही कथनव्यवस्था पाहू.

**४.५ दृश्यात्मकता**

दृश्यात्मक कथनशैली हा कथनपर साहित्याचा महत्त्वाचा विशेष. या शैलीमुळे कांदबरीत येणाऱ्या घटनाप्रसंगाना चित्रमयता प्राप्त होत असते. कादंबरीत येणाऱ्या घटनांचे आणि प्रसंगाचे सजीव चित्र वाचकांसमोर उभे राहते. यामुळे कथाशयाला एक प्रकारची सजीवता येते. याचे प्रत्यंतर 'नांगरमुठी' वाचताना येते. ''अंधार दाटून आला होता. पाऊस रिप रिप पडत होता. झाडांच्या गर्द शृंगाराला गदागदा हालवत वारा

फुत्कारत होता. गावाच्याकडंला औतेराव मोऱ्याचं घर एकूटवानं बसलेलं. कोंबडीनं पकाखाली पिल्ली घेऊन बसावं तसं! सोबतीला रातकिड्यांच्या किरकिरीचा जोष, रों रों करीत खळाळत जाणारा ओढा, भात खाचरात डराँवऽऽ डराँवऽऽ करणारं बेडूक. या साऱ्या तांडवात औतेरावाच्या घराचा गाज थंड पडला होता. कुत्र्याची भूक, बैलांच्या गळ्यातील घंटाचा नाद सारं काही गुडूप झालं होतं.

लायटीच्या डांबावर बसलेला रानपिंगळा चुकामूक झालेल्या जोडीदाराला साद घालत होता. ती भीतीदायक किलबिल रात्रीच्या अंधाराला अधिकच गडद करीत होती. तो आवाज कानावर येताच फटकुऱ्या बैलानं रवंथ थांबवली आणि कानाचं कोगं टवकारलं. जवळच त्याच्या सोबत्याचं आस्वल्या बैलाचं दावं रिकामं पडलं होतं. त्या रिकाम्या दाव्याकडं बघत ढाण्या वाघागत असणारा त्याचा मालक औतेराव; आसवं गाळीत मुकाट बसला होता. अखंड पावसाळभर गुडघ्याएवढ्या गाळातनं पेंडी वडून जनावरं तयार केली अन् अचानक काळाचा घाला पडला. बैलाच्या जाण्याची नि उद्याच्या जगण्याची काळजी जीवाला घोर लावीत होती.''(पृ.५) कादंबरीचा हा प्रारंभीचा भाग पाहिला तर एक प्रकारे पुढील कथेचे एक चित्र समोर येते. औतेराव मोऱ्याचं घर. पावसाची रिपरिप, रातकिड्यांचा आवाज, बेडकांचे आवाज, लायटीच्या डांबावरील पिंगळा या सर्व वर्णनातून औतेरावच्या घरावर असणारी दुःखाची छाया अधिक गडद होते. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या खेड्यातील एका रात्रीचे चित्र दृश्यरूपाने समोर उभे राहते.

''घरातली समदीजण बसून थाळीत भात वाढून घेतला. आंबूबाईनं दिलेल्या भाकरी घेतल्या नि कोरड्यासासंगट खावू लागली. जेवण आटोपलं नि पंतांनी कंदील खुंटीवरनं खाली काढला. काजळीनं काळं झालेलं भिंग राखुंड्यानं पुसून घेतलं. कंदिलात रॉकेल ओतून वात पेटवली. कंदिलाची कडी ओढून भिंग बसिवलं. मोडी फिरवून पेटणारी वात बारीक करून कंदील खाटालगतच्या खुंटीला आडीकला. खाटावर वळकट पसरली. अंगावर घोंगडं पांघरूण डोळे मिटून खाटावर बसलं अन् मुखानं भगवंताचं नामस्मरण करू लागलंत.''(पृ.१०) यामधून ग्रामीण भागातील खेड्यातील रात्रीचे वातावरण कसे असते याचे चित्र समोर येते. याबरोबर कादंबरीत असे अनेक घटना-प्रसंग येतात. ते वाचकांसमोर जसेच्या तसे उभे राहतात. कुसाच्या अंगावार बाजारच्या दिवशी वीज पडून मृत्यू होतो तो प्रसंग वाचकांसमोर दृश्य रूपाने येतोच पण वाचकांना सुन्नही करतो. तसेच पंताच्या मृत्यूसमयीचे कथनही जसेच्या तसे वाचकांसमोर उभे राहते. पेरणी, मळणी, कापणीची कादंबरीतील वर्णने दृश्यात्मक कथनशैलीमुळे अधिक जीवंतपणे वाचकांसमोर उभी राहतात.

**४.६ स्थळ-काळाचा विचार**

काळ-अवकाशाचा विचार कथनपर साहित्यामध्ये महत्त्वाचा असतो. काळ आणि अवकाशाशिवाय कथन आकारास येऊ शकत नाही. कादंबरीतील घटना प्रसंग कोणत्या ना कोणत्या काळावकाशात घडत असतात. त्याआधारे लेखक वास्तवाची विरूपे आपल्यासमोर ठेवत असतात. त्याचा अन्वयार्थ लावण्याचे त्याविषयी भाष्य करण्याचे काम लेखक करत असतात. हे करताना लेखक कथनाच्या विविध शक्यता आजमावत असतात. लेखक भूत वर्तमानाची सांगड याद्वारे कथानकात घालत असतो. 'नांगरमुठी'

कादंबरीतला काळ साधारण दोन तीन वर्षाचा आहे. पण अनेक घटना प्रसंगानी तो विस्तारला आहे. पेरणी, कापणी मळणी, निवडणूक, हरिपंताचे शेवटचे दिवस, वेगवेगळ्या ऋतुमानातील सण-उत्सव, बाळुमामा यात्रा, पंढरपूर यात्रा, ऊस आंदोलन यासारख्या विविध स्थळकाळातील चित्रण कादंबरी आले आहे. अशा स्थळकाळाविषयी कादंबरीत कथन आले आहे.

''भुईंबच्या बुट्टीतनं थंड आली. पहाटेला म्हातारी-कोतारी माणसं धग करून बसू लागली. खंडू न्हाव्याच्या कट्टीवर सकाळीच ही गर्दी! काटकूटऽ काटकूट करीत मशीनच्या दातऱ्या लागतील तशी पोरं ठणाणा ओरडत होती नि खंडूचं मधीच उठून चहाला घरात पळणं! रेडिओवर सकाळच्या बातमीत क्रिकेटची बातमी आली की वस्ताऱ्याचा हात गिऱ्हाईकाच्या गालावरच थांबणार! तोवर खापरीतनं कुशिरडा कुणाच्यातरी शर्टाच्या कॉलरीतनं आत टपाकलेला. सकाळची पहिली किरणं वेतोबाच्या कळसावर पडली. तशा पिपरणीवर जाग्या झालेल्या चिमण्या चुटू चुटू उडत डांबाच्या तारेवर बसल्या. बरीच लांबलचक अशी त्यांची ओळ तयार झाली.'' (पृ.४५)

'बिद्री कारखान्याचा पूल आला तसा तांडा थांबला. बैलांचे गळे रिकामे झाले. गाडीतली माणसं पाय रिकामं करण्यासाठी खाली उतरली. झऱ्यातलं पाणी पिण्यासाठी बैलांना मंजूळ शिळा उमटल्या. बैलं घौसवानी झुरूक्क झुरूक् पाणी प्याली. बैलांचे सोगं बदलण्यात आलं. पुढला प्रवास सुरू झाला. बैलांच्या अंगावरल्या झुलावरली भिंगं मावळतीच्या उन्हात चमकू लागली. घुंगराच्या तालात दौडणारी बैलं, तो ओसंडणारा उत्साह घेऊन धावणारा तांडा बघून समोरून आलेली वाहनं बाजूला होत होती. एस.टी.तली माणसं तांडा पाहून आनंदून गेलेली. भक्तिभावानं हात जोडत होती. एक विलक्षण थरार अनुभवायला येत होता. गावोगावी भरणाऱ्या यात्रा, जत्रेमध्ये मानवी मनाला खेचून घ्यायची जबरदस्त ताकद आहे. जी दुसरीकडे कुठे बघायला मिळत नाही. हे आपलं महाटमोळं वैभव आहे.

मुधाळतिट्टा सोडला नि वाऱ्यावरनं धनगरी ढोलांचा गाज कानावर येऊ लागला. बस आता अर्धा मैलाचं अंतर उरलेलं. बैलांची दौड वाढली. झाडांच्या झिरमाळीत अंधार भरत निघाला होता. त्या गडद सावलीच्या जाळीतून मंदिराच्या कळसावरील लायटींग दिसू लागलं. तसं रखमाबाईनं हात जोडलं. हळूहळू आदमापूर जवळ आलं. सगळ्या माळावर गाड्याच गाड्याऽ उतरल्या होत्या. पाय ठेवायला जागा नव्हती. अलीकडंच सप्पय जागा बघून तांडा थांबला. माणसं सामान घेऊन गाडीतनं उतारली. सगळं स्थिरस्थानाला लावलं अन् दर्शनाला बारीत उभा राहिली.'

हवेत उंच झोकं घेत पाळणं फिरत होतं. अबालवृद्ध त्या चक्राकार पाळण्यात बसून मौज लुटत होती. सगळीकडं तुडुंब गर्दी. माणसांचा, गुंजारव गागाजत होता. उघडेबंब धनगर गळ्यात भलेमोठे ढोल अडकवून दणादण कुडपीत होते. सोबतीला कैच्याळाचा खणखणाट अन् भंडाऱ्याची उधळण. श्रावणमासात पठारावर नाल फुलावी तशी पिवळ्याधम्मक भंडाऱ्यानं धनगरांची पागोटी माखलेली. सारं कसं मनोहर हृदयंगम तहानभूक हरपण्याजोगं! (पृ.७१-७२) कादंबरीतील वरील कथनाचा विचार केला असता असे दिसते की पाटील यांनी ग्रामीण भागातील स्थळ काळ आपल्या कथनशैलीच्या माध्यमातून उभा केला आहे.

## ४.७ संवादात्मकता

कथनपर साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये कोणते असेल तर ते संवाद होय. कथनपर साहित्यात वर्णनपरतेबरोबर संवादालाही विशेष महत्त्व असते. अर्थात वाङ्मयप्रकारांनुसार संवादाचे स्वरूपही वेगळे असते. स्व संवाद, पात्रा पात्रांमधील संवाद, समूहसंवाद, जनसंवाद अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर कलाकृतींमध्ये संवाद घडत असतो. या संवादाच्या माध्यमातूनच कथानक आकार घेत असते. कथानकाचा विस्तृत पट वाचकांसमोर उभा करण्याचे काम संवादातून पूर्ण होत असते. 'नांगरमुठी' या कादंबरीतील कथनाचा विचार करता कादंबरीमध्ये संवादात्मकताही तितकीच महत्त्वाची आहे. कादंबरीत वर्णने, पात्रे, प्रसंग, घटना यांच्या माध्यमातून संवाद आकार घेतात. 'नांगरमुठी' कादंबरीतील पात्रं आणि घटनाप्रसंगांची रेलचेल असल्यामुळे पाचही भागात संवाद येतात. कादंबरीतील पात्रे ही विशिष्ट भूप्रेदशातील असल्यामुळे तिथल्या घटना प्रसंगातील संवादावर तिथल्या भाषेचा प्रभाव संवादामध्ये दिसून येतो. ग्रामीण भागातील कृषी जीवनाशी निगडीत अनेक संवाद कादंबरीत येतात. त्यामुळे सर्व संवाद हे बोलीला जवळ जाणारे आहेत. याची काही उदाहरणे पाहू.

औतरावच्या घरातील हा संवाद पाहता येईल.

आल्या आल्या तान्या बापाला बिलगून म्हणालं,

''बाबा, मुक्ता आत्तीचा फोन आल्ता अमृता तात्याच्यात. लय भांडली आईसंगट.''

''का गा?''

''भांडना तर काय करील. आमी तिला आयार-माह्यार कवा करताव!''

साखरूनं मधीच तोड खूपसलं. ''औतेरावानं चिखलानं भरलेल्या पायावर अजून धड पाणी घेतलं नव्हतं. तोवर पुन्यांदा उफाणली,''

''व्हय वो म्हातारीला आम्ही कवा मारून घालविली?''

''बरं मारली तर मारली फुडंऽऽ''

''फुडं फुडं असं काय लावलाईसा? ऐनीच्या हुड्यावरलं खुळं हाय व्हय मी?''

''खुळं तर खुळं. घेतलं लिवून. फुडचं सांगऽऽ!''

''काय बाई तरी म्हणू या बापयाला. माझ्यासंगट हुज्जत घालायला लागलासा, मघा फोनवर भनीचं बोलणं ऐकाय पाह्यजे हुतासा. आईचा व आपला हिस्सा पह्यला टाकायचा म्हंती.''

''हिश्शाचं नाव काढताच औतेराव खवाळलाच एकदम साखरूवर.''

''ह्यबक खोऱ्याचा मेढा पाटीत बसला कनी अंगात आल्यालं निघंलं. भनीभावंडात बिब्बा घालतीस व्हय गं बोंडगे!''

''बोंडगी म्हणायचं काम नाही; सांगून ठेवती. सगळं भनीच्या सोद्यानं करून बावा बैरागी व्हा जावा. मीच जातो कुठंतरी त्वांड घ्यून मीच सगळ्यास्नी नकोसी हाय. (पृ.९०) या संवादातून घरातील नवराबायकोमधील किरकोळ वादाचे स्वरूप लक्षात येते.''

''मळणीचं कसं करायचं रं औतेराव ?''

''पावसाचा तालामाला बघून घालूया की सकाळच्याला.''

''कोंबडा बोब्यावायला तरी जुपी व्हायला पाह्यजे बघ. तवा कुठं सळ्ळ्याव लागतंय.''

''एवढ्या घुताडाला सताट गडी तरी पाहिजेत. सुपारीचं नार तोंडात टाकीत तातोबा बोलला.''

''आम्ही चौघंजण तरी हाव आणि चार गडी बघूवा. औतेराव म्हणाला. (पृ.२०)''

''येरवाळीच शेंडातली सुला घाईगडबडीनं हाका का मारत आली म्हणून साखरू बाहेर आली.''

''का गं सुलेऽऽ... का आलीस?''

''बाई भातावरला बधीरा मारायला घेटल्याला माझा खराटा तेवढा दे. म्हातारी रातभर कोकालतियाऽ''

''सुला तशी म्हंटल्यावर साखरूला झेंडूच फुटला.''

''काय तवकल सोसलीस बघ. माणसानं केल्यालं काढूने खरं काढायची पाळी आणतासा. शेतात कापणी लावलीस नि आजारी पडलीस. आपलं म्हणून आमी केलं. दाणं झोडून घरात आणून दिलं. तेची जाणीव तरी ठेवायची.''

''मी आल्यालो नाही. मला लावून दिलंय. आमच्या घरातली माणसं कशी हायीत ते कळूनबी तू मला अशी का बोलतीस? (पृ.१४६) वरील संवाद पाहिले तर असे दिसते. संवादातून बोलीभाषेचा प्रभाव जाणवतो. शेतीसंस्कृतीचे संदर्भ कादंबरीतून येतात.''

पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीत प्रमाणभाषा आणि बोलीभाषा अशा दोन्ही भाषेचा वापर केला आहे. निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादासाठी राधानगरी परिसरातील बोलीभाषेचा वापर केला आहे. भाषेचा हा समतोल पाटील यांनी संपूर्ण कादंबरीत सांभाळाला आहे. कादंबरीत निवेदनाची भाषा प्रमाणभाषा आहे. तर नांगरगावातले लोक बोलीभाषेत संवाद साधतात. अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी संवाद महत्त्वाचे कार्य करतात. 'नांगरमुठी' संवाद नेटके, साधे असूनही कादंबरीचा आशय सजीव करतात. 'नांगरमुठी' कादंबरीत औतरावच्या कुटुंबातील एकमेकातील संवाद, गावकऱ्यांमधील, कृषीकर्म करताना, ऊस आंदोलनावेळी अशा अनेक घटना प्रसंगाच्यावेळी संवादाचे स्वरूप पाहण्यासारखे आहे. त्यामधील वेगळेपण वाचकांच्या लक्षात येते.

औतराव आजारी होता त्यामुळे साखरूवर कामाचा ताण होता. भातकापणी झाल्यामुळे भात कापलेल्या रानाच्या नांगरटी करावयाच्या होत्या. त्यामुळे साखरूला चैन पडत नव्हता. घरात बैल

आहे, पण औत करणारा नाही. त्यामुळे ते विचारात पडलेली होती. अशा विचारात ती आपल्या तान्याला म्हणते,

''तानं आम्ही औत घ्यून जाऊया व्हय रं शेताकडं?''

''मारायचं कोण औत?''

''तू हायीस न्हवं का आणि मी हाय की संगट. त्यात काय इद्या बोलाय लागती?''

''ते काय मला जमायचं नाही. माझी सहामाहीची परीक्षा जवळ आलीया.''

''हीबी परीक्षाच हाय लेका. 'बा' आदू हून पडलाय. आजा जाग्यावर न्हाई.''

''मग कुणाचं तरी औत भाड्यानं बघायचं.''

'' 'बा'जवळ दुखण्याला पैसे नाहीत आणि दुसऱ्याला पैसं कुठलं द्यायचं? तू येणार नसलास तर राहूदे. मी जातो औत जुपून.''

''आगं माणसं काय म्हणतील? औतेरावानं मध्येच खो घातला.''

''माणसास्नी बोलायचंच असतंय. उपेगाला कोण पडतंय?''

''मुकादम नांगरतो म्हंटलाय. मी सांगिटलंय त्याला.''

''तेचच नांगरायचं पडलंय, तेला पहिल्यासारं निबत नाही आणि स्वतःची बैलं असताना दुसऱ्यावर का इसंबून राहायचं म्हणती मी.''

''आगं मी आजारी हाय म्हणूनऽऽ''

''तुमचं सोडा, प्वार हाय की आपलं.''

''ते नाही म्हंतय. कुठंतरी बैलाला फाळ लागेल.''

''तुमच्याबरोबर हुज्जत घालाय पायलीची पेज पिऊन याला पाह्यजे. (पृ.१२६)''

या संवादातून औतरावच्या घरातील साखरू, तान्या आणि औतेराव यांच्यातील संवादाचे स्वरूप लक्षात येते. वरील उदाहरणादाखल पाहिलेले संवाद पाहिले तर किंवा एकूण कादंबरीत येणारे प्रसंगानुरूप पात्रांच्या तोंडी येणारे संवाद हे साधे, सोपे, आणि सहज आहेत. कादंबरीतल्या संवादांना राधानगरी परिसरातील बोलीचा साज आहे. पाटील यांनी कादंबरीत काही ठिकाणी छोटेखानी संवादाचा वापर केला आहे. त्यामुळे प्रसंग अधिक पाल्हाळ होत नाहीत. तर कादंबरीतील सर्वच घटनाप्रसंगाना जिवंतपणा प्राप्त होतो.

**४.८ कृषीजनसंस्कृतीचे कथन**

पांडुरंग पाटील यांची 'नांगरमुठी' ही कादंबरी एका शेतकरी कुटुंबाची कहाणी सांगत असली तरी ती मुख्यत्वे कृषिजीवनाविषयी भाष्य करताना दिसते. त्यामुळे कादंबरीत शेतीसंस्कृतीचे कथन आलेले दिसून येते.

कादंबरीचे शीर्षकच शेतसंस्कृतीचे कथन निर्देशित करते. या कादंबरीत येणारे नांगरगाव खेडे पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेले दिसते. शेतीवर अवलंबून असणारा शेतकरी, त्याचे कष्ट, लहरी निसर्गाशी करावा लागणारा संघर्ष, शेतीमातीविषयी मनात असणारा कृतज्ञता भाव या साऱ्या गोष्टींचे कथन कादंबरीत आलेले आहे. कादंबरीत औतेराव आणि साखरू या कष्टकरी शेतकरी जोडप्याचा जीवन संघर्ष आहेच, त्याबरोबर गावातील इतर कष्टकरी शेतकऱ्यांचे जीवनही चित्रित झाले आहे. शेतकऱ्याच्या जीवनात त्यांच्यासोबत कष्ट करणारे शेतकऱ्याचा आधार समजले जाणारे बैल यासारख्या प्राण्यांचा गोतावळा येतो. त्यांच्याविषयी प्रेम येते. पिकांची पेरणी, कापणी, मळणी, झोडणी करण्यापासून ते नांगरट करण्यापर्यंतचे श्रमसंस्कृतीचे कथन कादंबरीत येते.

शेतीमातीविषयी शेतकऱ्यांच्या मनात कृतज्ञता आणि श्रद्धाभाव असलेला दिसून येतो. तो कादंबरीत अनेक ठिकाणी कथन केला आहे. आपल्या परंपरेत भूमीविषयी असणारा आदरभाव शेतकरी भूमीचा पूजाअर्चा करून प्रकट करताना दिसून येतो. शेतीशी निगडीत असणाऱ्या वेगवेगळ्या विधीविधानांमधून त्याच्या ठिकाणी असणारा कृतज्ञताभाव दिसून येतो. ‘अशातच भुईंब आली. साखरूनं नवी कोरी बेळाची बुट्टी सारवली होती. तिला चुन्याच्या पाच पाकळ्या काढल्या. पाच जागी मधोमध वर्तुळ रेखली. आता वर्षभर ही 'अन्नपूर्णा' शेताकडं जेवणखान भरून जाणार होती. तसेच शेतीमातीविषयी आपल्या परंपरेतील भावना प्रकट करताना कादंबरीतले आलेले कथन पाहता येते. ते असे, भाताची कापणी पूर्ण झाल्यानंतर समद्या कुरवाडणी 'सीतामाई' म्हणून लोंबीसकट भाताचं पाच आवं ठेवतात. 'सीता' ही धरित्री आईची लेक. म्हणून शिजलेल्या भाताच्या दाण्याला 'सीत' म्हणतात. इतका जवळचा संबंध आपल्या जगण्याशी पूर्वजांनी जोडलेला आहे. सीता ही फक्त रामायणातील प्रभू श्रीरामांची पतिव्रता स्त्री न राहाता कृषिसंस्कृतीत अस्मितेचं प्रतीक ठरते.

साखरूनं समदं निवद बोनं बुट्टीत भरून गाडीत नेऊन ठेवलं. घरातली समदीजण आज भुईंब पुजायला बैलगाडीतनं निघाली होती. जेंची शेतं लांब होती त्या प्रत्येकाच्या बैलगाड्या घरातली माणसं घेऊन शेताकडे दौडत निघाल्या होत्या.

शेतात आल्यावर ‘सीतामाईच्या’ पुढ्यात साखरूनं डबरा काढला. त्यात दसऱ्यातलं सोनं, कुंभ-दर्भ-लव्हाळा घातला. इथं दर्भ म्हणजे 'कुश' आणि लव्हाळा म्हणजे 'लव'. ही सीतेच्या मुलांचीच नावं येतात. दहीभात धरतीच्या पोटात घालून साखरूनं डबरा बुजवला. त्यावर नवं कापड घडी करून अंथरले. खांडव्यात नदीकडून आणून पूजलेलं पाच खडं होतं. ते धुवून चुण्यानं रंगवलं नि कापडावर ठेवलं. तेला हळद-कुंकू लावून फुलं घातली. नवरात्रीची मंदिरातून आलेली वात ठावक्यात तेल घालून लावली. दिवा ओवाळला. रखमानं काळ्या आईपुढं हात जोडलं नि म्हणाली,

आई अशीच धनधान्यानं तुझी वटी भरू दे. पोरंबाळं, गुरंढोरं तवानी हुंद्यात!(पृ.४२-४३)

पेरणी, भात कापणी वेळी ही शेतीची पूजा केली जाते. शेतीमातीविषयीचा शेतकऱ्यांच्या मनातील कृतज्ञता भाव या ठिकाणी दिसून येतो. पेरणी करताना पेरणीसाठी वापरली जाणारी औजारे त्यांची पूजा केली जाते.

पेरणीच्यावेळी शेतातील बांधावर बेवळा वाहणे असा किंवा भातकापणीला सुरुवात करतानाही शेतीची पूजा करून, शेतामध्ये दहीभात शिंपडून कापनीला सुरुवात केली जाते. पेरणी बरोबर सुगीतील भात कापणी आणि मळणी संदर्भातील कथन कादंबरी येते. शेतातील ही खूप महत्त्वाची कामे. वर्षभर राबून शेतातील भातपीक घरात आणेपर्यंत सर्व कामे शेतकऱ्यांसाठी खूप त्रासदायक आणि कष्टकारक असतात. भातकापणी तसेच मळणीसाठी गावातील माणसे गोळा करण्यापासून मळणी, झाडणीपर्यंत शेतकऱ्याला खूप कसरत करावी लागते. त्याचे सूक्ष्म तपशीलवार कथन कादंबरीत येते. याबरोबरच गवत कापणीच्यावेळचे कथनही आलेले आहे. शेतात काम करताना स्त्रिया गीतं म्हणत असत. कामाचा कंटाळा येऊ नये. माहेरच्या आठवणी ओवीगीतामधनू काढल्या जायच्या. त्याविषयी कादंबरीतील कथन असे,

लाबं नि लांब क्यास

माझ्या बयाच्या आवडीचं

लांब नि लांब क्यास।

पाणी बाजीच्या कावडीचं गं कावडीचं।। या गीतावर बाकीच्या भांगलणाऱ्या बायका सूर धरत असत.

खाऊबी वाटली आकडी दुधातली खीर ।

बाजी भावाचं गाव दूर गंऽ गाव दूर ।।

लेकीची ग जात। जसा गाजराचा ओपा ।

गौरा गेली नांदायला। झाला रिकामा माळी सोपा ।।

शेतकऱ्यासाठी शेतात लागणारी औजारे त्याला खूप प्रिय असतात. तसेच शेतात कामाला असणारे बैलही त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतात. ज्यावेळी औतरावचा बैल मरण पावतो. त्यावेळी औतेरावच्या कुटुंबावर दुःखाची छाया पसरते. त्याचे कथन कादंबरीत आले आहे. तसेच बैल आजारी पडतो त्यावेळी तो बाजारात विकायला तयार होत नाही.

''आणि हाय त्या बैलाचं काय करायचं

इकून टाकायचा.

साखरून बैल विकायचं नाव काढताच औतेराव रागाने ओरडतो.

बैलं हुती म्हणून दाराला माणूस इत हुतं. बैलं नसल्यावर कोण कुत्रं इचारायचं नाही आणि आतापतोर कुणाच्या जीवावर जगलासा''

ज्यावेळी बैलगाडी भंगाराला द्यायची वेळ येते. त्यावेळी औतेराव अस्वस्थ होतो. त्याच्यासाठी ते सोनं असतं. जनावारं असो किंवा बैलगाडीसारखी औजारं असो शेतकऱ्याला आजारी पडू देत नाहीत. शेतकऱ्याचा तो जागता धर्म असतो. असं औतेरावला वाटतं.

याबरोबरच कादंबरीत अनेक ठिकाणी शेतीविषयी पिकाविषी कथन आलेलं दिसून येतं. ऊसावर मावा रोग पडतो आणि शेतकऱ्याचा कणाच मोडतो. 'म्हातारा पाऊस दम खाऊन कोसळू लागला. सोबतीला वाऱ्याची झड. झडीला मावा जाईल असं वाटलं पण तो गेला नाही. उलट त्याचं प्रमाण वाढलं. हा हा म्हणता गावचा उसाचा समदा शिवार त्यान येलगटला. पांढरंधोट शाबूचं दाणं उसाला पानापानाला डसून चिकटा झालेला. पानातला रस मावा जसजसा शोषू लागला तशी पानं काळी पडू लागली. उसाची वाढ खुंटून शेंडं घोंचा घालून बसलेल्या दुखणकऱ्यात दिसू लागली.' यारखे कथन शेतीवरील रोगाची भयानकाता स्पष्ट करते. याबरोबर कादंबरीत शेतीसंदर्भातील आलेल्या काही कथनांचा उदाहरण विचार करू शकतो.

पाऊस उघड झाप करू लागला. डोंगर उताराचं पाणी घेऊन धावणाऱ्या सारणी ओहळांना उतार आले. चिघळलेली रानं घट्ट आली. नेबळून पडल्यालं नाचणं मान वर करून उठून बसलंत. मिटलेली बोंडं उलघडली. हाताच्या पाची बोटागत वाऱ्याच्या झुळकीसंगट नाचू लागली. भुईमुगाच्या शेंगा भरू लागल्या. पिवळ्या तिळाची फुलं कडेनं उमलली. हिरव्यागार पातळावर जरीचा काठ असल्यागत दुरून दिसू लागलं. माळा मुरडातली हावळी भातं घवळायला लागली. ढोरागुरांच्या चाऱ्याला तजेला आला. शिवारात माणसांचा वावर वाढला. पावसाळभर शिणहाळ असणारं शिवार गजबजू लागलं. (पृ.१२)

नदीकाठचा शिवार आठवडाभर पाण्याखाली राहिला. जेचं शेत नदीकाठाला होतं ती माणसं चिमणीगत तोंड करून पाऊस बघतच राहिली. गल्लीबोळातनं चिखल झाला. गावात तापसरी आली तर म्हारोड्यातली माणसं रानावनातला पाला उकडून मिठासंगट खाऊ लागली. कुणाकडं चार दाणं मागतो म्हंटलं तर पाऊस बाहेर पडू देईना झाला.

ऋतुचक्र फिरत निघालं होतं. पीक पाण्यासंगट सणवार, तिथमित करून माणसं आला दिवस गोड मानत होती. बायकांचं भांगलणीतनं डोकं वर नव्हतं. पाण्यात तिरावडं ठेवून रानानं गच्च झालेल्या पातीत बसायचं. इरल्यावर पाऊस झेलत रान ओरबडायचं. पेकाट घाईला यायचं मग मध्यंतरी इरल्याच्या पटाशीत ठेवलेली भाकरी काढून खायाची. तरतरी आली की ओव्या म्हणत पुन्हा भाताची भांगलण सुरू !

बापय गड्यांची सकाळ नदीकाठचं गवात कापून चिखल धुवून आणण्यात खर्ची पडायची. आजून डोंगराच्या पेंडीला अवकाश असायचा. पोरंटारं सकाळ, संध्याकाळी शाळेपूर्वी व शाळा सुटल्यावर गुरं घेऊन गोठणावर जायाची. पाऊस थोडा उघडला की पोरांचं छन्नी-दांडू, गोट्यांचं खेळ चालत. तर पोरींचं बटणांच, लंगडीचं, खड्यांचं खेळ चालत. खेळात पोरं रमत नि गुरं शेजारच्या माळातल्या जित्रापात घुसत. मग त्या शेतकऱ्याच्या शिव्या सुरू. (पृ.१०६)

रानात जिकडंतिकडं लगबग उडाली होती. ज्याच्यापासी कुरी नव्हती ते शेतकरी तिकाटणं मारीत होते. बायका तिकटीवर भात टोकणीत होत्या. डाव्या हातानं माती मागं ओढायची, उजव्या हातानं पाच-सहा दाणं सोडायचं नि परत डाव्या हातानंच माती त्यावर सारायची. तापलेला मातीचा रवा हाताला भाजत होता. बसून पुढं सरकून सरकून कंबार मोडायला झाली होती. किमान चार रोज तरी ऐऱ्यापैऱ्यानं बायकांना भात टोकणायचं होतं. मग दुपारच्याला थोडासा विसावा त्यात भाकर सोडायची. संगतची पोरं कैऱ्या, जांभळाचं

घस तोडून आणायची. तेच्यासोबत जेवण आटपायचं. जरा तंबाखूची राखुंडी काढायची. बापय गडी तनगा लावायचंत. जरा कुठं डोळं लागून सुरसुरी येती तवर शेतमालकाचा कालवा-आरं पांडबाऽ.. आभूळ गरगरलंय उठाऽ उठाऽ.. (पृ.९९) या उदाहरणावरून या कादंबरीचे कृषिजनसंस्कृतीशी असलेले नाते लक्षात येते. या कादंबरीचा समग्र डोलाराच या जीवनधारणेवर आधारलेला आहे. ते या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे.

### ४.९ वारकरी कथनाची प्रभावशीलता

'नांगरमुठी' कादंबरीत वारकरी जीवनाचे चित्रण येते. खरे कोणत्याही खेडेगावात किंवा ग्रामीण जीवनात विठ्ठल हे आराध्य दैवत असते. त्याची भक्ती केली जाते. रोजचा हरिपाठ, पंढरपूरची वारी, अखंड हरिनाम सप्ताह, घराघरात पोथीवाचन, प्रवचन, कीर्तन या गोष्टी ग्रामीण माणसाच्या रोजच्या जगण्यातील अविभाज्य भाग असतात. आपल्या कामतच विठ्ठलाचे निर्गुन निराकार रूप पाहणारा कष्टकरी शेतकरी संतांनी दिलेला भक्तीचा वारसा चालवित असताना दिसून येतो. 'नांगरमुठी' कादंबरीत वारकरी जीवनाचे रूपविशेष आलेले पहावयास मिळतात.

औतेरावच्या घरात विठ्ठलभक्ती असलेली दिसते. औतरावचे वडील हरिपंत हे विठ्ठलाची भक्ती करणारे, गळ्यात माळ घालून नियमित पंढरीचे वारी करणारे वारकरी असतात. हरिपंत मुखामध्ये विठ्ठलाचे नामस्मरण, हरिपाठ, तुकारामांचे अभंग, वारकरी संप्रदायाचे आचारधर्माचं पालन करत कामातही विठ्ठलभक्ती करताना दिसून येतात. गावात प्रत्येक ठिकाणी मदत करण्याची वृत्ती हरिपंताच्या ठिकाणी दिसून येते. 'एकमेका साह्य करू। अवघे धरू सुपंथ' ही शिकवण हरिपंताच्या ठिकाणी दिसून येते. कादंबरीत काही प्रसंगी याची प्रचिती येते. हरिपंताचा नातू तान्या त्यांच्या गळ्यातील माळेशी चाळे करताना माळेसंदर्भात हरिपंताना त्याच्या बालमनाला पडलेले प्रश्न विचारतो. त्याला हरिपंतानी दिलेली उत्तरे पाहता हरिपंतांकडे असणारी वारकरी संप्रदायाची विचारधारा आपल्याला दिसून येते.

''आबाजी तुमच्या गळ्यातली ही माळ कसली''

''तुळशीची माळ. पंढरीच्या पांडुरंगाची.''

''का घालायची आस्तीया ती''

''देव जवळ असावा म्हणून.''

''देव तुमाला दिसला ''

''देव दिसत नाही. जाणावा लागतोय बाळा.''

''म्हणजे''

''तू जसा मोठा होत जाशील तसं समदं कळंल तुला.''

''मग मी बी माळ घालणार!''

''खरं त्यासाठी तुला आजारी माणसागत पत करावी लागणार.''

घरामध्ये, शेतीतील मागंरात पंत तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी सोबत असे. फावल्यावेळी ते त्याचे वाचन करत. 'जेच्या तेच्या कर्मानुसार फळ मिळते.' असा त्यांचा सिद्धांत होता. 'माणसांची वर्दळ कमी झाली की निरव शांततेत पंत गाथा उघडून बसत. आताही त्यांच्या पुढ्यात गाथा उघडलेली होती. ते विचार करी होते. सिंहावलोकर करताना सारं सारं भूतकाळातलं कालपरवा घडल्यागत वाटू लागलं. इतकं ताजं, टवटवीत! गाथेवर आपलं प्रेम कधी जडलं गाथेचे ऋणानुबंध कधीचे त्यांना तरूणपणीचा साधक देशेतील काळ आठवू लागला. गळ्यात तुळशीची माळ होती. असं वाटायचं भगवंताच्या शोधासाठी घरदार सोडावं. त्यांनी निवडलेली भक्तीची वाट ही सूक्ष्म आणि दुस्तर होती.' हरिपंताच्या ठिकाणी प्राणी, पशु, पक्षी यांच्याप्रती भूतदया असते. पक्षांना ते पळसाच्या पानावर भाताची शीतं ठेवत. त्यामुळं त्यांचं शेत हेच पंढरपूर होत असे. पेरणीपूर्वी शेतात बेवळा बांधावर ठेवताना पंत म्हणतात.

''बा पांडुरंगाऽ ह्या जगात फक्त ह्यो भातकुंडा शहाणा! तो आपण स्वतःला मातीत गाडून घेतो नि पन्नासभर दाण्याचं लोंब उभा करतो भुकेल्यांच्यासाठी. हे 'पूर्णब्रह्म' तूच हायीसऽ तूच हायीसऽऽ..'' असं म्हणून पंतांनी माथा बांधावर टेकवला. तेव्हा त्या मातीचा बुक्का नकळत त्यांच्या कपाळी लागला. अशा पद्धतीने शेतीमाती हीच शेतकऱ्यांसाठी पंढरी असते. औतरावरही वडीलांच्या संस्काराचा प्रभाव पडलेला दिसून येतो. औतेरवालाही भजनाचं वेड लागलेलं होतं. कामातून सवड मिळेल तसं तो तुकदेवाकडं मांगरात पेटी वाजवायला शिकायला जात होता. एखादा राग आळवत गुणगुणत शेताभातात फिरत असे. हरिपंतांना त्याचं भारी कौतुक वाटायचं. औतेरावची मुलगी नंदिनी आपला बाबा म्हणत्याला अभंग वहीच्या पानावर उतरून ते पान जेवनाच्या कपाटावर चिकटवायची. मग घरातल्या सगळ्यांना तो अभंग पाठ व्हायचा. या ठिकाणी पंतांच्या सर्व घराने वारकरी संप्रदायाचा भक्ती परंपरेचा वारसा जपलेला दिसून येतो.

माघ महिन्यात नांगरगावमधून पंढरपूरची वारी निघते. हरिपंताची तब्येत साथ देत नसल्याने त्यांनी औतेरावला वारीला जायला सांगितले. पण औतेरावकडे जायला पैसे नव्हते. त्यावेळी साखरू आपल्या जवळचे साठवलेले पैसे देते. औतेरावला आई बाबांबरोबर लहानपणी पंढपूरला गेल्याच्या आठवणी जाग्या होतात. औतेरावबरोबर गावातील रामजी आण्णा, फरसराम, शामा पाटील हे गाडीवानबी पंढरपूरला जायला तयार होतात. वर्षभर ढोरकष्ट. बारमाई पाण्यानं खळाळता पैसा दावून उडवलेली झोप! अगोदर कर्ज काढून त्या ओझ्याखाली चिरडत जगणं. देणेकरी बँकेच्या लागलेल्या जळवा, पोरांचं शिक्षण ह्या सर्व जंजाळातून घडीभर सुटका म्हणजे पंढरीची वारी. त्यामुळे नांगरगावातून स्वतंत्र एस. टी. पंढरपूरला केली जायची.

पंढरपूरला जायच्या आदल्या दिवशी यात्रेकरूंनी तांदूळ, पीठ, तिखट, लाकडं ही सामग्री गोळा केली. तुकदेव, गोपाळबुवा, श्रीधरआण्णा ही मंडळी हरिपंतांचं दर्शन घ्यायला घरी आली. 'राम कृष्ण हरी' म्हणत सगळीजण एकमेकांच्या पाया पडली. आपण वारीला जाणार नाही, पण आपली आठवण ठेवून हे वारकरी घरला आलंत याचा हरिपंतांना खूप आनंद झाला.

''आबाजी तुम्ही आला असता वारीला तर बरं झालं असतं!'' तुकदेव म्हणाला.

''आता वारी तुमी चालवायची. जुनी  पानं गळून पडतील. नवी पालवी येईल. वारी चांद, सूर्य असेपर्यंत चालतच राहील.''

''पंत! काय निरोप सांगायचा विठुरायाला'' श्रीधरआण्णाच्या या प्रश्नाला उत्तर देताना त्यावेळी पंत म्हणाले,

''आयुष्यभर एकनिष्ठ राहून त्याची भक्ती केली असंल म्या तर त्या भगवंतानं एकच मला द्यावं, माझ्या घरात पुत्र-पौत्र अखंड वारी चालावी. येवढंच त्याला सांगा.'' असं विलक्षण मागणं हरिपंत मागतात

माणसं एकमेकांच्या भेटी घेऊन वारीला जातात. वारीचे आठ दिवस कुठल्या कुठे निघून जातात. वारीत औतेराव गळ्यात माळ घालतो. पंताना खूप आनंद होतो. पंढरपूरला जाऊन आल्यानंतर औतेरावची मानसिकताच बदलून जाते. तो म्हणतो, ''पंढरपूरला गेल्यापास्नं मला किडा-मुंगीसुद्धा तुडवू वाटत नाही.'' किंवा ''त्या पांडुरंगाला काळजी. समदं त्येच्या हातात हाय.''

हरिपंताच्या शेवटच्या काळात पंत विठ्ठलाशी एकरूप झालेले दिसतात. ते म्हणतात,

''आता मला बोलवू नका. मी देवाचं नामस्मरण करतो.''

''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारी साधियेल्या

''हरिमुखे म्हणा ऽऽ हरि मुखे म्हणा ऽऽऽ   पुण्याची गणना कोण करी।।''

असे अखंड अडतीस तास हरिपाठ म्हणत असतात. त्यावेळी तुळशीदलातून अधूनमधून गंगाजल सोडलं जात होतं. त्यांचे पंचप्राण गोळा झालेले होते. तरीही त्या पवित्र देहाची पुण्यवंत वाणी देवाचं अखंड नामस्मरण करीतच होती. तुळशीदल, बुक्का तिथं वर्षत होता. हरिपंतांच्या मृत्यूच्या अखेरच्या क्षणाचं कवतिक हाऽऽऽ हा म्हणता साऱ्या पंचक्रोशीत पसरलं होतं. माणसं भारावून बोलत होती,

''इथून मागं माळकरी झाल्यालं ऐकीवात हायीत खरं असं अडतीस तास हरिपाठ म्हणत देवलोकी निघालेला वारकरी पहिल्यांदाच बघितला.'' अंतसमयी भगवंताचं स्मरण करीत जो देह ठेवतो तो भगवंतालाच जाऊन मिळतो. याची अनुभूती सारी पंचक्रोशी घेत होती. पंताच्या देहाला अखेरचं स्नान घातलं. गंधबुक्का लावून तुळसमंजिरींची माला गळ्यात घातली. सुवासिनींनी आरती ओवाळली. तुळशीदलांनी झोकाळलेल्या मृत्यूशय्येवर देह ठेवण्यात आला. खांदेकऱ्यांनी खांदा दिला अन्  पुंडलिक वरदाचा गजर होऊन दिंडी चालली. सारे रूढ संकेत बाजूला ठेवून अंत्ययात्रेचा मार्ग विठ्ठल मंदिराकडे वळवण्यात आली. विठू परमात्म्याचं 'पायवणी' तीर्थ पंतांच्या देहावर शिंपडण्यात आलं. घरादारातून बायका हात जोडत होत्या. दुतर्फा पुष्पवृष्टी सुरू होती. विठुरायाचं दर्शन घेऊन तो महान भक्त अखेरच्या प्रवासाल निघाला. बारा वाटांनी वाहात येणारे पाण्याचे ओग नदीत मिसळावे तशी माणसं त्या अंतयात्रेत सामील होत होती. नांगरगाव एका पुण्यपुरुषाला कायमचं अंतरलं होतं.

अशा विविध घटना प्रसंगामधून आणि व्यक्तिचित्रांमधून वारकरी कथानाची प्रभावशीलता कादंबरीभर व्यापून राहिलेली दिसते.

### ४.१० भाषाविशेष

साहित्याची भाषा व्याकरणिक नियमांनी साचेबद्ध नसते; तर ती संस्कारित असते. साहित्यिक ज्या समाजात, वर्गात जन्मास आला त्या समाजवर्गातले संस्कार घेत जाणत्या वयापर्यंत वाढत असतो. कळत नकळत संस्कारक्षम वयामध्ये कानावर पडणारी भाषा, त्यातले उच्चार यांचा ठसा त्याच्या मनावर ठसलेला असतो. हा ठसा त्याने पुढे लिहिलेल्या साहित्याकृतीमध्ये चित्रणाच्या ओघात, निवेदनातून डोकावतो. अगर पात्रांच्या संवादातून स्पष्टपणे दिसतो. जी भाषा त्याच्या कानावर पडत असते; त्या भाषेतील शब्दांचे उच्चारण, पदांची लय आणि ज्या व्यक्तीच्या मुखातून त्याने ऐकलेली असते त्याच्या उच्चारणाचे अनुकरणीय रूप ही सारी गुणवागुण वैशिष्ट्ये घेऊनच ती साहित्यात उतरत असते. कारण तशाप्रकारचा भाषिक संस्कार त्याच्या स्मरणामध्ये संचितासारखा असतो. लेखक निवेदनासाठी प्रमाणभाषा तर संवाद मात्र बोलीभाषेत असतात. तर काही साहित्यकृतीमध्ये संपूर्ण बोलीभाषेचा वापर केलेला दिसतो.

'नांगरमुठी' कादंबरीच्या भाषेबद्दल विचार करताना असे दिसते भाषेतील वैविध्यता कादंबरीत दिसून येते. लेखकाने निवेदानासाठी प्रमाणभाषा तर संवादासाठी बोलीभाषेचा वापर केला आहे. कादंबरीतील निवेदन हे ओघवते आणि सहज आले आहे. निवेदनाच्या माध्यमातून लेखक कथानकातील घटना प्रसंगांना एक प्रकारे पृष्ठभूमी तयार करतो असे दिसते. यासाठी कादंबरीतील काही उतारे पाहू.

'चार वर्षे झाली. दूधगंगेच्या कालव्याचं काम रेंगाळलं होतं. आता चेनची पोकलैंड, मोठ्ठाले डोजर, डंपर काम करू लागले. ड्रिल मशीननं होल मारून काळ्या पाषाणात सुरुंग पेटू लागले आणि त्या धडाक्यानं डोंगराचा तळ हालू लागला.

कालव्यासकट धरण मंजूर व्हावं म्हणून जिल्ह्याच्या पुढाऱ्यांनी शासनाला गळ घातली होती. त्यांना तिकडं आपल्या भागात पाणी न्यायचं होतं. आपलं राजकारण साधायचं होतं. पण इकडं धरणाच्या पाणीसाठ्यामुळे बरीच गावं उठली होती. कालव्यात बऱ्याच अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी जाऊन ते भूमिहीन झाले होते. ह्या लोकांचं पुनर्वसन योग्य रीतीनं होणं जरुरीचं होतं. पण त्यासाठीचे प्रयत्न अपुरे पडत होते. कुठल्यातरी गावात बरड जमिनी घेऊन अगदी निर्वासितांचे हलाखीचं जगणं त्यांच्या वाट्याला आलं होतं.

डोंगरमाळात पाणी ज्याच्या शेताला मिळणार होतं तो शेतकरी खूश झाला होता. अशी दोन्ही बाजूनं बरीच उलथापालथ होऊ घातली होती.'(पृ.११४)

'साखरू घरात आली. तान्या शाळेस्नं येऊन पाटी, दप्तर जात्याला टाकून बाहेर खेळायला गेलं होतं. रखमा दार ओढून शेजारी कुठंतरी बसायला गेली होती. साखरू गोठ्यात गेली. शेणाची रवंदळ निरपिली.

डोणीतलं मुतू उपसून टाकलं नि हात, पाय धुवून धारेला आली. म्हशीची धार काढायची म्हणजे पुढ्यात सूळ उभा असल्यागत वाटू लागलं. यून चार दिवस झालंत. धारच सरळ द्यायची नाही. आताही साखरू धारेला बसली. कासेवर पाणी मारलं तशी धडाधड लाथा मारू लागली. तरीही कशीबशी कास धुतली. थान धरलं ते सोडायलाच नाही. खाडखाड करीत गोऱ्हणीत गेली. उठून हाकलली. पुन्हा धारेला बसली. तांब्यात चूळ पडती का नाही तर जे लाथ मारली ते तांब्या खणाणा करीत गडगडत गेला.' (पृ.१३)

वरील दोन्ही उतारे पाहिले तर पहिल्या उताऱ्यामध्ये निवेदनासाठी प्रमाणभाषेचा वापर केलेला दिसून येतो. तर दुसरा उतारा जरी प्रमाणभाषेत असला तरी बोलीतील शब्द आलेले दिसून येतात. जसे की शाळेस्न, यून, शेणाची रवंदळ निरपिली सारखी शब्द रचना बोलीतील असलेली दिसून येते.

कादंबरीत येणारे संवाद हे संपूर्णपणे बोलीभाषेतील आहेत. बोलीचा एक वेगळा साज संवादाना असलेला दिसतो. रानबा आणि हरिपंतामधील हा संवाद पाहता येईल.

''आबाजी! खळं काढायचं, आमाला बलिवशीला का न्हाई''

''केवढं काम म्हटलं कशाला कुणाला बलवायचं!''

''अहो तसं नव्हं. आमी संगतीची माणसं हाव. धा गेली करायला नि याक गेलं मरायला. शेताची कामं हुबलाक म्हणून म्हणायचं.'' (पृ.१२) या संवादामध्ये बलिवशीला, न्हाई, नव्हं, हाव, हुबलाक यासारखे शब्दामुळे संवाद अधिक जिवंत वाटतात. हे कादंबरीतील भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कादंबरीतध्ये अनेक ठिकाणी याची प्रचिती येते.

तसेच कादंबरीमधील घटना, प्रसंगाना चित्रमय पद्धतीने वाचकांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य भाषेत असलेले दिसून येते. कादंबरीत कृषिजीवनाचे अनेक संदर्भ येतात. घटना येतात. प्रसंग येतात. पेरणी, कापणी, मळणी प्रसंग वाचल्यानंतर ते वाचकासमोर जसेच्या जसे उभे राहतात. हे भाषेचे मोठे सामर्थ्य दिसून येते. कुसावरील बेतलेला प्रसंग वाचकांच्या अस्वस्थय करतो. हे पाटील यांच्या भाषेमुळे. असे कितीतरी घटना प्रसंग भाषेमुळे अधिक सकस बनले आहेत.

### ४.११ शब्दयोजना

'नांगरमुठी' कादंबरीत लक्षणीय अशा स्वरूपाची शब्दयोजना आली आहे. ही शब्दयोजना कृषिजीवनाशी, ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. या कादंबरीतील शब्दविशेषांमुळे लेखकाने एक एक दृष्यचित्र रेखाटले आहे. कादंबरीतील अनुभवद्रव्याला ही शब्दरूपे ठाशीव आकार देतात. कृषीजीवनाचे, शेतीमातीचे चित्रण करण्यासाठी कादंबरीत आलेली शब्दरूपे पोषक ठरली आहेत. तसेच काही शब्दरूपे ही ग्रामीण जीवनातून नाहीशी होण्याच्या मार्गावर आहेत, ती कादंबरीत आलेली आहेत. बोलीभाषेतील शब्दरूपांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर या कादंबरीत पहावयास मिळतो. ही शब्दरूपे लक्ष वेधून घेतात. शेतीशी

निगडीत असणारी अनेक शब्दरूपे आलेली आहेत. त्यामध्ये भरताड, येलगटलंत, लवांडल्यालं, खरपाड, कडूस, चुंबळीवर, शिणहाळ, उस्तवार, तिवडा, गोऱ्हण, इळाभरानं, मांगोर, पैरकरी, दात्र्या, कडाणी, घुताडं, कुडपू, व्हरपाय, तळझाडणी, मळणी, तिरावडं, इरलं, तिकाटणं, भाताची कडळ, नाचण्याचं गोंडाण, भाताच्या कवळ्या, उन्हाचा डोम, उलागणे, आकडी, मातेरं निवडणे, घोंघाणं, मेतुंडा, बांध ढाणणे, गुदस्ता, व्हयकारणी, भुईंब यासारख्या अनेक शब्दरूपांमुळे शेतीमातीचा ग्रामीण जीवनातील अवकाश सजीव करतात.

विशेषणांचा वापरही कादंबरीत काहीसा निराळा आला आहे. आडदानी, फकानं मारणे, दोन नेटाक शिपणी, नेबळून पडल्यालं, शेणाची रवंदळ निरपली, येंगत मावणारं, येवसरी, टपाकलंत, नवीच्यान, शिवकुळा येणे, पुदालकी, रूदावा, खुरमुंडी, मुटकाळ, झुळाकणे, डेंगणे, उळ्ळी करणे, तिरजा उसळणे, खेकटी अंगावर घेणे, निकारड्यावर, तातडं येणे, झुटुकबावल्या घालणे, मटमाया झाली, हातपाय नेबाळलं, वादुऱ्या उडत्यात, आचिटात पडणे, हालगुमालगु करणे, पिऊन ल्हास पडणे, माणसाचं रिवाण फुललं, ह्येच्या भना, आरं त्येच्या मारीऽऽ यासारख्या शब्दरूपामुळे अर्थाचे थेट वहन तर होतेच शिवाय कादंबरीतील प्रसंग वाचनीयही झाले आहेत. पाऊस कुडपीत होता. उन कावदारू लागलं, आभुळ काळवांडलं होतं,आभुळ टवकारलं होते, आभुळ घडघडाय लागलं होतं, आभाळात खेंडार पडू लागलं अशा रचनेमुळे ग्रामीण भागात या पावसाच्या विविध रूपाची कल्पना वाचकाला येते. याबरोबरच म्हणी, वाक्प्रचार, शिव्या यांचा वापरही कादंबरीत झाला आहे.

### ४.१२ 'नांगरमुठी' तील बोलीरूपे

ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये बोलीभाषा वापरणे ही एक महत्त्वपूर्ण आणि नैसर्गिक प्रक्रिया आहे. ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये, ग्रामीण भागातील जीवनशैली आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बोलीभाषा वापरली जाते. या बोलीभाषांमुळे कादंबऱ्या अधिक वास्तव आणि आकर्षक वाटतात. बोलीभाषा ही ग्रामीण संस्कृतीचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. बोलीभाषा ही त्या प्रदेशातील दैनंदिन जीवनाची व्यवहाराची भाषा असते. बोलीभाषेतील शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचा वापर ग्रामीण कथात्म साहित्यात आवर्जुन येतो. त्यामुळे वास्तवजीवनाचे चित्रण होऊन वातावरण निर्मितीस मदत होते. साहित्यात येणारी बोलीभाषा ही केवळ भाषा म्हणून येत नाही तर ती त्या प्रदेशातील संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली दर्शवते. मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करता, व्यंकटेश माडगुळकरांची 'बनगरवाडी', रा. रं. बोराडे यांची ''पाचोळा' उद्धव शेळके यांची 'धग' ही यासंदर्भातील उत्तम उदाहरणे आहेत. शिवाय अण्णाभाऊसाठे यांचे कथात्म साहित्य, आनंद यादव यांचे साहित्य, कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्या इत्यादी साहित्यिकांच्या लेखनामधून सशक्तपणे बोलीभाषेचा वापर झालेला दिसून येतो.

पांडुरंग पाटील यांनी 'नांगरमुठी' कादंबरीत निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि पात्रं चित्रण करताना, पात्रांच्या संवादासाठी बोलीभाषेचा वापर केला आहे. 'नांगरमुठी' कादंबरीत प्रामुख्याने कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी परिसरातील बोलीची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. 'नांगरमुठी' कादंबरी ही प्रामुख्याने

ग्रामीण जीवनातील कृषीजीवनाचे चित्रण करणारी असल्याने या ग्रामीण भागातील कृषी संस्कृती आणि जीवन याला अनुरूप अशी बोली कादंबरीत आली आहे. ती पात्रांच्या संवादामध्ये दिसून येते. औतेराव भाताच्या मळणीसाठी गावातील गडी गोळा करत असतो. तो संवाद पाहता येईल. त्यामध्ये बोलीभाषेचे अनेक विशेष दिसून येतात.

किस्ना औतेरावाचा सवंगडी. दोघं एकाच वगार्तलं. आजूनही दोस्ती तुटलेली नव्हती. लेझीम मंडळात हालगी वाजवायला नेमानं यायचं. दारावर जोरात कडी वाजाय लागली तसं आतनं भकंतच दार उघडून बाहीर आलं,

का वंड घाईला आलंय?

कडूऽ लबाड बोलतंस नि माझ्यावर गुरगुरतंस? बुकलीनऽऽ! किस्नानं पोतं खांद्यावर मारलं नि पाठोपाठ चालला.

मर्दा! पैरेकरी वाजवीत आस्तील. तक्क्यात कोण गावंल?

कापला तर गावाला सपायचा नाहीस. कसला भित्तोस मळणीला? चल गपवानी. किस्नानं दोस्ताला फुडं घातला. दोघं घरात आलं. औतेरावानं घरातनं बैलं सोडली. किस्नानं कासरं हातात घेतलं नि गल्लीतनं बैलं पळवीत निघाला. छळाम् छळाम्ऽ छळाम्ऽऽ नाद करीत बैलं उधळलीत. औतेराव त्याला आवरत म्हणाला,

''आरं लेकाच्या माणसं झोपल्याली हायीत. शिस्तीत चलऽऽ''

''माप झोपतील. झोपायचं दिवस व्हय हे? किस्ना.''

बैलं खळ्यावर यायला घुत्ताडाचा एक फेर वडून झालता. औतेरावानं रुळ जुपला. कडंचा येडा मारून झाल्यावर किस्नानं पात धरली. (पृ.२४).

हरिपंताची बायको रखमा आणि कुसा यांच्यातील आणखी एक संवाद पाहू.

''कुसे ऐकू इना व्हय गं? हालग्या शिंगांचं वाजाप लागतंय बलवायला!''

मग त्या बायका आल्या. औतेरावानं बांधावरच्या केळीचं पान कापून तुकडं केलं. त्यावर प्रत्येकीला भात, आमटी, पोळी, कानुल्याचा प्रसाद वाढून दिला. पण त्यांनी तो खाल्ला नाही. त्यांच्या तोंडात घरातली पोरंटारं आडकल्याली. पदरात बांधून घेतला.

''कुसे औंदा सुगीला केवढं भात गोळा केलंसा गं?''

''झालं की दोन पोती आत्तीसाब! मालक म्हणीतं रखमानानीचं भात तेवढं घाल म्हणून. त्यास्नी लावून देतो सांजच्याला.''

एवढं बोलताना कुसा उपकाराच्या वझ्याखाली गाऊन नरमाईचं बोलणं बोलत होती. रखमाच्या ध्यानात ती गोष्ट आली. तशी ती म्हणाली,

''माणसानं जाणीव ठिवली त्यात आलं. नको गं बाई तुझं भात. आसं गोळा करून घरावर सोन्याच्या खापऱ्या घातल्या असत्या. तुझी पोरं जेवली त्यात समदं आलं.''

''तुमी रागाला आलासा म्हणीत हुतं मालक!''

''कामाधंद्यासाठी माणूस रागामागानं बोलतंय एखादयेळी म्हणून काय एवढं मनाव घ्याचं आस्तंय? जगल वाचल ते बघिल फुडली भुईंब! माणसाचा जलम पुना न्हाई!''

''तुमाला दहा वरसं काय सुदीक हुनार न्हाईऽऽ... कुसा म्हणाली. (पृ.४३-४४)''

उदाहरणादाखल घेतलेल्या दोन्ही संवादामधून ग्रामीण बोलीचे स्वरूप लक्षात येते. दोन्ही संवादामध्ये ग्रामीण बोलीतील शब्दरचना पहावयास मिळते. कडूऽ लबाड बोलतंस नि माझ्यावर गुरगुरतंस? बुकलीनऽऽ!, कुसे ऐकू इना व्हय गं? हालग्या शिंगांचं वाजाप लागतंय बलवायला!

सारख्या वाक्यामधून आलेली शब्दरूपे बोलीची सहजता आविष्कृत होताना दिसून येते. ग्रामीण माणसाचा रोखठोक व्यवहार वरील अवतरणात आलेला पहावयास मिळतो. याबरोबरच कादंबरीत अनेक ठिकाणी बोलीतील म्हणी, वाक्प्रचार आलेले आहेत.

### ४.१४ समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार केला. हा विचार करताना कादंबरीतील कथनव्यवस्था आणि कादंबरीतील भाषा कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे याचा सविस्तर धांडोळा घेतला. प्रस्तुत कादंबरीत लेखकाने कथन आणि भाषेच्या आधारे कादंबरीतील सबंध आशयव्यवहार नेमकेपणाने साकारला आहे असे दिसून येते. कादंबरीतील आशयाचे स्वरूप व्यामिश्र नाही. सरळ साध्या सोप्या भाषेतून आणि कथनातून औतेरावच्या कुटुंबाचा जीवनप्रवास लेखकाने चित्रित केला आहे. ग्रामीण भागातील वास्तव तपशीलांची सूत्रबद्ध मांडणी लेखकाने कादंबरीत केलेली आहे. कादंबरीतील कालावकाशाचा विचार, संवादात्मकता, दृश्यात्मकता सारखी कथनशैली कादंबरीतल आशयाला अधिक परिणामकारक बनवते. कादंबरीतील भाषिक व्यवहार हा कादंबरीतील घटना प्रसंगाच्या ओघाने सहज आलेला आहे. ग्रामीण बोलीचा वापर, बोलीतील शब्द, छोटी छोटी वाक्यरचना यामुळे कादंबरी ग्रामीण जीवनाचे, कृषिजाणिवांचा वेधक असा आविष्कार घडविते. अशा अनेक गुणविशेषांमुळे ही कादंबरी लक्षणीय ठरते.

### ४.१५ स्वाध्याय

योग्य पर्याय निवडा.

१. ‘नांगरमुठी’ कादंबरी कोणत्या वर्षी प्रकाशित झाली.

अ) २०२२ ब) २०२१

क) २०२४ ड)२०२५

२. हणमाने मुंबईत दोन खोल्या कोणत्या ठिकाणी घेतल्या होत्या

अ) परेल ब) दादर

क) विले पार्ले ड) घोडबंदर

३. वामन गुरव कोणत्या खात्यातून रिटायर झाला होता

अ) एस.टी महामंडळ ब) शिक्षण खाते

क) जिल्हा परिषद ड) एम.एस.सी.बी

४. औतेरावचे गाडीवान मित्र बैल घेण्यासाठी किती पैसे देतात.

अ) वीस हजार ब) पंधरा हजार

क) दहा हजार ड) पाच हजार

५. सरवड्याचा बाजार कोणत्या दिवशी भरत असे.

अ) रविवार ब) मंगळवार

क) शुक्रवार ड) बुधवार

६. हणमंताची मुलगी वैजयंताला लग्नासाठी कोणत्या गावचं स्थळ आलं होतं.

अ) मुरगूड ब) दारवाड

क) सरवडे ड) वाघापूर

७. गणपा बारड ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवार कोणत्या वार्डातून उभा राहिला होता.

अ) एक नंबरच्या ब) दोन नंबरच्या

क) तीन नंबरच्या ड) चार नंबरच्या

८. औतेरावने बैलगाडी कोनाकडून बनवून घेतली होती.

अ) आंदू सुतार ब) रामा सुतार

क) भिवा सुतार ड) धोंडबा सुतार

९. हरिपंताचा भाऊ हाणमाच्या मुलगीचं नाव काय आहे.

अ) नंदीनी    ब) वैजयंता

क) भागु    ड) संगिता

१०. 'नांगरमुठी' कादंबरी कोणत्या प्रकाशनाने प्रकाशित केली आहे.

अ) दर्या प्रकाशन    ब) मौज प्रकाशन

क) मनोविकास प्रकाशन    ड) पॉप्युलर प्रकाशन

उत्तरे- १. क) २०२४ २. अ) परेल ३. ड) एम.एस.सी.बी ४. क) दहा हजार ५. क) शुक्रवार ६. ड) वाघापूर ७. अ) एक नंबरच्या ८. अ) आंदू सुतार ९. ब) वैजयंता १०. अ) दर्या प्रकाशन

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. नांगरमुठी कादंबरीतील कथनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. नांगरमुठी कादंबरीतील परिसरभाषेचे स्वरूप उलगडून दाखवा.

३. नांगरमुठी कादंबरीतील येणारे शेतीसंस्कृतीचे कथन सांगा.

४. नांगरमुठी कादंबरीच्या आधारे भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

५. नांगरमुठी कादंबरी येणाऱ्या वारकरी रूपविशेषाचा आढावा घ्या.

**पुरक वाचन**

१. पाटील, पांडुरंग, नांगरमुठी, दर्या प्रकाशन, पुणे, २०२४.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. थोरात, हरिश्चंद्रः निवेदक-कथात्म साहित्य, मराठी वाङ्मयकोश, खंड ४, विजया राज्याध्यक्ष (संपा.) महाराष्ट्र राज्य संस्कृती आणि साहित्य मंडळ, मुंबई,२००२

२. नेमाडे, भालचंद्र : साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७ अ.)दर्या प्रकाशन

३. कोत्तापले नागनाथः साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे

४. ठाकूर, रवींद्र : मराठी ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१३.

५. खोले, विलास(संपा.)ः गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००२

◆◆◆